UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**राज्यात वाळू माफियांकडून अवैधरित्या वाळूचा मोठया प्रमाणात होत असलेला उपसा**

**(1) * ४१४२ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील विशेषतः अकोला जिल्ह्यातील पिंजर परिसरातील खेर्डा (भागाई) निंबी, दोनद मोरगांव, (काकड) राहीत, पिंजर्डा नदी पात्रातून, ठाणे जिल्ह्यातील नदीपात्रांमध्ये तसेच, खाडीमध्ये व मौजे चळे-सुस्ते (ता.पंढरपूर,जि.सोलापूर) येथील भीमा नदीतून बेकायदा वाळू उपसा होत असून रेतीमाफिया विरोधात मेरीटाईम बोर्डाने कारवाई करण्याबाबतचे आदेश राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरणाने दिले असता त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे तसेच वाळू उपसा रोखण्यासाठी गेलेल्या महसूल कर्मचाऱ्यांवर वाळू माफियांनी टिपर अंगावर घालून कर्मचाऱ्यांस मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास वाळू माफियांकडून शासनाचा दररोजचा लाखो रूपयांचा महसूल बुडविला जात आहे हे ही खरे आहे काय
(3) असल्यास वाळूमाफियांची तस्करी रोखण्यासाठी दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ रोजी भरारी पथकांची नेमणूक करूनही महसूल विभागाच्या डोळयात धूळ फेकून वाळू माफिया रात्री-बेरात्री वाळूचे उत्खनन करीत आहेत, हे ही खरी आहे काय,
(4) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(5) तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(6) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (2), (3), (4), (5) व (६) राज्यातील विविध भागात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीची अनेक प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. गौण खनिजाचे अनधिकृत उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत.

अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यात सन २०१४-२०१५ मध्ये गौण खनिजाची अवैध

वाहतूक करणा-या ४२ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन, रुपये ३,६०,१००/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

...2



ता.प्र.क्र.4142....
श्री.एकनाथराव खडसे...

ठाणे जिल्ह्यात सन २०१४-२०१५ मध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ७४५ प्रकरणात रुपये १,६६,३४,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यात सन २०१४-२०१५ मध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ५ प्रकरणांत रुपये ५,२५,२००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

अमरावती जिल्ह्यातील मौजा भातकुली येथे दिनांक २९/१२/२०१४ रोजी अवैध रेती वाहतूक करीत असलेल्या ट्रॅक्टरवर कारवाई करतांना संबंधित वाहन मालक यांनी नायब तहसिलदार भातकुली व तलाठी, अंतापूर यांना मारहाण केली व जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता. सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द भातकुली पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने ३ व्यक्तींना अटक करण्यात आलेली असून, आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, खंडपीठ पुणे येथे दाखल अर्ज क्रमांक ३४ (THC) २०१३ (WZ) (आवाज फाऊंडेशन व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) मध्ये मा.न्यायाधिकरणाने दिनांक २९.५.२०१४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रात नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती उत्खननाचे धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, वाळू माफियांसंबंधी या सभागृहात चर्चा झाली होती. पण पाहिजे तसा फरक अद्याप पर्यंत वाळू माफियांमध्ये पडलेला नाही. येथे शासनातर्फे सविस्तर उत्तर देण्यात आले आहे. या उत्तरामध्ये दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. वाळू माफियांनी तहसीलादाराना जीवे मारण्याचा प्रयत्न देखील केला आहे. असे असताना वाळू माफियांवर शासनाने जरब बसवायला पाहिजे होती ती बसविलेली नाही. शासनातर्फे दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. मात्र, फौजदारी कारवाई करण्यात येत नाही. ती आपण केली पाहिजे. अवैध वृक्ष तोडीला प्रतिबंध करण्यासाठी वन विभागाचे नाके असतात. त्याच प्रमाणे वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रक वर लक्ष ठेवण्यासाठी आपण तपासणी नाके निर्माण केले तर त्यावर काही प्रतिबंध बसू शकेल असे मला वाटते. तेव्हा याचा शासन विचार करणार आहे काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. वाळू माफियांकडे हरामाचा भरपूर पैसा असतो. त्यामुळे दंडाची रक्कम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4142..

प्रा.जोगेंद्र कवाडे....

भरून ते मोकळे होतात. या सोबतच त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली तर निश्चितपणे हे जे गैरप्रकार चालत आहेत त्याला आळा बसू शकेल. आज शासकीय अधिकाऱ्यांवर हात उचलण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यास देखील निश्चितपणे प्रतिबंध बसू शकेल. तेव्हा यासंबंधी देखील शासन काही निश्चित कारवाई करणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे सरांनी जी चिंता व्यक्त केली आहे ती खरी आहे. वारंवार उपाययोजना करून सुद्धा वाळू माफियांवर नियंत्रण आणण्यामध्ये शासनाला अजून पर्यंत पूर्णपणे यश आलेले नाही. वाळू माफियांच्या विरोधात शासनाच्या वेगवेगळ्या यंत्रणांमार्फत कारवाई करण्याची आवश्यकता आहे. यात निव्वळ महसूल विभागाचा नव्हे तर, पोलीस, परिवहन विभाग, खनिकर्म विभाग, पर्यावरण विभाग यांचा देखील संबंध येतो. यात केवळ महसूल विभागाची भूमिका स्पष्ट असून भागणार नाही तर आता सांगितलेल्या सर्व विभागांचे देखील सहकार्य असणे आवश्यक आहे. त्यासाठी आता राज्य सरकार कायद्यामध्ये बदल करण्याचा विचार करीत आहे. आताच्या अस्तित्वात असलेल्या कायद्यात त्रुटी आहेत. महसूल विभाग अवैध वाळू संबंधात फक्त दंडात्मक कारवाई करू शकतो. फार झाले तर वाळू वाहून नेणारे वाहन महसूल विभाग जप्त करू शकतो. परंतु, वाळू उत्खननासाठी वापरण्यात येणारे यंत्र, जेसीबी मशीन, पंप ही साधनसामुग्री जप्त करण्याचे अधिकार महसूल विभागाला नाहीत. तो अधिकार पोलीस विभागाला आहे. यामध्ये पोलिसांकडून देखील बऱ्याच वेळा टाळाटाळ केली जाते. पोलिसांचे म्हणणे असते की, पर्यावरण विभागाचे प्रमाणपत्र असल्यामुळे पर्यावरणाचा भंग झाला आहे असे सिद्ध होत नसल्यामुळे आम्ही पुढची कारवाई करू शकत नाही. या सर्व त्रुटी दूर करण्यासाठी आम्ही एक समिती नियुक्त केली होती. त्या माध्यमातून नवीन वाळू धोरण आणण्याचे सरकारच्या विचाराधीन आहे. सध्या हे वाळू धोरण हरित न्यायाधिकरण यांच्याकडे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4142....

श्री.एकनाथराव खडसे...

विचाराधीन आहे. त्यांची अनुमती आल्यानंतर शासन निश्चित कारवाई करणार आहे. यात अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केला असेल तर त्यांच्या विरुद्ध देखील कठोर कारवाई करण्याचे तसेच वाळू माफियांविरोधात देखील एमपीडीए सारखा कायदा लागू करण्याची तरतूद नवीन कायद्यामध्ये प्रस्तावित करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. या वर्षी पासून आपण स्मॅड प्रणाली विकसित केली आहे. ही प्रणाली उपग्रहांशी जोडलेली आहे. या द्वारे किती ई लिलाव झाला, संबंधिताला किती वाळू उचलण्यास अनुमती दिली आहे, त्याला किती खोलपर्यंत उत्खनन करण्यास अनुमती दिली आहे, हे जाणून घेता येणार आहे. यासाठी तेथे सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. वाळू ट्रकमध्ये टाकल्यानंतर तो ट्रक कायदेशीरपणे वाळूची वाहतूक करतो की बेकायदेशीर वाहतूक करतोय हे देखील त्या ट्रकच्या नंबरद्वारे माहीत होणार आहे. त्या ट्रकच्या नंबर बरोबर शासनाचा टोल नंबर आपण मोबाईलमध्ये फिड केला तर आपल्याला लगेचच तो ट्रक कायदेशीर वाहतूक करतोय की बेकायदेशीर वाहतूक करतोय हे लक्षात येईल. या प्रणालीद्वारे कोणत्याही नागरिकाला त्यासंबंधातील माहिती मिळू शकेल. शासनाने या वर्षीपासून स्मॅड प्रणाली काही ठिकाणी लागू केली आहे. त्यात काही त्रुटी आहेत त्या दूर करण्याचा शासनाचा प्रयत्न सुरू आहे. या माध्यमातून शासन वाळू माफियांवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करीत आहे. तसेच, नवीन कायदा आल्यानंतर यावर निश्चितपणे आळा बसू शकेल असे मला वाटते.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, वाळूला पर्याय सुचविणे याबाबत शासनाने नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल शासनास सादर झाला आहे. सदर अहवाल शासनास सादर होऊन तत्संबंधी शासनाने आता पर्यंत कोणती कारवाई केली आहे, असा माझा पहिला प्रश्न आहे. मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, खंडपीठ पुणे यांनी दिनांक 29.5.2014 रोजी आदेश देऊन आता जवळ जवळ एक वर्षे पूर्ण होत आलेले आहे. तरी देखील अद्याप पर्यंत

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4142..

कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तत्संबंधात कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? माननीय न्यायाधिकरणाने आदेशित केल्या प्रमाणे नौका नयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू उत्खननाचे धोरण बनविण्यात येणार आहे. सध्याच्या धोरणामध्ये वाळू उत्खननाचा ठेका निविदा पद्धतीने देण्यात येत आहे. याबाबत शासन वेगळे धोरण अवलंबिणार आहे काय ? शासन ई लिलाव पद्धतीचा अवलंब करणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी शेवटच्या प्रश्नाचे उत्तर आधी देतो. यासंबंधी पुण्यातील हरित न्यायाधिकरणाने काही सूचना केल्या आहेत. त्यांनी मेरीटाईम बोर्डाकडे काही कार्यभार दिलेला आहे. त्या संबंधातील धोरण विचाराधीन आहे. हरित न्यायाधिकरणाने वाळू धोरणाला मान्यता द्यावी या प्रयत्नात आम्ही आहोत. त्यांनी काही त्रुटी दूर करण्यास सांगितल्या होत्या त्या आम्ही शासनाच्या माध्यमातून दूर केल्या आहेत. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे या जिल्ह्यांमध्ये जेथे समुद्र किनारा आहे तेथे वाळू उत्खननाला सध्या तरी बंदी आहे. यासंबंधी उच्च न्यायालय व हरित प्राधिकरणाने एक आदेश दिला होता की, सरकारने समुद्रातील वाळू संबंधातील धोरण निश्चित करावे. या बाबतीतील तपासणी मेरीटाईम बोर्ड यांच्या मार्फत करावी असे त्यांनी सुचविले होते. त्याप्रमाणे त्यांच्याकडे ही जबाबदारी देण्यात आली होती. जहाजाच्या चॅनेलचे खोलीकरण करण्याचे काम त्यांच्याकडे देण्यात आले होते. ज्या ठिकाणाहून वाळू उचलली आहे ती त्यांनी पाचशे मीटर पेक्षा लांब अंतरावर ठेवून लिलाव करावा अशा प्रकारच्या सूचना दिल्या होत्या. वाळू धोरण निश्चित झाल्यानंतर वाळूचा ई-लिलाव करण्याचा शासनाचा मानस राहणार आहे. या पुढे ई- लिलाव पद्धतीनेच लिलाव करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4142....

श्री. एकनाथराव खडसे .....

समुद्राची वाळू सोडून तलावातील किंवा धरणातील वाळू काढण्याच्या संदर्भात तसेच गाळ मिश्रित वाळू काढण्याच्या संदर्भात राज्यसरकार धोरण तयार करीत आहे. वाळूच्या संदर्भात लोकांची गैरसोय दूर झाली पाहिजे तसेच बांधकामाला स्वस्त दराने वाळू उपलब्ध झाली पाहिजे, वाळू माफियांचा बंदोबस्त झाला पाहिजे यासाठी शासन कडक कायदा करणार आहे.

सभापती महोदय, कृत्रिम वाळू तयार करण्याच्या संदर्भात अहवाल अद्याप राज्य सरकारला प्राप्त झालेला नाही. ज्या ठिकाणी दगडखाणी आहेत तेथील दगड क्रश करुन त्याची वाळू तयार करुन ही वाळू किती उपयोगात येईल, त्या वाळूची क्षमता किती राहील यासंदर्भात तपासणी केली जात आहे. क्रश केलेल्या वाळूची क्षमता ओरिजनल वाळू इतकी राहील की, नाही यासंदर्भातील जो तांत्रिक अहवाल आहे तो अद्यापि शासनाला प्राप्त झालेला नाही. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करुन निष्कर्ष जाहीर केले जातील.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, वाळूच्या प्रश्नाच्या संदर्भात मंत्री महोदय या अधिवेशनात चौथ्यांदा उत्तर देत आहेत. राज्य शासनाने वाळूच्या संदर्भात जाहीर केलेल्या धोरणामुळे आमचे समाधान झाले होते. राज्य सरकारने वाळूच्या संदर्भात धोरण जाहीर केल्यानंतरही या राज्यातील अनेक ठिकाणी तहसीलदारांवर, तलाठयांवर वाळू माफियांनी हल्ले केलेले आहेत. त्यामुळे या वाळू माफियांच्या संदर्भात राज्य शासन हे अधिवेशन संपण्याच्या आत बिल आणणार आहे काय ? किंवा हे अधिवेशन संपल्याबरोबर यासंदर्भात राज्य शासन वटहुकूम जारी करणार आहे काय ? कायदा करताना काही अपुरेपणा राहिला तर ज्यावेळेला बिल सभागृहापुढे मांडले जाते त्यावेळेला त्या बिलामध्ये दुरूस्ती करता येऊ शकते. त्यामुळे वाळूच्या संदर्भातील कायदा याच अधिवेशनात आणून त्यामध्ये आपल्याला जी काही दुरूस्ती करावयाची असेल ती करावी अशी माझी सूचना आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना माननीय महसूल मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. परंतु छोटया नाल्यांमध्ये 500 मीटर पर्यंत वाळू काढली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये लबाडी होणार आहे. वाळू माफिया वाळूच्या

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4142....

श्री.जयंत पाटील .....

संदर्भातील कायदा लवकर होऊ नये म्हणून फाईल्स अडवण्याचे काम करतील हे मी या ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो. त्यामुळे शासन वाळू माफियांच्या संदर्भात याच अधिवेशनात कायदा आणणार आहे काय?

सभापती महोदय, कृत्रीम वाळू तयार करण्याची काही आवश्यकता नाही. आपल्याला वाळू हवी असेल तर वाळू राजस्थानमधून किंवा परदेशातून सुध्दा आणता येते. आता आपल्याला ज्या दराने वाळू मिळते त्यापेक्षा 1 किंवा 2 हजार रुपये प्रति ब्रासच्या मागे आयात केलेल्या वाळूला जास्त दर द्यावे लागणार आहे. त्यामुळे आयात वाळूच्या संदर्भात शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे अशी माझी सूचना आहे. चांगली वाळू असेल तरच बांधकाम चांगले होऊ शकते. परंतु मुंबईमध्ये आता माती मीश्रीत वाळू वापरली जात असल्यामुळे निकृष्ट बांधकाम होत असून बांधकाम पडण्याचे प्रमाण सुध्दा वाढले आहे. त्यामुळे चांगली व स्वस्त वाळू मिळण्यासाठी व माफिया मुक्त वाळूच्या संदर्भात शासन याच अधिवेशनात कायदा आणणार आहे काय ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, याच अधिवेशनात वाळूच्या संदर्भात कायदा आणण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. परंतु जोपर्यंत ग्रीन ट्रिब्यूनलकडून अहवाल प्राप्त होत नाही तोपर्यंत वाळूच्या संदर्भात चांगल्या प्रकारचा कायदा करणे अवघड असल्यामुळे आम्ही ग्रीन ट्रिब्यूनलच्या अहवालाची वाट पाहतो आहोत. वाळूच्या संदर्भात अधिवेशन संपण्याच्या अगोदर बिल आणणार आहे किंवा अधिवेशन संपल्यानंतर वटहुकूम काढून वाळू माफियांवर नियंत्रण आणण्याचा राज्य सरकार प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, बाहेरुन वाळू आयात केली तर ती स्वस्त पडेल की, महाग पडेल यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे त्यासंदर्भात शासन तपासणी करुन विचार करेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, माझ्या नंदूरबार जिल्हयात तापी नदी वाहते. या ठिकाणी शासनाने ई-टेंडरींग करुन दोन गावामध्ये वाळूचे टेंडर दिले आहे. परंतु गावाच्या मध्यभागी वाळू काढण्याचा ठेका दिल्यामुळे गावकऱ्यांनी त्यास प्रखर विरोध केलेला आहे. त्यामुळे माझी मंत्री

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4142....

श्री.चंद्रकांत रघुवंशी .......

महोदयांना विनंती आहे की, वाळूचा ठेका गावामध्ये न देता हा ठेका गावाच्या बाहेर दिला जाईल काय ? गावातून एवढया मोठया प्रमाणात वाळूचे ट्रक गेले तर अपघाताचे प्रमाण वाढेल व पर्यायाने गावकऱ्यांचा त्याला तीव्र विरोध राहील, त्यामुळे ओसरली आणि आराळे या दोन गावामध्ये वाळूचा ठेका 100-200 मीटर अंतराने वाढवून दिला जाईल काय ? या दोन्ही गावातील वाळूचा स्पॉट चेंज करण्याची विनंती गावकऱ्यांनी ग्रामसभेच्या माध्यमातून केली असून गावकऱ्यांची विनंती शासन मान्य करेल काय ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, ज्या ठिकाणी वाळूचा ठेका दिला जातो त्या ठिकाणी खनिकर्म विभागाच्या माध्यमातून पहिल्यांदा तपासणी केली जात असते. तपासणी केल्यानंतर वाळू किती आहे, पाणी किती आहे, वाळू किती खोलवर आहे, 3 मीटरच्या बाहेर असेल तरच वाळू काढण्याची परवानगी दिली जात असते. त्यामुळे खनिकर्म विभागाच्या निकषात त्याच गावात दुसरा स्पॉट असेल तर सदर स्पॉट स्थलांतरित करण्यासाठी नक्कीच सूचना देण्यात येतील.

श्री. प्रभाकर घार्गे : सभापती महोदय, वाळूचा प्रश्न संपूर्ण राज्यात आहे. बऱ्याच ठिकाणी अनधिकृतपणे वाळू उचलली जाते. वाळूच्या संदर्भात महसूल आणि पोलीस विभागाचा संबंध येत असतो. अनधिकृतपणे वाळूचा मोठया प्रमाणात उपसा होत असतो व केवळ दोन चार केसेस अशा प्रकारे दाखवल्या जातात. खरे म्हणजे संगनमतानेच वाळूच्या चोऱ्या होत असतात. त्यामुळे यासंदर्भात माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्या ठिकाणची वाळू चोरीला गेली आहे त्यासंदर्भात दर महिन्याला सर्व्हे करुन महसूल व पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल काय ? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, राज्यामध्ये जे दुष्काळी भाग आहेत म्हणजे खटाव-मान या दुष्काळी भागात शासनाने वाळूचे लिलाव काढले आहेत. ज्या ठिकाणी पिण्यासाठी टँकर लावले गेले आहेत अशा ठिकाणी शासनाने वाळूचे लिलाव काढलेले आहेत. या ठिकाणची वाळू काढू नये यासाठी कित्येक शेतकरी कोर्टात गेल्यामुळे कोर्टाने यासंदर्भात स्थगिती आदेश सुध्दा दिलेले आहेत. जो दुष्काळी भाग आहे, ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे अशा भागातील वाळूचे लिलाव शासन रद्द करणार आहे काय ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, वाळूच्या संदर्भात धोरण निश्चित करीत असतांना पर्यावरण विभागाने ज्या अटी घातलेल्या आहेत त्या अटीच्या अधीन राहूनच वाळूचे लिलाव होत असतात. वाळूचे उत्खनन करतांना पाण्याचा साठा किंवा पाणी झिरपण्याचे प्रमाण कमी होता कामा नये. ज्या ठिकाणी वाळू उपसल्यानंतर पाण्याची पातळी खोल जाईल किंवा पाणी वाहून निघून जाईल अशा ठिकाणी वाळूचे लिलाव दिले जात नाहीत. पर्यावरण विभागाने सुचवल्यानंतरच महसूल विभाग वाळूचे लिलाव काढत असते.

सभापती महोदय, दुष्काळी भागातील वाळूच्या लिलावाच्या संदर्भात शासनाने एक समिति नियुक्त केली असून त्या समितीने अशा प्रकारची सूचना केली तर दुष्काळी भागातील वाळूचे लिलाव रद्द करण्याचा निर्णय घेतला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

**सभापती :** या प्रश्नावर 17 मिनिटे चर्चा झालेली आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांच्या सर्व प्रश्नाचे निरसन केले असल्यामुळे आता मी पुढील प्रश्न पुकारीत आहे.

श्री. गिरीष बापट (संसदीय कार्यमंत्री ) : सभापती महोदय, प्रश्नोत्तरामध्ये मी डिस्टर्ब करु इच्छित नाही परंतु विधान परिषदेत दोन तीन प्रश्नाच्या पुढे कामकाज होत नाही ही वस्तुस्थिती आहे. दोन महिने अगोदर सन्माननीय सदस्य प्रश्न देत असतात व साधारणतः प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये 40 प्रश्न असतात. वाळूच्या प्रश्नाची व्याप्ती मोठी आहे. परंतु सन्माननीय सदस्य प्रश्न डेव्हलप करण्यामध्ये जास्त वेळ घेतात पर्यायाने जास्त प्रश्न पुरकारले जात नाहीत. त्यामुळे रोज किमान 10 प्रश्न होतील, यासंदर्भात आपण योग्य तो निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

**सभापती :** प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आपण सर्वांनी सहकार्य केले तरच जास्तीत जास्त प्रश्न चर्चेला येऊ शकतील. परवा माननीय उप सभापती महोदयांनी 10 प्रश्न घेतले होते. त्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासामध्ये जास्त प्रश्न होण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी पॉईंटेड प्रश्न विचारले, प्रश्न डेव्हलप करण्यामध्ये वेळ घालवला नाही तर जास्तीत जास्त प्रश्नोत्तरे होऊ शकतील.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यात विशेषत: नांदेड,अमरावती,यवतमाळ जिल्हयात दुष्काळ, अतिवृष्टी,गारपिटीमुळे शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या**

(2) * **३४४६** श्री.संदिप **बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.राहुल नार्वेकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(1) **राज्यात विशेषत: नांदेड, अमरावती, यवतमाळ, जिल्ह्यात दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट तसेच सतत होणारी नापिकी, सोयाबीन, कापूस पिकांचे झालेले नुकसान यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची घोषणा शासनाने माहे डिसेंबर, २०१४ व जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,**

(2) **तसेच, नापिकीमुळे डोक्यावर झालेले कर्जाचे ओझे कसे फेडावे या विवंचनेतील ११८ शेतकऱ्यांनी मागील वर्षात आत्महत्या केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले हे ही खरे आहे काय**

(3) **असल्यास उक्त प्रकरणी प्रशासनाच्या उदासीनतेमुळे मदतीचे प्रस्ताव अपात्र ठरल्याने शासनाकडून मिळणारी आर्थिक मदतही अद्याप मृत्यू पावलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना मिळालेली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,**

(4) **असल्यास यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय तसेच,राज्य शासनाने घोषणा केल्याप्रमाणे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,**

(5) **अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?**

श्री. दिलीप कांबळे,**श्री. एकनाथराव खडसे** यांच्या करिता**: (१) होय.**

(2), (3) **व (४)**

**सन २०१४** (जानेवारी-डिसेंबर) **मध्ये नांदेड जिल्ह्यात एकूण ११८ शेतकरी आत्महत्या प्रकरणे निदर्शनास आली आहेत. यापैकी ७५ प्रकरण शासकीय निकषानुसार पात्र ठरली असून मयत शेतक-याच्या कुटुंबीयास प्रत्येकी रु.१.०० लक्ष मदत देण्यात आलेली आहे. ४३ प्रकरणे अपात्र ठरली आहेत.**

**शासनाने सन २०१४ च्या खरीप हंगामातील बाधित शेतक-यांना अर्थसहाय्य करण्यासाठी रु.४०००/- कोटी निधी वितरित केला आहे.**

(5) **प्रश्न उद्‌भवत नाही.**

श्री. संदिप बाजोरिया : सभापती महोदय, विचारलेल्या प्रश्नाला जे उत्तर देण्यात आलेले आहे त्यामध्ये विसंगती आहे. नांदेड, अमरावती व यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांनी अतिवृष्टीमुळे केलेल्या आत्महत्येबद्दल प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. परंतु मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये केवळ नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दल माहिती दिलेली आहे. माझा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.: 3446....

श्री. संदिप बाजोरिया........

पहिला प्रश्न असा आहे की, नांदेड, अमरावती व यवतमाळ जिल्हयात एकंदर किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या नातेवाईकांना व त्यांच्या कुटुंबीयांना कोणते सहाय्य करण्यात आले, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी किती प्रकरणे पात्र व अपात्र ठरविण्यात आली आहेत ?

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3446...

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, नांदेड जिल्ह्यातील 118 आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता आणि त्याचे उत्तर देण्यात आलेले आहे. एकूण 75 शेतकरी पात्र ठरलेले आहेत. नांदेड, अमरावती आणि यवतमाळ या तीन जिल्ह्यांमध्ये एकूण 592 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यापैकी 405 शेतकऱ्यांना मदत दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे की, पात्र आणि अपात्रतचे निकष काय आहेत. त्याबाबत सांगू इच्छितो की, दिनांक 19 डिसेंबर, 2005 रोजीचा शासन निर्णय आहे. त्यानुसार पात्र व अपात्र ठरविण्यात येते. त्यातील काही निकष जसे तो शेतकरी असला पाहिजे, 7/12च्या उताऱ्यावर त्याचे नाव पाहिजे,राष्ट्रीयकृत बॅंकेचे कर्ज असले पाहिजे इत्यादी अटींची पूर्तता केल्यास ते शेतकरी मदतीसाठी पात्र समजले जातात.

**सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांना असे म्हणावयाचे आहे की, निकष ठरविताना काही गोष्टी राहून गेल्या असतील त्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना मदत मिळाली नसेल. तेव्हा आपण सन्माननीय सदस्यांकडून माहिती घ्यावी व खालच्या पातळीवर निकषाच्या बाहेर काही गोष्टी झाल्या असतील तर त्या शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करावा.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, होय. आजच पुन्हा फेरतपासणीचे आदेश देण्यात येतील.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, प्रलंबित प्रकरणाची यादी दिवसेंदिवस वाढत आहे. दोन-तीन महिन्यानंतर प्रस्ताव रिजेक्ट करण्यात आला असे कळविण्यात येते. प्रस्ताव रिजेक्ट करण्याची कारणे म्हणजे जमिनीची खातेफोड केलेली नाही, 7/12 च्या उताऱ्यावर नाव नाही इत्यादी. शेतकऱ्यांचा मुलगा कर्जापायी आत्महत्या करतो, परंतु 7/12 च्या उताऱ्यावर त्याचे नाव नसल्यामुळे त्याचे प्रकरण रिजेक्ट करण्यात येते. वस्तुस्थिती अशी आहे की, वडिलांच्या आणि मुलाच्या नावे कर्ज असते. त्यांनी शेतीसाठी कर्ज घेतलेले असते, परंतु 7/12 च्या उताऱ्यावर मुलाचे नाव नसल्यामुळे ती प्रकरणे रिजेक्ट करण्यात येतात. अशाप्रकारच्या ज्या जाचक अटी आहेत त्या रद्द करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासन मदत करणार काय ?

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3446...

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, होय.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते येथे उपस्थित आहेत त्यांना शेतकऱ्यांबद्दल जिव्हाळा आहे. मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, सन 2005 च्या शासन निर्णयानुसार पात्र आणि अपात्र ठरविण्यात येते. माझी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती आहे की, या निकषामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. वारंवार होणारी नापिकी, अतिवृष्टी, गारपिटी यामुळे जानेवारी ते मार्च या महिन्यात यवतमाळ जिल्ह्यातील 85 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यापैकी 43 कुटुंबीयांना मदत मिळाली आहे. ज्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत ते सर्व शेतकरी होते. माझा प्रश्न आहे की, मदतीच्या संदर्भातील निकष बदलून सर्व शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल काय ?

**सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जिल्हाधिकारी आणि त्यांची यंत्रणा निकषाप्रमाणे काम करीत असते. नैसर्गिक आपत्ती वेगवेगळ्या स्वरूपातील आहेत. या नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक शेतकरी प्रभावित होत आहेत. त्यामुळे आपल्यासमोर नवीन आव्हाने निर्माण होत आहेत. तेव्हा आपण या सर्व गोष्टींचा विचार करून आपणास निकष बदलण्याची वेळ आली तर त्याप्रमाणे कार्यवाही करावी. माझ्या अनुभवातून मी हे मत व्यक्त केलेले आहे. .

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, आज आपणास वेगवेगळ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे ही गोष्ट खरी आहे. राज्यातील कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. ज्या ठिकाणी संकटग्रस्त व आपदग्रस्त शेतकरी आहेत त्यांना सरकार निश्चितपणे मदत करील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, शासन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाला एक लाख रूपयांची आर्थिक मदत करते. माझा प्रश्न आहे की, एक लाख रूपयांची आर्थिक मदत केव्हापासून जाहीर करण्यात आली ? ही एक लाख रूपयांची मदत खूप अपुरी असून त्या रकमेमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबातील शेतकऱ्यांच्या घरी कोणी शिक्षण घेत असेल तर त्यांच्यासाठी एखादी योजना घेण्याची आवश्यकता आहे. तसेच त्यांच्या घरी कोणी बेरोजगार असेल तर त्याला रोजगार मिळवून देण्याची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टींचा व्यापक विचार करून सरकार या मदतीच्या पॅकेजचा पुनर्विचार करणार काय ?

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3446...

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, दिनांक 19.12.2005 रोजीचा शासन निर्णय आहे. या शासन निर्णयानुसार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला रोख रक्कम 30 हजार रुपये देण्यात येतात आणि उर्वरित 70 हजार रक्कम कुटुंबातील व्यक्तींच्या नावे संयुक्त खात्यावर राष्ट्रीयकृत बँकेत किंवा पोस्टात ठेवण्यात येते. त्या कुटुंबातील बेरोजगार व्यक्तीला रोजगार मिळवून देण्यात येईल काय किंवा कोणी विद्यार्थी वा विद्यार्थिनी शिक्षण घेत असतील तर त्या संदर्भात शासन निर्णय घेईल का असा प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, हे सरकार गोरगरीब, मागासवर्ग, शेतकरी, शेतमजूर यांच्या संदर्भात काम करणारे आहे. तेव्हा सरकार या संदर्भात लवकर निर्णय घेईल.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, नांदेड, अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यांतील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. खरीप आणि रब्बीचे पीक हातचे गेल्यामुळे या तीन जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या मोठ्या संख्येने आत्महत्या झालेल्या आहेत. या ठिकाणी माननीय महसूल मंत्री उपस्थित आहेत. शेतकऱ्यांच्या हातून खरीप आणि रब्बीचे पीक गेल्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, भविष्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबण्यासाठी सरकार कोणत्या ठोस उपाययोजना करणार आहेत ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही लांच्छनास्पद बाब आहे. मागील दहा वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्येमध्ये वाढ होत आहे ही चिंतेची बाब आहे. मागील सरकारने देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी सामाजिक प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. त्यावर सरकार अधिक जोर देत आहे. शेतकऱ्यांचे समुपदेशन करणे, ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेणे, शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये पाणी आणणे, जलयुक्त शिवार योजना हाती घेणे इत्यादी गोष्टींसाठी शासन प्रयत्न करणार आहे. तसेच शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला पाहिजे तसेच जगण्यासाठी ज्या पूरक गोष्टी आहेत त्या त्याला मिळाल्या पाहिजेत यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3446...

श्री.एकनाथराव खडसे.....

सभापती महोदय, नांदेड, अमरावती आणि यवतमाळ या तीन जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण खूप आहे. आतापर्यंत या तीन जिल्ह्यांमध्ये एकूण 592 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी 405 शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत देण्यात आली. 186 शेतकरी अपात्र ठरले आणि एका प्रकरणाची चौकशी सुरु आहे. यापूर्वी नापिकीमुळे शेतकरी आत्महत्या करीत होते. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत होते,अशाप्रकारचे चित्र होते. परंतु अलीकडे द्राक्ष आणि केळी बागायती क्षेत्रातील शेतकऱ्यांचे आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे नेमके कारण शोधणे अवघड झालेले आहे. मी पुढे येतो आणि आत्महत्या थांबविण्यासाठी मदत करतो असे कोणीही दाव्याने सांगू शकत नाही. शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नयेत यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. मला काही सन्माननीय सदस्यांनी सूचना केली की, जसे गावागावात तंटा मुक्ती व व्यसन मुक्ती सारख्या समित्या आहेत, त्या धर्तीवर शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी गावातील 10-12 लोकांची समिती करुन त्यांनी शेतकऱ्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवावे. कुणाच्या संशयास्पद हालचाली जाणवल्या तर त्याला भेटणे, कोणी कर्जबाजारी झाला असेल तर त्याला कर्ज फेडण्यासाठी मदत करणे किंवा कर्ज मिळवून देण्यासाठी मदत करणे,

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3446

श्री.एकनाथराव खडसे....

सामूहिकरित्या लग्न पार पाडणे इत्यादी बाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करुन त्यांना एकत्र आणणे अशा प्रकारच्या उपाययोजना करता येतील.

सभापती महोदय, ज्या भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत त्या भागातील अहवालावरुन असे दिसून आले की, आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीची मानसिकता आत्महत्या करण्याच्या 8-10 दिवसांपूर्वीपासून ठीक नसते. त्याच्या मनामध्ये चलबिचल सुरु असते. तो इतरांकडे जीवनात आता काही अर्थ नाही, आता मला जगणे परवडत नाही असे शब्दप्रयोग करीत असतो. त्यामुळे अशाप्रकारे आत्महत्येचा विचार करणाऱ्या लोकांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी गावातील ग्रामसेवक, प्रतिष्ठित व्यक्ती, डॉक्टर, मानसोपचार तज्ज्ञ यांची समिती नेमून त्या समितीने त्या व्यक्तीसोबत सहजरित्या गप्पागोष्टी करुन त्यांना मदत करण्याची किंबहुना आत्महत्येपासून परावृत्त करण्याची भावना स्वीकारायला पाहिजे. तंटा मुक्ती अभियानाच्या धर्तीवर प्रत्येक गाव पातळीवर अशा प्रकारची समिती गठीत करुन आत्महत्या रोखण्यासाठी त्यांचेही योगदान राहावे यासाठी सरकार प्रयत्न करेल.

महोदय, राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नयेत यासाठी सरकारने काळजी घेतली आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितले की, आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना देण्यात येणारी 1 लाख रुपयांची मदत कमी आहे. मी सांगू इच्छितो की, कोणाच्याही जीवनाचे मूल्य करता येत नाही. कारण प्रत्येकाचे जीवन अमूल्य आहे. त्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना अधिक मदत करण्याबाबत सरकार विचार करीत आहे. मग त्यामध्ये विमा काढणे हा एक पर्याय आहे. शेतकऱ्यांना 5 लाख रुपयांपर्यंतच्या विम्याचे संरक्षण देणे आणि संबंधित विम्याचा हप्ता राज्य सरकारच्या माध्यमातून भरणे किंवा विम्याचा हप्ता सामूहिक विमा योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबत राज्य सरकार विचार करीत असून तशी चर्चा सुरु आहे. तसेच राज्यात जे आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत किंवा अल्पभूधारक शेतकरी आहेत त्यांच्यासाठी केंद्र सरकारने दरमहा एक रुपया प्रमाणे 12 महिन्यांचे 12 रुपये भरल्यास व त्याचा नैसर्गिक मृत्यू झाला,

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3446

श्री.एकनाथराव खडसे....

आत्महत्या केली किंवा अपघाती मृत्यू झाला तरी इन्शुरन्स कंपनीच्या माध्यमातून त्याच्या कुटुंबीयांना 2 लाख रुपये मदत करण्याची व्यवस्था केली आहे. राज्य सरकार सुध्दा या योजनेच्या बाबतीत विचार करीत आहे. राज्यात अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या सव्वा कोटींच्या आसपास आहे. केवळ एकट्या अल्पभूधारक शेतकऱ्यांचाच नव्हे तर त्यांच्या कुटुंबीयांचा विम्याचा हप्ता सुध्दा राज्य सरकार स्वतःच्या तिजोरीतून भरेल. एकंदरीत संपूर्ण परिवाराला विम्याचे संरक्षण देण्याचा सरकार विचार करीत आहे. सध्या अल्पभूधारक शेतकऱ्याला वार्षिक 12 रुपये भरावयाचे आहेत. हा विमा सध्या एका व्यक्तीसाठी आहे. तो संपूर्ण परिवारासाठी करुन त्यांना सुध्दा 2 लाख रुपयांपर्यंत कशा प्रकारे संरक्षण देता येईल या बाबतचा निर्णय हे अधिवेशन संपण्याच्या आत घेऊन तो जाहीर करणार आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, गारपीट, अतिवृष्टी आणि दुष्काळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत केली आहे काय, असा प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला 'होय' असे लेखी उत्तर देण्यात आले आहे. तसेच सरकारने जाहीर केलेली 4 हजार कोटी रुपयांची मदत शेतकऱ्यांना मिळाली आहे काय, असा प्रश्न विचारण्यात आला होता. आजपर्यंत ती मदत मिळाली असे आपण गृहीत धरु या. वास्तविक पाहता 4800 कोटी रुपयांची मागणी प्रशासनाने केली आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, उर्वरित 800 कोटी रुपयांची मदत प्रत्यक्षात केव्हा मिळणार आहे ? तसेच गारपीट आणि अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने मदत केली आाहे काय, असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्याला शासनाने 'होय' असे लेखी उत्तर दिले आहे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे आजपर्यंत ही मदत शेतकऱ्यांना मिळालेली नाही. त्यामुळे या संदर्भात माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर त्याच्या कुटुंबीयांना 2.5 लाख रुपयांची मदत करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय ? गारपीटग्रस्त शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर त्याच्या कुटुंबीयांना 2.5 लाख रुपये मदत केली असेल तर, तशाच प्रकारची मदत दुष्काळ आणि नापिकीमुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना करण्यात येईल

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3446

श्री.धनंजय मुंडे....

काय ? माझ्याकडे माहितीच्या अधिकारात मागविलेली माहिती आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, ऑक्टोबर-2014 ते फेब्रुवारी-2015 या कालावधीत 1039 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यातील 544 प्रकरणे पात्र ठरली. शिवाय 276 प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यांना शासनाकडून कसल्याही स्वरुपाची मदत मिळाली नाही. शासनाच्या दिनांक 27 जून, 2006 रोजीच्या परिपत्रकात नमूद केले आहे की, सकृतदर्शनी शेतकरी आत्महत्येचे कारण शासन निकषात बसत असल्यास अशी प्रकरणे 48 तासाच्या आत समितीसमोर ठेवून सानुग्रह अनुदान देण्यात यावे." वास्तविक पाहता अनेक शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना दोन-तीन महिने उलटूनही मदत मिळत नाही. त्यामुळे या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत करण्यासाठी शासन वेगळे पाऊल उचलणार काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एकूण तीन प्रश्न विचारलेले आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, राज्यात 2001 ते डिसेंबर-2014 या कालावधीत 17,645 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी 8023 शेतकऱ्यांचे कुटुंब मदतीस पात्र ठरले आहेत. 9503 शेतकऱ्यांचे कुटुंब मदतीस पात्र ठरले नाही. पात्र शेतकऱ्यांच्या वारसांना 1 लाख रुपये मदत करण्यात आली आहे. गारपीटग्रस्त भागातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केली तर त्यांना 2.5 लाख रुपये मदत देण्यात येते. यातील 1.5 लाख रुपये या योजनेंतर्गत आणि उर्वरित 1 लाख रुपये माननीय मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून देण्यात येतात. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो पर्याय सुचविला आहे त्या बाबत विचार करता येईल. मी सांगू इच्छितो की, या पर्यायापेक्षाही शेतकऱ्यांना विम्याचे अधिकाधिक संरक्षण देऊन त्यांना कशाप्रकारे लाभ मिळवून देता येईल या दृष्टीने राज्य सरकारचा प्रयत्न राहणार आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही. मी पुन्हा स्पेसिफिक विचारतो की, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना केलेल्या मदतीच्या धर्तीवर दुष्काळी भागातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत करण्यात येईल काय ? गारपीटग्रस्त भागातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर त्याच्या कुटुंबीयांना मदत करण्याबाबत

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3446

श्री.धनंजय मुंडे....

सरकारने जी भूमिका स्वीकारली आहे तीच भूमिका दुष्काळी भागातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांबाबत अवलंबिण्यात येईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, यापेक्षा अधिक मदत देता येईल काय, या बाबत राज्य सरकार गंभीरपणे विचार करेल.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, या ठिकाणी आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री बसलेले आहेत. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, नांदेड जिल्ह्यात एका शेतकऱ्याने न्यायालयात आत्महत्या केली आहे. संपूर्ण राज्यात सुध्दा मोठ्या प्रमाणावर आत्महत्या झाल्या आहेत. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, राज्य सरकार शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करणार आहेत काय, नसल्यास, किमान या वर्षीच्या कर्जावरील व्याज माफ करण्यात येईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सध्यातरी संपूर्ण शेतकऱ्यांचे कर्ज माफ करता येत नाही. परंतु कर्जमाफी किंवा व्याज माफीच्या बाबतीत जी मागणी करण्यात आली आहे त्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, हा विषय नक्कीच मंत्रिमंडळासमोर नेऊन, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करता येईल.

सभापती महोदय, मी अगोदर उत्तर देताना गारपीटग्रस्त भागातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना 2.5 लाख रुपये मदत देण्यात आल्याचे चुकून सांगितले होते. त्यामध्ये मी आपल्या अनुमतीने सुधारणा करतो. मी सांगू इच्छितो की, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना 2.5 लाख रुपयांची मदत देण्यात आली नव्हती. 2.5 लाख रुपयांची मदत ही पुरामुळे जे लोक वाहून गेले होते त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात आलेली आहे.

----------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**बदलापूर नगरपालिकेने स्वातंत्र्य सैनिकाच्या जमिनीवर स्मशानभूमीचे केलेले बांधकाम**

**(3) * ३५३९ अॅड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बदलापूर (जि.ठाणे) येथील ज्येष्ठ स्वातंत्र सैनिक व वीर बाजीप्रभू देशपांडे यांचे वंशज स्व.रामचंद्र देशपांडे यांना स्वातंत्र सैनिक सन्मान योजनेनुसार राज्य सरकारने शिरगांव बदलापूर येथील सर्वे क्र ११० मधील २ हेक्टर शेतजमीन दिनांक २० एप्रिल, १९७४ रोजी वा त्या सुमारास चरितार्थासाठी दिली होती, हे खरे आहे काय,
(2) तसेच सन १९६७ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री (स्व.वसंतराव नाईक) तसेच १९७२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान (स्व.इंदिरा गांधी) यांनी स्व.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांना सन्मानपत्र व ताम्रपत्र देवून सन्मानित केले होते, हेही खरे आहे काय,
(3) तसेच स्वातंत्र्य सैनिक स्व.रामचंद्र देशपांडे यांचे पश्चात सदर जमिनीची वहिवाट सध्या त्यांच्या कन्या श्रीमती प्रिया अनंत राजे करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, वीर बाजीप्रभू देशपांडे यांचे वंशज व स्वातंत्र्य सैनिक रामचंद्र देशपांडे यांना त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाबाबत प्रदान केलेली सदर जमीन कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेने हस्तगत करून त्या जागेवर हिंदू स्मशानभूमी उभारण्यात आली असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(5) असल्यास, त्याप्रकरणी संबंधित श्रीमती प्रिया राजे यांनी जिल्हाधिकारी, ठाणे, तहसीलदार, अंबरनाथ व प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचेकडे लेखी तक्रार निवेदने सादर करूनही त्याबाबत अद्याप कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(6) असल्यास, देशाच्या स्वातंत्र्यासाठी हाल-अपेष्टा सोसणा-या स्वातंत्र्य सैनिकांच्याबाबतीत त्यांची अहवेलना व अवमूल्यन करणा-या कुळगाव-बदलापूर नगरपालिका व महसूल विभागातील संबंधित दोषींवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(7) तसेच, कुळगाव-बदलापूर नगरपालिकेने अतिक्रमीत जमीन स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना परत देण्यासाठी व जमिनीच्या महसूल दप्तरी नोंदी सुधारण्यासाठी शासनाकडून काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, मौजे शिरगाव, ता.अंबरनाथ येथील स.नं. ११०/३ प्लॉट नं.१ (क्षेत्र २-००-० हे.आर) ही जमीन स्वातंत्र्य सैनिक कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांना शासनाने सन १९७५ मध्ये कब्जेहक्काने दिली होती.
(2) स्वातंत्र्य सैनिक कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांना दिनांक ३ जून, १९६८ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतराव नाईक यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र देण्यात आले असून त्यांना ताम्रपत्र देऊनही सन्मानित करण्यात आले होते.
(3) सदर जमिनीच्या अधिकार अभिलेखात सन २००७ मध्ये वारसाने कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांचे वारस श्रीमती प्रिया अनंत राजे व इतर चार यांची नावे दाखल आहेत.
(4) स्वातंत्र्य सैनिक कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांना कब्जेहक्काने दिलेल्या सदर जमिनीपैकी ७७३.१८ चौ.मी. क्षेत्रावर कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेने सन १९९८ मध्ये कम्पाऊंड वॉल व पत्र्याचे शेड बांधले असून त्याचा वापर स्मशानभूमी म्हणून होत आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3539....

(5), (6) व (७) श्रीमती प्रिया राजे यांनी दिनांक ०४/०२/२०१४ रोजी दिलेला अर्ज कुळगाव बदलापूर नगरपरिषदेशी संबंधित असल्याने नगरपरिषद यांचेशी संपर्क साधणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांना कळविले आहे. सदर जागेवरील स्मशानभूमी काढणेबाबतचा प्रस्ताव अध्यक्ष, नगरपरिषद यांच्या मान्यतेने सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येत असल्याचे मुख्याधिकारी, नगरपरिषद यांनी दिनांक २५/०६/२०१४ रोजी श्रीमती प्रिया राजे यांना कळविले आहे.

सदर जमिनीस आज रोजी कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांचे वारस श्रीमती प्रिया अनंत राजे व इतर चार यांची नावे दाखल असल्याने महसूल दप्तरी नोंदी सुधारण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, हा संवेदनशील प्रश्न आहे. मी या माध्यमातून शासनाची व अधिकाऱ्यांची संवेदना जागविण्याचा प्रयत्न केला आहे. वीर बाजीप्रभू देशपांडे यांचे वंशज आणि ज्यांनी आपल्या जीवाची आहुती स्वातंत्र्य सैनिक म्हणून दिली ते स्व. रामचंद्र देशपांडे यांना स्वातंत्र्य सैनिक सन्मान योजनेनुसार देण्यात आलेल्या जागेवर काही लोकांनी अतिक्रमण करून आपला कब्जा करावा या हेतूने स्मशानभूमी बांधली आहे. माझे स्पेसिफिक 4 प्रश्न आहेत. सदर जागेवरील स्मशानभूमी काढण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे केव्हा ठेवण्यात आला, सदर जागेवरील स्मशानभूमी काढण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, सदर जमीन वारसा म्हणून श्रीमती प्रिया अनंत राजे यांच्या नावे असताना त्या जागेचा नगरपारिषदेने स्मशानभूमी म्हणून वापर कोणत्या आधारे केला, वारस व्यक्तींची म्हणजे श्रीमती प्रिया अनंत राजे व इतर यांची परवानगी न घेता, डीपीप्रमाणे स्मशानभूमीचे आरक्षण नसताना, रितसर भूसंपादन झालेले नसताना, तेथे कंपाऊड वॉल व पत्र्याचे शेड कसे काय बांधले, यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींच्या विरुद्ध शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येईल ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन 1998 पूर्वी या जमिनीवर प्रेत जाळण्यास सुरुवात झाली. ती मोकळी जागा होती. जागा कोणाची आहे हे न पाहता मोकळ्या जागेवर स्थानिकांनी पूर्वीपासून प्रेत जाळण्यास सुरुवात केली. तात्पुरत्या स्वरूपाचे शेड उभारून प्रेत जाळण्यासाठी स्मशानभूमी म्हणून त्या जागेचा आजपर्यंत उपयोग करण्यात येत आहे. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, ती जमीन राज्य सरकारच्या माध्यमातून देण्यात आली होती. ही

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3539....

श्री. एकनाथराव खडसे ....

'ब' वर्ग जमीन आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून त्यांना 2 हेक्टर जमीन देण्यात आली होती. श्रीमती प्रिया अनंत राजे यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे अर्ज करून स्मशानभूमी त्वरित हलविण्याबाबत सांगितले आहे. अगोदर कोणाचीही तक्रार नव्हती. आमच्या जमिनीचा स्मशानभूमी म्हणून वापर करीत आहेत असे कोणीही सरकारच्या निदर्शनास आणले नव्हते. कै. रामचंद्र काशिनाथ देशपांडे हयात असतानाही तशी तक्रार सरकारकडे प्राप्त झाली नव्हती. त्यामुळे ही परंपरागत असलेली स्मशानभूमी असावी असा समज नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांचा होता. आता स्मशानभूमी अन्यत्र हलविण्याच्या संदर्भात नगरपालिकेला सूचना देण्यात आली आहे. सदर जागेवरील स्मशानभूमी अन्यत्र हलविण्यात यावी, मात्र त्याआधी संबंधित जागा देण्यास तयार असतील तर त्यांना उचित मूल्य देऊन ती जागा संपादित करावी, संबंधित जागा देण्यास तयार नसतील तर स्मशानभूमी अन्यत्र हलवावी असे सांगितले आहे. दुसरीकडे जागा आरक्षित करण्यास विलंब लागेल. जागेचे आरक्षण करणे, स्मशानभूमीसाठी जागा संपादित करणे यासाठी वेळ लागणार आहे. पुन्हा ती जागा शहरात संपादित होते की बाहेर संपादित होते हे माहीत नाही. इतकी वर्षे स्मशानभूमी तेथे आहे त्यामुळे स्वाभाविकपणे ती गावात आहे आणि लोकांना जवळची आहे. स्मशानभूमी गावापासून लांब गेली तर लोकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. स्थानिकांचे या संदर्भात निवेदन आहे की, संबंधितांना उचित मोबदला द्यायचा असेल तर द्यावा आणि त्यांची संमती मिळाली तर स्मशानभूमी येथेच ठेवावी. स्थानिकांचा या संदर्भात असा आग्रह आहे. आम्ही नगरपालिकेला या संदर्भात सूचना दिल्या आहेत की, या संदर्भात उचित मार्ग काढावा. नगरपालिकेच्या बैठकीत या संदर्भात ठराव केला आहे की, संबंधितांशी चर्चा करून मार्ग काढावा, नाही तर अन्यत्र जागा आरक्षित करून स्मशानभूमीची पर्यायी व्यवस्था करावी.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझी उत्तराला हरकत आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, जागा मोकळी होती म्हणून तेथे स्मशानभूमी केली. सभापती महोदय, स्मशानभूमी करण्याचा अधिकार कोणालाही नाही. जिल्हाधिकारी यांनाही हा अधिकार नाही. जिल्हाधिकारी दंडाधिकारी म्हणून काम करतात, त्यांना तो अधिकार कायद्याने आहे. स्मशानभूमी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3539....

श्री. जयंत प्र. पाटील ....

हलविणे किंवा नवीन करणे या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना दंडाधिकारी म्हणून अधिकार आहेत. दंडाधिकारी यांची परवानगी घेतली नसेल तर, ज्या अधिकाऱ्याने सन 1998 ला ही स्मशानभूमी तात्पुरती बांधली त्याच्यावर राज्य शासन काय कारवाई करणार आहे ? ते वीर बाजीप्रभू देशपांडे यांचे वंशज आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने राज्य चालते, त्या राज्यात वीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या वंशजांच्या सोबत असे होणे ठीक नाही. ते स्वातंत्र्य सैनिक होते, त्यांचा सन्मान स्व. इंदिरा गांधी, स्व. वसंतराव नाईक यांनी केला आणि अशा व्यक्तीच्या कुटुंबीयांवर अन्याय होत असताना शासन त्याकडे गंभीरतेने पाहत नाही हे ठीक नाही, कायद्याचे पालन होत नाही. शासन स्मशानभूमीसाठी असलेल्या कायद्याचे पालन करून यावर निर्णय घेणार आहे का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, वीर बाजीप्रभूंच्या वारसांना 1968 साली ही जमीन दिली. आपल्या सर्वांच्या मनात त्यांच्याविषयी आदर, सन्मान आहे. सन 1968 पासून आतापर्यंत ही जमीन मोकळी आहे. फेरफाराची नोंद सन 2007 मध्ये झाली आहे, तोपर्यंत ही जागा नेमकी कोणाची आहे याबाबत स्थानिकांना माहीत नव्हते. त्या कालखंडात कोणीतरी त्या जागेवर प्रेत जाळण्यास सुरूवात केली. सभापती महोदय, तेथे कोणत्याही प्रकारचे पक्के बांधकाम नाही. (अडथळा) पूर्वापार ती जागा स्मशानभूमीसाठी वापरण्यास सुरूवात केली होती. तेथे पूर्वापार खुल्या पध्दतीने प्रेते जाळली जात होती असा मुख्याधिकारी कुळगाव-बदलापूर यांनी त्यांचा अहवाल दिला आहे. पक्के असे बांधकाम आजही तेथे नाही. तात्पुरत्या स्वरूपाच्या व्यवस्था केल्या होत्या. कोणीही हरकत घेतली नाही की, तुम्ही प्रेत येथे का जाळत आहात, ती आमची जागा आहे. आतापर्यंत कोणत्याही प्रकारची हरकत कोणीही घेतल्याचे दिसून आलेले नाही. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे अधिकृत स्मशानभूमी नाही, परवानगी दिलेली नाही, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मदत केलेली नाही. मग आता कारवाई कोणावर करणार ?

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी बेकायदेशीरपणे प्रेत जाळले जातात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3539....

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, बेकायदेशीरपणे प्रेत जाळले जात आहेत अशी कोणीतरी हरकत घेतली पाहिजे. कोणी हरकत घेतली तर कारवाई करता येईल. कोणाची तरी हरकत आली पाहिजे की, माझ्या जागेत प्रेत जाळत आहेत. माझी जागा आहे असे म्हणणारे कोणी पाहिजे होते. हा आताचा प्रश्न नाही. सन 1968 पासूनचा हा प्रश्न आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांच्या उत्तरास माझी हरकत आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, जिल्हाधिऱ्यांकडे श्रीमती राजे यांनी तक्रार अर्ज दिला आहे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, तक्रार अर्ज आता दिला आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, कधी तरी तो तक्रार अर्ज आला आहे. आता तक्रार अर्ज आला म्हणजे तक्रार नाही का, 10 वर्षांपूर्वीची तक्रार आहे, आजची तक्रार नाही का ? सरकार मान्य करते की, कोणतेही भूसंपादन झालेले नाही, आरक्षण नाही, स्मशानभूमी अधिकृत नाही. आज तक्रार अर्ज आलेला आहे तर मग त्यावर शासनाने निर्णय घ्यावा.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आता तक्रार आली म्हणून विषयाला सुरुवात झाली. त्याबाबत नगरपलिकेला कळविले आहे, त्यांनी तसा ठराव पारित केला आहे. नगरपालिकेने या संदर्भात दुसरीकडे आरक्षण ठेवण्याच्या संदर्भात बैठकीत ठराव केला आहे. तक्रार आल्यानंतर कार्यवाहीस सुरुवात झाली आहे. आतापर्यंत कोणाची तक्रार नव्हती.

**सभापती** : मंत्री महोदय, आपण आपल्या उत्तरात असे नमूद केले आहे की, ती सरकारी जागा होती आणि त्या जागेवर कोणत्याही प्रकारचे आरक्षण नव्हते. लोक केवळ सरकारी जागा रिकामी सापडली म्हणून त्या जागेचा स्मशानभूमी म्हणून वापर करीत आहेत. सन्माननीय सदस्यांच्या भावना अशा आहेत की, आपण या जागेचा स्मशानभूमी म्हणून होत असलेला वापर बंद करावा आणि दुसऱ्या योग्य ठिकाणी त्रास होणार नाही तेथे या संदर्भातील सोय करावी. शहरे वाढत आहेत, त्यामुळे स्मशानभूमीच्या संदर्भात अडचणी निर्माण होत आहेत. आपण तशा पध्दतीने विचार केला तर या प्रश्नाला जास्त न्याय मिळेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3539........

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, शासनाने उत्तरामधून स्पष्टपणे हे मान्य केले आहे की, "सदरची जमीन स्वातंत्र्य सैनिक कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांना कब्जेहक्काने देण्यात आलेली आहे." मंत्री महोदयांनी तोंडी उत्तरात असे नमूद केले आहे की, "त्यांच्या वारसांनी या संदर्भातील तक्रार केलेली नाही." महाराष्ट्रात अशा किती तरी जमिनी संबंधित अधिकाऱ्यांनी पेन्सिल एन्ट्री घेऊन लुटलेल्या आहेत. अशा प्रकारे अनेक जमिनी दुसऱ्याच्या नावे करण्यात आल्या आहेत. स्वातंत्र्य सैनिकांना महाराष्ट्रात दिलेल्या किती तरी जागा अशा प्रकारे अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे दुसऱ्याला गेल्या आहेत. त्यामुळे कोणीही तक्रार न केल्यामुळे कार्यवाही करण्यात आली नाही, हे उत्तर योग्य नाही. सन 1975 मध्ये ही जमीन शासनाने श्री.देशपांडे यांना दिली. सन 2014 मध्ये श्री.देशपांडे यांच्या वारसाने सरकारकडे तक्रार केली. त्यानंतर नगरपरिषदेने अन्यत्र आरक्षण ठेवण्याबाबतचा विषय सर्वसाधारण सभेपुढे आणल्याची माहिती मंत्री महोदयांनी दिली आहे. अन्यत्र, आरक्षण ठेवण्यासाठीचा विषय सर्वसाधारण सभेपुढे ठेवला जातो. मग त्या जागेचा वापर स्मशानभूमीसाठी करण्याबाबतचा विषय सर्वसाधारण सभेपुढे का ठेवण्यात आला नाही ? अशा अधिकाऱ्यांवर कारवाई केली नाही तर हे प्रकार वाढणार आहेत. त्यामुळे संबंधितांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, कुणा अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. त्या ठिकाणी शेड बांधावी, काढून टाकावी किंवा वापर करावा, अशी कोणतीही परवानगी अधिकाऱ्यांनी दिलेली नाही. त्या जमिनीचा वापर होत असताना कोणीही तक्रार केलेली नाही. फेब्रवारी, 2014 मध्ये पहिली तक्रार जिल्हाधिकाऱ्यांना प्राप्त झाल्याबरोबर जिल्हाधिकाऱ्यांनी ताबडतोब नगरपरिषदेला कळविले आणि नगरपरिषदने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. तक्रार अर्जाची तातडीने दखल घेऊन कार्यवाही सुरु केलेली आहे. सन 1968 ते सन 2014 या कालावधीमध्ये जमिनीच्या वापराबाबत कोणीही हरकत घेतलेली नाही. जर हरकत घेतली गेली असती तर तातडीने कार्यवाही झाली असती. त्या जमिनीचा वापर स्मशानभूमीसाठी करावा, अशा प्रकारचा ठराव नगरपरिषदेने केलेला नाही. तथापि, आता स्मशानभूमीसाठी पर्यायी जमिनीवर आरक्षण लावण्याचा ठराव नगरपरिषदेने केलेला आहे. अन्य जमिनीवर आरक्षण लावण्याची कार्यवाही सुरु आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3539........

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, यापूर्वी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. परंतु, फेब्रुवारी, 2014 मध्ये तक्रार प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही सुरु केलेली आहे, असे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले आहे. तथापि, ही जागा कोणाची आहे, अनधिकृतरित्या या जमिनीचा वापर कशासाठी होतो आहे, याची माहिती घेण्याचे काम जिल्हाधिकारी किंवा शासकीय यंत्रणेचे नाही का ? स्वातंत्र्य सैनिकास मिळालेल्या जमिनीचा वापर स्मशानभूमीसाठी करण्यात येत आहे, ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे. नगरपरिषदेला आपण धन्यवाद दिले पाहिजेत. यासाठी की, एवढी वर्षे तात्पुरत्या शेडमध्ये स्मशानभूमी चांगल्या पध्दतीने वापरात आहे. त्यांनी या बाबतीत कमालच केली आहे. जमीन मालकाने तक्रार केलेली नाही, असे म्हणून शासनाला आपल्या जबाबदारीतून बाजूला जाता येणार नाही. शहरातील सर्व जमिनींची नोंद शासन दरबारी असते. ती कोणाच्या नावावर आहे, याची माहिती सरकारी यंत्रणेला असते. त्यामुळे त्या जमिनीवर अनधिकृत काही घडत असेल तर तीही माहिती शासनासमोर आली असणारच. अशी सर्व माहिती असतानाही शासन यंत्रणा एवढी वर्षे गप्प का बसली होती ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी हे वारंवार सांगितले आहे की, ही सरकारी जमीन आहे. स्वातंत्र्य सैनिक कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांना सन्मानपत्र मिळाल्यानंतर ही जमीन त्यांना देण्यात आलेली आहे. ही ब-सत्ता वर्गातील वर्ग-2 ची जमीन आहे. ही जमीन वर्ग-2 ची असल्यामुळे वारसाच्या नावाची नोंद उशिरा झाली आहे. ही वेळेवर झाली असती तर स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान नगरपरिषद करणार नाही, असे मला वाटत नाही. आता नगरपरिषदेने तातडीने पावले उचलली आहेत. स्मशानभूमीसाठी अन्यत्र आरक्षण ठेवण्याबाबत त्यांनी बैठक घेतली आहे आणि कार्यवाही देखील सुरु केली आहे. तसेच, आता या जमिनीवरील स्मशानभूमीचा वापर बंद केलेला आहे.

-------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील मराठी माध्यमाच्या खाजगी विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्याबाबत**

**(४) * ३९३५ श्री.सतिश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठी माध्यमाच्या खाजगी विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना तसेच संस्थेच्या शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यासाठी शासनस्तरावर काय उपाययोजना करणार आहे वा करण्यात येणार आहे,
(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) शाळांसाठी सार्वजनिक सेवा या वर्गवारीमध्ये वीज बिल देण्यात येते. या वर्गवारीमध्ये ० ते २०० युनिट मधील वीज वापराचे दर घरगुती १०१-३०० युनिट पेक्षा कमी ठेवण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मराठी माध्यमाच्या खाजगी विनाअनुदानित व अनुदानित शाळांमध्ये संगणक लॅब असते. परंतु, विजेचा पुरवठा नसल्यामुळे या शाळांमधील लॅब बंद अवस्थेत आहेत. हा प्रश्न केवळ खाजगी शाळांचा नसून जिल्हा परिषदांच्या शाळांचीही तीच स्थिती आहे. या शाळांना विजेचा खर्च भागविण्यासाठी अनुदान मिळत नाही. त्यामुळे स्वतंत्रपणे विजेच्या खर्चासाठी अनुदान वितरित करण्यासाठी शासन तरतूद करणार आहे का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न मूळ तारांकित प्रश्नाशी सुसंगत नाही. "राज्यातील मराठी माध्यमाच्या खाजगी विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना तसेच संस्थेच्या शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यात येत नाही, हे खरे आहे काय," असा तारांकित प्रश्न विचारण्यात आला आहे. हा प्रश्न विजेच्या दरासंबंधीचा आहे व सन्माननीय सदस्य वेगळा प्रश्न विचारीत आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आमचे समाधान झाले आहे.

-------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुस्लिम समाजास आरक्षण देण्याचा शासनाच्या कार्यवाहीबाबत**

(५) ***२६६८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुस्लीम समाजाला ५ टक्के आरक्षण देण्याबाबत मागील शासनाने अध्यादेश काढून सवलती लागू केल्या होत्या, सदर अध्यादेशासंदर्भात विधेयक सादर करुन मंजुरी घेण्याबाबत तसेच यासंदर्भात राज्याचे मा.ॲडव्होकेट जनरल यांचेकडून माहिती घेवून मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी नागपूर अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठा आणि मुस्लिम समाजाला एकाचवेळी आरक्षणाचा निर्णय घेतलेला असतानासुद्धा केवळ मराठा आरक्षणाच्या निर्णयासाठीचे विधेयक डिसेंबर २०१४ च्या अधिवेशनात विधिमंडळाने मंजूर केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील गोरगरीब मुस्लिम समाज आरक्षणासाठी आंदोलनाद्वारे लढा देत असतांना शासनाने मात्र मुस्लिम आरक्षणाचे विधेयक विहित मुदतीत मंजूर न केल्यामुळे या समाजावर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करीत आहे,
(५) अद्याप, यासंदर्भात कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) ते ओपिनियन प्राप्त करुन घेऊन योग्य ते निवेदन करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते.
(२) होय.
मुद्द क्र. (३), (४) व (५) बाबत नमूद करण्यात येते की, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मा.उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय विचारात घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्यातील मुस्लीम समाजाला 5 टक्के आरक्षण देण्याची घोषणा आघाडी सरकारने केली होती. या प्रश्नाच्या प्रश्न भाग 1 ला दिलेल्या उत्तरात असे नमूद केले आहे की, "ओपिनियन प्राप्त करुन घेऊन योग्य ते निवेदन करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते." गेल्या हिवाळी अधिवेशनात स्वत: मुख्यमंत्री महोदयांनी आणि या सभागृहाच्या नेत्यांनी सरकारच्या वतीने असे निवेदन केले होते की, आम्ही महाधिवक्त्यांचे तत्काळ मार्गदर्शन मागवू आणि मुस्लीम समाजाच्या आरक्षणाबाबतचा अध्यादेश काढू. आज मी सभागृहाच्या

...5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2668.......

श्री.धनंजय मुंडे.......

हे निदर्शनास आणू इच्छितो की, आघाडी सरकारने मुस्लीम समाजाला दिलेले 5 टक्के आरक्षण न्यायालयानेही ग्राह्य धरले आहे आणि आपल्या निकालाच्या परिच्छेद 78 मध्ये असे म्हटले आहे की, "The State government has clearly made out a prima facie case for providing for reservation of seats for admission in educational institutions in the State of Maharashtra, even by raising the existing percentage of reservations from 52 per cent to 57 per cent of seats for admissions in educational institutions in the State. Interim stay of provisions in impugned ordinance providing for reservations of seats in educational institutions will certainly impede the process of drawing Muslim youths into the main stream of secular education in the State." याचा अर्थ असा आहे की, "अध्यादेशाच्या अंमलबजावणीस अंतरिम स्थगिती देणे, त्या योग्य शैक्षणिक संस्थांमधील मुस्लीम विद्यार्थ्यांच्या आरक्षित प्रवेशास स्थगिती देणे म्हणजे मुस्लीम तरूणांना धर्मनिरपेक्ष शिक्षण देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या प्रक्रियेत खोडा घातल्यासारखे आहे."

सभापती महोदय, आघाडी सरकारने मुस्लीम समाजाला दिलेले 5 टक्के शैक्षणिक आरक्षण न्यायालयाने ग्राह्य धरले असताना अध्यादेशाबाबत महाधिवक्त्यांचे पुन्हा मार्गदर्शन घेण्याची गरज नव्हती. मुस्लीम समाजाला दिलेल्या 5 टक्के आरक्षणाबाबतच्या अध्यादेशाचा कालावधी दिनांक 24 डिसेंबर, 2014 रोजी संपला आहे. माझा प्रश्न हा आहे की, मराठा समाजाला द्यावयाच्या आरक्षणासाठी ज्याप्रमाणे सरकारने कायदा केला तसा कायदा मुस्लीम समाजाच्या आरक्षणासाठी का केला नाही, अध्यादेश का काढला नाही ? आता कोर्टाचा आदेश मी आपल्यासमोर वाचून दाखविलेला आहे. तो ग्राह्य धरुन मुस्लीम समाजाला 5 टक्के आरक्षण देण्याबाबतचा निर्णय शासन कधी पर्यंत घेणार आहे आणि हिवाळी अधिवेशनात दिलेले आश्वासन कधीपर्यंत पूर्ण करणार आहे ?

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2668...

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दिनांक 23/12/2014 पर्यंत मुस्लिम व मराठा आरक्षणाचे दोन्ही अध्यादेश अस्तित्वात होते. मराठा व मुस्लिम आरक्षणामध्ये एक अंतर आहे, या अध्यादेशाचे रुपांतर विधेयकात करण्याबाबत थोड्या अडचणी आल्या होत्या. यामध्ये सुप्रीम कोर्ट व हायकोर्टाचे जजमेंट आहे,...(अडथळा)... आपण ऐकून घ्यावे, आघाडी शासनाने 50 वर्षात आरक्षण दिले नाही. आमचे सरकार आरक्षण देणार आहे. आपण 50 वर्षे सत्तेत राहून आरक्षण दिले नाही आम्ही आरक्षण देणार आहोत, त्याची चिंता आपण करु नये. 50 वर्षानंतर तुमची तळमळ दिसून आली, त्याबाबत मी तुमचे अभिनंदन करतो. मुस्लिम आरक्षणाविषयी आता तरी तुम्हाला कळवळा वाटत आहे. कोणत्याही परिस्थितीत आम्ही मुस्लिम आरक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहोत. आपण 50 वर्षात आरक्षण दिले नाही आमच्या सरकारला पाच महिन्यांचा तरी कालावधी द्यावा.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्रित घोषणा देतात)

सभापती महोदय, यांना या विषयावर राजकारण करायचे आहे, मुस्लिम समाजाला माहिती आहे की, 50 वर्षे काँग्रेस किंवा आघाडी सरकारने त्यांच्यावर अन्याय केला आहे. सत्तेत असताना देखील त्यांना या सरकारने आरक्षण दिले नाही हे मुस्लिम समाजाला माहिती आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या दोन सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी पहिली सूचना सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.सतीश चव्हाण व श्री.अमरसिंह पंडित यांनी "राज्यभरातील संच मान्यतेपेक्षा अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे वेतन ऑफ लाईन पध्दतीने अदा करण्याचे परिपत्रक असतानाही बीड जिल्हा परिषदेतील 1030 अतिरिक्त शिक्षक दीड वर्षापासून वेतनापासून वंचित असणे, दीड वर्षापासून वेतन नसल्यामुळे या अतिरिक्त शिक्षकांची बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक 16 मार्च, 2015 पासून धरणे आंदोलन सुरु केलेले असणे, 6 दिवसानंतरही आंदोलनाची दखल न घेतल्याने वैफल्यग्रस्त होऊन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोकणी वस्ती (वाढवणा) केंद्र कन्या चौसाळा, ता.जि.बीड येथील श्री.हिरामन भंडाणे या अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकाने दिनांक 21 मार्च 2015 रोजी फाशी घेऊन आत्महत्या करणे, शिक्षकांच्या आत्महत्येमुळे संपूर्ण जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात खळबळ माजणे, घटनेचा निषेध म्हणून व आत्महत्येस प्रवृत्त केले म्हणून संबंधितांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी संपूर्ण जिल्ह्यात शैक्षणिक बंद पाळण्यात येणे, अतिरिक्त ठरलेल्या 1030 शिक्षकांचे थकित वेतन तातडीने देण्याची गरज, अतिशय महत्वाच्या असलेल्या या विषयावर चर्चा करण्यासाठी आजचे प्रश्नोत्तराचे कामकाज स्थगित करुन या विषयावर चर्चा करावी." या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी नियम 289 अन्वये सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला करुन अतिशय जिव्हाळ्याच्या व ज्वलंत विषयावर चर्चा करण्यात यावी. नियम 289 अन्वये उपस्थित करण्यात आलेला विषय आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात नसल्याने नियम 289 च्या सूचनेत मी अनुमती नाकारीत आहे. तरी देखील विषयाचे गांभीर्य लक्षात घेता याबाबत सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, बीड जिल्हा परिषदेच्या समोर घडलेली ही घटना आहे. बीड जिल्हयात एकूण अतिरिक्त झालेल्या शिक्षकांना गेल्या सात ते आठ महिन्यांपासून सामावून घेतले जात नाही किंवा त्यांचे समायोजन करण्यात आले नाही. याबाबत वारंवार पत्रव्यवहार करुन सर्व संघटनांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासोबत बैठका झाल्या आहेत. 6 महिन्यापेक्षा अधिक काळ होऊन देखील अद्याप पावेतो शिक्षकांचे समायोजन झाले नाही. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जवळेकर यांच्या कार्यकाळात शिक्षकांची संख्या 150 पेक्षा अधिक अतिरिक्त झालेली आहे. याबाबत जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासोबत बैठक झाली आहेत. तरी देखील यासंदर्भातील निर्णय होऊ शकला नाही. या शिक्षकांना गेल्या 6 महिन्यापासून पगार मिळालेला नाही. त्यामुळे शिक्षकांना आत्महत्या करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिला नाही. शिक्षक आज देखील उपोषणाला बसले आहेत. त्यामुळे अधिवेशन संपण्याअगोदर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याची कार्यवाही करण्यात यावी. ज्या शिक्षकांनी आत्महत्या केली, त्याच्या कुटुंबीयांना शासनाने मदत केली पाहिजे. जे शिक्षक अतिरिक्त आहेत त्यांचे समायोजन करुन त्यांना नियुक्त्या देण्यात येतील काय ? हे शिक्षक अतिरिक्त का झाले याबाबत तत्कालीन शिक्षणाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना माहिती नव्हते काय ? आपल्या जिल्हयात शिक्षकांची जादा पदे असताना अन्य जिल्ह्यातून येणाऱ्या शिक्षकांना का सामावून घेण्यात आले आहे. हे सर्व माहीत असून यामध्ये मलाफाईड इन्टेशनमुळे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या बाबी केल्या आहेत, ते आता निलंबित आहेत. शिक्षणाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे रॅकेट आहे. याचा परिणाम या शिक्षकांना भोगावा लागत आहे. या शिक्षकांना न्याय मिळावा यासाठी नियम 289 सूचना दिलेली आहे, त्यानुसार या विषयाबाबत सभागृहात चर्चा व्हावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : या प्रस्तावाची सूचना मी अगोदर अमान्य केलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, श्री.भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, यांनी "नवीन पनवेल सेक्टर 19 मधील सेंट जॉर्ज चर्चवर दिनांक 20 मार्च 2015 रोजी काही अज्ञात समाजकंटकांनी केलेली दगडफेक " या विषयावर प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. आजच्या

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती...**

दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबतीत प्रश्नोत्तराचा तास व कामकाज स्थगित करण्याबाबत या सूचनेद्वारे माननीय सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावात विषय समाविष्ट नसल्याने या प्रस्तावाबाबत काल दिनांक 23 मार्च 2015 रोजी सन्माननीय सदस्यांनी म.वि.प.नियम 93 अन्वये सूचना दिली होती, त्या सूचनेवर शासनाने निवेदन करावे, असे निदेश मी दिलेले असल्यामुळे नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

---

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये महसूल व वन विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये नियोजन विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.रवींद्र वायकर (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.गिरीश महाजन (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये जलसंपदा विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माझ्याकडे आज दिनांक 24 मार्च 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

**सचिव** : सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण, वि.स.स.यांनी "शासन निर्णय दिनांक 1 एप्रिल, 2010 अन्वये 24 वर्षानंतर मिळणारा आर्थिक लाभ खाजगी शाळेच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू नसणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर, यांनी "चेंबूर (मुंबई) येथील पालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारांतर्गत पुरविल्या जाणाऱ्या खिचडीत दिनांक 21 मार्च, 2015 रोजी वा त्या सुमारात उंदराची पिल्ले आढळून येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील, यांनी "मोतीलाल नेहरुनगर 'कोले कल्याण' गाव, बांद्रा, (पूर्व) मुंबई को.ऑप.हाऊसिंग सोसायटीत कायदेशीर पात्रताधारक सदस्यांना त्यांच्या हक्काची घरे व आवश्यक सुविधा देण्यास विकासकाकडून होत असलेला अन्याय." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव........

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "नाशिक जिल्ह्यातील मौजे गोवर्धन, महादेवपूर व पाथर्डी (ता.नाशिक) कुर्णोली व गोंदेदुमाला (ता.इगतपुरी) येथील शेत जमीन खरेदीमध्ये घोटाळे व गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "महाबळेश्वर तालुक्यातील किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या पार फाटा ते कुमठे रस्त्यासाठी ठेकेदाराने परवानगी न घेता गौण खनिजाचे उत्खनन करुन शासनाचे केलेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "बेदरकारपणे वाहन चालवून दोन व्यक्तींच्या मृत्युस कारणीभूत असलेला मद्यधुंद चालक अल्ताफ शेख याला अटक करुन त्याचा वाहन चालकाचा परवाना रद्द करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी "दादर रेल्वे स्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर 'चैत्यभूमी' रेल्वे स्थानक असे नाव देण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "दिनांक 22 मार्च, 2015 रोजी सहलीसाठी मंगरुळ तलावात (वडद, ता.कुदी) गेलेल्या 7 तरुणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडणे, तलावाच्या ठिकाणी जीवरक्षकाची नियुक्ती नसल्याने पर्यटकांना जीव गमवावा लागत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभागृहातील कामकाजाबाबत**

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आज अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. तसेच, आजच्या कामकाज पत्रिकेत 4-5 लक्षवेधी सूचना दाखविण्यात आलेल्या आहेत. मी माननीय जलसंपदा मंत्री श्री.गिरीष महाजन यांना विचारु इच्छितो की, प्रथम अर्थसंकल्पावरील सर्वसाधाण चर्चा सुरु करावयाची की लक्षवेधी सूचना पूर्ण झाल्यानंतर अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु करावयाची ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, अगोदर लक्षवेधी सूचना घेण्यात याव्यात.

**सभापती** : ठीक आहे.

------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील आरक्षित जागेच्या बदल्यात बेकायदेशीर टीडीआर मंजूर करणे

**मु.शी.** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील आरक्षित जागेच्या बदल्यात बेकायदेशीर टीडीआर मंजूर करणे यासंबंधी ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील आरक्षण क्र.192 कल्याण-डोंबिवली महानगरपालिका ऑटोमोबाईल वर्कशॉप, आरक्षण क्र.193 जनावरांचा दवाखाना व वसाहत, आरक्षण क्र.194 राज्य शासनाचे कार्यालय, आरक्षण क्र.195 केंद्र शासनाचे कार्यालय, आरक्षण क्र.197 माध्यमिक शाळा, 18 मीटर व 24 मीटर रुंद विकास योजनेप्रमाणे रस्ता या आरक्षणाने बाधित होत असलेल्या जागेच्या बदल्यात हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) वितरित करताना भूमि अभिलेख विभागाकडून प्राप्त नकाशाची महानगरपालिकेकडून शहानिशा तसेच सर्वेक्षण न करता व सदर जागेवरील अतिक्रमण न हटविता हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) मंजूर करणे, विकासकाकडून सदर जागेवर भरणी करण्याचे व वाडेभिंत बांधण्याची फी महानगरपालिकेकडून वसूल करण्यात आली असणे व सदर जागांवर अतिक्रमण केलेल्या नागरिकांनी सर्वेक्षण आक्षेप घेतलेला असल्याने भरणी व वाडेभिंत बांधण्यात आलेली नसल्याने केवळ विकासकाच्या फायद्यासाठी सदरचा टीडीआर बेकायदेशीरपणे मंजूर करणे, सदर जागेवरचा उर्वरित टीडीआर मंजूर करु नये, अशा विषयाची तक्रार करुनही नुकताच 10595 चौ.मी. टीडीआर मंजूर करणे, या बेकायदेशीरपणे मंजूर केलेल्या टीडीआर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, हा टीडीआर घोटाळा आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त श्री.रामनाथ सोनावणे यांच्या कारकिर्दीत मोठ्या प्रमाणावर हा टीडीआर घोटाळा झालेला आहे. जर टीडीआर द्यावयाचा असेल तर त्यासाठी साधे-साधे नियम आहेत. त्या नियमांची पायमल्ली केली गेलेली आहे. कारण, टीडीआर देताना त्याला वाडेभिंत घालून त्याचा सर्व्हे करावा लागतो. परंतु, कोणत्याही प्रकारचा सर्व्हे न करता, कोणत्याही प्रकारची वाडेभिंत न घालता केवळ कागदोपत्री पैसे घेतले गेले आहेत. मी त्यावर आक्षेप नोंदविला होता की, नियमांची पूर्णपणे पायमल्ली केली जात आहे. ज्यावेळी मी त्या संदर्भात पत्र दिले त्यावेळी तत्कालीन आयुक्त श्री.सोनावणे साहेबांनी एक नोट तयार केली. जनरली अतिक्रमण असलेल्या जागेचा टीडीआर देता येत नाही. असे असताना देखील त्यांनी स्वत: एक नोट केली होती की, 80 टक्के टीडीआर आता द्यावा आणि अतिक्रमण काढल्यानंतर उर्वरित 20 टक्के टीडीआर द्यावा. तेथे आजही अतिक्रमण आहे. महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारचा सर्व्हे केलेला नाही. जवळ जवळ 6 लाख 70 हजार फुट टीडीआरचे वाटप झालेले आहे. सर्व नियम पायदळी तुडवून एवढा मोठा घोटाळा झालेला आहे. सर्व नियम पायदळी तुडविलेले आहेत, असे प्रथम दर्शनी दिसून येते. माझा प्रश्न असा आहे की, या घोटाळ्यास जबाबदार असलेल्या तत्कालीन आयुक्तांना निलंबित करुन त्यांच्या बरोबर जे जे कर्मचारी या भ्रष्टाचारात अडकलेले आहेत त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील आरक्षण क्रमांक 192 ते 197 अशी 6 आरक्षणे आणि त्या आरक्षणापोटी 81,800 स्क्वेअर मीटरचा ताबा महानगरपालिकेला घ्यावयाचा होता आणि त्यापोटी 54,438 स्क्वेअर मीटर टीडीआर द्यावयाचा होता. हे घेत असताना महानगरपालिकेने काही अटी आणि शर्ती पाळावयास पाहिजे होत्या, हे सत्य आहे. एक म्हणजे, हद्द कायम करणे. दुसरे म्हणजे, ते समतल करणे. तिसरे म्हणजे, तेथे दीड मीटरचे कम्पाऊंड करुन घेणे आणि हे जर केले नाही तर तो टीडीआर देऊ नये. वारंवार अशा प्रकारची अनियमितता होत होती. म्हणून तेथील सन्माननीय सदस्यांनी या संदर्भातील तक्रार आणि एक पत्र देखील संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्या पत्राचे उत्तर त्यांना

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील........

देण्यात आले असेल. परंतु, त्यांनी हे मान्य केले होते की, तेथे जी भिंत बांधावयास पाहिजे होती, ती भिंत त्यांनी बांधली नाही. परंतु, ती भिंत बांधली नाही म्हणून त्यापोटी त्यांनी काही रक्कम वसूल केलेली आहे आणि हे अनुज्ञेय आहे की नाही, हे कायद्यात बसते किंवा नाही. ते पैसे आजही जमा आहेत. परंतु, एखादा मोठा भूखंड असेल आणि त्यामध्ये छोटे-छोटे प्लॉट्स असतील तर प्रत्येक प्लॉटची भिंत बांधणे आणि कम्पाऊंड करणे शक्य नसते. म्हणून तशा प्रकारची तरतूद त्यांनी केली होती. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे की, आरक्षित जागेवर अतिक्रमण झालेले आहे आणि त्या अतिक्रमणाचा भाग वगळून टीडीआर द्यावयास पाहिजे होता. परंतु, तसे न करता ती जागा धरुन त्यांनी टीडीआर दिलेला आहे, असे आपले म्हणणे आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, नाही, जो पर्यंत अतिक्रमण काढले जात नाही, भिंत बांधली जात नाही, महानगरपालिका त्याचा सर्व्हे करुन रिपोर्ट देत नाही तो पर्यंत टीडीआर हस्तांतरित होत नाही. तेथे अतिक्रमणे आहेत. त्यांनी सर्व्हे केलेला नाही, भिंतही बांधलेली नाही. फक्त कागदोपत्री पैसे घेतले आणि टीडीआर दिलेला आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, संपूर्ण कार्यवाही करीत असताना ज्या गोष्टी करणे क्रमप्राप्त आहेत, सक्तीच्या आहेत, त्या झाल्या नसतील तर जसे सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 80 टक्के आरक्षण किंवा तेथे भिंत बांधण्यात आलेल्या नाहीत. अशा प्रकारच्या त्रुटी राहिलेल्या असतील आणि त्या संदर्भात पत्र दिल्यानंतर देखील....

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मंत्री महोदयांचा काही तरी गैरसमज झालेला आहे. नियम असा आहे की, जो पर्यंत संपूर्ण अतिक्रमण काढले जात नाही, भिंत बांधली जात नाही आणि महानगरपालिका त्याचा सर्व्हे करुन रिपोर्ट सादर करीत नाही तो पर्यंत टीडीआर हस्तांतरित करता येत नाही. ही कार्यवाही होत नव्हती आणि टीडीआर मात्र हस्तांतरित केला जात होता. मग यामध्ये उद्या गरीब लोकांचे मरण होईल. म्हणून मी या संदर्भात ऑब्जेक्शन घेतले. त्यावर आयुक्तांनी अशी नोट तयार केली की, आता 80 टक्के टीडीआर द्यावा आणि अतिक्रमण



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब.......

काढल्यानंतर उर्वरित 20 टक्के टीडीआर द्यावा. म्हणजे नियम पाळण्यात आलेले नाहीत. ज्यावेळी मी नियम पाळण्यात आले नाही हे दाखवून दिले त्यानंतर पुन्हा नियमांची पायमल्ली करण्यात आली. हे सर्व चुकीच्या पद्धतीने केलेले आहे. त्यामुळे हा सरळ सरळ भ्रष्टाचार आहे. म्हणून आपण संबंधितांना निलंबित करणार आहात काय ?

**सभापती** : मंत्री महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य रिलिफ मागत आहेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या सर्व प्रक्रियेमध्ये नियम पाळले गेले नसतील तर त्याची पुन्हा चौकशी करु आणि चौकशी अंती ते दोषी आढळून आले तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माझी स्पेसिफिक मागणी अशी आहे की, संबंधितांना निलंबित करण्यात येणार आहे काय ? एखादी चुकीची गोष्ट होत असेल आणि सन्माननीय सदस्य ती निदर्शनास आणून देत असतील तरी देखील नियम तोडले जातात. याचा अर्थ प्रशासन कोणालाही जुमानत नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब साहेब, आपण स्वतः वकील आहात. आपण जर नॅचरल जस्टिसला धरुन एखाद्या माणसाला निलंबित करण्याचा आग्रह धरला आणि आपण जर त्याच्या बाजूने हिअरिंग देण्याचे नाकारले तर निलंबनाची कारवाई टिकेल किंवा नाही, याची आपल्याला देखील चांगली माहिती आहे. मला असे वाटते की, चौकशी न करता निलंबनाची कारवाई करण्यापेक्षा ठराविक कालावधीत म्हणजे 10 ते 15 दिवसात सखोल चौकशी करुन त्यांनी ही कारवाई करावी.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, होय.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांचे योग्य प्रकारे संवर्धन व जतन करण्याबाबत

**मु.शी.** : महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांचे योग्य प्रकारे संवर्धन व जतन करण्याबाबत यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"महाराष्ट्राच्या मराठी तनामनात स्फूर्ती आणणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांना सर्वच मानवंदना देत असणे, महाराजांचे कर्तृत्व, दातृत्व आणि नेतृत्व आज जगाला व महाराष्ट्राला दीपस्तंभाप्रमाणे असणे, महाराजांनी निर्माण केलेले गडकिल्ले आज हिंदवी स्वराज्याचा इतिहास सांगत असणे, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आपण ऐकणे, त्यांचे दर्शन घेणे, त्यांचे पोवाडे गाणे, महाराजांना अनुभवण्याचा प्रयत्न करणे, यात सिंधुदुर्ग किल्ला भाग्यवान असणे, या किल्ल्यावर इतिहासाचे सोनेरी पान न्याहाळावयास मिळणे, प्रत्यक्ष शिवाजी महाराजांच्या डाव्या पायाचा अन उजव्या पायाचा ठसा येथे पाहावयास मिळणे, अरबी समुद्रात उभा असलेला सिंधुदुर्ग हा हिंदवी स्वराज्याचा शिलेदार असणे, अशाचप्रकारचे अनेक किल्ले महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असणे, या सर्व किल्ल्यांचे संवर्धन होणे गरजेचे असणे, त्यामधून महाराजांचे महाराष्ट्राप्रती असणारे प्रेम सदैव पुढील पिढीस प्रेरणा देत रहावे यासाठी महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांचे योग्यप्रकारे संवर्धन व जतन करण्याबाबत त्वरीत जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विनोद तावडे (सांस्कृतिक कार्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरामध्ये असा उल्लेख करण्यात आलेला आहे की, पुरातत्व संचालनालयामार्फत संरक्षण, संवर्धन व देखभाल केली जाते, तसेच दुरुस्तीसाठी 12 कोटी 24 लाख 17 हजार रुपये इतका निधी खर्च केलेला आहे आणि 15 कोटी 9 लाख 51 हजार रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. मी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून राज्याबाहेरील काही किल्ल्यांची माहिती देऊ इच्छिते. मी स्वत: काही ठिकाणी जाऊन आलेले आहे. माझ्याकडे राजस्थान मधील कुंभाळगड किल्ल्याचा फोटो आहे, तो फोटो मी आपल्याला दाखविते. कुंभाळगड किल्ला महाराणा प्रताप यांच्या पणजोबांनी बांधलेला आहे. चीनची जी जग पदसिद्ध भिंत आहे त्या नंतरची जग प्रसिद्ध भिंत कुंभाळगड येथील आहे. (...अडथळा....) पणजोबांचे नाव देखील सांगते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय सभागृहात गांभीर्याने काम करीत नाहीत.

यानंतर श्री.भोगले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण : त्यांना कोणत्याही गोष्टीचे गांभीर्य नाही हे मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते. मी तुम्हाला प्रत देते. तुम्ही सविस्तर माहिती वाचू शकता. पुरातत्व विभागाकडून कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. प्रत्यक्षात गड व किल्ल्यांची केवळ डागडुजी करण्यात येते. किल्ल्यांच्या दगडी बांधकामातील दगड सैल झाल्यास ते बसविले जातात. परंतु गड व किल्ल्यांची पाहणी करण्यासाठी पर्यटकांचा ओघ वाढावा यासाठी चांगल्याप्रकारे किल्ल्यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. छत्तीसगड, श्रीरंगपट्टणम, लाल किल्ला, ग्वाल्हेरचा किल्ला यांची पाहणी करण्यासाठी राज्याची टीम पाठवून कशा प्रकारे राज्यातील गड व किल्ल्यांचे संवर्धन करता येईल आणि पर्यटक शिवाजी महाराजांनी उभारलेले गड व किल्ले पाहण्यासाठी येतील यादृष्टीने शासन प्रयत्न करणार आहे काय आणि राज्याची टीम पाहणी करण्यासाठी पाठविण्यात येईल काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, टीम नक्की पाठवू. फक्त आपण एक बाब लक्षात घेतली पाहिजे, राजस्थान राज्यातील किल्ले आणि महाराष्ट्रातील किल्ले यांची तुलना करता कामा नये. जे इतिहासाचे अभ्यासक आहेत त्यांना माहित आहे की, राजस्थानमधील त्या त्यावेळच्या राजे महाराजांचे मोगल आणि इंग्रजांशी काय नाते होते आणि आपल्या छत्रपती महाराजांचे काय नाते होते. आपल्या राज्यातील किल्ले लढाईच्या दृष्टीने उभारले गेले. राजस्थानमधील किल्ल्यांमध्ये पंचतारांकित हॉटेल्स उभारली गेली आहेत. हा इतिहास जाणून घेऊन पुढे गेलो तर मी माननीय सदस्यांच्या मताशी सहमत आहे की, आपल्या राज्यातील किल्ल्यांची अवस्था लक्षात घेता आपण अधिक चांगल्याप्रकारे जतन करु शकतो. तेथे अधिक पर्यटकांचा ओघ कसा वाढेल या पध्दतीने त्यांची निगा राखू शकतो. पर्यटकांनी ते किल्ले बघण्यासाठी यावे याकरिता चांगले वातावरण नक्की करु. या सगळ्याचा विचार करण्यासाठीच किल्ले आणि गड संवर्धन समिती नेमली आहे. माननीय सदस्यांच्या कल्पनेत ज्या ज्या गोष्टी आहेत त्याची दखल घेऊन संवर्धन समिती त्यावर कार्यवाही करेल.

**सभापती** : संवर्धन समितीची बैठक घेतली जाईल त्यावेळी माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण व अन्य इतिहासप्रेमी लोकांना बोलावून त्यांचे विचार ऐकून घ्यावेत आणि त्यातून जो मार्ग काढणे शक्य होईल तो काढण्याचा प्रयत्न करावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, विधानपरिषद आश्वासन समितीच्या माध्यमातून आम्ही सिंधुदुर्ग किल्ल्याची पाहणी केली होती. त्यावेळी असे दिसून आले की, सिंधुदुर्ग किल्ल्याची मोठया प्रमाणात पडझड झाली असून त्याची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. वास्तविक पुरातत्व विभाग हा केंद्र सरकारच्या अखत्यारित आहे. त्या विभागाच्या प्रतिनिधींनी आमच्या असे निदर्शनास आणले की, महाराष्ट्र राज्यातील वेगवेगळ्या किल्ल्याच्या डागडुजीसाठी केवळ 2 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत, इतर राज्यातील अशा प्रकारच्या वास्तूसाठी जो निधी दिला गेला त्या मानाने महाराष्ट्र राज्याला अत्यंत तुटपुंजी रक्कम उपलब्ध करुन दिली आहे. सिंधुदुर्ग किल्ला हा पूर्णपणे समुद्रामध्ये बांधण्यात आलेला आहे. अनेक वर्षे किल्ल्याची भिंत दुरूस्त करण्याचा प्रयत्न करुनही ती दुरुस्ती होत नाही. ज्या पध्दतीने काम केले पाहिजे त्या पध्दतीचे काम होत नाही. पुरातत्व विभागाचे म्हणणे आहे की, आमच्याकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही. केंद्र सरकारच्या माध्यमातून या कामाला चालना देण्यासाठी राज्य सरकार काय उपाययोजना करणार आहे? समुद्रामध्ये असलेल्या किल्ल्याची पाहणी करण्यासाठी पर्यटक आकृष्ट होतील या दृष्टीने विशेष मोहीम हाती घेतली जाईल काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे हे कोकणातील आहेत. त्यांनी मांडलेला मुद्दा रास्त आहे. काही गड व किल्ले केंद्र सरकारच्या किंवा राज्य सरकारच्या अखत्यारित येतात. सिंधुदुर्ग किल्ला हा केंद्र सरकारच्या यादीतील असून या किल्ल्याच्या दुरूस्तीसाठी पुरेसा निधी येणे अपेक्षित असताना नाममात्र तरतूद उपलब्ध होत होती. त्यातून योग्य ती कामे करणे शक्य होत नव्हते. यावेळी मी बजेट तयार होण्यापूर्वी केंद्रीय सांस्कृतिक मंत्री श्री.महेश शर्मा यांची दोन तीन वेळा भेट घेऊन चर्चा केली. रायगड किल्ला हा केंद्र सरकारच्या यादीमध्ये आहे. तो डी-नोटिफाय करुन राज्याकडे देता येऊ शकतो. रायगड किल्ला हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा मुद्दा आहे. तो किल्ला केंद्राच्या यादीतून वगळून राज्याच्या यादीत समाविष्ट केला तर त्या किल्ल्याचे ज्या काटेकोरपणे संवर्धन करायचे आहे ते आम्ही करु अधिक चांगल्या प्रकारे आम्ही संवर्धन करु शकतो. इतर किल्ले आहेत त्यासाठी केंद्र सरकारकडून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

जो निधी यावयास पाहिजे तो अधिक प्रमाणात मागितला आहे. त्याचा पाठपुरावा करीत आहोत. ते अगोदरच्या काळात झाले असते तर किल्ल्याचा बुरूज अधिक ढासळला नसता.

..3..



श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, दोन राज्यातील किल्ल्यांची तुलना होऊ शकत नाही. काही प्रमाणात मी या मताशी सहमत आहे. तरी सुध्दा आपल्या राज्यातील जे किल्ले आहेत त्या किल्ल्याच्या भिंतीमध्ये झाडे उगवतात, त्या झाडांची मुळे वाढत गेल्याने भिंतीचे दगड सैल होतात. राजा कुंभ याने कुंभाळगडाची उभारणी केली होती. तो आणि इतर किल्ले पाहून आपल्या राज्यातील किल्ल्याची सुधारणा करता आली तर ती करावी अशी मी विनंती करते.

श्री.विनोद तावडे : माननीय सभापतींनी आदेश दिले आहेत. आपण आणि इतर माननीय सदस्य जे सुचवतील त्याचा अंतर्भाव विचार करताना त्यात आम्ही करु.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, विजयदुर्ग किल्ल्यामध्ये सफाई करण्यासाठी विद्यार्थी गेले तर पुरातत्व विभागाकडून परवानगी दिली जात नाही. हा शिवकालीन किल्ला असून तीनही बाजूला समुद्र आहे. 700 वर्षापूर्वीचे जूने बांधकाम तशाच अवस्थेत असून पुरातत्व विभागाने 7 वर्षापूर्वी दुरुस्त केलेला भाग ढासळला आहे. त्यामुळे किल्ल्याची दुरवस्था झाली आहे. भिंतीमध्ये झाडे उगवली आहेत. पुरातत्व विभागाने छोटी छोटी कामे केली तरी हा किल्ला मजबूत होऊ शकतो. सफाई आणि इतर किरकोळ कामासाठी स्थानिक लोकांचा सहभाग घेण्याबाबत संवर्धन समितीमार्फत पुरातत्व विभागाकडे प्रयत्न केले जातील काय?

श्री.विनोद तावडे : आता काम मजबुतीने होईल, कारण मजबूत मंत्री आहे. काळजी करु नका. सर्वार्थाने मजबूत आहे. विजयदूर्ग किल्ल्याबाबत माननीय सदस्यांनी जे मत मांडले आहे ते खरे आहे. काही ठिकाणी झाडांची मुळे वाढल्यामुळे किल्ल्याच्या तटबंदीला धोका निर्माण होतो. त्या त्यावेळी या सगळ्याची आर्किटेक्ट पध्दतीने तपासणी केली पाहिजे. आपण अधिक जाणता. या किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी फुटकळ निधी वाटला जातो. त्यामुळे दुरुस्ती योग्य प्रमाणात होत नाही. दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने विचार करु.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

24-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) I.4

SGB/ AKN/ KTG/ 13:20

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्यातील किल्ले आणि इतर राज्यातील किल्ले यांच्यात जमीन अस्मानाचा फरक आहे. आपल्या राज्यातील किल्ले शालिवाहन काळापासूनचे आहेत. त्यांचे संरक्षण करणे हा एक मुद्दा आहे. त्या किल्ल्यांचा इतिहास सुध्दा अनेकांना माहित नसतो. त्या इतिहासाचे प्रदर्शन घडविणारा कार्यक्रम किंवा उपक्रम विभागामार्फत राबविण्यात येईल काय, त्या किल्ल्याचा वैशिष्ट्यपूर्ण इतिहास सांगणारा कार्यक्रम करण्याचा प्रयत्न विभागाकडून केला जाईल काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. लोकांनी किंवा पर्यटकांनी या किल्ल्यावर जायचे कशासाठी? त्यांना तेथे गेल्यानंतर इंटरेस्टींग माहिती कळेल, इतिहास कळेल अशी व्यवस्था असावी. किल्ल्याच्या ठिकाणी गाईड नसतो, दृकश्राव्य यंत्रणेची व्यवस्था नसते. गो.नी.दांडेकर, बाबासाहेब पुरंदरे यांच्याबरोबर आम्ही किल्ले पाहण्यासाठी फिरलेलो असल्यामुळे आम्हाला आवड आहे. तशी माहिती आता उपलब्ध नसल्यामुळे गड किल्ल्याची पाहणी करण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना सगळा इतिहास कळला पाहिजे.

नंतर जे.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी गड-किल्ले यासंबंधातील छोटासा अभ्यासक्रम ठेवला तर त्यातून देखील काही तरी निर्माण होऊ शकेल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, गड,किल्ले संवधर्नासाठी समिती नेमली आहे. आता आपण रायगडावर रायगड महोत्सव सुरू करणार आहोत. त्याचा उल्लेख माननीय वित्त मंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात केला होता. रायगडावर शिवकालीन वातावरण उभे करून देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यात येणार आहे. सुरूवातीला पाच ते सहा दिवसांचा रायगड महोत्सव सुरू करण्याचे आमच्या विचाराधीन आहे. शिवकालीन वातावरण कसे होते हे आम्ही त्यातून दाखविणार आहोत. यात महाराजांचा शिवराज्यभिषेक कसा झाला त्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे. एवढेच नव्हे तर गडावर शिवकालीन बाजारपेठ देखील उभी करण्यात येणार आहे. अशा प्रकारे चार ते पाच हजार कलाकारांच्या माध्यमातून आपण रायगडावर शिवसृष्टी उभी करण्याचा विचार करीत आहोत. आता आपण रायगडासाठी 1 कोटी 80 लाख रूपये दिले आहेत. या राज्यातील गड, किल्ले या द्वारे स्वाभिमानाचा, लढाईचा इतिहास येथे येणाऱ्या पर्यटकांना स्फूर्ती देणारा असेल अशा पद्धतीनेच आम्ही या पुढे किल्ल्यांचे संवर्धन करणार आहोत.

......

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

लक्षवेधी क्र.3

**पृ.शी. :** ***मौजे दहिसर, ता.बोरीवली येथे कमाल जमीन धारणा अधिनियमान्वये सवलती प्राप्त करुन राबविण्यात आलेल्या गृहनिर्माण प्रकल्पात अनियमितता झाल्याचे उघडकीस येणे***

**मु.शी. :** ***मौजे दहिसर, ता.बोरीवली येथे कमाल जमीन धारणा अधिनियमान्वये सवलती प्राप्त करुन राबविण्यात आलेल्या गृहनिर्माण प्रकल्पात अनियमितता झाल्याचे उघडकीस येणे*** यासंबंधी श्री.पांडुरंग फुंडकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मौजे दहिसर, ता.बोरीवली येथील सीटीएस क्रमांक १५१०, १४१४-ब, १४२१-अ, १४२१-क, १४२१-ड, १४२२ येथे कमाल जमीन धारणा अधिनियमान्वये सवलती प्राप्त करुन राबविण्यात आलेल्या गृहनिर्माण प्रकल्पात काही अनियमितता झाल्या असल्याचे माहितीच्या अधिकारान्वये फेब्रुवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस येणे, सदर प्रकल्पात एकूण अनुज्ञप्ती प्राप्त ३१३ सदनिकांपैकी ३२ सदनिका परस्पर विकून शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान करणे, तसेच अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांकापेक्षा जास्त एफएसआय वापरणे, या प्रकरणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ रोजी पत्रान्वये आयुक्त, मुंबई महानगरपालिका तसेच मुख्य अभियंता इमारत प्रस्ताव विभाग, मुंबई महानगरपालिका यांनी संबंधित विकासकाविरुध्द कडक कारवाई करण्याची मागणी केली असता सदर पत्रांच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न होणे, या प्रकरणी तातडीने दखल घेऊन सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."***

डॉ.रणजित पाटील :(नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनातील पहिल्या आणि दुसऱ्या परिच्छेदामध्ये उक्त मंजूर योजनेनुसार विकासकाने उपरोक्त भूखंडावर 40.00 चौरस मीटर पर्यंत बांधीव क्षेत्राच्या 313 सदनिका बांधून त्यापैकी 10 टक्के प्रमाणे शासन देय 32 सदनिका शासनास प्रत्यार्पित करणे बंधनकारक होते असे नमूद केलेले आहे, तर दुसऱ्या परिच्छेदामध्ये 10 टक्क्याप्रमाणे 20 सदनिका शासनास प्रत्यार्पित करणे बंधनकारक होते असे नमूद केलेले आहे. यासंबंधी दिनांक 6 ऑगस्ट 2014 रोजी एक पत्र मुख्य अभियंता, इमारत प्रस्ताव विभाग, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना दिले होते. त्यात एकूण अनुज्ञप्ती प्राप्त 313 सदनिकांपैकी 32 सदनिका शासनास देणे आवश्यकता असताना संबंधित विकासकाने सदर 32 सदनिका परस्पर विकून शासनाचा करोडो रूपयांचा महसूल बुडविला आहे असा मी पत्रात आरोप केला आहे. तसेच अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा जास्त एफएसआय वापरला आहे अशी देखील मी तक्रार केली होती. पर्यावरण खात्याची परवानगी न घेता कांदळवनाची मोठ्या प्रमाणावर कत्तल केली जात असल्याची देखील मी तक्रार केली होती. या तक्रारीची चौकशी करावी अशी मी मागणी केली होती. माझ्या पत्राला साधे उत्तर देखील मिळाले नव्हते. चौकशी देखील झाली नाही. प्रस्तुत भूखंडावर खेळाचे मैदान, मार्केट, इत्यादी नागरी सुविधांचे आरक्षण असताना विकासकाने अधिकाऱ्यांच्या संगनमताने या प्रकल्पास मंजुरी मिळविली आहे. एकूण 8 इमारतींचे बांधकाम करणे गरजेचे असताना प्रत्यक्षात फक्त पाच इमारती उभारल्या आहेत. उरलेल्या तीन इमारतींचे बांधकाम जोत्या पर्यंत झालेले आहे. हा प्रस्ताव 1990 पासूनचा आहे. एकूण पाच इमारतींमधून 20 सदनिका अल्प उत्पन्न गटास वितरित करण्यासाठी शासनाला देणे आवश्यक असताना विकासकाने सदनिका बाजारभावाने परस्पर विकलेल्या आहेत. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून ज्यांनी ज्यांनी यात अनियमितता केली आहे त्यांना शासन करण्यात येणार आहे काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हे खरे आहे की, सदर प्रकल्प हा 1993 मध्ये सुरू झाला. एक दशक उलटून गेले तरी लोकांना सदनिका मिळालेल्या नाहीत. अजूनही काही लोक प्रतीक्षेत आहेत. यासाठी काही कारणे देखील होती. 1993 मध्ये सेक्शन 20 खाली ही ....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील...

योजना मंजूर झाली. 40 चौ.मी.च्या 313 सदनिका बांधायच्या होत्या हे खरे आहे. त्यापैकी 30 सदनिका या शासनाला देय होत्या. पण दिनांक 11.10.1995 रोजी एक शुद्धिपत्रक निघाले आणि 8 (4) संबंधात सुधारित ऑर्डर निघाली. यात त्यांच्याकडे 15000 चौ.मी.अतिरिक्त असलेली जागा 7000 चौ.मी.पर्यंत आली. त्यामुळे सेक्शन 20 सुद्धा रिवाईज झाले. त्यामुळे पूर्वी शासनाला 30 सदनिका देय होत्या त्याचे प्रमाण 20 सदनिकांवर आले. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचे 10 टक्क्यांऐवजी पाच टक्क्यांपर्यंत सदनिका राखून ठेवण्याबाबतचे आदेश आले. त्यामुळे 20 सदनिकांवरून हे प्रमाण 10 सदनिकांपर्यंत आले. 10 सदनिकांनंतर पुन्हा या विकासकाने शासनाला विनंती केली की, माझी जागा आरजी आणि अंतर्गत रस्त्यांमध्ये गेली आहे. त्यामुळे या क्षेत्राच्या मोबदल्यात कोणतेही क्षेत्र प्रत्यार्पित करण्याची आवश्यकता नसल्याने एकूण 8 सदनिका शासनास प्रत्यार्पित करण्याचे आदेश देण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या पत्राला अधिकारी पोच देत नसतील तर संबंधितांची चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल. येथे विकासकाने सर्व सोयी सुविधा पुरविल्या आहेत. 3 इमारतींचे बांधकाम सीआरझेड मुळे थांबलेले आहे. 20 सदनिका परस्पर विकल्या असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांचा होता. तीन इमारतीतील प्रत्येकी एक सदनिका त्या विकासकाने शासनाला दिलेली आहे. चौथ्या इमारतीला एनओसी दिली आहे. पण ओ.सी.दिलेली नाही. पाचव्या इमारतीतील त्यांनी सदनिका दिली नाही म्हणून सक्षम अधिकाऱ्यांमार्फत आपण त्यांचे काम थांबविलेले आहे. सदर इमारतीतील सदनिका विकू नये असे आम्ही सांगितलेले आहे. सदर सदनिका त्यांनी परस्पर विकल्या असतील तर त्याची पूर्ण चौकशी करून यात जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

......

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : ***पुण्यातील एम.आय.टी.कॉलेज मधील विद्यार्थ्यावर करण्यात आलेले रॅगिंग.***

**मु.शी.** : ***पुण्यातील एम.आय.टी.कॉलेज मधील विद्यार्थ्यावर करण्यात आलेले रॅगिंग*** यासंबंधी ***सर्वश्री. अनंत गाडगीळ, शरद रणपिसे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप***,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अनंत गाडगीळ ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"महाराष्ट्र राज्याने सन १९९९ साली रॅगिंगविरुध्द कायदा संमत केला असताना गेल्या वर्षी पुण्यातील एम.आय.टी. मधील एका विद्यार्थ्याला विवस्त्र करण्यात येऊन त्यावर शारीरिक अत्याचार करण्यात येणे, परिणामी त्या विद्यार्थ्याला ३ आठवडे आयसीयुमध्ये ठेवावे लागणे, अद्यापही तो विद्यार्थी संपूर्ण बरा झालेला नसणे, परंतु अद्यापही रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यावर संस्थेने कारवाई केलेली नसणे, पोलिसांनी एफआयआरही दाखल करुन घेण्यास सुरुवातीला टाळाटाळ करणे, रॅगिंग ॲक्ट कलम ९(१) अन्वये ७ दिवसात संबंधित संस्थेने कारवाई न केल्यास संस्थाचालकांवर शासन कारवाई करु शकते, असे असताना हे प्रकरण जाणीवपूर्वक दडपून टाकण्याचे प्रयत्न केले जात असल्याने जनमानसांत निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने चौकशी करुन रॅगिंग विरोधी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."***

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री (शहरे) ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, पुणे शहराला विद्येचे माहेर घर म्हटले जाते. त्या प्रतिमेला काळिमा फासणारी, लांच्छनास्पद अशी घटना मी लक्षवेधी सूचनेद्वारे मांडत आहे. पुण्यातील एमआयटी संस्थेमध्ये एका विद्यार्थ्यांने प्रवेश घेतला होता. त्याच्यावर रॅगिंग करण्यात आले. त्या विद्यार्थ्याला संपूर्ण विवस्त्र करण्यात आले. त्या विद्यार्थ्यावर झालेल्या अत्याचाराचे वर्णन केले तर मी सभागृहात सभ्यतेच्या मर्यादा ओलांडल्या असा अर्थ काढला जाईल. त्या विद्यार्थ्यावर एवढा अत्याचार करण्यात आला की, त्याला 3 दिवस आयसीयु मध्ये ठेवायला लागले. संस्थेचे पदाधिकारी देखील रूग्णालयात विद्यार्थ्याला भेटून गेले. रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अद्याप पर्यंत कारवाई झालेली नसताना देखील लेखी उत्तरामध्ये विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात आली आहे अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले आहे. रॅगिंग करणारे विद्यार्थी आजही कॉलेजमध्ये सकाळी व्यवस्थितपणे येत आहेत आणि संध्याकाळी जात आहेत. सन 1999 मध्ये रॅगिंगला प्रतिबंध बसावा म्हणून महाराष्ट्रामध्ये कायदा करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने कलम 9 (1) अनुसार एका प्रकरणात असे आदेश दिले आहेत की, 7 दिवसामध्ये संबंधित विद्यार्थ्यांवर कारवाई केली नाही तर संस्था चालकांविरूद्ध कारवाई केली पाहिजे. तेव्हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या विद्यार्थ्यांवर कधी कारवाई करण्यात येणार आहे, संस्था चालकांविरूद्ध किंवा प्रिन्सिपॉल विरूद्ध शासन कधी कारवाई करणार आहे काय अशा घटना वारंवार घडत आहेत. तेव्हा कायद्यात बदल करून संस्थेचे अध्यक्ष किंवा संचालक किंवा प्रिन्सिपॉल यांना जबाबदार धरून त्यांच्या विरूद्ध फौजदारी गुन्हा दाखल करणार आहात काय ? आमचे पालक मंत्री श्री.गिरीश बापट यांच्या मतदार संघातील हा प्रश्न मी मांडलेला आहे. हा प्रश्न त्यांनी देखील गांभीर्याने घेतला पाहिजे. आताच माननीय मंत्री सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले की, ज्या कोणी अधिकाऱ्याने उत्तर दिलेले नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ ....

सभापती महोदय, मी दोन तीन सार्वजनिक प्रश्नांवर मुख्यमंत्री महोदयांना दोन तीन पत्रे लिहिली होती परंतु त्यांनी माझ्या एकाही पत्राला उत्तर दिलेले नाही.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सदर विद्यार्थ्यांने जुलै, 2014 मध्ये तोंडी तक्रार केली होती. या विद्यार्थ्याला दोन तीन महिने त्रास होत होता. सदर विद्यार्थी दवाखान्यात भरती झाल्यानंतर पोलिसांमध्ये तक्रार करण्यात आली. सदर विद्यार्थी दवाखान्यात भरती झाल्यानंतर कॉलेज प्रशासन खडबडून जागे झाले व या कॉलेज प्रशासनाने 3 विद्यार्थ्यांना एक महिन्यासाठी रेस्टीकेट केले. कॉलेजने 3 विद्यार्थ्यांवर दि.10-11 सप्टेंबर रोजी कारवाई करुन या 3 विद्यार्थ्यांना एक महिन्यासाठी रेस्टीकेट केले. महाराष्ट्र शासनाचा अँटी रॅगिंग ॲक्ट तसेच हायर अँड टेक्नीकल एज्यूकेशनच्या डायरेक्शननुसार या विद्यार्थ्यांवर सक्त कारवाई झालीच पाहिजे. परंतु यामध्ये इन्स्टिटयूशनच्या हेडला सुध्दा जबाबदार धरले जात असते. तोंडी तक्रारी नंतर सुध्दा सात दिवसाच्या आत कारवाई होणे अपेक्षित असताना ते या ठिकाणी झालेले दिसत नाही त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करुन यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल जेणेकरुन भविष्यात दुसरे विद्यार्थी असा प्रकार करण्यास धजावणार नाहीत.

सभापती महोदय, हायर अँड टेक्नीकल एज्यूकेशन बोर्डने यासंदर्भात कमिटी नियुक्त केली असून या समितीचा रिपोर्ट दोन दिवसामध्ये येणार असून कमिटीच्या रिपोर्टनुसार सात दिवसाच्या आत कारवाई करुन संबंधित दोषींवर कडक कारवाई केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, रॅगिंग ॲक्ट प्रमाणे रॅगिंगचा प्रकार घडल्यानंतर पोलीस कारवाई केली जाते. संस्थाचालकांना माहिती असते की, कॉलेजमधील कोणते विद्यार्थी रॅगिंग करतात. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना बोलावून त्यांचे समुपदेशन केले जाते. त्यामुळे रॅगिंगचा प्रकार होऊ नये, रॅगिंगचे गुन्हे घडू नये यासाठी पोलीस, संस्थाचालक,शिक्षण विभागातील अधिकारी याबाबतीत आराखडा तयार करणार आहेत काय ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी अतिशय मूलभूत प्रश्न विचारलेला आहे. अँटी रॅगिंग ॲक्ट शिवाय युजीसीचे यासंदर्भात

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील ......

रेग्युलेशन्स आहेत. दरवर्षी विद्यार्थी, पालकांकडून रॅगिंगचा प्रकार आढळून आला तर आम्हाला कळविण्यात यावे असे कॉलेज प्रशासनाकडून प्रतिज्ञापत्रावर लिहून घेतले जात असते. तसेच प्रत्येक कॉलेजला एक स्टँडिग कमिटी सुध्दा असते. परंतु सदर कॉलेजमध्ये गेल्या दोन वर्षापासून अशा प्रकारची स्टँडिग कमिटी नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे यासंदर्भात शासन कडक कारवाई करेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनंत गाडगीळ यांनी पुण्याच्या एका ज्वलंत प्रश्नाकडे लक्ष वेधलेले आहे. विद्यार्थ्याने नोव्हेंबर 2014 मध्ये तक्रार केली होती. खरे म्हणजे 3 महिन्यात चार्जशिट दाखल व्हावयास पाहिजे होते. चार्जशिट दाखल न झाल्यामुळे गुन्हेगारांना मोकळे रान मिळते. याबाबत कोथरुड पोलीस स्टेशनने आरोप पत्र का दाखल केले नाही, याबाबत काही चौकशी करण्यात आली होती काय ? आरोप पत्र दाखल न झाल्याबद्दल गृहराज्यमंत्री कोणती कारवाई करणार आहेत ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पुण्यात अनेक चांगल्या संस्था आहेत. याच संस्थेमध्ये नव्हे तर अनेक संस्थांमध्ये अँटी रॅगिंग कमिटी अस्तित्वात नाही. मॅनेजमेंट तक्रारींची दखलच घेत नाही. अनेक विद्यार्थी संघटनेने यासंदर्भात निवेदने दिलेली आहेत. परंतु शिक्षण विभागाकडून यासंदर्भात कोणतीही उत्तरे देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे रॅगिंगच्या विरोधात समित्या स्थापन करण्याच्या संदर्भात तसेच असे प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यासंदर्भात कठोर कारवाईच्या सूचना शासनाकडून दिल्या जातील काय ? तसेच आरोप पत्र दाखल न केल्याबाबत माननीय गृहराज्यमंत्री माहिती देऊ शकतील काय ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, चार्जशिटला उशीर का करण्यात आला असा प्रश्न सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विचारला आहे. जेएमएफसीमध्ये पीडित मुलाची आई गेली होती व त्यावेळी त्या महिलेने कलमे वाढविण्याची विनंती केली होती. त्यांनतर काही कालावधी नंतर पालकांनी असे सांगितले की, केवळ मुलेच नाही तर कॉलेजच्या संबंधित शिक्षकांनाही आम्हाला दोषी धरावयाचे आहे. त्यामुळे यामध्ये विलंब झालेला आहे. आरोप पत्र दाखल करण्यामध्ये का विलंब झाला याबाबत मी स्वत: लक्ष घालणार असून यासंदर्भात लवकरात लवकर चार्जशिट दाखल केले जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी माहिती दिली आहे की, या प्रकरणात संस्थाचालकांनी संबंधित 3 विद्यार्थ्यांना 1 महिन्याठी रेस्टीकेट केले होते. तसेच पुढील चौकशी करुन संबंधित विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल अशीही माहिती मंत्री महोदयांनी दिलेली आहे. संस्था चालकांनी संबंधित विद्यार्थ्यांना एक महिन्यासाठी रेस्टीकेट केले होते ते कशाच्या आधारे ? हे विद्यार्थी रॅगिंगमध्ये दोषी आढळल्यामुळेच संस्थाचालकांनी दोषी विद्यार्थ्यांवर कारवाई केलेली होती. हे विद्यार्थी दोषी आढळलेले असताना अजून कोणती चौकशी केली जाणार आहे ? हे विद्यार्थी एक महिन्यासाठी रेस्टीकेट झाले होते याचा अर्थ हे विद्यार्थी दोषी होते असाच त्याचा अर्थ होतो. संस्थाचालकांनी एक महिन्याची रेस्टीकेटची कारवाई कोणत्या आधारावर केली होती, कोणत्या कायद्याच्या आधारे केली ? संबंधित विद्यार्थ्याला ज्यावेळेस रुग्णालयात दाखल करण्यात आले होते त्यावेळेस एमएलसी झाली होती काय, एमएलसीच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे ? या 3 विद्यार्थ्यांना त्या कॉलेजमधून कायमस्वरुपी रेस्टीकेट केले जाणार आहे काय ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, या प्रकरणातील विद्यार्थ्यांवर सेक्शन 342,355 आणि 506 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सेक्शन 4 ऑफ महाराष्ट्र प्रोहिबिशन सेक्शन ऑफ रॅगिंग ॲक्ट अंतर्गत दोन वर्षाची कैद किंवा 10 हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

सभापती महोदय, एकाच महिन्यासाठी या विद्यार्थ्यांना का रेस्टीकेट करण्यात आले असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असून यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, स्टँडींग कमिटी किंवा तेथील जी काही समिती असते त्या समितीने यासंदर्भात तात्काळ जे काही करावयास पाहिजे होते ते त्यांनी केलेले आहे. परंतु फायनल पनिश्मेंटसाठी पोलिसांचा तपास होईल, चार्जशिट होईल तसेच युजीसीचे जे काही रिझॉल्यूशन्स आहेत त्या प्रमाणे कारवाई केली जाईल. समितीचा रिपोर्ट सात दिवसात मागवला जाईल व या रिपोर्टच्या आधारे जी काही कडक शिक्षा देता येईल ती शिक्षा या प्रकरणातील विद्यार्थ्यांना दिली जाईल.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या प्रकरणातील लक्षवेधी सूचना उपस्थित केली नसती तर या कॉलेजमधील दोषी विद्यार्थी असेच मोकाट फिरले असते.

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अनंत गाडगीळ : सभापती महोदय, गेल्या आठवडयात दुर्दैवी विद्यार्थ्यांच्या पालकांनी माझी भेट घेतली होती. या विषयाच्या संदर्भात त्यांनी युजीसीकडे सुध्दा तक्रार केलेली आहे. सदर विद्यार्थी दोषी अथवा निर्दोष असल्याचे अजूनही सिध्द झाले नसल्यामुळे आम्ही या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये प्रवेश दिलेला आहे यासंदर्भातील कॉलेजचा माझ्याकडे ईमेल आहे. त्यामुळे या कॉलेजवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, जर कोणी कॉलेजमध्ये अशाप्रकारचे दुष्कृत्य करीत असेल तर, करिअर मेकिंगच्या स्टेपवर अशा गोष्टी करीत असेल तर, त्याबाबत कोणत्याही प्रकारचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जाणार नाही.

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी एका अत्यंत महत्वाच्या विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, शाळा आणि कॉलेजेसमध्ये अशा गोष्टी वारंवार घडत असतात. देशात आणि परदेशात पुणे शहर हे विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. अशा पुणे शहरात आणि एमआयटीसारख्या संस्थेत असे प्रकार घडतात ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. मला असे वाटते की, तपासामध्ये काही लॅप्सेस झाले असतील, मग ते आयपीसी खालील असतील, रॅगिंग ॲक्ट खालील असतील किंवा पोलीस पातळीवरील असतील, आपण यामध्ये जातीने लक्ष घालून असे प्रकार थांबविले पाहिजेत. लक्षवेधीच्या निवेदनात नमूद केलेले आहे की, मोबाईलवर त्याचे चित्रण झालेले आहे. तेव्हा जास्त पुराव्याची गरज काय ? आपली जी काही पॉलीसी असेल त्यातील बाबी विचारात घेऊन ज्या मुलांनी हे कृत्य केलेले आहे त्यांना कायम स्वरुपी कॉलेजमधून बाहेर काढावे असे माझे निर्देश आहेत. या सर्व प्रकारणामध्ये संस्थेची काही चूक असेल तर संस्थेवर कारवाई करावी. सर्व सन्माननीय सदस्यांनी आक्रमकपणे हा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. फौजदारी प्रक्रिया वगैरे बाबी होत राहतील. परंतु ज्या विद्यार्थ्यांवर अशाप्रकारचे शारीरिक आणि मानसिक अत्याचार झालेले आहेत त्यामुळे तो आयसीयुमध्ये ॲडमिट आहे. अशाप्रकाराला जे बळी पडत आहेत त्यांना मानसिक कौन्सिलींग देण्याचे बंधनकारक करावे. कारण या धक्क्यातून बाहेर पडणे अत्यंत गरजेचे असते. ही फक्त रॅगिंगची केस आहे अशातला भाग नाही. मग बलात्काराच्या घटना असतील किंवा समाजामध्ये नानाप्रकारच्या घटना घडत आहेत त्यासाठी कौन्सिलींग करणे गरजेचे आहे. ज्या संस्थेमध्ये असे प्रकार घडतील त्या संस्थेने स्वतःच्या खर्चाने कौन्सिलींग करावे असे मी निदेश देत आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, होय.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: गेवराई जि.बीड विधानसभा क्षेत्रातील सहा ग्रामपंचायतीच्या विभक्तीची होत असलेली मागणी

**मु.शी.**: गेवराई जि.बीड विधानसभा क्षेत्रातील सहा ग्रामपंचायतीच्या विभक्तीची होत असलेली मागणी यासंबंधी सर्वश्री अमरसिंह पंडित, सतीश चव्हाण, धनंजय मुंडे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमरसिंह पंडित ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गेवराई, जि.बीड विधानसभा क्षेत्रातील अनेक ग्रामपंचायतीच्या विभक्तीची मागणी लोकप्रतिनिधी व ग्रामीण जनतेतून करण्यात येणे, लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती, दळणवळण आदी बाबींचा विचार करुन विभक्तीकरणाची मागणी होणे, एकाच ग्रुप ग्रामपंचायतीतील गावे वेगवेगळ्या तहसील, पंचायत समिती, पोलीस स्टेशन हद्दीत असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागणे, एकाच ग्रुप ग्रामपंचायतीच्या दोन गावामधून सिंदफणा नदीसारखी मोठी नदी गेल्यामुळे त्यांचा आपसातील संपर्क तुटणे, ग्रामपंचायत स्तरावर येणारा विकास निधी वाटप करताना वस्ती आणि तांडा यांच्यावर सतत अन्याय होणे, तांड्यातील अशिक्षित, मागास बंजारा समाजावर यामुळे मोठा अन्याय होणे, विविध बंजारा संघटना यांनी तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याची मागणी शासनाकडे करणे, संबंधित ग्रामस्थांनी ग्रुप ग्रामपंचायतीच्या विभक्तीकरणाच्या केलेल्या मागणीकडे शासनाने अक्षम्य दुर्लक्ष करणे, यामुळे सर्वसामान्य नागरिक व तांड्यातील बंजारा समाजात पसरलेला शासनविरोधी तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.दीपक केसरकर ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना गेवराई, जिल्हा बीड विधानसभा क्षेत्रातील सहा ग्रामपंचायतींच्या विभक्तीची मागणी करण्या संदर्भातील आहे. तलवडा ग्रामपंचायत ही निकषात बसत आहे, परंतु निवडणूक लागल्यामुळे त्या संदर्भातील प्रस्ताव आता करता येणार नाही असे निवेदनात नमूद केलेले आहे. सदर ग्रामपंचायतीचा प्रस्ताव शासन स्तरावर सात महिन्यांपासून प्रलंबित असण्याचे कारण काय आहे ? जातेगाव ग्रामपंचायतीच्या संदर्भात कळविण्यात आलेले आहे की, अंतर कमी पडते म्हणून नाकारण्यात आलेले आहे. पाचेगाव ग्रामपंचायतीचा प्रस्ताव आलेला आहे, त्याचा विचार करण्यात येईल असे सांगण्यात आलेले आहे. केसापुरी व ईर्ला मजरा आणि डुब्बा मजरा या ग्रामपंचायतींना पंचायती समिती माजलगाव आणि दुसऱ्या ग्रामपंचायतीला पंचायत समिती वडवली आणि विधानसभा क्षेत्र मात्र गेवराई आहे. ही ग्रुप ग्रामपंचायत आहे. एखादे काम असेल तर एकाने वडवली येथे जायचे आणि दुसऱ्याने माजलगाव येथे जायचे. वेगळी ग्रामपंचायत करण्यासाठी लोकसंख्येच्या संदर्भातील अट सांगण्यात येत आहे. ईर्ला मजरा, डुब्बा मजरा, केसापुरी आणि चकलांबा संदर्भात "खास बाब" म्हणून निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, ईर्ला मजरा आणि डुब्बा मजरा या दोन ग्रामपंचायतीमध्ये धरण झाल्यामुळे त्या ग्रामपंचायती विभक्त झालेल्या आहेत. परंतु त्यांची लोकसंख्या अत्यंत कमी आहे. त्याचबरोबर या ग्रामपंचायतीच्या बाजूला दोन तालुके येतात. त्या तालुक्यांमध्ये या ग्रामपंचायती मर्ज करता येतात किंवा कसे या संदर्भात सन्माननीय सदस्यांसोबत चर्चा करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी चकलांबाच्या संदर्भात सांगितले की, चकलांबाच्या संदर्भात ग्रुप ग्रामपंचायत करण्याचा प्रस्ताव आला तर आणि दोघांची लोकसंख्या एकत्र केली तर ती एक हजाराच्यावर जाते. तेव्हा ग्रुप ग्रामपंचायतीचा प्रस्ताव आला तर त्याबाबत निश्चिपणे विचार करण्यात येईल. हा एक वेगळ्या तऱ्हेचा प्रश्न आहे. नवीन ग्रामपंचायतीसाठी असलेल्या अटीमध्ये अंतराची अट आहे, लोकसंख्येची अट आहे, या सर्व बाबींचा विचार करून निर्णय घ्यावा लागतो.

सभापती महोदय, स्टेट इलेक्शन कमिशन सर्व निवडणुका घेते. त्यांच्या सूचना आहेत की, सहा महिन्यात कोणत्याही ग्रामपंचायतीचे विभाजन करता येणार नाही. या संदर्भात स्पेशल केस करता येते काय अशी विचारणा केली असता, अशी स्पेशल केस करता येणार नाही असे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर...

त्यांच्याकडून सांगण्यात आले. त्यामुळे निवडणुकीपूर्वी सहा महिने ग्रामपंचायतीचे विभाजन करता येणार नाही आणि निवडणूक होऊन ग्रामपंचायत गठीत झाल्यापासून दोन वर्षे विभाजन करता येणार नाही. उर्वरित ग्रामपंचायतीच्या संदर्भात निर्णय घेंण्यासाठी अधिवेशन संपण्यापूर्वी सन्माननीय सदस्यांना माझ्या दालनात बोलावून या कामास गती देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

सभापती महोदय, हे सर्व प्रस्ताव पंचायत समितीकडे दिनांक 15 मार्च रोजी प्राप्त झाले आणि दिनांक 18 मार्च रोजी ते जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आले. हे प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठवावे लागतील त्यानंतर त्यावर योग्य तो निर्णय घेता येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक घेऊन सर्व प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात येईल. बीड जिल्ह्यातील अनेक वाड्या आणि तांडे हे वेगळी ग्रामपंचायत करण्यासंदर्भातील निकष पूर्ण करतात. तेव्हा मंत्री महोदयांनी बीड जिल्ह्यातील वेगळी ग्रामपंचायत करण्याच्या मागण्या संदर्भातील सर्व प्रलंबित प्रश्न त्या बैठकीत घेऊन ते मार्गी लावण्यात येतील काय ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, आपण ज्या ग्रामपंचायतीची माहिती घेतलेली आहे त्या संदर्भात जरूर बैठक घेण्यात येईल. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, इतर काही प्रश्न प्रलंबित आहेत. त्याची त्यांनी माहिती द्यावी. त्याबाबत आपणास नंतर देखील मिटींग बोलाविता येईल. माहिती नसताना मिटींग बोलाविली तर निर्णय घेता येणार नाही. आता जी माहिती उपलब्ध आहे त्याबाबत आश्वासित करु इच्छितो की, जे काही जेन्यूईन प्रश्न असतील त्यामध्ये लक्ष घालण्यात येईल. तसेच आपणास प्रोसिजर पूर्ण करावी लागेल.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**शासकीय इमारतींचे फायर ऑडिट करण्यासंबधी औचित्याचा मुद्दा**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते. तसेच आपण पुण्याच्या एमआयटी संस्थेत झालेल्या रॅगिंगसंबंधी शासनाला जे निर्देश दिले, त्याबद्दल देखील मी आपले आभार मानते.

सभापती महोदय, मी जो मुद्दा उपस्थित करीत आहे तो थेट आपल्याशी संबंधित नाही. दिनांक 22 मार्च, 2015 रोजी नवी दिल्ली येथील संसद भवनातील एसी प्लान्टला आग लागली. दोन-अडीच वर्षापूर्वी मंत्रालयाला आग लागली होती. आता मंत्रालयाचे नूतनीकरण झालेले आहे. ज्या ज्यावेळी महाराष्ट्रात आणि मुंबईतील इमारतींना आग लागते त्यावेळी फायर ऑडिटची चर्चा होते. विधान भवन, शासकीय इमारती, ठिकठिकाणच्या महानगरपालिकांच्या इमारतींमध्ये आगीच्या संदर्भात कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत ? सत्रकाळात सुरक्षितेच्या दृष्टीने आपण विधान भवनात वाहन आणण्यावर बंदी घातलेली आहे. मला औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधायचे आहे की, विधान भवन आणि अन्य शासकीय इमारतींमध्ये जी काही विद्युत उपकरणे आहेत त्याच्या सुरक्षिततेच्या संदर्भात, आगीच्या संदर्भात उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातून लक्ष घालावे, अशी विनंती आहे.

**सभापती** : या संदर्भात शासनाने निवेदन करावे.

-----------

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : स्वच्छ भारत अभियान (नागरी) ची अंमलबजावणी राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) म्हणून मिशन मोड पध्दतीने करणे

**मु.शी.** : स्वच्छ भारत अभियान (नागरी) ची अंमलबजावणी राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) म्हणून मिशन मोड पध्दतीने करणे, या संबंधी नगर विकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो..

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## विशेष उल्लेखाच्या सूचना

**पृ.शी./मु. शी.** : मौजे आपटीतांडा (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथे व तालुक्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याने टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे, याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडते.

" मौजे आपटीतांडा (ता.पैठण, जि.औरंगाबाद) या गावात व परिसरात या वर्षात अतिअल्प पाऊस पडल्याने पाण्याची पातळी खाली गेल्याने तालुक्यात भीषण पाणी टंचाई निर्माण होणे, औरंगाबाद जिल्हयात यावर्षी दुष्काळ सदृश परिस्थिती असल्याने कुटुंबातील मोठी माणसे (आई-वडील) पोटाच्या उदरनिर्वाहासाठी ऊसतोडीच्या कामासाठी बाहेरगावी जाणे, परिणामी घरातील मोठया मुलीला सुमारे दीड किलोमीटरहून पाणी आणावे लागत असणे, तालुक्यात पाण्याची तीव्र टंचाई असल्याने टँकरने पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता, सदर गावात भीषण पाणी टंचाई विचारात घेता टँकरद्वारे तातडीने पाणी पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : राज्यातील अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत असणाऱ्या ग्रंथपालांना शिक्षकांप्रमाणे (बी.एड.) वेतनश्रेणी देणे, याबाबत डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो. राज्यातील अनुदानित माध्यमिक शाळांमधील ग्रंथपालांच्या समस्यांविषयी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

"राज्यामध्ये अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये ग्रंथपाल म्हणून जे काम करतात त्यांना बी.एड. शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी द्यावी असा उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाला आहे. बऱ्याच वेळा असे होते की, प्रत्येक व्यक्तीने न्यायालयात जाणे प्रस्तुत नाही. त्यामुळे शासनाने न्यायालयाचा झालेला निर्णय ग्राह्य मानून सर्व ग्रंथपालांना बी.एड. शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी द्यावी. तसेच आज ग्रामीण भागात विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे. ग्रंथपालांची नितांत गरज आहे. चांगले आणि उत्तम वाचनालय असणे तसेच वाचन संस्कृती रूजविणे हे खूप महत्त्वाचे आहे. सध्या ग्रंथपाल पदासाठी 1 हजार विद्यार्थी संख्येची अट आहे, ती अट शिथिल करून ती 500 विद्यार्थी संख्येपर्यंत आणावी, अशी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या माध्यमातून विनंती करतो."

---------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : हवेली जात पडताळणी समितीमार्फत बनावट जात वैधता प्रमाणपत्र दिल्याचे उघडकीस येणे, याबाबत ॲड.जयदेव गायकवाड, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यात महसूल विभागाच्या वतीने प्रामुख्याने तहसीलदार आणि प्रांत अधिकारी यांच्याकडून सर्व कागदपत्रांची छाननी व शहानिशा करुन एखाद्या व्यक्तीला जातीचा दाखला दिला जातो, परंतु हा दाखला वैध आहे की नाही, हे तपासण्यासाठी समाजकल्याण विभागाच्या वतीने जात पडताळणी समितीच्यामार्फत जात वैधता प्रमाणपत्र दिले जाते, जातीच्या दाखल्यासोबत हे वैधता प्रमाणपत्र असेल तरच महसूल विभागाने दिलेला दाखला ग्राह्य धरला जातो, मात्र हवेली जात पडताळणी समितीमार्फत बनावट जात वैधता प्रमाणपत्र दिले असल्याचे माहे, मार्च, 2015 च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस येणे, या बाबत दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनास करीत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : राजे संभाजी माध्यमिक विद्यालय, अंत्री देशमुख, ता.मेहकर, जि.बुलढाणा या शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वेतनातून 5 टक्के रक्कम शाळेच्या विकासासाठी जमा करण्याबाबत संस्थेच्या अध्यक्षांनी आदेश देणे, याबाबत श्री.नागो पुंडलिक गाणार,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वेतनामधून 5 टक्के इतका आर्थिक निधी शाळेच्या वेतनेतर खर्चासाठी जमा करण्याकरिता शासनाने कोणतीही अधिसूचना काढलेली नसताना दयानंद महाराज बहु. सेवासंस्था, चिखली, जि.बुलढाणा या संस्थेच्या अध्यक्षांनी संस्थेद्वारा संचलित राजे संभाजी माध्यमिक विद्यालय, अंत्री देशमुख, ता.मेहकर, जि.बुलढाणा या शाळेच्या मुख्याध्यापकांना दि.10/10/2014 रोजी पत्र देऊन इमारत विकास, नवनिर्माण, प्रयोगशाळा विकास, क्रीडा विकास, विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य, संगणक कक्ष, वीज जोडणी इत्यादी बाबींसाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वेतनातून 5 टक्के इतकी रक्कम कपात करुन संस्थेच्या खात्यात जमा करण्याचे दिलेले आदेश, शाळा विकास निधी जमा करण्याबाबत कोणत्याही कर्मचाऱ्याने नकार दिल्यास गंभीर दखल घेतली जाईल अशी दिलेली धमकी, मुख्याध्यापकाने टाळाटाळ केल्यास मुख्याध्यापकांना जबाबदार धरुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात येईल असे आदेश देणे, या गंभीर प्रकाराबाबत शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण होणे, या प्रकरणी शासनाचे झालेले दुर्लक्ष, संस्था चालकांविरुध्द कारवाई होत नसल्याने शिक्षक कर्मचाऱ्यांची होत असलेली आर्थिक पिळवणूक, परिणामत: शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये शासनाविषयी प्रचंड असंतोष पसरणे, ही बाब विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : हवामानातील बदलाची अद्ययावत माहिती उपलब्ध होण्यासाठी मुंबई प्रादेशिक हवामान विभाग व राज्याच्या पर्यावरण विभागाने मोठ्या प्रमाणावर जन जागरण मोहीम हाती घेणे, याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"दिनांक 23 मार्च हा दिन विशेष जागतिक हवामान दिनानिमित्त "क्लायमेट नॉलेज फॉर क्लायमेट ॲक्शन" ही या वर्षीची संकल्पना फार महत्त्वाची आहे. निसर्गाचा प्रकोप रोखणे मानवाच्या हाती नसले तरी अद्ययावत तंत्रज्ञानाच्या मदतीने हवामानातील बदल आधीच जाणून सज्ज राहणे शक्य आहे. अद्ययावत पूर्वानुमान मिळविणे ही खरी गरज आहे. देशातील 318 प्रमुख शहरांमध्ये हवामानाची माहिती देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आता जिल्ह्याऐवजी तालुका पातळीवर, परिसरातील हवामान बदलांचे अपडेट आणि शेती विषयक सल्ले उपलब्ध करुन द्यायला हवेत, अचूक माहितीमुळे आपत्ती व्यवस्थापन, शेती, पर्यटन, आरोग्य अशा सर्व क्षेत्रांना अद्ययावत माहिती उपलब्ध होण्यासाठी मुंबई प्रादेशिक हवामान विभाग व राज्याच्या पर्यावरण विभागाने मोठ्या प्रमाणावर जन जागरण मोहीम हाती घ्यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे."

---------

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : श्री.श्याम हरिश्चंद्र मारकू, रा.थेरोंडा-खंडेरावपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड या मच्छीमाराची जाळी आगीत भस्मसात झाल्याने त्याला नुकसान भरपाई देण्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"श्री.श्याम हरिश्चंद्र मारकू, रा.थेरोंडा-खंडेरावपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड, यांचा परंपरागत मच्छीमारीचा धंदा असून त्यांनी मच्छीमारीसाठी लागणारी जाळी कौलारु खोपटे बांधून समुद्र किनारी ठेवली होती. दिनांक 4 मार्च, 2015 रोजी या खोपटाला अचानक आग लागणे, श्री.श्याम मारकू यांची खोपटात ठेवलेली मच्छीमारी जाळी आगीत भस्मसात होऊन त्यांचे रुपये 1 लाख 75 हजार रुपयांचे नुकसान झालेले आहे. या बाबत तलाठी सजा, रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी दिनांक 6 मार्च, 2015 रोजी नुकसानीचा पंचनामा करुन तहसीलदार, अलिबाग यांना दिनांक 16 मार्च, 2015 रोजी अहवाल पाठविणे, श्री.श्याम मारकू हे अत्यंत गरीब मच्छीमार असून या नुकसानीमुळे त्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागल्याने श्री.श्याम मारकू यांना आर्थिक मदत होण्यासाठी व या प्रकरणी शासनाचे लक्ष वेधून श्री.श्याम मारकू यांना मदत करण्यासंबंधी आदेश होण्याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे."

---------

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : मौजे पिंपळखुटा, ता.पातुर, जि.अकोला या गावामध्ये जल स्वराज्य ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या कामामध्ये भ्रष्टाचार करणाऱ्या शासकीय अधिकारी व कंत्राटदार यांची उच्चस्तरीय चौकशी करून कारवाई करणे याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मौजे पिंपळखुटा, ता. पातूर, जि. अकोला या गावामध्ये जल स्वराज्य ग्रामीण पाणीपुरवठा योजना सुरू करण्यात आली. या जल स्वराज्य ग्रामीण पाणीपुरवठा योजनेमध्ये शासकीय कर्मचारी/अधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमताने भ्रष्टाचार केला आहे. या योजनेंतर्गत जी कामे झाली ती अतिशय निकृष्ट दर्जाची झाली असून या योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या विहिरीच्या खोदकामात तसेच बांधकामात पैशाचा गैरव्यवहार झाला आहे. या योजनेंतर्गत विहिरीपासून पाण्याच्या टाकीपर्यंत टाकण्यात आलेले पाण्याचे पाईप तसेच नळ जोडणीसाठी वापरलेले पाईप अत्यंत निकृष्ट दर्जाचे वापरून या योजनेच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत पाणीपुरवठ्यासाठी शासनाने कोट्यवधी रूपयांचा निधी देऊनही मौजे पिंपळखुटा या गावातील नागरिकांच्या पिण्याचा पाण्याची समस्या सुटलेली नाही. या जल स्वराज्य ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या कामामध्ये संगनमताने भ्रष्टाचार करणारे शासकीय अधिकारी व कंत्राटदार यांची उच्चस्तरीय चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : दलित वस्ती सुधार योजना तसेच विशेष घटक योजना व उप योजना निधीचा इतरत्र वापर करण्यावर प्रतिबंध घालणे याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यातील अनुसूचित जातीच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वांगीण विकासाकरिता विशेष घटक योजनेद्वारे केंद्र शासनाकडून मिळणारा निधी व राज्य शासनाचा निधी यांचा वापर राज्यातील अनुसूचित जाती, समाज समुहाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासाकरिताच करण्यात यावा असे बंधन आहे. परंतु, बऱ्याचदा विशेष घटक योजना व उप योजना निधीचा वापर पुरेपूर केला जात नसल्याचे आणि हा निधी अनुसूचित जातीच्या ऐवजी दुसऱ्या कामांकरिता वापरला जात असल्याची सर्वसाधारण तक्रार आहे. विशेष घटक योजना व उप योजना निधीचा वापर पूर्णतः प्रामाणिकपणे केला जात नाही. त्यामुळे अनुसूचित जातीचा अपेक्षित विकास घडून आला नाही आणि येत नाही. विशेष घटक योजना व उप योजनेचे कालबध्द ऑडिट करून योजनेची पूर्तता करण्यास अकार्यक्षम ठरलेल्या व ठरणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची गरज आहे. याशिवाय दलित वस्ती सुधार योजना राबविण्याबाबत अनेक प्रकारची अनियमितता केली जाते. दलित वस्ती सुधारणा तसेच विशेष घटक योजना व उप योजना निधीचा इतरत्र वापर करण्यावर कठोरपणे प्रतिबंध घालण्यात यावा व शासनाने या विरूध्द वर्तणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरूध्द कठोर कारवाई करावी अशी मागणी या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यात वर्धा व इरई नदीवरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा केला जात असणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"चंद्रपूर जिल्ह्यात वर्धा व इरई नदीवरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा केला जात असणे, त्यात 4 वीज केंद्रे, 3 वेकोली उद्योग, 2 मत्स्य बीज केंद्रे, 2 पाणीपुरठा योजना व इतर अशा 13 विविध उद्योगांद्वारे व संस्थांद्वारे नदीतील पाणी उपसा करण्यात येणे, सदर उद्योग व इतरांकडे 1 कोटी 92 लाख 27 हजार रूपये पाणी कर शिल्लक असणे, सदर उद्योगाने अद्यापही पाटबंधारे विभागाकडे पाणी कर न भरल्याने पाटबंधारे विभागाने नोटीस देण्यात येणे, त्यामुळे शासनाचे लाखो रूपयांचे होत असलेले नुकसान, त्यामुळे शासनाने संबंधित उद्योगांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : रायगड जिल्ह्यातील महाड येथे असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रीय स्मारकाची देखभाल व दुरूस्ती योग्य पध्दतीने होत नसणे याबाबत श्री. प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"रायगड जिल्ह्यातील महाड येथे असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रीय स्मारकात अत्याधुनिक नाट्यगृहासह तरण तलाव, व्यापारी संकुल, दोन सभागृहे, संदर्भ ग्रंथालय, वस्तुसंग्रहालय असणे, तसेच येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दुर्मिळ छायाचित्रे पहायला मिळणे, या स्मारकाची देखभाल करण्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) कडे असणे, परंतु या स्मारकाची देखभाल व दुरूस्ती योग्य पध्दतीने होत नसल्यामुळे तरण तलावाचा वापर होत नसणे, व्यापारी संकुल वापराविना पडून राहणे, त्याचबरोबर येथील सुसज्ज असे नाट्यगृह जनतेस व नाट्यप्रेमीस उपलब्ध करून न देणे, यामुळे स्थानिक जनतेत व कलाप्रेमीमध्ये नाराजी निर्माण होणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या राष्ट्रीय स्मारकाची देखभाल योग्यरितीने होऊन स्थानिक जनतेस व कलाप्रेमीस यामधील सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : नीम, ता. अंमळनेर व मांजरोद, ता. शिरपूर या दोन गावांना जोडणाऱ्या तापी नदीवरील पुलाचे काम प्रशासकीय मंजुरी देऊन सुध्दा सुरू न होणे याबाबत श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती स्मिता वाघ (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"नीम, ता. अंमळनेर आणि मांजरोद, ता. शिरपूर या दोन गावांना जोडणाऱ्या तापी नदीवरील पुलासाठी दिनांक 10.02.2012 ला प्रशासकीय मंजुरी देऊन सुमारे 40 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली. परंतु गेले एक वर्ष होऊन सदर पुलाचे भूमीपूजन करण्यात आले नसल्याने फसवणूक केल्याची भावना तेथील स्थानिक नागरिकांमध्ये पसरली असणे, सदर 2 वर्षांपासून रखडलेल्या पुलाचे काम सुरू करण्याची आवश्यकता असतानाही त्याकडे दुर्लक्ष करणे, यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झालेला असणे, सदर पुलाचे बांधकाम केल्यास पुढील इंदूर, भोपाल, आग्रा महामार्गाचे अंतर जवळपास 50 किलोमीटरने कमी होणार असणे, व्यापारी दळणवळणासाठीही हा महामार्ग सोयीचा होणार आहे, याकरिता सदर पुलाचे बांधकाम सुरू करण्याकरिता कार्यवाही करावी म्हणून विशेष उल्लेखाद्वारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मोबाईल ॲन्ड्रॉईड ॲप्लिकेशनद्वारे सन्माननीय सदस्यांना कामकाजाची माहिती देणे.**

**सभापती** : आपणा सर्वांना विदित आहेच की, माननीय मंत्री, माननीय राज्यमंत्री, सभागृहाचे सन्माननीय सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळाचे तसेच राज्य शासनाचे अधिकारी यांना सभागृहाच्या बैठकांचे कामकाज, विधिमंडळाच्या समित्यांच्या बैठका आणि विधानमंडळाद्वारे आयोजित करण्यात येणारे विविध कार्यक्रम याबाबतची माहिती सध्या लघुसंदेशाद्वारे (SMS) कळविण्यात येते.

उपरोक्तप्रमाणे नमूद केलेली माहिती सर्व संबंधित मान्यवरांना यापुढे नवीन आज्ञावलीद्वारे देण्यात येणार असून यासाठी विधिमंडळाद्वारे "मोबाईल ॲन्ड्रॉईड अप्लिकेशन" (Mobile Android Application) तयार करण्यात आले आहे. सदर आज्ञावली "गुगल प्ले स्टोअर" मध्ये "विधानमंडळ" या नावाने आज मंगळवार, दिनांक 24 मार्च, 2015 रोजीपासून उपलब्ध होईल. तसेच लघुसंदेश (SMS) सेवासुध्दा यापुढेही सुरू राहील.

तरी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या सुविधेचा अवश्य लाभ घ्यावा.

----

सन्माननीय सदस्य ॲड. रामहरी रूपनवर यांना विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यासाठी मी उद्या संधी देतो. आज सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा आहे. आपण आता मध्यंतर घेऊ आणि त्यानंतर सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला सुरूवात करू. सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी 15 मिनिटे स्थगित होत आहे.

(दुपारी 02.18 ते 02.33 वाजेपर्यंत मध्यंतर)

----

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक दुपारी 3.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.35 ते 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------------

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

**<u>नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी जात पडताळणी</u>**

**<u>अधिकाऱ्याची नियुक्ती करणेबाबत</u>**

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या विषयाकडे मला मंत्री महोदयांचे लक्ष वेधायचे असल्यामुळे दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, नवी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक 22 एप्रिल, 2015 रोजी आहे. नवी मुंबई महानगरपालिका परिसरात सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर येथील नागरिक वास्तव्य करीत आहेत. त्यांची नावे नवी मुंबई महानरगपालिकेच्या मतदार यादीत आहेत. ज्या उमेदवारांना निवडणुकीसाठी उभे रहायचे आहे त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळणे गरजेचे आहे. 19 मार्च रोजी तेथील जात पडताळणी अधिकारी श्री.सुनील वारे यांच्या हलगर्जीपणामुळे त्यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्या ठिकाणी नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. सभापती महोदयांना माझी विनंती आहे की, संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांना सूचना करुन सदर पदावर नवीन अधिकाऱ्याची नियुक्ती ताबडतोब करावी. अर्ज भरण्याची शेवटची तारीख 7 एप्रिल आहे. सर्व पक्षातील उमेदवार निवडणूक लढण्यास इच्छुक आहे. त्या भागात पश्चिम महाराष्ट्रातील लोक जास्त संख्येने राहतात. त्या लोकांना वेळवर जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले नाही तर निवडणुकीच्या प्रक्रियेत ते भाग घेऊ शकणार नाहीत. त्यामुळे संबंधित मंत्री महोदय या बाबीकडे लक्ष देतील काय ?

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांनी ही बाब तातडीने शासनाच्या निदर्शनास आणावी. याबाबत तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. महानगरपालिकेच्या निवडणुका आहेत. जे उमेदवार आहेत त्यांना वेळेवर जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले पाहिजे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, या विषयाची दखल घेऊन ताबडतोब त्या ठिकाणी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:**अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.:**सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुन्हा सुरु...

**तालिका सभापती** : सर्व साधारण अर्थसंकल्पावरील चर्चा उत्तरासह सायंकाळी 7 वाजेपर्यंत पूर्ण करायची आहे. माझ्याकडे 40 सन्माननीय सदस्यांची नावे आली आहेत. सभापती महोदयांनी सांगितले आहे की, या चर्चेत सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावयाची असल्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी मोजके बोलावे व वेळेचे बंधन पाळावे अशी माझी विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे, त्यामुळे अर्थसंकल्पाच्या चर्चेवर सन्माननीय सदस्यांना बोलण्यास संधी दिली पाहिजे. विधानसभेमध्ये विभागवार बोलता येते. आम्हाला फक्त दोन दिवस चर्चा करण्यासाठी वेळ मिळतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, विभागवार चर्चा करायची असेल तर त्याबाबत गट नेत्यांच्या बैठकीत या विषयावर चर्चा करता येईल. माननीय सभापती यांनी जे मला सांगितले ते मी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले आहे. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे हे ऑनलेग होते त्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जो मुद्दा मांडला तो अतिशय महत्वाचा आहे. आपल्या सभागृहात विभागवार चर्चा होत नाही. बजेटवर सर्व-साधारण चर्चा होते. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली ती योग्य आहे. ही चर्चा आज संपवायची असेल तर जास्त वेळ बसावे. सदस्यांच्या बोलण्यावर थोड्या मर्यादा घातल्या तरी चालतील पण जास्त मर्यादा घालू नका. एवढेच या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, अर्थमंत्री महोदयांनी केलेल्या भाषणाच्या पहिल्या भागावर मी काल बोलत होतो. मी सभागृहात बोलत असताना असे सांगितले होते की, जनतेने तुम्हाला कौल दिला आहे. भाजप पक्षाला जास्त आमदार मिळाले आहेत, तुमचे सरकार आहे. आघाडी सरकारच्या काळातील काही योजना या सरकारने बंद केल्या आहेत. त्या योजनांबाबत आम्हाला वाईट वाटण्याचे काही कारण नाही. या पक्षाने जनतेला अभिवचन दिले होते, भाजपाने दृष्टीपत्र काढले आहे. त्या

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे..

दृष्टीपत्रात 17 विभाग असून 177 कलमांचा त्यात समावेश करण्यात आला आहे. त्या कलमांची अंमलबजावणी पहिल्या अधिवेशनात करता येईल असे मला वाटत नाही. महत्वाचे मुद्दे घेऊन जनतेच्या समोर आपण गेला होता, त्या जनतेची तुम्ही दिशाभूल करु नये असे मी काल सांगितले होते. सर्व बाबींचा मी ऊहापोह करणार नाही. जे सन्माननीय सदस्य काल नव्हते त्यांच्या निदर्शनास मी काही बाबी आणून देऊ इच्छितो. काल मी अशी मागणी केली होती की, या दृष्टीपत्रातील क्रमांक तीन मध्ये 'शेतकऱ्यांना सुगीचे दिवस येणार' असे नमूद केले आहे. त्यासाठी अन्नदाता आधार पेन्शन योजना सुरु करण्यात येईल. आज सकाळी प्रश्नोत्तराच्या तासात आत्महत्येचा प्रश्न चर्चेला आला होता. वर्तमानपत्रात देखील आत्महत्येविषयी बातम्या आलेल्या आहेत. देशाचे पंतप्रधान माननीय श्री.नरेंद्र मोदी यांनी असे सांगितले की, अल्पभूधारक शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नयेत, त्यांना मदत व्हावी म्हणून केंद्र शासनामार्फत 5 हजार रुपये पेन्शन देण्याचा आम्ही विचार करीत आहेत, यासाठी त्यांनी योजना सांगितली आहे. हे ताबडतोब करतो असे त्यांनी सांगितले नाही. परंतु भाजपच्या जाहीरनाम्यात अन्नदाता आधार पेन्शन योजना सुरु करु असे सांगितले असून बजेटमध्ये त्यासंदर्भात तरतूद करण्यात आली नाही. एका बाजूला शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यामुळे या सरकारने सर्व सामान्य शेतकऱ्यांना फसविले आहे. कांदा, कापूस, टोमॅटो या पिकांचे भाव अनैसर्गिकरित्या कोसळले तर 'कृषी उत्पन्न सुरक्षा निधी' योजना तयार करण्यात येईल. यासाठी देखील तरतूद करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील लोक विहीर, ओढा, नाला, नदीचे पाणी पितात, त्यांना शुध्द आणि स्वच्छ पाणी देऊ. निवडणुकीच्या काळात ग्रामीण भागातील जनतेला बिसलेरीचे पाणी मिळणार असे सांगितले होते. आम्ही बिसलेरी किंवा बाटली बंद पाणी द्या अशी मागणी करीत नाही. स्वयंभू पाणी योजना शासनाने जाहीर केली आहे. प्रत्येक गावात सौर ऊर्जेवर आधारित स्वयंभू पाणी योजना तयार करण्यात आली आहे. ग्रामीण भागात सौर ऊर्जेवर पाणी शुध्दीकरण प्रकल्प राबविण्यात येऊन जनतेला शुध्द पाणी मिळेल अशी ही योजना असून या योजनेसाठी देखील एक रुपयांची तरतूद बजेटमध्ये करण्यात आलेली नाही.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे..

सभापती महोदय, काल गॅलरीत पत्रकार नव्हते, आज कदाचित दोन तीन पत्रकार गॅलरीत असावेत. 65 वर्षे वय पूर्ण केलेल्या पत्रकारांना दरमहा 1500 रुपये पेन्शन देण्यात येईल. असे जाहीर करण्यात आले आहे. पण 1500 रुपये ही रक्कम जास्त नाही. सर्व महाराष्ट्रात ॲक्रीडिशन असलेले किती पत्रकार आहेत ? यासाठी सर्व नियम लावले जाणार आहेत. अशा पत्रकारांची संख्या 2000 किंवा 3000 असू शकेल. अशा पत्रकारांना पेन्शन देण्यात येईल असे जाहीर केले, परंतु या बजेटमधून त्यासाठीही तरतूद करण्यात आलेली नाही. या सरकारचा किती निषेध केला तरी तो कमीच होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, आयुष्यभर नोकरी व व्यवसाय न केलेल्या 60 वर्षे वय पूर्ण झालेल्या महिलांसाठी पेन्शन योजना सुरु करण्यात येईल. या योजनेचे गोंडस नाव 'माहेरचा आधार' असे आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना मी सांगू इच्छितो की, 'माहेरचा आधार' तुटला आहे. या बजेटमध्ये असा आधार कोठेच दिसत नाही. या बजेटचे समर्थन कसे करावे, यासंदर्भातील मुद्दे मी काल माझ्या भाषणात मांडले होते.

सभापती महोदय, आपण आता मेक इन महाराष्ट्राचे स्वप्न पाहत आहोत. काल माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले ते बरोबर होते. केंद्र सरकारने एखादी योजना जाहीर केली की, ती योजना महाराष्ट्रात कॉपी करायची, पेस्ट करायची व फारवर्ड करायची. 'मेक इन इंडिया' चा 'मेक इन महाराष्ट्र' ही कॉपी करण्यात आली आहे. मेन इन महाराष्ट्र करायचा असेल तर त्यासाठी पायाभूत सुविधा पाहिजेत. वीज, पाणी, रस्त्यांची सोय पाहिजे. बजेटमधील क्रमांक 16 वर वीज निर्मितीबाबत नमूद करण्यात आले आहे. 18 क्रमांकावर जल विद्युत प्रकल्पासाठी 900 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केला आहे. 19 क्रमांकावर वीज दर कमी राहतील याची काळजी घेण्याचे परिणामकारक प्रयत्न करण्यात येतील, असे नमूद केले आहे. परंतु अशा प्रकारचे प्रयत्न बजेटमध्ये दिसत नाहीत. विद्युत नियामक आयोगाचा निर्णय आल्यावर विजेचे दर वाढविण्यात येतील, त्यामुळे हे सरकार जनतेला किती काळ फसविणार आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.........

सभापती महोदय, पायाभूत सुविधा आणि औद्योगिकीकरण झाले नाही तर राज्याची आर्थिक परिस्थिती किती डबघाईला येईल, हे मला वित्त राज्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. तुम्ही जल विद्युत प्रकल्पाच्या संदर्भात सांगितले, त्यासाठी 900 कोटी रुपयांची तरतूद केली. परंतु, जल विद्युत प्रकल्पासाठी राज्यात किती साईट्स उपलब्ध आहेत ? जल विद्युत प्रकल्पासाठी राज्यात फारशा साईट्स उपलब्ध नाहीत. विदर्भात गोसिखूर्द प्रकल्पाचे काय झाले ? तेथे जल विद्युत प्रकल्प सुरु झाला काय ? तेथे जल विद्युत प्रकल्प सुरु झालेला नाही.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना सांगू इच्छितो की, उत्तराखंड येथे भगिरथ नदी अडविण्याचा प्रयत्न झाला. त्यासाठी 1 हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले. ती 22 किलो मीटर लांबीची नदी आहे. ते पाणी बोगद्याने अडविण्याचा प्रयत्न झाला. परंतु, ती नदीच गायब झाली. मग तुमचे जल विद्युत प्रकल्प कसे पूर्ण होणार आहेत ? जल विद्युत प्रकल्पासाठी साईट्स कोठे उपलब्ध आहेत, जागा कोठे उपलब्ध आहे ? तुम्हाला अणु ऊर्जेशिवाय पर्याय नाही. परंतु, अर्थसंकल्पात अणु ऊर्जेचा साधा उल्लेख देखील करण्यात आलेला नाही. तुम्हाला पुढील 10 वर्षात विजेचे उत्पादन तिपटीने वाढवावे लागेल आणि पुढील 15 वर्षात म्हणजे 2030 पर्यंत तुम्हाला विजेचे उत्पादन चारपट वाढवावे लागेल. परंतु, त्याचे नियोजनच नाही. माझा शासनाला प्रश्न आहे की, मग तुम्ही 'मेक इन महाराष्ट्र' कसा करणार आहात ? तुम्ही जनतेला बिसलेरी पाणी, शुद्ध पाणी देण्याचे आश्वासन दिले. परंतु, याबाबत अर्थसंकल्पात कोठेच उल्लेख करण्यात आलेला नाही. महिलांना माहेरचा आधार देण्याचे आश्वासन दिले. परंतु, याचाही अर्थसंकल्पात उल्लेख नाही. आम्ही रस्त्यांचे जाळे विणू असे सांगितले. आम्ही मुंबई, जळगाव, बीड, नांदेड, सोलापूर, रत्नागिरी आणि पुणे असा महामार्ग करु असे सांगितले. परंतु, याबाबत अर्थसंकल्पात कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. मग पायाभूत सुविधा नसतील तर कोणते उद्योगधंदे राज्यात येणार आहेत आणि 'मेक इन महाराष्ट्र' कसा काय होणार आहे, हे मला कळत नाही. वित्त राज्यमंत्री महोदय या संदर्भात खुलासा करतील, अशी मी अपेक्षा करतो.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.........

सभापती महोदय, बजेटच्या पहिल्या भागावर भाष्य केले म्हणजे बजेटचे भाषण पूर्ण होत नाही. बजेटचा दुसरा भाग अत्यंत महत्वाचा आहे. म्हणून बजेटच्या दुसऱ्या भागावर देखील बोलले पाहिजे. तुम्ही जर हे सर्व करणार असाल तर त्यासाठी तुम्ही महसूल कसा जनरेट करणार आहात ? महसुली उत्पन्नाची साधने काय आहेत ? मी सांगू इच्छितो की, यावर्षी 1 लाख 98 हजार 230 कोटी रुपये महसुली जमेचा अंदाज आहे. महसुली खर्च 2 लाख 1 हजार 988 कोटी रुपये आहे आणि 3,575 कोटी रुपयांची महसुली तूट आहे. मग महसुली तूट देखील भरुन निघत नाही, राज्यात उद्योगधंदे देखील येत नाहीत आणि राज्यात पायाभूत सुविधा देखील निर्माण होत नाहीत. मग 'मेक इन महाराष्ट्र' कसा होणार आहे, असा प्रश्न मला आपल्याला विचारावासा वाटतो. श्री.टकले साहेब, आपल्याला या संदर्भात नेहमी एकच उत्तर दिले जाते. माननीय श्री.प्रकाश महेता साहब, आप मेरे बहुत अच्छे मित्र है, पुराने मित्र है. अंधेरे में आपके पास एक ही प्रकाश है, दुसरा प्रकाश नही है. तुम्ही आम्हाला नेहमी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करता आणि सांगता की, राज्यावर 3 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे. प्रत्येक वर्षी 24 हजार कोटी रुपये फक्त व्याजापोटी द्यावे लागतात. मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना सांगू इच्छितो की, हे म्हणणे कदापिही मान्य होणार नाही. हे म्हणणे जगामध्ये देखील मान्य होणार नाही.

सभापती महोदय, गॅटचा करार झाला. सन 1989 मध्ये जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. संपूर्ण जग बदलले. मंदीची लाट आली. बराक ओबामा अमेरिकेचे अध्यक्ष झाल्या बरोबर अमेरिकेतील बँका बुडीत निघाल्या. परंतु, भारतातील एकही बँक बुडीत निघाली नाही. अमेरिकेत शासनाला बँकांना पॅकेज द्यावे लागले. आपल्या देशात अशी परिस्थिती निर्माण झाली नाही. कारण आपल्या देशाची अर्थव्यवस्था भरभक्कम आहे. स्व.इंदिरा गांधींनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले होते. त्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेला धोका पोहोचू शकत नाही. म्हणून तुम्ही आम्हाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करु शकत नाही की, आघाडी शासनाने एवढे कर्ज घेतले, इतकी रक्कम व्याजापोटी द्यावी लागते. तुमचे चुकले असे म्हणून काहीही होत नाही. सन्माननीय सदस्य श्री.कवाडे साहेब,

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.........

ज्याला घोड्यावर बसायचे असते त्याची मांड पक्की असली पाहिजे. तुमची मांडच पक्की नसेल, सर्वच वेगळा कारभार असेल तर तुम्ही राज्याचा विकास कसा करणार आहात, हे मला या निमित्ताने आपल्याला विचारावेसे वाटते.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना सांगू इच्छितो की, आपले भाषण सुरु होऊन आता जवळपास 35 मिनिटे झालेली आहेत. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत इतर सन्माननीय सदस्यांना देखील भाग घ्यावयाचा आहे. आपण भाषणाचा समारोप करावा.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी दोन मिनिटात माझे भाषण संपविणार आहे. मी मघाशी विचारले की, तुम्ही महसुली तूट कशी भरुन काढणार आहात ? शासनाने सांगितले की, आम्ही एलबीटी रद्द करणार आहोत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, तुम्ही व्हॅटमध्ये वाढ करणार आहात. केंद्र शासनाचे बजेट सादर झालेले आहे. केंद्र शासनाने सर्व्हिस टॅक्स 12.36 टक्क्यावरुन 14 टक्के केलेला आहे. त्यामुळे सर्व्हिस टॅक्समध्ये 1.64 टक्के म्हणजे जवळपास 2 टक्के वाढ झालेली आहे. तुम्ही आणखी 2-3 टक्के व्हॅट लावला तर 5 टक्के करवाढ होणार आहे. शहरातील जे मोठे व्यापारी एलबीटी देणार होते ते एलबीटी पासून मुक्त होणार आहेत आणि 1200 ते 1500 कोटी रुपयांचा फायदा फक्त 10 ते 15 व्यापाऱ्यांना मिळणार आहे. ग्रामीण भागातील जनतेवर तुम्ही व्हॅट लावणार आहात. त्यामुळे महागाई वाढणार आहे, हे वित्त राज्यमंत्र्यांनी लक्षात घ्यावे. तुम्ही जीएसटीची वाट बघत आहात, हे चित्र बरोबर नाही.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. मी माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार साहेबांशी बोललो. माननीय वित्त राज्यमंत्री श्री.दीपक केसरकर साहेब सभागृहात उपस्थित आहेत. मी सांगू इच्छितो की, राज्याचा महसूल वाढवायचा असला तरी जनतेवर कर लावू नका. आपण प्लॅन एक्सपेंडिचर बघा, नॉन प्लॅन एक्सपेंडिचर बघावे.

सभापती महोदय, राज्यात स्व.शंकरराव चव्हाण साहेबांसारखे मुख्यमंत्री झाले. त्यांनी झिरो बेस बजेट मांडले. प्रत्येक विभागाची तपासणी केली. प्रत्येक आयटेम झिरो धरुन त्याला बजेट

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.........

द्यावयाचे की नाही, नसेल तर का द्यावयाचे नाही आणि द्यावयाचे असेल तर का द्यावयाचे, त्यातून काही बचत होऊ शकते काय, याचा त्यांनी सांगोपांग विचार केला. त्यावेळी स्व.शंकरराव चव्हाण साहेबांनी व्हेरिफिकेशनसाठी माझ्याकडे 7 विभागांची जबाबदारी सोपविली होती. त्यावेळी सर्व विभागांचे सचिव आमदारांभोवती फिरत होते. कारण, स्व.शंकरराव चव्हाण साहेबांनी त्यांना सांगितले होते की, आमदारांच्या समित्यांनी शिफारस केल्याशिवाय मी तुमची मागणी मान्य करणार नाही. मी त्यांना विचारले की, सर, तुम्ही माझ्याकडे 7 विभागांची जबाबदारी सोपविलेली आहे. त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचा देखील समावेश आहे. त्यांनी मला असे उत्तर दिले की, इरिगेशन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग ही अशी खाती आहेत की या खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिमेंटचा वापर होतो आणि त्यांचे सिमेंटचे रिकामे पोते जरी झटकले तरी त्यातून लाखो रुपये पडतील. तुम्ही तो महसूल का गोळा करीत नाही, तुम्ही तुमच्या विभागाचे निरीक्षण का करीत नाही, तुम्ही झिरो बेस बजेटचा का अवलंब करीत नाही आणि राज्याचा महसूल का वाढवत नाही. तुम्ही जनतेवर जवळ जवळ 5 टक्के करवाढ लादत आहात. विरोधी पक्ष ही करवाढ कधीही मान्य करणार नाही, हे मी सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, माझा या अर्थसंकल्पाला पाठिंबा का नाही. कारण, वित्त राज्यमंत्री महोदयांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातील संघाची कविता वाचून दाखविली. मी काल सांगितले की, माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांना महाराष्ट्र गीताने प्रेरणा मिळाली होती. तुम्ही प्रथम संघाची कविता वाचली आणि त्यानंतर महाराष्ट्र गीत वाचले. तुम्ही प्रथम संघाची कविता वाचली. आली संधी घ्या उरकवून. याला माझा विरोध आहे. ही सामाजिक भावना, कोणीही येते, कोणी रामजादे म्हणते, तर कोणी हरामजादे म्हणते. कोण काय काय वक्तव्ये करतात. चर्चवर दगडफेक करतात. तुम्ही मेहरबानी करून राज्यातील सामाजिक भावना बिघडवू नका. म्हणून मी या अर्थसंकल्पाला तीव्र विरोध करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----------

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी या ठिकाणी बोलत असताना चर्चेवर दगडफेक करतात असा उल्लेख केला. कोणी गोटमार केली, आम्ही मारले का? अशा पध्दतीचे वक्तव्य केले आहे ते कामकाजातून काढून टाकावे, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे) :** सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी केलेले वक्तव्य तपासून घेतले जाईल. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपले भाषण सुरु करावे.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, अर्थसंकल्पीय सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, ज्या भूमिकेतून अर्थसंकल्प मांडला गेला त्यातून राज्याची आर्थिक परिस्थितीचा विचार करता त्या पार्श्वभूमीवर सरकार काय करणार आहे याकडे सगळयांचे लक्ष लागले होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि शेतकऱ्यांच्या संकटावर मार्ग शोधण्यासाठी अनेक उपाययोजनांचा समावेश केला त्याबद्दल मी सरकारचे स्वागत करते.

सभापती महोदय, सावकारांपासून मुक्ती, सूक्ष्म सिंचन अभियान योजना, जलयुक्त शिवार, रोजगार हमी योजनेमध्ये वाढ, सौर कृषी पंप, कृषी पंपांचे ऊर्जीकरण आदीबाबत चांगली तरतूद केली आहे. विशेष म्हणजे सरकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी संनियंत्रण कक्ष मंत्रालयात स्थापन करण्याबाबत अर्थसंकल्पात तरतूद करणे अतिशय महत्वाचे आहे. एका बाजूला महाराष्ट्रामध्ये शहरीकरण वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पायाभूत सुविधांसाठी तरतूद होणे आवश्यक आहे. स्मार्ट सिटी, बस स्थानकांचे नूतनीकरण, रेल्वे प्रकल्पांना गती देण्यासाठी राज्य शासन व रेल्वे मंत्रालय यांच्या समभागातून सामूहिक विकास योजना राबविण्यासाठी तरतूद केली आहे.

सभापती महोदय, नागपूर शहर मेट्रो प्रकल्पासाठी 197.69 कोटी व पुणे शहर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी 174.99 कोटी रूपयांची तरतूद केली आहे याबद्दल मला समाधान व्यक्त करावेसे वाटते. नारी शक्तीचा सन्मान करण्याच्या भावनेपोटी महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांच्या नावाने बाजारपेठ निर्माण करण्याचा शासनाचा मानस आहे.त्याकरिता 200 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. समाजाच्या परिघाबाहेर आहेत, जे आर्थिक संधीपासून वंचित आहेत त्यांच्यासाठी काय करतो याकडे समाजाच्या विविध घटकांचे लक्ष असते.

सभापती महोदय, घरेलू कामगार मंडळ शासनाने यापूर्वी गठीत केले आहे. त्यासाठी 20 कोटी रूपयांची तरतूद केली आहे, त्याचे मी स्वागत करते. त्याचबरोबर वन हक्कासाठी काम करणाऱ्या आदिवासी संघटना आहेत. मोठया प्रमाणात पेसा कायद्यांतर्गत वन हक्काचे सामूहिक दावे निकाली काढण्यासाठी या संघटना काम करीत असतात. आदिवासी बांधवांनी तयार केलेली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

24-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) R.3

SGB/ KTG/ 15:20

डॉ.नीलम गोऱ्हे.......

शेती मालाची उत्पादने यासाठी त्रिस्तरीय सहकारी संस्था तयार करण्यासाठी 50 लाख रुपयांची तरतूद केली आहे. ही तरतूद कमी वाटत असली तरी त्यातून आदिवासींना निर्णय प्रक्रियेमध्ये सुविधा मिळण्यासाठी त्रिस्तरीय सहकारी संस्थेचा उपयोग होणार आहे. त्याबद्दल मी शासनाचे मन:पूर्वक स्वागत करते.

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प तयार होण्यापूर्वी मी स्वतः माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस, माननीय अर्थमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार, माननीय अर्थ राज्यमंत्री श्री.दीपक केसरकर यांची भेट घेतली होती. मी त्यांच्याकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. त्यामध्ये एक अपेक्षा अशी होती की, 2001 मध्ये केंद्रात माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार असताना जेंडर रिस्पॉन्सिबल बजेट तयार करण्याचे धोरण तत्कालीन केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्री श्रीमती सुमित्रा महाजन यांनी स्वीकारल्यानंतर महाराष्ट्रामध्ये 2002 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांनी जेंडर रिस्पॉन्सिबल बजेट तयार करु अशा प्रकारचा निर्णय घेतला होता. 2002 पासून 2014 पर्यंतच्या 12 वर्षाच्या काळात प्रत्येक अर्थसंकल्पापूर्वी त्या त्या अर्थमंत्र्यांना मी या संदर्भात विनंती केली होती. स्त्रियांवर या धोरणाचा काय परिणाम होतो त्याप्रमाणे काही हेड बदलून जे काही अनुकूल असेल त्याबद्दल भूमिका स्वीकारली पाहिजे. जेंडर लेन्समधून स्त्रियांवर काय परिणाम होतो हे पाहून तरतूद करावी ही संकल्पना स्वीकारली पाहिजे. या संकल्पनेचा अर्थसंकल्पामध्ये समावेश झालेला नाही.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

सभापती महोदय, मंत्रालय इमारतीला आग लागली त्यावेळी सभागृहात या विषयावर चर्चा झालेली होती. आगीपासून संरक्षण योजनेचा उल्लेख नगरविकास विभागाशी संबंधित आहे. स्ट्रक्चरल ऑडिट आणि अंमलबजावणीच्या संदर्भातील अहवालाबद्दल काहीतरी भूमिका अर्थसंकल्पामध्ये स्पष्ट व्हावयास पाहिजे होती.

नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा लवकरच सुरु होणार आहे. तुळजापूर, पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी वाढीव तरतूद केली त्याचे मी स्वागत करते. पंढरपूर येथे वारकऱ्यांना सोयी सुविधा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

न दिल्यामुळे उच्च न्यायालयाने मोठया प्रमाणात नाराजी दर्शवून वारी रद्द करण्यासंबंधी मत व्यक्त केले होते. वारकऱ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देऊन भाविकांना सुविधांचा फायदा होईल या

...4..



डॉ.नीलम गोऱ्हे.......

दृष्टीने मी सरकारला विनंती करु इच्छिते. सोयी सुविधांची अंमलबजावणी करण्यासाठी पंढरपूर येथून सातत्याने लोकांची मागणी होत होती की, स्वतंत्र आयएएस दर्जाचा अधिकारी पंढरपूर विकास प्राधिकरणामध्ये देखरेख करण्यासाठी नेमावा. जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांच्यामार्फत जेवढ्या वेगाने कामांना मंजुरी मिळाली पाहिजे तेवढ्या वेगाने मिळत नाही याचा सरकारने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, नारी शक्तीचा सन्मान व आदर करीत असल्याबद्दल मी सरकारचे स्वागत करते. परंतु या अर्थसंकल्पामध्ये महिला व बालविकास विभागाबाबत सांगू इच्छिते की, विमेन्स वेल्फेअर सहाय्यक अनुदान यात गेल्या वर्षीपेक्षा तरतूद कमी झालेली दिसून येते. त्यात निश्चितपणे वाढ व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करते. सरकार त्याबाबत प्रकाश टाकेल. तेजस्वीनी ग्रामीण महिला सक्षमीकरण योजना, महिला आयोग या माध्यमातून त्यांना संरक्षण, अधिकार यासाठी तरतूद केली त्याबद्दल निश्चितपणे सरकारचे स्वागत करते. परंतु महिला धोरणाला 2013 मध्ये अंतिम स्वरुप दिले, त्यासाठी आराखडा आणि तरतूद करावयास पाहिजे याकडे मी सरकारचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, दोन-तीन मुद्यांबाबत आमच्या मनामध्ये संदिग्धता आहे, शंका आहे. तापमानातील बदलाचा परिणाम आपण पहात आहोत. गारपीट आणि अवकाळी पावसामुळे मोठया प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. आपण तापमान बदलाला सामोरे जात असताना सरकारने कशा प्रकारे सक्षमता स्वीकारली पाहिजे, शेतकऱ्यांसाठी कोणती दक्षता घेण्यासाठी यंत्रणा उभारु शकतो याबद्दल काही स्पष्टता झालेली नाही. आपत्कालीन व्यवस्थापन नियोजनाबद्दल पथपदर्शी प्रकल्प असावयास पाहिजे. मी सन्माननीय मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये उल्लेख केला होता की, जगामध्ये अनेक अविकसित देशांमध्ये फक्त राज्य महिला आयोग पुरेसा आहे असे मानले जात नाही. इक्वल पे, इक्वल राईट्स. ज्या ज्या क्षेत्रात महिला काम करीत आहेत त्या ठिकाणी महिलांना समान अधिकार, समान संधी, समान वेतन दिले जाते

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

की नाही, त्यांना सुरक्षितता मिळते की नाही याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी सध्या जगातील अनेक अविकसित देशांमध्ये इक्वल पे, इक्वल राईट्स कमिशन असते. तसे कमिशन महाराष्ट्रामध्ये स्थापन केले तर महाराष्ट्राचे आधुनिकतेकडे पुढचे पाऊल पडू शकेल. त्याबद्दल सरकारकडून पुढील काळात विचार होईल अशी अपेक्षा आहे.

...5...



डॉ.नीलम गोऱ्हे.......

सभापती महोदय, महिलांच्या संदर्भात विचार करता केंद्र सरकारकडून 2013-14 मध्ये निर्भया फंडातून 1000 कोटी रुपयांची तरतूद केली गेली होती. दुर्दैवाने आणि खेदाने सांगावेसे वाटते की, तरतूद करुनही तिचा विनियोग झाला नाही ही बाब पुढील वर्षी उघड झाली. नव्याने आलेल्या केंद्र सरकारने 2000 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. आमची अपेक्षा आहे की, ज्या ज्या ठिकाणी महिला मेडिको लिगल केसेस घेऊन येतील त्या ठिकाणी महिलांना मानसिक आधार देण्यासाठी, न्याय वैद्यकीय सहाय्याच्या केसेस चालतात त्या ठिकाणी वन स्टेप क्रायसेस सेंटरची तरतूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या भाग 2 मध्ये पृष्ठ 8 वर मुंबईतून क्रूड ऑईलवर लावण्यात येणाऱ्या जकातीबाबत विचार होणे आवश्यक आहे असे म्हटले आहे. मुंबईमध्ये तेल कंपन्यांच्या रिफायनरीज आहेत म्हणून मुंबईमध्ये हा कर जमा होतो. मुंबईमध्ये कर जमा होतो म्हणून मुंबईचा विचार करतो असा भाग नाही. महाराष्ट्रामध्ये जिथे जिथे क्रूड ऑईलवर प्रोसेस करुन ते इतर जिल्ह्यांमध्ये पाठविले जाते त्यावर तेथील महानगरपालिका देखील कर लावत असतात.

नंतर एस.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

मुंबईतून कर जमा होतो त्यामुळे विचार केला जातो असे जेव्हा म्हटले जाते. तेव्हा मुंबई नव्हे तर आज महाराष्ट्रातून कोट्यवधी रुपयांचा कर जमा होतो. त्यातून महाराष्ट्र आणि मुंबईला काय मिळते असा प्रश्न मनामध्ये निर्माण होतो. त्यामुळे मुंबईसाठी एक वेगळा निर्णय घेणे अतिशय गरजेचे आहे. नीती आयोगामुळे राज्य सरकारने आपला वाटा वाढविला आहे असे जाहीर केले आहे. मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर या सारख्या ठिकाणी आपण मोठ्या प्रकल्पांसाठी निधी कशा प्रकारे देणार आहात यासंबंधी देखील विचार करणे अतिशय गरजेचे आहे. मुंबईकरांना रेल्वे, वाहतुकीच्या सुविधांपासून पुन्हा वंचितच ठेवलेले आहे अशा प्रकारची भावना त्यांच्या मनात निर्माण होत आहे याकडे देखील मला आपले लक्ष वेधावेसे वाटते.

सभापती महोदय, हिंदू हृदयसम्राट शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृति प्रीत्यर्थ स्मारक करण्याचा निर्णय घेतला असून तो स्वागतार्ह आहे. तो अत्यावश्यक अशा स्वरुपाचा निर्णय आहे. परंतु, यासाठी किती रुपयांची तरतूद केली आहे, या स्मारकाचे स्वरुप कसे राहणार आहे यासंबंधात मंत्रिमंडळातील माननीय मंत्री सरकारशी चर्चा करु शकतात. पण यासाठी किती तरतूद करण्यात आली आहे याचा ठोस उल्लेख अर्थसंकल्पात झालेला नाही. त्यामुळे यासंबंधातील अपेक्षा अपूर्ण राहिलेल्या आहेत असे आमच्या मनात येते. श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी निधीची तरतूद करुन स्मारकाची रुपरेषा सर्वांच्या समोर लवकरात लवकर आणली तरच कामाला सुरुवात होईल व त्याद्वारे जनतेच्या अपेक्षांना न्याय दिल्या सारखे होईल.

सभापती महोदय, नाट्यगृह आणि प्रेक्षागृहासाठी सगळ्या सोयी सुविधा करण्यात येणार आहेत. कालच पनवेलला नगरपालिकेच्या नाट्यगृहामध्ये नाट्य अभिनेत्री श्रीमती अतिशा नाईक कार्यक्रमासाठी आल्या होत्या. परंतु, लाईट नसल्यामुळे उघड्या चेंबरमध्ये त्यांचा पाय गेला आणि त्यांच्या पायाला इजा झाली. यासंबंधी अनेक वृत्तपत्रांमधून नाट्यकर्मींनी लेखच्या लेख लिहिले आहेत. त्यात त्यांनी नाट्यगृहातील स्वच्छतागृहे अत्यंत घाणेरडी असणे, स्टेजच्या फळ्या उखडलेल्या असणे, खुर्च्या तुटलेल्या असणे, पुरेशी लाईट व्यवस्था नसणे, असे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. एका बाजूला आपण महाराष्ट्राला सांस्कृतिकरित्या प्रगत करणार आहोत असे म्हणत

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

आहोत. जिल्हा तेथे नाट्यगृह अशा प्रकारची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. तेव्हा नाट्य व प्रेक्षागृहांची व्यवस्था चांगली करण्यासाठी शासनाने प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, आता मी गृह विभागावर बोलणार आहे. गृह विभागासाठी वेळोवेळी बजेटमध्ये तरतूद करण्यात आली आहे असे शासनाच्यावतीने सांगण्यात येते. मध्यंतरी कॅगने सरकारच्या उदासीनतेवर ताशेरे मारले होते. सरकारच्या उदासीनतेमुळे सन 2006-2007 मध्ये 300 कोटी रूपये वापरलेच गेले नाहीत. आजही आपण अनेक ठिकाणी सीसीटीव्ही लावण्याचे म्हणत आहात. पोलिसांच्या अन्य मागण्या आहेत त्यासाठी पुरेशी तरतूद झाली आहे किंवा नाही यासंबंधातील तपशीलवार चर्चा वेगळ्या पद्धतीने होणे गरजेचे आहे. त्याकडे देखील मला शासनाचे लक्ष वेधावेसे वाटते.

सामान्यांना आधार आणि भविष्याची आशा असणारा हा अर्थसंकल्प आहे. तरी देखील आज मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. टाईम्स ऑफ इंडियामध्ये असे लिहून आले आहे की, एका 72 वर्षीय महिलेला शेतावर काम करण्यासाठी मजबूर व्हावे लागत आहे. ही अतिशय दुःखद घटना बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील आहे. येत्या 8-10 दिवसामध्ये आपले अधिवेशन संपणार आहे. पुढच्या अधिवेशनाची वाट पाहात बसण्यापेक्षा दुष्काळ व नैसर्गिक आपत्ती यामध्ये कोणतेही राजकारण न करता 1972 साली ज्या प्रकारे दुष्काळ निवारण समित्या स्थापन केल्या होत्या तशा प्रकारच्या समित्या संपूर्ण जिल्ह्यामध्ये कराव्यात व अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने सर्वांना बरोबर घ्यावे अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करते.

महाराष्ट्र राज्यासमोर अनेक घोटाळे आले होते. त्या घोटाळ्यातील निधी कुठे गेला याचा जसजसा शोध लागेल तसतसा तो जनतेसमोर आणावा. यावर प्रकाश पडल्याशिवाय राहणार नाही. दमदार अर्थसंकल्प राज्य सरकारने सादर केला आहे. त्याबद्दल मी माननीय अर्थमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार आणि अर्थ राज्यमंत्री श्री.दीपक केसरकर यांचे अभिनंदन करते.

माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी आपल्या सभागृहात जोशपूर्ण अर्थसंकल्प मांडला नाही असा मुद्दा उपस्थित केला आहे. मला असे वाटते की, आपण सभागृहात कशा प्रकारचे वातावरण ठेवतो आहे हे देखील पाहणे महत्त्वाचे आहे. माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी रेटून काही तरी मांडण्यापेक्षा

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

आपण काही तरी समजूतदार भूमिका ठेवली असती तर अधिक चांगले झाले असते. मी असे म्हणेन की, माननीय अर्थ राज्यमंत्री हे कृती करून दाखवतात. त्यांनी सिंधुदुर्गमध्ये कृती करून दाखविली आहे. तशी त्यांना राज्यामध्ये कृती करून दाखविण्याची संधी मिळालेली आहे. मी दोघांचेही अभिनंदन करते. धन्यवाद. जय भीम, जय महाराष्ट्र.

......

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, या राज्याचा 1,98,230 कोटी रूपयांचा अर्थसंकल्प आहे. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी कमी वेळ मिळालेला आहे. त्यांनी झिरो बजेटचा मुद्दा उपस्थित केला आहे. प्रत्येक खात्याचे वेगवेगळे बजेट ठेवून बजेट सादर केले पाहिजे. मी गेली 15 वर्षे या सदनाचा सदस्य आहे. मी माझ्या स्थानिक विकास निधीतील संपूर्ण दोन कोटी रूपये कधीच खर्च केले नाहीत. मी दरवर्षी 1 कोटी 95 लाखा पर्यंतच निधी खर्च करीत असतो. आमदारांना दीड पट स्थानिक विकास निधी करण्याची मुभा असली तरी ती एक फसवणूक आहे. विनाकारण नैवेद्यासारखे थोडे थोडे पैसे देण्यात येतात. मी माझा स्थानिक विकास निधी रूपये1 कोटी 95 लाखा पर्यंतच खर्च केला आहे.

सभापती महोदय, यंदाचा अर्थसंकल्प 3727 कोटी रूपये तुटीचा आहे. आपण तुटीचा अर्थसंकल्प का करीत आहात हा माझा पहिला प्रश्न आहे. आपण प्रत्येक खात्यातील निधी थोडा थोडा कमी करावा. आपण तुटीचा अर्थसंकल्प सादर करता त्यामध्ये देखील मेख आहे.

यासंबंधी अर्थ खात्याची भूमिका काय आहे ? अर्थ विभागाने निधीची तरतूद करून तो निधी प्रत्येक विभागाला द्यायचा असतो. त्यामुळे पुन्हा अर्थ खात्यामध्ये फाईल येण्याची काय गरज आहे. खरे म्हणजे तशी गरजच नाही. या शासनाला अच्छे दिन आणायचे असतील तर त्यांनी आता ही पद्धत बदलायला पाहिजे. बांधकाम विभागासाठी पाच हजार कोटी रूपयाची तरतूद केल्यानंतर त्या पेक्षा अधिक निधी खर्च करावयाचा असेल तर अर्थ खात्याची परवानगी घ्यायला आमची हरकत नाही. आपण प्रत्येक फाईल अर्थ खात्याकडे तरतुदीसाठी पाठवत आहात. तो प्रकार आता थांबला पाहिजे. माननीय वित्त राज्यमंत्री हे प्रभावी आहेत असे आताच सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी सांगितले आहे.

आपण सिंचनासाठी 7300 कोटी रूपये दिलेले आहेत. हा निधी खर्च करण्यासाठी सक्षम आय.ए.एस.अधिकारी द्यावा किंवा त्या खात्यामध्ये अर्थ सचिव असे पद निर्माण करण्यात यावे. जिल्हा परिषदेमध्ये कॅफो असतो. त्याला सर्व वित्तीय अधिकार असतात. त्याप्रमाणे आपण येथे वित्तीय अधिकारी नेमला पाहिजे अशी माझी मागणी आहे. अर्थ खात्याची मक्तेदारी तोडण्याचे काम माननीय अर्थ मंत्र्यांनी केले पाहिजे. येथे सगळी लूट चालली आहे. ज्येष्ठ मंत्री सांगतात की, अर्थ खात्यामध्ये फाईल अडलेली आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...........

फायनांस ही अर्थ खात्याची खाजगी मालमत्ता आहे काय ? अर्थ खात्यात जी फाईल जाईल ती मंजूर झालीच पाहिजे अशी आपली मागणी राहिली पाहिजे. खरे म्हणजे हे कोण ठरवत असते तर ते सभागृह ठरवित असते. आज आपण या सभागृहापुढे मान्यता घेण्यासाठी आला आहात. आम्ही मान्य केलेले बजेट बदलण्याचा अधिकार अर्थ सचिवाला किंवा अर्थ मंत्र्यांनाही नाही. त्यांना त्यामध्ये जर काही बदल करावयाचा असेल तर त्यांना सभागृहातच पुन्हा यावे लागते. आपली पध्दतही ब्रिटिशकालीन आहे. ब्रिटिशांच्या वेळेस लोकशाही नव्हती. त्यामुळे ही ब्रिटिश पध्दत बदलण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात मी जो काही मुद्दा उपस्थित केला आहे त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात माहिती देण्याची आवश्यकता आहे. आपल्याला जर कायदेशीर सल्ला घेऊन माहिती द्यावयाची असेल तर ती माहिती आपण उद्या या सभागृहात दिली तरी चालेल. सभागृहाने एकदा तरतूद केली, त्या तरतुदीला सभागृहाने मान्यता दिल्यानंतर त्यासंदर्भातील फाईल पुन्हा खाली यावयास नको. असे जर झाले तर काम अतिशय सोपे होईल. मंत्री महोदय हे नवीन दमाचे असल्यामुळे ते असे काम करतील अशी मी त्यांच्याकडून अपेक्षा करतो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात मला शिवसेनेचा प्रभाव किंवा छाप दिसत नाही. (अडथळा)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील अर्थसंकल्पावर आपले विचार मांडत आहेत परंतु खाली बसून माननीय मंत्री त्यांना अडथळा निर्माण करीत आहे ते योग्य नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी या सभागृहात अर्थसंकल्प अतिशय चांगल्या प्रकारे मांडला. मी आपली नाही तर या राज्यातील जनतेची काळजी करतो आहे. पर्यावरण विभाग महत्वाचा विभाग आहे. आपण आज स्वच्छ भारत करण्यास निघालो आहोत. महत्वाचे विभाग असलेल्या पर्यावरण विभागावर कोणत्याही प्रकारे या बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. बजेटमध्ये परिवहन खात्यामध्ये सुध्दा कोणत्याही प्रकारे तरतूद करण्यात आलेली नाही. परिवहन विभागात कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नसताना सुध्दा माननीय

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...........

परिवहन मंत्री श्री. रावते साहेब 150 गाडया घ्यावयास निघाले आहेत. शिवसेनेकडे जे 5 विभाग आहेत त्या पाचही विभागांना 2 लाख कोटीच्या बजेटमध्ये केवळ 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. बजेटमध्ये शिवसेनेच्या पाच विभागांना एक टक्का सुध्दा तरतूद करण्यात आली नाही, यालाच चाणक्य नीती म्हणतात. आरोग्य विभाग, परिवहन विभाग, पर्यावरण विभाग आणि उद्योग विभाग हे महत्वाचे विभाग आहेत. शिवसेनेच्या विभागाच्या संदर्भात करण्यात आलेल्या तरतुदीमुळे हा अर्थसंकल्प मला तरी समतोल वाटत नाही. त्यामुळे या पाचही विभागांना तरतूद वाढवून दिली पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने माननीय अर्थमंत्र्यांना करु इच्छितो.

सभापती महोदय, या ठिकाणी मी एकंदर पाच मुद्यावर विचार व्यक्त करणार आहे. मी माझ्या भाषणात मुद्यांची पुनरावृत्ती करीत नाही.

सभापती महोदय, आज राज्यातील साखर उद्योग फार मोठया संकटात सापडला आहे. साखर उत्पादन करणारे ऊस शेतकरी अडचणीत सापडला आहे. या वर्षी आपण ऊसाचा दर एफआरपी 32 रुपयांनी ठरवून केलेला आहे. आज साखरेचा दर 20 रुपये झाला असून 4 महिन्यांनी या साखरेचे दर 36 रुपये झाल्याशिवाय राहणार नाहीत. व्यापारी 20 रुपये दराची साखर खरेदी करुन डम्प करतील आणि तीच साखर चार महिन्यांनी 36 रुपयांनी विकतील. परंतु पुढील वर्षी साखर उद्योगातील सर्व शेतकरी नष्ट होतील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. या बजेटमध्ये ऊसाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची तरतूद किंवा कोणतेही भाष्य करण्यात आलेले नाही याचे मला आश्चर्य वाटते. साखर उद्योगातूनच या महाराष्ट्राचे अर्थकारण, राजकारण, विकासाचे धोरण चालत असते. साखर उद्योगाच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला नाही तर पुढील वर्षी एकही साखर कारखाना सुरु होऊ शकणार नाही असे मला वाटते. त्यामुळे उद्या राज्यातील लाखो ऊस उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती दयनीय झाल्याशिवाय राहणार नाही असे माझे ठाम मत आहे. या बजेटमध्ये साखरेच्या संदर्भात काही तरतूद होईल, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळेल अशी माझी अपेक्षा होती परंतु माझ्या सर्व अपेक्षा या बजेटमध्ये फोल ठरल्या आहेत.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...........

सभापती महोदय, या राज्यामध्ये सिंचनाचा विषय मी पहिल्यांदा उपस्थित केला होता. आर्थिक पाहणी अहवालाच्या संदर्भात याच खुर्चीवरुन आक्षेप घेण्यात आला होता. आज जे सत्तेमध्ये आहे त्यांनीच त्यावेळेस आक्षेप घेतला होता. सन 2008-2009 पर्यंत 17.60 टक्के सिंचन होते. सन 2009-2010 मध्ये हे सिंचन 17.9 टक्के झाले. सन 2010 च्या पुढील 3 वर्षात सिंचनाची माहिती उपलब्ध नाही असे उत्तर या ठिकाणी देण्यात आले होते. आम्ही या प्रश्नाच्या वेळी मी ज्यावेळेस उभा राहिलो होतो त्यावेळेस आपण सर्वांनी मला साथ दिली होती. 3 वर्षाची माहिती न देणे हे बरोबर नाही असे आजचे सत्ताधारी त्यावेळेस म्हणाले होते. या वर्षीच्या महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालात सुध्दा गेल्या 3 वर्षातील सिंचनाची माहिती देण्यात आलेली नाही. गेल्या 3 वर्षाच्या सिंचनाच्या संदर्भात आम्ही जी माहिती दाखवली होती ती माहिती सुध्दा महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालात दिलेली नाही. या तीन वर्षाच्या काळात सिंचन किती झाले याची माहिती कृषी विभागाकडे आहे परंतु सिंचन विभाग याची माहिती देत नाही. मागच्या सरकारने 3 वर्षाची आकडेवारी दिली नाही म्हणून तुम्ही सुध्दा ती द्यावयाची नाही ? यासंदर्भात आम्ही जलसंपदा मंत्र्यांवर आक्षेप घ्यावयाचा काय ? सिंचनाच्या संदर्भात परवापासून मी तीन वेळा या सभागृहात मुद्दा उपस्थित केला असून आज चौथ्यांदा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, सध्या जे नागरीकरण होत आहे त्यासाठी शासनाला स्वतंत्र निधीची तरतूद करावी लागणार आहे.

यानंतर श्री. अजित.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

आमच्या शेतकऱ्यांचे सिंचनासाठी ठेवलेले पैसे नागरीकरणासाठी वापरु नका. आपण बाळगंगा,काळू, कोंडाणा, शाई धरण करीत आहात पण त्यासाठी एमएमआरडीए आणि सिडको पैसे देत आहे. आपणास आता नागरीकरणासाठी स्वतंत्र निधी द्यावा लागेल. मुंबई शहरात दहा दहा कोटी रुपयांचे फ्लॅट घेणारे ग्राहक आहेत. त्यांना आणखी 500 रुपये स्वे.फुटामागे लावावे, त्या पैशातून धरण होऊ शकते. मुंबई शहरात 40 हजार स्वे.फूट भावाने फ्लॅट खरेदी केला जातो. अलिबागमध्ये 60 हजार रुपये स्वे.फुटाचा भाव आहे. आपण आणखी 200 रुपये स्वे.फुटामागे वाढवून त्यांच्यासाठी स्वतंत्र पाण्याची व्यवस्था करावी अशी माझी मागणी आहे. आपणास नागरीकरणासाठी वेगळे पाणी आणि कृषीसाठी वेगळे पाणी असे धोरण घ्यावे लागणार आहे. कृषीसाठी निधीची तरतूद वेगळी असली पाहिजे. त्या संदर्भातील तरतूद अर्थसंकल्पात दिसत नाही.

सभापती महोदय, मी यापूर्वी देखील सांगितलेले आहे की, ज्या प्रकल्पाचे काम 20 टक्के शिल्लक आहे अशा प्रकल्पांना प्रथम निधी देऊन ते प्रकल्प प्रथम पूर्ण केले पाहिजेत. जर एखाद्या प्रकल्पाची चौकशी सुरु असेल आणि त्या प्रकल्पाचे काम 80 टक्के पूर्ण झाले असेल तर तो प्रकल्प देखील प्रथम पूर्ण करुन नंतर त्याबाबत चौकशी करावी. बाळगंगा प्रकल्पाचे 10 टक्के काम शिल्लक आहे. त्या प्रकल्पासाठी सिडको पैसे देत आहे. फक्त चौकशी लागली म्हणून ते काम थांबविण्यात आलेले आहे. काम थांबविले म्हणून ठेकेदार 200 ते 300 कोटी रुपये जादा पैशाची मागणी करणार, हे एक मोठे रॅकेट आहे. माझी या निमित्ताने मागणी आहे की, ज्या प्रकल्पाची कामे 10-20 टक्के शिल्लक आहेत ती प्रथम पूर्ण करावीत. त्या प्रकल्पाची चौकशी करावयाची असल्यास ती जरुर करावी, त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही. जर चौकशीमध्ये ठेकेदार दोषी आढळला तर त्याच्याकडून तेवढी रक्कम वसूल करावी. आपल्याकडे ठेकेदाराची बँक गॅरेन्टी असते त्यातून आपणास वसुली करता येईल.

सभापती महोदय, आता नैना प्रकल्प येत आहे. नवी मुंबई येथे विमानतळ होत आहे. त्या ठिकाणी ज्या गतीने नागरीकरण होत आहे त्यासाठी पाणी कोठून आणणार ? मग आपण आमच्या शेतकऱ्यांचे पाणी पळविणार. तेव्हा अपूर्ण प्रकल्प लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता आहे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशानुसार सिंचनाचे वाटप झाले पाहिजे. त्यादृष्टीने अपूर्ण कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, "स्वच्छ भारत अभियान" देशात आणि राज्यात मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येणार असा उल्लेख अर्थसंकल्पातील भाषणात आहे. या अभियानासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. इतक्या तुटपुंज्या रकमेमध्ये हे अभियान होणार नाही. या स्वच्छ भारत अभियानामध्ये डॅम्पींग ग्राऊंडसाठी तरतूद करण्यात आलेली नाही. डम्पींग ग्राऊंडसाठी जागेचे नियोजन कसे करणार आहात, याचा उल्लेख अर्थसंकल्पातील भाषणात दिसत नाही. आपण "स्वच्छ भारत अभियानातील" कचरा चंद्रावर टाकणार आहात काय ? आपणास कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डम्पींग ग्राऊंडची व्यवस्था करावी लागेल.

सभापती महोदय, अलिबाग नगरपालिकेने भूसंपादनासाठी 24 लाख रुपयांची तरतूद केली होती. डिस्पुटमुळे शासनाने परवानगी दिली नाही. आज त्या जागेची किंमत 2 कोटी रुपये झाली आहे. अलिबाग नगरपालिकेची तेवढी किंमत देण्याची आर्थिक कुवत नाही. या ठिकाणी "स्वच्छ भारत अभियानासाठी" जी तरतूद केलेली आहे ती अत्यंत अपुरी आहे त्यामध्ये ते अभियान होईल असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अतिशय चांगला मुद्दा मांडला, मी त्या मुद्याची पुनरावृत्ती करतो. 3 लाख रुपयांवरील कामांचे ई-टेंडरींग करण्यात येईल असे सांगण्यात आले. परंतु यातून वाचण्यासाठी 2 लाख 99 हजार रुपयांची कामे मंजूर करण्यात आली म्हणजे ही अफरातफर आहे, फ्रॉड आहे. एक काम असेल तर ठीक आहे. परंतु दोनशे-चारशे कामे केलेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी सुशिक्षित बेरोजगारांच्या सोसायटींचा आणि मजूर संस्था सोसायटीचा प्रश्न विचारला होता त्यावेळी माननीय सहकार मंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, या नियमामध्ये बदल करता येणार नाही. आमचा हा निर्णय आहे. या निणर्याला अर्थमंत्री बगल देत असतील तर ते बरोबर नाही. श्री.चंद्रकांत पाटील हे मंत्रिमंडळातील वजनदार मंत्री आहेत. पूर्वीची पद्धत सुरु ठेवावी असे दोन्ही बाजूचे सदस्य सांगत होते. परंतु त्यांनी ती पद्धती तशीच पुढे सुरु ठेवली नाही.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात आरोग्य विभागासाठी 629 कोटी 92 लाख रुपये, पर्यावरण विभागासाठी 9 कोटी 10 लाख रुपये, परिवहन विभागासाठी 141 कोटी रुपये, उद्योग विभागासाठी 403 कोटी 9 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच रस्ते आणि पूल म्हणजे एमएसआरडीसीसाठी 3 हजार 313 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे परंतु ती तरतूद बीओटीचे तत्व धरुन गृहीत केलेली आहे म्हणजे त्या विभागासाठी काहीही तरतूद केलेली नाही. या सर्व विभागांची एकूण बेरीज दोन हजार कोटी रुपये देखील होत नाही. आपण त्यांच्यावर इतका अन्याय करु नका...(अडथळा)..

सभापती महोदय, सरकार बदलल्यानंतर मंत्रालय इमारत दुरुस्तीच्या कामास गती येईल असे मला वाटले होते. पण त्यासाठी आपल्याकडे पैसे नाहीत. मंत्रालय इमारत दुरुस्तीच्या बांधकामाचे नियोजन झालेले नाही. मंत्रालयाची इमारत दुसऱ्या जागेवर नव्याने बांधली असती तर ती कमी खर्चात आणि लवकर बांधून पूर्ण झाली असती.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

आज मंत्रालयाच्या इमारतीमध्ये जाण्यास भीती वाटते. महोदय, मी अजूनही माननीय गृहनिर्माण मंत्र्यांच्या मंत्रालयातील दालनामध्ये गेलेलो नाही. या अर्थसंकल्पामध्ये मंत्रालयाच्या नूतनीकरणाचा खर्च वाढणार आहे की कमी होणार आहे, तसेच हे काम कधीपर्यंत पूर्ण होणार आहे, या बाबतचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

महोदय, हा अर्थसंकल्प 1 लाख 95 हजार कोटी रुपयांचा आहे. यातील 46 हजार कोटी रुपये हे केंद्र सरकारकडून मिळणार आहेत. शिवाय या अर्थसंकल्पामध्ये वाढीव महसूल जमा होणार असल्याचे नमूद केले आहे. या निमित्ताने मी विचारतो की, हा वाढीव महसूल कशाच्या माध्यमातून येणार आहे ?

सभापती महोदय, या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये स्थानिक संस्था कर (LBT) रद्द करण्याबाबतचा उल्लेख करून हे सरकार एकप्रकारे फसवणूक करीत आहे. राज्य सरकार एलबीटी पासून मुक्ती देऊ शकत नाही. कारण असे केले तर सर्व महापालिकांचा अर्थसंकल्प कोलमडून पडेल. तसेच दुसरी बाब अशी की, एलबीटी रद्द केल्यानंतर मुंबई व्यतिरिक्त अन्य महापालिकांना नुकसान भरपाईपोटी रक्कम द्यावी लागणार असल्यामुळे ती भरपाई कर वाढवून करण्याचे ठरविण्यात आले आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, आपण ग्रामीण भागातील जनतेवर कर लादू नका. मुंबईकरांवर जे काही कर लावायचे असतील ते लावा, त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही. परंतु ग्रामीण भागातील लोकांवर कर लादला तर महाराष्ट्रातील जनता हे कधीही सहन करणार नाही.

सभापती महोदय, लोकसभा निवडणुका होऊन 9-10 महिन्यांचा काळ लोटला आहे. दोन महिन्याने केंद्रातील सरकारला एक वर्ष पूर्ण होणार आहे. परंतु....

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, लोकसभेच्या निवडणुका होऊन 10 महिन्यांचा काळ लोटला आहे. येत्या पाच वर्षांमध्ये रायगड जिल्ह्यात 1 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक येणार आहे. यावरून रायगडला चांगले दिवस आले असे सन्माननीय सदस्यांना वाटत नाही काय किंवा या गुंतवणुकीमुळे रायगड जिल्ह्याचा विकास होणार नाही असे ते कसे म्हणू शकतात ?

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय ज्या गुंतवणुकीबाबत सांगत आहेत ती गुंतवणूक 10 वर्षांपूर्वीच जाहीर झालेली आहे. त्या नवीन योजना नाहीत.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या 5 वर्षांमध्ये 1 लाख कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर होऊन ती कामे होणार आहेत. मला वाटते सन्माननीय सदस्यांनी पूर्वीच्या आणि आताच्या सरकारमध्ये फरक करावा. तसेच दुसरी बाब अशी की, मंत्रालयाच्या नूतनीकरणाचे काम 75 टक्के पूर्ण झाल्यानंतर आमच्या सरकारकडे आले आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे भाषण सुरु असतानाच माननीय मंत्र्यांनी खुलासा करणे हे या सभागृहाच्या प्रथा, परंपरेला धरुन नाही. सन्माननीय सदस्य अर्थसंकल्पावर बोलत असताना माननीय मंत्र्यांनी त्यांच्या भाषणात अडथळा निर्माण करणे उचित नाही. या चर्चेला माननीय वित्त मंत्री उत्तर देणार आहेत. त्यांनी त्यांच्या उत्तरामध्ये जे काही सांगायचे असेल ते सांगावे. परंतु माननीय मंत्र्यांनी असे मध्येच बोलणे योग्य नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येता कामा नये. या राज्याचा अर्थसंकल्प हा 1 लाख 95 हजार कोटी रुपयांचा आहे. मग यातून रायगड जिल्ह्यासाठी 1 लाख कोटी रुपये कसे देण्यात येणार आहेत ?

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये ज्या प्रकारचा बदल पाहिजे होता तो दिसत नाही. महोदय, माझ्या भाषणाचा समारोप करण्यापूर्वी एवढेच सांगतो की, अर्थसंकल्पामध्ये तरतुदी केल्यानंतर बदलविण्याची जी परंपरा वित्त विभागात आहे ती नवीन सरकार बदलेल अशी अपेक्षा व्यक्त करतो व येथेच थांबतो.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : नवीन पनवेल येथील सेंट जॉर्ज चर्चवर झालेल्या हल्ल्यातील आरोपींना अटक करण्यात येणे

**मु.शी.** : नवीन पनवेल येथील सेंट जॉर्ज चर्चवर झालेल्या हल्ल्यातील आरोपींना अटक करण्यात येणे, या संबंधी गृह (शहरे) राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ.रणजित पाटील ( गृह (शहरे) राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो..

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.:** सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....)

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी सन्माननीय सदस्य सर्वश्री अनिल सोले, नागो गाणार, भाई गिरकर, डॉ.अपूर्व हिरे, मितेश भांगडिया, विनायक मेटे, महादेव जानकर, श्रीमती स्मिता वाघ, ॲड.अनिल परब, सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, माणिकराव ठाकरे, राजेंद्र मुळक, चंद्रकांत रघुवंशी, हरिसिंग राठोड, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री भाई जगताप, ॲड.जनार्दन चांदूरकर, सर्वश्री आनंदराव पाटील, अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, सर्वश्री ख्वाजा बेग, जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, कपिल पाटील, दत्तात्रय सावंत, श्रीकांत देशपांडे, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री सुनील तटकरे, विक्रम काळे, किरण पावसकर, अमरसिंह पंडित व हेमंत टकले यांची नावे आलेली आहेत.

आता सन्माननीय सदस्य श्री.अनिल सोले यांनी भाषणास सुरुवात करावी.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझी माननीय सभापतींना विनंती आहे. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवरील सन्माननीय सदस्यांची भाषणे होण्यास रात्रीचे जवळपास 9 वाजतील. आपण यावरील माननीय मंत्र्यांचे उत्तर उद्या विशेष बैठकीत ठेवावे. मी माननीय सभापतींना या संदर्भात भेटतो. आज यावरील उत्तर घाईघाईत झाले तर न्याय मिळणार नाही.

**तालिका सभापती** : मी या संदर्भातील निरोप माननीय सभापतींना पाठवितो. माननीय सभापतींनी जाहीर केले आहे की, संध्याकाळी 7 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालवायचे आहे. आपण संध्याकाळी 7 वाजेपर्यंत कामकाज चालू ठेवू आणि वेळ वाढवायचा असेल तर वेळ वाढवू. सन्माननीय सदस्य प्रा. अनिल सोले यांनी भाषणास सुरुवात करावी.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी, अर्थसंकल्पाचे स्वागत करण्यासाठी मी उभा आहे. माननीय राज्यमंत्री श्री. दीपक केसरकर यांनी अत्यंत धीरगंभीरतेने राज्याचा अर्थसंकल्प मांडला आहे. वरिष्ठ सभागृहात ज्या पध्दतीने प्रतिपादन व्हायला पाहिजे होते, त्या पध्दतीने त्यांनी प्रतिपादन केले आहे. माननीय राज्यमंत्री श्री. दीपक केसरकर यांनी त्यांच्या व्यक्तिमत्वाप्रमाणे, अपेक्षेप्रमाणे प्रतिपादन केले आहे. सभागृहात अर्थसंकल्प मांडताना त्यांची स्टाईल, पध्दत होती, त्यामुळे ते अभिनंदनास पात्र आहेत. राज्याचा अर्थसकल्प सादर करताना कोणत्याही प्रकारचा अभिनिवेश न ठेवता, कोणत्याही मोठ्या योजनांची घोषणा न करता ठोस असा अर्थसंकल्प माननीय अर्थमंत्री व माननीय राज्यमंत्री यांनी मांडला आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, राज्यावर जवळपास 3 लाख कोटी रूपयांचे कर्ज आहे आणि त्या संदर्भातील व्याज देण्याकरिता शासनाला 24 हजार कोटी रूपयांची व्यवस्था करावी लागते हे आपल्याला माहीत आहे. अर्थसंकल्पात त्या संदर्भातील व्यवस्था करीत असतानाच गेल्या काही वर्षातील महसुली असंतुलन दिसते, त्याचा परिणाम दिसतो, तो कमी करण्याचा प्रयत्न माननीय अर्थमंत्री व माननीय राज्यमंत्री यांनी अर्थसंकल्पामध्ये केल्याचे दिसत आहे. महसुली असंतुलनामुळे 13886 कोटी रूपयांची महसुली तूट झाली आहे. पुढील वर्षी ही तूट मोठ्या प्रमाणात येऊ नये या दृष्टीने अर्थसंकल्पात निश्चितपणे काळजी घेण्यात आली आहे. मला अत्यंत अभिमानाने सांगावेसे वाटते की, माननीय अर्थमंत्र्यांची भूमिका स्पष्ट आहे. भावी पिढीसाठी भांडवली मत्ता तयार करण्याचा संकल्प अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. त्यांनी केलेले वक्तव्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे. बऱ्याचदा सरकारी लेख्यांत रकमाची भांडवली खर्च म्हणून नोंद झाली तरी, यानंतर भावी पिढीकरिता मालमत्ता तयार होईलच किंवा उत्पादक मालमत्ता तयार होईलच अशी काही खात्री नसते. परंतु त्याची काळजी या अर्थसंकल्पात निश्चितपणे घेतलेली दिसून येते.

सभापती महोदय, यावर्षी 54999 कोटी रूपयांच्या योजना मांडल्या आहेत. मागच्या वर्षी 51 हजार कोटी रूपयांच्या योजना मांडल्या होत्या. आपल्या निदर्शनास येते की, मागे शेवटपर्यंत त्या संदर्भात तरतुदी झाल्या नाहीत आणि कामे रेंगाळली. त्यामुळे आता याकरिता पैसे खर्च करण्याचा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. अनिल सोले ....

संकल्प माननीय अथमंत्र्यांनी केला आहे. मी त्याचे निश्चितपणे स्वागत करतो. अर्थसंकल्पात अनेक योजना आहेत ज्यांचा मी उल्लेख करू शकतो. नागपूर, पुण्याकरिता मेट्रो आहे, मुंबई मेट्रो-3 आहे, आमदार आदर्श गाव योजना आहे, भंडारा-चंद्रपूर-गोंदिया येथील मामा तलावांचे नूतनीकरण आहे, बस स्थानकांचे नूतनीकरण आहे, मिहानच्या संदर्भातील पुनर्वसनाची व्यवस्था आहे, विविध धार्मिक ठिकाणांचे सौंदर्यीकरणाची व्यवस्था आहे. सभापती महोदय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, कामठी करिता 10 कोटी रूपयांची तरतूद आहे. पर्यावरणाच्या गोष्टी आहेत. अर्थसंकल्पात अनेक मुद्दे आहेत. कौशल्य विकास आहे. अनेक मुद्यांना त्यांनी स्पर्श केला आहे आणि राज्यातील जनतेला यातून हमी देण्यात आली आहे. मी आता 2-3 योजनांबाबत बोलणार आहे. मी रिपिटेशन करणार नाही.

सभापती महोदय, जलयुक्त शिवार अभियान एक चांगली योजना आणली आहे. हे अभियान आहे जे मोठ्या प्रमाणात चालविण्यात येणार आहे आणि त्यासाठी जवळपास 1 हजार कोटी रूपयांची तरतूद केली आहे. मी त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. राज्यातील अनेक जिल्ह्यांत पाण्याची स्थिती वाईट आहे. विदर्भात मोठ्या प्रमाणात पाऊस येऊन सुध्दा वर्धा, अमरावती जिल्ह्यात 95 टक्के कोरडवाहू जमीन राहते आणि याचे कारण ते पाणी वाहून जाते, गोदावरीला जाऊन मिळते. ते पाणी अडविण्याच्या कोणत्याही योजना आखलेल्या नाहीत. आपण धावत्या पाण्याला चालायला लावा, चालत्या पाण्याला थांबायला लावा आणि थांबलेल्या पाण्याला जमिनीत मुरायला लावा, ही दृष्टी ठेवून जलयुक्त शिवार अभियान केले आहे. विकेंद्रित जलाशय निर्माण करायचे, सूक्ष्म जल सिंचनाच्या योजना आणायच्या अशा प्रकारे जमिनीतील ओलावा वाढवून कास्तकाराला समृध्द, सुखी करायचे असा मानस जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून दिसत आहे. विकेंद्रित पाणी साठे निर्माण करण्यासाठी यावर्षी 500 कोटी रूपये नियतव्यय प्रस्तावित आहे. मागील वर्षी यासाठी 250 कोटी रूपये नियतव्यय प्रस्तावित होता, तो आता दुप्पट करण्यात आला आहे. गडचिरोली-चंद्रपूर-गोंदिया-भंडारा या भागातील मालगुजारी तलावांकरिता मागच्या वर्षी 10 कोटी रूपयांचीच तरतूद केली होती, मात्र यावर्षी 100 कोटी रूपयांची



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. अनिल सोले ....

तरतूद करण्यात आली आहे. सूक्ष्म सिंचनाचा महत्त्वकांक्षी प्रकल्प आहे. सदर बाबीसाठी यावर्षी 330 कोटी रूपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. मागच्या वर्षी यासाठी फक्त 12 कोटी 50 लाख रूपयांचा नियतव्यव प्रस्तावित होता. या सर्व सिंचनाच्या योजना आहेत. जवळपास 38 रखडत पडलेल्या प्रकल्पांना पूर्ण करण्याचे, 700 दलघमी पाणी साठा निर्माण करून 69 हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा संकल्प यामध्ये दिसत आहे. जलभरणाच्या योजना, पाणी जिरविण्याच्या-मुरवण्याच्या योजना आहेत. तलाव आणि पाणी साठे प्रदूषित असतील, ते बुजत असतील तर त्यांना ठीक करण्याच्या योजना देखील यामध्ये मोठ्या प्रमाणात दिसतात. मी शासनाचे यासाठी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, कृषी पंपाच्या बाबतीत विचार केला तर असे लक्षात येते की, कृषी पंपाच्या दृष्टीने पथदर्शी प्रकल्प घेतला आहे. 1039 कोटी रूपयांचा भरीव नियतव्यव यामध्ये दिला आहे. जवळपास 60540 पथदर्शी प्रकल्प आहेत. आपण यामध्ये यशस्वी झालो तर राज्यात 5 लाख सौर ऊर्जेवर चालणारे प्रकल्प, पंप आणण्यात येणार आहेत. मी याचे देखील स्वागत करतो. मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना आहे. राज्यात जवळपास 2 लाख 66 हजार कि.मी. चे रस्ते आहेत. रस्ते पोहचतात तेथे विकास होतो, समृध्दी पोहचते, परिवहन पोहचते. रस्ते शहरासाठी जोडले जातात. मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजनेच्या अंतर्गत 350 कोटी रूपयांची व्यवस्था करण्यात आली आहे. दरवर्षी 1 हजार कोटी रूपयांची वाढ सुचविली आहे. ग्रामीण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गावे शहराला जोडण्याच्या दृष्टीने सोय होणार आहे. मी याचेही स्वागत करतो. आमदार आदर्श गाव योजना आहे. सदर बाबतीत म्हटले गेले की, ही योजना म्हणजे कॉपी, पेस्ट आणि फॉरवर्ड केलेली योजना आहे. देशाने चांगल्या योजना, कन्सेप्ट यांचे कौतुक केले आहे. स्वच्छ भारत योजना, स्मार्ट सिटी योजना याला कोण विरोध करीत आहे ? आदर्श गाव योजना केंद्र शासनाने अवलंबिली आहे, त्याचे सर्वांनी स्वागत केले आहे. विविध पक्षांच्या नेत्यांनी आपापल्या क्षेत्रामध्ये 1 गाव निश्चित केले, दत्तक घेतले आणि ती योजना राबविण्याचा संकल्प केला. एक चांगली योजना आली आहे आणि या माध्यमातून प्रत्येक



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. अनिल सोले ....

मतदारसंघामध्ये मॉडेल व्हिलेज तयार होईल. आमदार निधी आणि तेवढाच पैसा राज्य शासन त्यात देणार आहे. ग्रामीण भागात चांगले वातावरण पोहचविण्याच्या दृष्टीने आमदार आदर्श गाव योजना आहे. मी त्याचे स्वागत करतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले........

सभापती महोदय, आज जवळपास 2 लाख 66 हजार पेक्षा जास्त लोक दारिद्र्य रेषेखाली असून देखील त्यांना घरकुल योजनांचा लाभ मिळत नाही. कारण, त्यांच्या जवळ स्वतःच्या मालकीची जमीन नाही. यासाठी राज्य सरकारने पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या नावाने घरकुलासाठी जमीन खरेदी करण्याकरिता 50 हजार रुपयांची मदत देणारी योजना सुरु केली आहे आणि त्यासाठी अर्थसंकल्पात आर्थिक तरतूदही केली आहे. मी आपल्या माध्यमातून या शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, स्वच्छ भारत अभियानाला अनेक संदर्भ आहेत. त्याचा संबंध पर्यावरणाशीही जोडला जातो. भारत स्वच्छ करावयाचा असेल तर केवळ रस्त्यांवरील काडीकचरा उचलून चालणार नाही तर त्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीकोनातून मोठ्या योजना हाती घेण्याची गरज आहे. सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट आणि सॉलिड वेस्ट ट्रिटमेंट यांचे मोठे प्रकल्प महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात उभारले गेले पाहिजेत, अशा केंद्र शासनाच्या सूचना आहेत. डोअरस्टेप गारबेज कलेक्शनव्दारे शहरांमध्ये निर्माण होणारा कचरा उचलला पाहिजे, त्यावर त्याच ठिकाणी ट्रिटमेंट झाली पाहिजे आणि त्याच ठिकाणी त्याची विल्हेवाट लागली पाहिजे, या दृष्टीकोनातून योजना तयार करण्याची आवश्यकता आहे. लोकांनाही यामध्ये सहभागी करुन घेतले पाहिजे. यासाठी शासनाने गावोगावी शौचालये, घराघरात शौचालये आणि सार्वजनिक शौचालयाची योजना आपल्या अर्थसंकल्पात अंतर्भूत केली आहे, त्याबद्दल मी या शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, भाषण संपविण्यापूर्वी एक अतिशय महत्त्वाचा विषय मी आपल्या अनुमतीने मांडू इच्छितो. या विषयासंदर्भात या सदनानेही चिंता व्यक्त केली आहे. एल.बी.टी.का आला, कशाकरिता आला, त्या माध्यमातून काय अपेक्षा होती, त्याची फलनिष्पत्ती काय झाली, अशा प्रकारचे अनेक प्रश्न जनतेच्या मनामध्ये आहेत. मी नागपूर महानगरपालिकेचा महापौर असल्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांना अनेकवेळा विनंती केली होती. ज्यावेळी आपण फायनान्शिअल रिफॉर्म करतो, त्यावेळी त्याचे इफेक्ट आणि इम्पॅक्ट ज्या जनतेवर होणार आहेत, त्या जनतेशी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

चर्चा करण्याची आवश्यकता असते. परंतु, दोन वर्षापूर्वी अतिशय घिसाडघाईने याबाबतचा निर्णय

...2....



प्रा.अनिल सोले........

घेण्यात आला. अक्षरशः एल.बी.टी.लादण्यात आला. त्यावेळी महापौर परिषदेचा एकमताने असा प्रस्ताव होता की, एल.बी.टी.लादण्यात येऊ नये. महाराष्ट्रात एल.बी.टी.लागू करण्यापूर्वी संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला विश्वासात घ्यावयास हवे होते, ते झाले नाही. आता मात्र या शासनाने एल.बी.टी.रद्द करण्याची घोषणा केली आहे. वास्तविक पाहता, 1 एप्रिल पासून एल.बी.टी.रद्द व्हावा, अशी आमची अपेक्षा होती. परंतु, सरकारने 1 ऑगस्ट पासून हा निर्णय अंमलात आणण्याचा मनोदय जाहीर केला आहे. हा निर्णय घेतल्याबद्दल मी मनापासून या शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, एल.बी.टी.रद्द झाल्यानंतर जवळपास एक वर्षाचा विचार केला तर शासनावर साधारणपणे 14500 कोटी रुपयांचा भार येणार आहे. महानगरपालिकांना हा निधी द्यावा लागणार आहे. एल.बी.टी.लागू करण्याचा निर्णय आपल्या राज्याने मागील काळात घेतला. परंतु, संपूर्ण देशात एल.बी.टी. कोठेही नाही. त्यांच्या पक्षाच्याही अनेक लोकांनी एल.बी.टी.ला विरोध केला होता. 19 खासदारांचे शिष्टमंडळ दिल्लीला निवेदन घेऊन गेले होते. अशा प्रकारे अनेक लोकांनी विरोध केला असताना या विरोधाला न जुमानता घिसाडघाईने तत्कालीन शासनाने हा निर्णय लागू केला.

सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिकदृष्ट्या स्वतःवरच अवलंबून असतात आणि त्यासाठी ऑक्ट्रॉय होता. अॅबॉलिशन ऑफ ऑक्ट्रॉय, ही आमचीही भूमिका होती. ऑक्ट्रॉय रद्द करावयास हवा होता. परंतु, तो रद्द करीत असताना त्याला एल.बी.टी.हा पर्याय होऊ शकत नव्हता. कारण, देशात एल.बी.टी. कोठेही नाही. ज्या ठिकाणी ऑक्ट्रॉय अॅबॉलिश झाला, त्या ठिकाणी काय होते ? गुजरातमध्ये एल.बी.टी. किंवा ऑक्ट्रॉय नाही. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, ज्या ठिकाणी विविध पक्षांची सरकारे आहेत, त्या ठिकाणी महानगरपालिकांना आवश्यक असणारे कॉन्ट्रिब्युशन दिले जात आहे. त्यामुळे आपल्या राज्याने वेगळा पर्याय शोधावयास हवा होता. पण तत्कालीन शासनाच्या जेव्हा हे लक्षात आले की, काही तरी गडबड झाली आहे, त्यावेळी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

लोकसभेच्या निवडणुकीनंतर तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सर्व महापौरांना बोलाविले. अशा प्रकारे आर्थिक रिफॉर्म करीत असताना आवश्यक असलेली गंभीरता तत्कालीन सरकारमध्ये नव्हती.

...3....



प्रा.अनिल सोले........

सभापती महोदय, आताच्या सरकारने एल.बी.टी.रद्द केला आहे आणि योग्य ती व्यवस्था करण्याच्या दृष्टीकोनातून सहा महिन्यांची मुदत घेतली आहे. सर्व महानगरपालिकांना याची जाणीव करुन दिलेली आहे की, 1 ऑगस्ट, 2015 नंतर एल.बी.टी. राहणार नाही. त्या दृष्टीने आवश्यक असलेली तजवीज या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सरकारने केली आहे, त्याबद्दल मी अर्थ मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, वेळ थोडा असतानाही आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि या अर्थसंकल्पाला समर्थन देऊन थांबतो. धन्यवाद.

-------------

...4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सरकारने या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहासमोर मांडला आहे. काही तरी संकल्प घेऊन केलेले अर्थाचे नियोजन म्हणजे अर्थसंकल्प असतो. परंतु, कोणताही संकल्प नसलेला हा अर्थसंकल्प आहे, असे माझे प्रामाणिक मत आहे.

सभापती महोदय, धरसोड वृत्ती कशी असते याबाबत कोकणातील एक म्हण आहे. "एक ना धड भाराभर चिंध्या." अशीच या अर्थसंकल्पाची गत झाली आहे. एकही गोष्ट सरळ नाही. कोणत्याही गोष्टीला तडीस नेण्याचा संकल्प या अर्थसंकल्पात दिसत नाही, अशा प्रकारचा अर्थसंकल्प मांडण्याचा प्रयत्न माननीय अर्थ मंत्र्यांनी केला आहे.

सभापती महोदय, आज संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहे. मी अर्थसंकल्प वाचत असताना पाहिले की, देशी बियाण्यांचे जतन व संवर्धन करणे, असा उल्लेख त्यामध्ये आहे. निश्चितपणे देशी बियाण्यांचे संवर्धन केले पाहिजे. आपल्याकडे अनेक वर्षांपासूनची बियाणे आहेत, जे चांगल्या प्रतीची आहेत, उच्च प्रतीची आहेत, त्यांचे जतन झाले पाहिजे, याबाबत कोणताही वाद असण्याचे कारण नाही. परंतु, आज संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडलेली आहे. शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीतून जात असताना कमी जागेमध्ये जास्त उत्पादन करु शकेल, अशा प्रकारच्या बियाण्यांची निर्मिती करणे आणि त्या माध्यमातून शेतकऱ्यांची आर्थिक क्षमता वाढविणे, हे महत्त्वाचे काम असतानाही त्याचा उल्लेख मात्र अर्थसंकल्पीय भाषणात दिसून आला नाही.

सभापती महोदय, मी कोकणातील आहे, अर्थ राज्यमंत्री महोदय देखील कोकणातील आहेत. कोकणाला 720 किलो मीटरचा समद्र किनारा लाभला आहे. मी अनेक मच्छीमारांशी बोलत असतो कारण मी कोकणातील आहे. परंतु, हल्ली या समुद्रात मासे मिळणे कठीण झाले आहे. मासेमारी करीत असताना अनेक मच्छीमारांकडून देशाची सीमा ओलांडली जाते. आपण पाहिले असेल की, गुजरातचे मच्छीमार चुकून पाकिस्तानमध्ये जातात व त्यांना त्या देशाकडून अटक केली जाते. तामिळनाडूतील मच्छीमार श्रीलंकेत जातात आणि त्यांनाही त्या देशाकडून अटक केली जाते. आज मच्छीमारांची दुरवस्था असताना त्यांना आधार देण्याची गरज असताना

..5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे.........

यांत्रिकीकरणासाठी केवळ 20 कोटी रुपयांची तुटपुंजी तरतूद या अर्थसंकल्पात केलेली आहे. मच्छीमारांवर मोठे संकट असताना बारीक मासे समुद्रात राहिले पाहिजेत, त्यांची वाढ झाल्यानंतर ते मिळाले पाहिजेत, अशी अपेक्षा आहे. परंतु, पर्ससेन नेट बद्दल एकही शब्द अर्थसंकल्पात नाही. यामधून जी काही परिस्थिती निर्माण झाली आहे, ती कशी सोडविणार आहात, याबद्दलही अर्थसंकल्पात उल्लेख नाही.

सभापती महोदय, आमदार आदर्श ग्राम योजनेचा उल्लेख आताच सन्माननीय सदस्य श्री.अनिल सोले यांनी केला आहे. तो करीत असताना कट, पेस्ट ॲण्ड फॉरवर्ड, असाही उल्लेख त्यांनी केला आहे. एखादा सन्माननीय सदस्य आमदार निधीतून केवळ 10 ते 15 लाख रुपयांपर्यंतचा प्रकल्प घेऊ शकतो. एखादे आदर्श गाव निर्माण करायचे म्हणजे ते स्वयंपूर्ण असले पाहिजे, वेगवेगळ्या स्वच्छतेच्या योजना व्यवस्थितपणे राबविल्या गेल्या पाहिजेत, घनकचऱ्याचे चांगले व्यवसथापन असले पाहिजे, प्रत्येक गावामध्ये शुध्द पाणी मिळाले पाहिजे, चांगले रस्ते असले पाहिजेत, अशी अपेक्षा आहे आणि ही सर्व कामे 10 ते 15 लाख रुपयांमध्ये करावयाची म्हटली तर आदर्श ग्राम कसे उभे राहणार आहे ? केवळ घोषणा करायची म्हणून ही घोषणा करण्यात आली आहे. मी सुरुवातीलाच सांगितले की, धरसोड वृत्तीने, कोणतेही काम तडीस नेता येईल, अशी कोणतीही घोषणा अर्थसंकल्पात नाही.

सभापती महोदय, वीज निर्मितीसाठी या अर्थसंकल्पात 535 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मी मघाशी तत्कालीन ऊर्जा राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांच्याशी चर्चा केली. साधारणपणे प्रति मेगावॅट 5 कोटी रुपये एवढा खर्च येत असतो.

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे...

सरकारने मेक इन महाराष्ट्राची घोषणा केली आहे. 105 मेगावॅट जास्तीची वीज निर्मिती करण्यासाठीची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. जलविद्युत प्रकल्पातून वीज निर्मिती करणे शक्य आहे किंवा नाही याची शाश्वती नाही. जागेचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. नवीन धरणे बांधण्यासाठी जागा नाही, त्यामुळे 900 कोटी रुपयांची तरतूद कशासाठी करण्यात आली आहे याची स्पष्टता होत नाही. केवळ संख्याबळाचा खेळ करण्यात येत असून जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्यात येत आहे, अशा स्वरुपाचा अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदय, रायगड महोत्सवाचा उल्लेख बजेटमध्ये करण्यात आला आहे. आज सकाळी देखील सभागृहात रायगड महोत्सवाचा उल्लेख झाला होता. रायगड किल्ला केंद्र शासनाच्या पुरातत्व विभागाकडे आहे, ही घोषणा करण्यापूर्वी राज्य सरकारने केंद्र शासनाच्या पुरातत्व विभागाशी चर्चा केली आहे काय ? आमचा संकल्प होता, परंतु पुरातत्व विभागाने परवानगी दिली नाही त्यामुळे 50 कोटी रुपये खर्च करु शकत नाही, असे नंतर सांगण्यात येईल. आश्वासन समितीच्या अभ्यास दौऱ्यासाठी आम्ही रायगड किल्ल्यावर गेलो होतो. सिंधदुर्ग येथील पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, हा किल्ला केंद्र सरकारच्या पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत आहे. तेथे राज्य सरकारला एक वीट देखील लावता येणार नाही. त्यामुळे रायगड महोत्सव कशा प्रकारे करण्यात येणार आहे, याची स्पष्टता होत नाही. जे शक्य नाही ते बजेटमध्ये दाखविले जात आहे. जनतेची दिशाभूल केली जात असून लोकांना सांगायचे की, आम्हाला या गोष्टी करायच्या होत्या पण केंद्र शासनाने परवानगी दिली नाही, कायद्यामुळे अडचण निर्माण झाली, काही लोक कोर्टात गेले. कोणताही विचार न करता अशा घोषणा फक्त सवंग लोकप्रियतेसाठी शासनाकडून केल्या जात आहेत.

सभापती महोदय, निसर्ग पर्यटन विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. पर्यटन हे निसर्गाच्या माध्यमातून होत असते. कोकण, विदर्भ किंवा अभयारण्यांतील पर्यटन हे निसर्गातूनच होत असते. पर्यटन विकास महामंडळ असताना निसर्ग पर्यटन विकास महामंडळाची काय आवश्कता आहे हे मला कळले नाही. कोकणात 720 किलोमीटर समुद्र किनारा आहे. यासाठी फक्त 42 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अर्थ राज्यमंत्री महोदय कोकणातील

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे...

आहेत. सागरी किनाऱ्याबाबत मी एक उदाहरण देतो. अलिबाग तालुक्यातील आवास या गावातील लोकांनी अत्यंत मेहनत करुन हजारो झाडे समुद्र किनाऱ्यावर लावली होती. समुद्र किनाऱ्यावर धूप प्रतिबंधक बंधारा बांधावा लागतो. येथील बंधाऱ्याचे बांधकाम अर्धवट केल्यामुळे समुद्रात उधाण आले होते त्यावेळी तेथील 700 ते 800 झाडे वाहून गेली आहेत. या बजेटमध्ये धूप प्रतिबंधक बंधाऱ्यासाठी आर्थिक तरतूद केल्याचे दिसत नाही. कोकणाच्या जनतेला मंत्री महोदय काय उत्तर देणार आहेत. कोकणातील जनतेचा हा महत्वपूर्ण विषय आहे. कोकणातील अनेक गावे समुद्र किनाऱ्यावर वसलेली आहेत. तेथे धूप प्रतिबंधक बंधारा नसल्यामुळे तेथील जमिनी संपूर्णपणे वाहून जात आहेत.

सभापती महोदय, क्रीडा धोरणाची अंमलबजावणी करण्याची घोषणा केली आहे. यासाठी फक्त 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 50 कोटी रुपये व्यायाम शाळा व वेगवेगळ्या जिल्ह्यात क्रीडा संकुल उभारण्यासाठी आहेत. क्रीडा धोरण राबविण्यासाठी शाळांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. शिक्षण खात्यामार्फत क्रीडा धोरणाची अंमलबजावणी करताना शाळांना आर्थिक मदत लागणार आहे. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या स्पर्धांसाठी जावे लागते, त्यासाठी काहीही तरतूद करण्यात आली नाही, फक्त घोषणा करण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, जे.जे.स्कूल ऑफ आर्ट हे अत्यंत नावाजलेले महाविद्यालय आहे. मुंबई शहरातील काही भूषणे आहेत त्यामध्ये जे.जे.स्कूल ऑफ आर्ट हे अत्यंत महत्वाचे आहे. मी स्वत: तेथे गेलो होतो. तेथे शिक्षक नाहीत, ज्या ठिकाणी आर्टचे शिक्षण दिले जाते तेथे आर्किटेक्चरच्या कॉलेजसाठी इमारत घेण्यात आली. तेथे जुन्या काळातील अनेक पेंटिंग्ज् आहेत, त्या जतन करण्याची आवश्यकता आहे. जे.जे.स्कूल ऑफ आर्टसाठी लागणारा प्रोफेसर वर्ग शासनाने देणे आवश्यक आहे. जे.जे.स्कूल ऑफ आर्टला गत वैभव प्राप्त करुन देण्यासाठी फक्त 10 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, ती अतिशय कमी आहे. तेथे कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहेत. कंत्राटी पध्दतीवर अनेक प्रोफेसर काम करीत आहेत त्यांना कायम करणे आवश्यक आहे. ही कामे 10 कोटी रुपयांत होणार नाहीत.

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे...

सभापती महोदय, अनेक विषय येथे मांडता येतील परंतु वेळेचे बंधन आहे, वेळेचे बंधन पाळणारा मी आहे. कारण मी देखील तालिका सभापती म्हणून दुसऱ्या सन्माननीय सदस्यांना वेळेचे बंधन पाळण्यास सांगतो. दोन तीन गोष्टींचा उल्लेख करुन मी थांबणार आहे.

सभापती महोदय, मच्छिमारांच्या संस्थेचे मुख्य कार्यालय नागपूर येथे आहे. व्यवसाय कोकणात आहे व त्याचे मुख्यालय नागपूर येथे आहे. ही विसंगती दूर करणे अत्यंत गरजेचे आहे. भाग क्रमांक दोन मधील चटई क्षेत्राच्या अधिमूल्यात वाढ करण्यात आली आहे. आम्ही शहरी भागातील लोकांनी काय गुन्हा केला आहे. मुंबई शहरात मराठी माणूस आहे. वित्त राज्य मंत्री ज्या पक्षाचे आहेत तो पक्ष मराठी बाबत सातत्याने आग्रही असतो. चटई क्षेत्र निर्देशांकात वाढ करण्यात येत आहे. त्यानुसार अधिमूल्यात वाढ करण्यात येत आहे. अशी घोषणा एका बाजूला करीत असताना दुसऱ्या बाजूला स्वस्त दरात घरे उपलब्ध करुन देण्यात येतील असे सांगण्यात येते. बेसीक रेट वाढविल्यामुळे सामान्य माणूस तसेच मंत्रालयातील कर्मचारी किंवा महानगरपालिकेत काम करणारा कर्मचारी किंवा खाजगी कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याची ऐपत 10 ते 25 लाख रुपयांचे घर घेण्याची आहे, त्याच्या आर्थिक क्षमतेनुसार त्याला कर्ज मिळते. ते कर्ज देखील अल्प मिळते. असे असताना सरकार कोणत्या पध्दतीने स्वस्त दरात घरे उपलब्ध करुन देईल? कोणताही ठोस कार्यक्रम म्हाडाच्या वतीने राबविताना दिसत नाही. मी स्वत: अनेक वर्षे म्हाडात वेगवेगळ्या स्तरावर काम केले आहे. म्हाडाकडे जमीन उपलब्ध नाही, खाजगी मालकाकडून मार्केट भावाने जमीन घेतली तर म्हाडा कशा प्रकारे स्वस्त दरात घरे उपलब्ध करुन देणार आहे] याबाबत अर्थसंकल्पात सूतोवाच करण्यात आले नाही.

सभापती महोदय, लाकूड विरहित प्लेन आणि प्री लॅमिनेटेड पार्टीकल बोर्डवरील कर याबाबत उल्लेख करण्यात आला आहे. मंत्री महोदयांनी इको फ्रेन्डली पार्टीकल बोर्ड आणि रेग्युलर प्लायवूड बोर्ड किंवा रेग्युलर लॅमिनेटेड बोर्ड यावरील कर सारखा ठेवला आहे. पार्टीकल बोर्डला प्रोत्साहन देण्याचे कारण पर्यावरणाचे संतुलन राखणे हे आहे. पार्टीकल बोर्ड कोंडा व रिसायकलिंग पासून तयार होतो. पार्टीकल बोर्ड, रेग्युलर पार्टीकल बोर्ड किंवा लॅमिनेटेड बोर्ड

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे...

वरील कर सारखा ठेवण्यात आला आहे. पार्टीकल बोर्डचा वापर लोकांनी केला तर पर्यावरणाचा समतोल राखता येईल, त्यामुळे रिसायकलिंगचा उद्देश नाहीसा होतो.

सभापती महोदय, बजेट मांडतांना मंत्री महोदयांनी अनेक गोष्टींचा उल्लेख केला आहे. अनेक वेळा काही सवलती दिल्या जातात. सवलतीमुळे अर्थसंकल्पात किती तूट येणार आहे किंवा किती उत्पन्न कमी होणार आहे किंवा एखादा कर लावला तर त्यातून किती उत्पन्न मिळेल याचे सूतोवाच बजेटच्या भाषणात करण्यात आले नाही. हा अर्थसंकल्प अतिशय दिशाहीन, राज्यातील जनतेची दिशाभूल करणारा असल्यामुळे मी त्याचा तीव्र शब्दात निषेध करतो, धिक्कार करतो व माझे भाषण संपवितो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदय या ठिकाणी आहेत, मंत्री महोदय सभागृहात बसण्याचा उद्देश असा असतो की, सन्माननीय सदस्यांकडून ज्या सूचना येतात त्यांचे टिपण मंत्री महोदयांनी घ्यावे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे मंत्री महोदयांना डिस्टर्ब करीत आहेत. त्यांच्याशी अर्ध्या तासापासून ते बोलत आहेत. मंत्री महोदयांच्या कानात ते काय सांगत आहेत याची मला माहिती नाही.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेबांनी त्यांच्या जागेवर बसले पाहिजे. त्यांनी सभागृहात मंत्री महोदयांबरोबर गप्पा मारु नयेत.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब अर्थसंकल्पावर शेवटी बोलणार आहेत. त्यामुळे त्यांच्या पक्षातर्फे त्यांच्यावर अन्याय होत आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी अर्थसंकल्पावर बोलणार आहे. मला अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी किमान अर्धा-पाऊण तास वेळ देण्यात यावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे. माझ्या पक्षाचे 5-7 सदस्य बोलणार आहेत. त्यानंतर मी बोलणार आहे.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : आता सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपले भाषण सुरु करावे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्याची संधी दिली त्याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार मानतो.

सभापती महोदय, राज्यातील 11 कोटी जनतेचा विचार करुन 54 हजार 999 कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करण्यात आलेला आहे. मागील वर्षी आघाडी सरकार सत्तेवर असताना 51 हजार 222 कोटी 54 लाख रुपयांचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करण्यात आला होता. म्हणजे विद्यमान अर्थसंकल्प जवळपास 13 हजार 676 कोटी 43 लाख रुपयांनी जास्त आहे. असे असले तरी 3,457 कोटी रुपयांचा तुटीचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, माननीय वित्त राज्यमंत्री श्री.दीपक केसरकर यांनी अत्यंत शांत, धीरगंभीरपणे सन 2015-16 चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर केलेला आहे. परंतु, आमचे मित्र, राज्याचे माननीय वित्तमंत्री, श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी शेरोशायरी, कवितांचा वर्षाव करीत, संगीतमय पद्धतीने, काव्यमय पद्धतीने अर्थसंकल्प सादर केलेला आहे. मी अर्थसंकल्पाचा अभ्यास केला त्यावेळी मला आमचे कविवर्य सुधाकर गायधने यांनी लिहिलेल्या चार ओळींची आठवण झाली. ते महाराष्ट्राचे महान कवी आहेत. त्यांनी महान काव्य लिहिलेले आहे. ते असे म्हणतात की,

"चिंध्या पांघरुण सोनं विकायला बसलो, तर गिऱ्हाईक फिरकेना,
सोनं पांघरुण चिंध्या विकायला बसलो तर गर्दी हटेना."

सभापती महोदय, अशी अवस्था आहे. श्री.अनिल सोले साहेब, अशा पद्धतीने काल पर्यंत सत्तेवर असलेले सरकार चिंध्या पांघरुण सोने विकत होते तरी त्या सरकारला जनतेने निवडणुकीमध्ये साथ दिली नाही आणि सोने पांघरुण चिंध्या विकायला निघालेला अर्थसंकल्प आपण सांगत आहात. लहान मुलाला औषध द्यावयाचे असेल तर तो मुलगा औषध घेत नाही. कारण ते औषध कडू असते. म्हणून त्याला शुगर मिक्सिग औषध दिले जाते. आता औषधांच्या गोळ्या देखील शुगर मिक्सिग निघालेल्या आहेत. त्या प्रमाणे हा शुगर कोटेड अर्थसंकल्प आहे. राज्यातील

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

जनतेच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे. स्वप्न चांगले आहे. आपण नेहमीच म्हणतो की, स्वप्न पाहणे वाईट नसते. परंतु, जो पर्यंत आपण ते स्वप्न वास्तवामध्ये उतरविण्याचा प्रयत्न करीत नाही तो पर्यंत त्या स्वप्नाला अर्थ नसतो.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात जनतेच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबित व्हाव्यात असा प्रयत्न करणार आहे, असे अर्थसंकल्पाच्या पहिल्याच पानावर नमूद केलेले आहे. आशा आणि आकांक्षा या दोन बहिणी आहेत. परंतु, ते प्रयत्न कोठे दिसत नाही. प्रयत्न करणार आहोत, असे अर्थसंकल्पात नमूद केलेले आहे. राज्यातील दीन, दुर्बल, शोषित, पीडित, अंध, अपंग, निराधार, आदिवासी, दलित, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, अल्पसंख्याक जनतेला हे राज्य त्यांचे आहे, असे वाटले पाहिजे या दृष्टीने शासन हा अर्थसंकल्प सादर करीत आहे, असे सांगण्यात आले आहे. त्या ऊपर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला सामाजिक न्याय, अंत्योदयाचे स्वप्न, समाजातील भगिनींची प्रगती, उच्च शिक्षण घेऊन देखील बेरोजगार असलेला आमच्या राज्यातील तरुण वर्ग, शेतकरी, आदिवासी, शेतमजूर या सर्वांचा विचार आमच्या सरकारने केलेला आहे, असे अर्थसंकल्पात सांगण्यात आले. हे जरी खरे असले तरी प्रत्यक्षात काय स्थिती आहे, हे अर्थसंकल्प वाचल्यानंतर आपल्या लक्षात येईल.

सभापती महोदय, शेतकरी आत्महत्या करीत आहेत आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे संपूर्ण राज्य परेशान आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी आपल्याला काही विशेष प्रयत्न करता येतात काय, यावर मघाशी सभागृहात चर्चा झाली. त्यावेळी या संदर्भात करावयाच्या अनेक उपाययोजनांच्या संदर्भात चर्चा करण्यात आली. सभागृहाचे नेते, माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी देखील त्या संदर्भात काही मुद्दे मांडले. प्रत्येक गावातील ज्या शेतकऱ्यांनी शेतीसाठी कर्ज घेतले असेल अशा शेतकऱ्यांची यादी तयार करुन ती ग्रामपंचायतीमध्ये ठेवली पाहिजे आणि तो शेतकरी जर कोणत्या अडचणीत सापडला तर तो आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होऊ नये यासाठी गाव पातळीवर विशेष अशा प्रकारचा प्रयत्न करता येऊ शकतो काय, याचा देखील विचार करणे आवश्यक आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

सभापती महोदय, सावकारी कर्ज हे सापाच्या वेढ्यासारखे आहे. सावकाराकडून कर्ज घ्यावयाचे असेल तर शेतकरी आपली शेती तारण म्हणून सावकाराकडे गहाण ठेवतो. तो सावकार एवढा लुच्चा आणि लफंगा असतो की, तो साधे कर्ज देत नाही. तो त्या शेतकऱ्याची शेतीच आपल्या नावावर करुन घेतो, विक्री पत्र करुन घेतो आणि त्यानंतर तो शेतकऱ्याला कर्ज देतो. त्या शेतकऱ्याने सावकाराने दिलेल्या मुदतीत कर्जाची परतफेड केली तरी तो सावकार त्या शेतकऱ्याची जमीन त्याला परत करीत नाही, तो त्याची जमीन हडप करण्याचा प्रयत्न करतो. तत्कालीन गृहमंत्री स्व.आर.आर.पाटील साहेबांनी अशा सावकारांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढू, असे सांगितले होते. शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यासाठी मजबूर करणाऱ्या सावकारांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढण्याचा कार्यक्रम आपल्या शासनाचा आहे काय ? परंतु, तसा कार्यक्रम या अर्थसंकल्पात दिसत नाही. ज्या शेतकऱ्यांनी सावकारांकडून कर्ज घेतले त्या शेतकऱ्यांच्या कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी शासनाने घेतलेली आहे. शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यासाठी मजबूर करणाऱ्या सावकारांना दंडीत करण्याची किंवा त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची कार्यवाही आपण केलेली नाही, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. आपण अर्थसंकल्पीय भाषणात सांगितले की, ज्या 2 लाख 23 हजार शेतकऱ्यांनी सावकारांकडून कर्ज घेतलेले आहे त्यांना आम्ही सावकाराच्या कर्जातून मुक्त करणार आहोत. ते कर्ज फेडण्यासाठी आपण 156 कोटी रुपये कर्जाची रक्कम आणि त्या कर्जावरील व्याजाचे 15 कोटी रुपये आपण भरणार आहात.

सभापती महोदय, राज्यात अवकाळी पाऊस, गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले, शेतकरी हवालदिल झाला. त्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी 4 हजार कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी जी 4 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे ती दर्या में खस खस अशा प्रकारची आहे. शेतकऱ्यांना वीज बिलात सूट, विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कामध्ये सूट इत्यादी असे अर्थसंकल्पात नमूद

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

केलेले आहे. मग इत्यादी म्हणजे काय ? इत्यादीमध्ये आणखी कशाचा समावेश आहे, हे स्पष्ट झाले असते तर चांगले झाले असते.

सभापती महोदय, पाण्याचे व्यवस्थापन अत्यंत महत्वाचे आहे. आपण देखील आपल्या भाषणात पाण्याच्या व्यवस्थापनाच्या संदर्भात उल्लेख केला. जल युक्त शिवार अभियान, पाझर तलावांची व्यवस्था असा अर्थसंकल्पात उल्लेख आहे. सन्माननीय सदस्य श्री.अनिल सोले साहेब, पाझर तलावांच्या संदर्भात बोलले. विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर भागात माजी मालगुजारी तलाव आहेत. त्या तलावांचे खोलीकरण करणे, गाळ काढणे, पाझर तलावांची निर्मिती करणे, वॉटर शेडींगचे कार्यक्रम हाती घेणे, बंधारे, छोटी धरणे, साठवण तलाव बांधणे, अशी व्यवस्था जर आपण केली तर निश्चित ग्रामीण भागातील पाण्याची समस्या थोड्या फार प्रमाणात कमी होऊ शकेल, असे मला वाटते.

सभापती महोदय, केंद्र शासनाने नरेगा योजना सुरु केलेली आहे. परंतु, सर्वात जास्त भ्रष्टाचार नरेगा योजनेमध्ये आहे.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

असे दिसते की, 1948 कोटी 80 लाख रुपयांचा नियतव्यय नरेगासाठी प्रस्तावित केला आहे. हा निधी म्हणजे भ्रष्टाचार करणाऱ्यांसाठी दुभती गाय आहे. त्यावर मनरेगाच्या माध्यमातून नियंत्रण कसे करणार आहात हे स्पष्ट केले पाहिजे. ग्रामीण भागातील बेरोजगार, शेतमजूरांना कशा प्रकारचे काम मिळणार आहे याची दखल घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आपण कोकणामधील आहात. कोकणाला 720 कि.मी.चा समुद्र किनारा लाभला आहे. हे महाराष्ट्राला लाभलेले वरदान आहे. आपण भाग्यशाली आहात, आपण समुद्र किनारी राहता. ग्रामीण भागातील रस्त्यांची काय अवस्था झालेली आहे याचा अनुभव घ्यायचा असेल तर आपण वाशिम ते हिंगोली असा वाहनाने प्रवास करुन पहा. ग्रामीण भागातील रस्त्यांची दुर्दशा थांबली पाहिजे. रस्ता आहे तेथे विकास आहे असे म्हटले जाते. ग्रामीण भागाचा विकास करावयाचा असेल तर ग्रामीण भागामध्ये उत्कृष्ट रस्त्यांचा विकास करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, झोपडपट्टीधारकांना मालकीचे पट्टे मिळाले पाहिजेत. शासनाने 2000 पर्यंतच्या झोपड्यांना अभय दिले आहे. तसा कायदा केला असून जीआर देखील निघालेला आहे. झोपडपट्टयांचा पुनर्विकास करताना बिल्डर, विकासकांना काम दिले जाते, त्यांच्याकडून झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या नागरिकांची फसवणूक केली जाते. त्यांच्यामार्फत दादागिरी केली जाते, गुंडगिरी केली जाते. झोपडीधारकांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले जाते. याचे एक उदाहरण मी देऊ इच्छितो. मे.शंकर मित्तल यांच्या रिध्दी सिध्दी कार्पोरेशन, सिध्दार्थनगर, दादासाहेब गायकवाड रोड, मुंबई यांना महापालिकेने नोटीस दिली. त्यांना एसआरए योजनेचे काम दिले होते. विकासकाने मुंबई महापालिकेच्या सफाई कामगार वसाहतीतील भिंत तोडली. वसाहतीमधून वाहनांची वाहतूक आणि ये जा करण्यासाठी रस्ता तयार केला. जेसीबी, बुलडोझर मशीन जाण्यासाठी या रस्त्याचा बेकायदेशीर वापर करुन महापालिकेच्या निधीतून बसविण्यात आलेले पेव्हर ब्लॉक व महापालिकेच्या मालमत्तेचे नुकसान केले. मे.शंकर मित्तल यांच्या रिध्दी सिध्दी कार्पोरेशनला नोटीस देण्यात आली. परंतु शासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही. बिल्डर मंडळींची दबंगगिरी सुरु आहे, उच्छाद सुरु आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या संदर्भात मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना, शहरी शबरी आदिवासी घरकुल योजना राबविण्याबरोबरच झोपडपट्टीचा विकास, झोपडयांना संरक्षण देण्याचे काम शासनाने केले पाहिजे.

सभापती महोदय, देशाच्या माननीय पंतप्रधानांनी स्वच्छ भारत अभियानाचा नारा दिला. त्यानंतर नागरिक संपूर्ण देश स्वच्छ करण्याच्या कामाला लागले. आमच्या महाराष्ट्रामध्ये ग्रामस्वच्छता अभियान संत गाडगेबाबा यांच्या नावाने आघाडी सरकारने सुरु केले हे आम्ही कधीही विसरु शकत नाही. त्याचा किमान उल्लेख तरी या अर्थसंकल्पात होणे अपेक्षित होते. स्व.आर.आर.पाटील यांचा उल्लेख होणे आवश्यक होते. ग्रामस्वच्छता अभियान त्यांनी सुरु केले. भारत स्वच्छ अभियानाची मुख्य आवृत्ती तीच आहे. त्याची जाणीव ठेवली असती तर अधिक बरे वाटले असते.

सभापती महोदय, राज्य शासनाने घरेलू कामगार मंडळ तयार केले असून त्यासाठी फक्त 20 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. कामगारांची संख्या लक्षात घेता पुरेशी तरतूद होणे आवश्यक आहे. कामठी, जि.नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक आणि प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या सोबत राज्य शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ प्रकाशन समिती, महात्मा फुले ग्रंथ प्रकाशन समिती आणि राजर्षि शाहू महाराज ग्रंथ प्रकाशन समिती स्थापन करण्याचे घोषित केले आहे. त्यासाठी तरतूद किती केली याचा कुठेही उल्लेख दिसून येत नाही याबद्दल खेद वाटतो.

सभापती महोदय, चंद्रपूर, गडचिरोली व भंडारा जिल्हयांमध्ये बांबूचा व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो. लक्षावधी कुटुंबे या व्यवसायावर अवलंबून आहेत. 2014 मध्ये शासनाने नवीन बांबू धोरण तयार केले. महाराष्ट्र स्तरावर बांबू विकास मंडळ तयार केले त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. सभापती महोदय, वय वर्ष 6 ते 14 पर्यंतच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सर्व शिक्षा अभियान सुरु करण्यात आले. ही योजना प्रामाणिकपण् राबविली जावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प दिशाभूल करणारा आहे. शासनाची प्राथमिकता काय आहे? कोरडवाहू शेतीस स्थैर्य देऊ असे सांगताना कृषी जमिनीचा अनिर्बंध अकृषिक वापर, अतिरिक्त एफएसआय यामधून बिल्डर आणि विकासकांच्या हितासाठीचे धोरण आणले आहे ही बाब अत्यंत गंभीर आहे. टोलमुक्त महाराष्ट्र करणार असे जाहीर केले होते. काल सभागृहामध्ये धनगर समाजाच्या आरक्षणाबद्दल चर्चा झाली. मराठा समाजाला आरक्षण दिले ही चांगली बाब आहे. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. मुस्लीम समाजाला दिलेले आरक्षण हायकोर्टाने शिक्षणासाठी कायम ठेवले, ते देखील युती सरकारने सुरु केले नाही. अधिसूचना काढली नाही ही गंभीर बाब आहे. शासनाने पक्षपाती भूमिका सोडली पाहिजे. धनगर समाजाचा विचार केला पाहिजे. काल मला बोलायला संधी मिळाली नाही. मुंबईमध्ये धनगर समाजाचे लाखो लोक आपल्या अनेक वर्षाच्या मागणीसाठी मोर्चा घेऊन आले होते. सरकारने त्या समाजाला आरक्षण दिले पाहिजे. मराठा समाजाला ओबीसी समाजाप्रमाणे वेगळे आरक्षण दिले. मुस्लीम समाजाला शैक्षणिक आरक्षण दिले आणि धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाला धक्का न लावता आरक्षण दिले तर बरे होईल.

सभापती महोदय, एलबीटी हा कर रद्द करण्याची घोषणा करण्यात आली. परंतु याचा परिणाम असा झाला की, एलबीटीच्या ऐवजी वॅट हा कर लागू केला आहे. एलबीटी हा फक्त महापालिकेच्या क्षेत्रात वसूल केला जात होता. वॅट हा संपूर्ण राज्याला लागू केल्यामुळे ग्रामीण जनतेकडून सुध्दा कर वसूल होणार आहे ही गंभीर बाब आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्यायमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. अनुसूचित जातीसाठी प्रत्यक्षपणे आर्थिक तरतूद पूर्वी दाखविली जात होती. परंतु आता नियतव्यय दाखविण्यात आला आहे. उत्पन्न वाढले तर तरतूद होईल असा त्याचा अर्थ होतो. राज्यातील अनुसूचित जाती, ओबीसी, भटक्या समाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे हे मला नमूद करावयाचे आहे.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचे म्हटले आहे. परंतु तरतूद करण्यात आलेली नाही. माननीय बाळासाहेब ठाकरे आणि माननीय गोपीनाथ मुंडे यांच्या स्मारकाचा उल्लेख केला आहे. परंतु त्यासाठी किती रक्कम दिली जाणार आहे याचा कुठेही उल्लेख दिसत नाही.

नंतर 2बी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

या राज्यातील ग्रंथालय, वाचनालय यांना आपण पाच कोटी रूपयांची तुटपुंजी तरतूद केली आहे हे उचित नाही. राज्यातील ग्रंथालय, वाचनालयासाठी आपण भरीव तरतूद करायला पाहिजे होती. शेवटी मला असे म्हणावयाचे आहे की, हा अर्थसंकल्प फसवा असल्यामुळे मी त्याला विरोध करतो आणि येथेच थांबतो.

.....

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गोपीकिशन बाजोरीया)**

श्री.राजेंद्र मुळक (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. युती शासनाचा हा पहिलाच अर्थसंकल्प आहे. या शासनाला 31 मार्च 2015 पर्यंत आघाडी शासनाच्या अर्थसंकल्पानुसार काम करावयाचे आहे.

सभापती महोदय, 2014 मध्ये विधान सभेची निवडणूक झाली. त्या निवडणुकीमध्ये जनतेला ज्या पद्धतीने स्वप्ने दाखविण्यात आली होती त्याचा अंतर्भाव पहिल्या अर्थसंकल्पात होणे आवश्यक होते. आमच्या हातामध्ये सत्ता आली तर महाराष्ट्र कुठे घेऊन जाऊ अशा प्रकारची स्वप्ने दाखविल्यानंतरचा हा पहिला अर्थसंकल्प आहे. पण त्यात कसलाही अंतर्भाव नसल्यामुळे मला दु:ख होते. निवडणुकीच्या काळात जनतेला दाखविण्यात आलेल्या स्वप्नांचे प्रतिबिंब अर्थसंकल्पात कुठेही दिसून येत नाही.

सभापती महोदय, नवीन सत्ता आल्यानंतर हा या शासनाचा पहिलाच अर्थसंकल्प आहे. यात आपल्याला अनेक नवीन तरतूद करता आल्या असत्या. माननीय वित्त मंत्र्यांकडून मागील 5-6 महिन्यांपासून तिजोरी खाली आहे असे मीडिया समोर सातत्याने सांगण्यात येत आहे. महाराष्ट्र संपूर्ण देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. सत्तेत आल्यानंतर निदान महाराष्ट्राच्या बाबतीत तरी त्यांनी असे बोलावयास नको होते. एखाद्या वित्तीय संस्थेसमोर राज्य जाते त्यावेळी त्याची पत असणे आवश्यक असते. देशात महाराष्ट्राची पत आजही पहिल्या क्रमांकाची आहे. राज्याची तिजोरी खाली आहे असे बोलणे म्हणजे मा.वित्त मंत्र्याचा पळपुटेपणा आहे.

सभापती महोदय, 1,98,230 कोटी रुपयांचा अर्थसंकल्प माननीय वित्त मंत्र्यांनी मांडलेला आहे. यात एकूण 2,01,988 कोटी महसुली खर्च असून रुपये 3757 इतकी महसुली तूट आहे. अनावश्यक खर्चाची बचत करुन महसूल व महसुली वसुली अधिक प्रभावीपणे करुन ही तूट मर्यादित कशी करता येईल या संदर्भात कुठेही उल्लेख नाही. तेव्हा शासन ही तूट कशी भरुन काढणार आहे यासंबंधातील उत्तर माननीय मंत्र्यांकडून हवे आहे. या राज्याचे महसुली आधिक्य आपण कसे वाढविणार आहात? यात आपल्याला खूप स्कोप आहे. आजही आपल्या राज्यात सर्वात जास्त

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेंद्र मुळक...

महसूल सेल्स टॅक्स, व्हॅटच्या माध्यमातून जमा होत आहे. आज पर्यंत मूल्यवर्धित कराच्या माध्यमातून कधीच घट झालेली नाही. मी तीन महिन्यातील महसुली जमा उत्पन्नाचे पिंक व ग्रीन बुकमधील आकडे पाहिले. या शासनाने कारभार हातात घेतल्यानंतर नियंत्रण आपल्या हातामध्ये घेतले पाहिजे होते. आपले राज्य हे देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. पूर्ण देशात महाराष्ट्राचे वैभव आहे. आपल्या राज्याची देशात एक वेगळी ओळख आहे. मुंबई ही आपल्या देशाची आर्थिक राजधानी आहे. आज व्हॅटच्या उत्पन्नामध्ये घट झालेली आहे. याचा अर्थ या शासनाचे नियंत्रण नाही. सत्तेत आल्यानंतर माननीय अर्थमंत्र्यांचा तिजोरी खाली आहे हा एकच नारा आहे. आज आपण सत्तेत आहात उद्या आम्ही सत्तेत येणार आहोत. आपल्याच राज्याच्या बाबतीत अशा प्रकारचे वक्तव्य करणे बरोबर नाही. अशा रितीने आपण स्वतःहून आपल्या राज्याची पत वित्तीय संस्थे समोर कमी करणे बरोबर नाही. खबरदार, यापुढे महाराष्ट्राच्या बाबतीत अशा प्रकारचा उल्लेख केला तर राज्यामध्ये कुठेही फिरू देणार नाही एवढे लक्षात ठेवावे. सर्व गोष्टीचे सोंग घेता येईल, पण पैशाचे सोंग घेता येत नाही. आज देशातील एकही राज्य महाराष्ट्राच्या आजूबाजूला उभे राहू शकत नाही एवढी आपली किंमत वित्तीय संस्थांसमोर आहे. कॅश रिचड् राज्य म्हणून आजही आपली ओळख संपूर्ण देशात आहे. आज राज्य चालविताना जे गांभीर्य पाहिजे ते आपल्यामध्ये दिसून येत नाही.

सभापती महोदय, आपले लक्ष सन 2014-15 च्या महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवालाकडे वेधत आहे. मुंबई ही महाराष्ट्राची आर्थिक राजधानी आहे. तसेच देशाची आर्थिक राजधानी आहे. म्हणूनच प्रमुख निगम आणि वित्तीय संस्था, मुख्यालये या शहरात आहेत. या देशातील प्रमुख वायदे व भांडवली बाजार आणि विक्रीय वस्तू व्यापार विनियमन केंद्र मुंबईत आहेत. देशपातळीवर मोठ्या स्वरूपात महसूल गोळा होतो. त्यातील एक मोठा भाग मुंबईमध्ये आहे. त्यामुळेच महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती भक्कम आहे, असे महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक पाहाणीतच नमूद करण्यात आले आहे. असे असले तरी देखील वित्त मंत्री तिजोरी खाली आहे असे म्हणत आहेत. असे बोलणे म्हणजे निव्वळ पळपुटेपणा आहे. आपण काही करू शकत नाही. आपल्याकडे कुठलीच माहिती नाही. खोटे बोलून आपण सरकारमध्ये आलेला आहात. एका विशिष्ट हवेमुळे हे सर्वजण



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेंद्र मुळक...

आलेले आहेत. महाराष्ट्रा सारखे राज्य चालवायचे असेल तर धीर-गंभीरपणा लागतो. अभ्यासपूर्ण काम करण्याची गरज असते.

सभापती महोदय, राज्यात दुष्काळ पडला, गारपीट झाली. त्यावर अनेक सन्माननीय सदस्य बोलले आहेत. यासाठी आपण चार हजार कोटी रूपये दिले आहेत. हे पैसे या शासनाने कुठून दिले आहेत ? राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली होती म्हणूनच आपण हे पैसे दिले आहेत ना ? या शासनाने शेतकऱ्यांसाठी कमी निधी दिलेला आहे. आपण त्या पेक्षा जास्त निधी देऊ शकला असता. पण जास्त पैसा देण्याची आपली इच्छा शक्तीच नव्हती.

माझी माननीय वित्त राज्यमंत्री यांना विनंती आहे की, त्यांनी या दोन पुस्तकांचे चांगल्या प्रकारे अध्ययन करावे. या दोन पुस्तकांमध्ये संपूर्ण राज्याची आर्थिक परिस्थिती आहे. आपण पिंक आणि ग्रीन बुक वाचून काढावे. रूपये चार हजार कोटींपेक्षा जास्त निधी आपण दुष्काळी व गारपीटग्रस्त भागातील शेतकऱ्यांना देऊ शकला असता. पण जास्त निधी आपण देऊ शकला नाहीत याचा मला खेद होतो.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजेंद्र मुळक .......

तुम्ही शेतकऱ्यांना कर्जमुक्त कराल अशी आम्हाला अपेक्षा होती. परंतु तुम्ही शेतकऱ्यांना कर्ज मुक्त केले नाही. तुमच्याकडे शेतकऱ्यांकडे पाहण्याची दृष्टीच नाही व ही दृष्टी या अर्थसंकल्पात दिसून आली नाही. त्यामुळे पिंक बूक आणि ग्रीन बुक मंत्री महोदयांनी पुन्हा एकदा चांगल्या प्रकारे वाचावे अशी माझी सूचना आहे. राज्याच्या जमा-खर्चापासून वर्षभरापर्यंत आपल्याकडे किती नियतव्यय राहील व जमा किती राहील याची सर्व माहिती या पिंक बुक आणि ग्रीन बुकमध्ये आपल्याला दिसून येईल. हे पुस्तक आपणच छापलेले आहे.

सभापती महोदय, या सरकारने घोषणांचा पाऊस पाडला आहे. या बजेटमध्ये विजेचे दर कमी करण्यात येतील असा उल्लेख आहे. परंतु विजेचे दर आपण कसे कमी करणार आहात ? विजेचे दर कमी करण्याच्या संदर्भात आपले नेमके काय धोरण आहे ? परवाच्या मंत्री महोदयांच्या भाषणात 3 महिन्यांसाठी विजेचे दर कमी करण्यात येतील असा उल्लेख होता. परंतु याच बरोबर यांनी ट्रिब्यूनलकडे 8 टक्क्याची वाढ करण्यासंदर्भात एक पिटीशन सुध्दा ठेवलेले आहे. सध्याची जागतीक परिस्थिती पाहिली तर इंधनाचे दर जवळपास निम्म्याहून जास्त प्रमाणात कमी झाले आहेत. वीज सुध्दा एक प्रकारचे इंधनच आहे. पेट्रोल पंपावर पेट्रोल घेतले की, ताबडतोब पैसे मोजावे लागतात. परंतु वीज वापरल्यानंतर त्याचे एक किंवा तीन महिन्यांनी बिल येत असते. वीज निर्माण करण्यासाठी जे इंधन लागते त्या इंधनाची किंमत सुध्दा जागतिक स्तरावर कमी झालेली आहे. वीज निर्मितीसाठी लागणाऱ्या इंधनाची किंमत कमी झाली आहे याबाबतीत कोठेच उल्लेख करण्यात आलेला नाही. आज तारखेला प्लँट लोड फॅक्टर कमी झालेला आहे, यांच्या प्लँट लोड फॅक्टरची मागील चार महिन्याची आकडेवारी माझ्याकडे आहे. महाराष्ट्रात चंद्रपूर, कोराडी, पारस, खापरखेडा,परळी या ठिकाणी वीज निर्मितीचे केंद्र आहे. या प्लँटचा लोड फॅक्टर अत्यंत कमी झालेला आहे. या शासनाचे पीएलएफकडे लक्ष नसल्यामुळे आज राज्यातील वीज निर्मितीमध्ये घट झालेली आहे. वीज निर्मितीची कॉस्ट वाढलेली असताना हे विजेचे दर कसे काय कमी करणार आहेत ? केवळ घोषणा करुन दर कमी होऊ शकत नाहीत. विजेची 3 महिन्यांची तूट कशा प्रकारे भरुन काढली जाणार आहे ? विजेचे दर 3 महिन्यांसाठी कमी केले जातील याचा उल्लेख

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजेंद्र मुळक .......

बजेटमध्ये असल्यामुळे यासंदर्भातील माहिती मंत्री महोदयांनी आजच्या उत्तराच्या भाषणात देण्याची आवश्यकता असून ती माहिती राज्यातील जनतेला कळायला पाहिजे. केवळ घोषणा करुन चालणार नाही. आपण जो उल्लेख केलेला आहे त्यामागे आपले नेमके धोरण काय आहे, कशा पध्दतीने दर कमी होणार आहे याची माहिती या सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, एलबीटीच्या बाबतीत अनेकांनी विचार मांडले आहेत. सन 2009 मध्ये एलबीटीचा कायदा आला. एलबीटीच्या संदर्भात सभागृहात अनेक सदस्यांनी भाषणे केली होती. एलबीटीच्या संदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री, माननीय खडसे साहेब, माननीय मुनगंटीवार साहेब या सर्वांच्या एकमताने एलबीटीचा कायदा तरतुदीसह मंजूर झाला व तो सन 2011-2012 पासून लागू करावयाचा होता. कोणताही नवीन कर आला की, त्याला सुरुवातीला विरोध होत असतो. त्यावेळेस एलबीटीला आजच्या सत्ताधारी पक्षातील मंडळींनी खूप मोठया प्रमाणात विरोध केला होता. एलबीटीला यांनी "लुटो बाटो टॅक्स" असे नावही दिले होते. मुंबईमध्ये यासंदर्भात देशाच्या नेत्यांची एक सभा झाली होती. त्या सभेमध्ये "ये लुटो बाटो टॅक्स है. ये लुटो बाटो टॅक्स चलानेवाले लोगो को इस देश से और इस महाराष्ट्र से हमे दूर करना है. हमारी सरकार आयेगी तो दूसरे ही दिन ये लुटो बाटो टॅक्स रद्द करेगी." परंतु अजून हा एलबीटी तुम्ही का बंद केला नाही ? नागपूरच्या अधिवेशनात एलबीटी बंद केला जाईल अशी घोषणा करण्यात आली होती पंरतु अद्याप एलबीटी सुरुच आहे. एलबीटीसाठी व्हॅटवर 1 टक्का अधिभार लावून एलबीटी बंद करू अशी घोषणा करण्यात आली होती. ऑगस्टच्या 15 तारखेपासून एलबीटी रद्द करु अशीही घोषणा नागपूरच्या अधिवेशनात करण्यात आली होती.

सभापती महोदय, व्हॅटवर 1 टक्का अधिभार म्हणजे हा 1 टक्के अधिभार कोणावर पडेल ? हा 1 टक्क्याचा अधिभार राज्यातील सर्व जनतेवर पडणार असून याचा फायदा राज्यातील एखाद्या महानगरपालिकेला होणार व तो भुर्दंड सर्व ग्रामीण भागातील लोकांनी का सहन करावयाचा ? 73 व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून जेवढयाही पंचायत राज संस्था आहेत, स्थानिक स्वराज्य संस्था आहेत त्यांना स्वायत्तता देण्यात आलेली आहे. तुम्ही आपली संस्था चालवा, आपला

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजेंद्र मुळक .......

निधी उभारा, पैसे खर्च करा, तुम्हला जर मदत लागत असेल तर तुमच्या जीडीपी प्रमाणे राज्य सरकार देईल असे सांगण्यात येत आहे. परंतु हे या स्वायत्त संस्थांना आणि राज्याला कोणत्या दिशेने घेऊन चालले आहेत ? व्हॅटवर 1 टक्का अधिभाराचे ग्रामीण भागातील जनतेने पैसे भरावयाचे आणि अशा परिस्थितीत चंद्रपूर महानगरपालिकेचा महापूर नवीन कराचे पैसे घेण्यासाठी मंत्रालयात उभा राहिला तर चंद्रपूरचा महापौर कॉंग्रेसचा असल्यामुळे त्यांना उद्या येण्यास सांगायचे आणि उद्या आला तर दोन महिन्यांनी देतो असे सांगायचे ? याला काय स्वायत्ता म्हणावयाची ? या सरकारची निती नागपूरमध्ये चालते आणि नागपूरची ही नीती आता ते सरकारमध्येही आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. या राज्याला, या पध्दतीने, या दिशेने आम्ही निश्चितपणे जाऊ देणार नाही. मी तुम्हाला सांगू इच्छितो की, तुम्ही या राज्यामध्ये ज्या पध्दतीने आलात त्याची आम्हाला माहिती आहे. मी परवा एका ठिकाणी गेलो होतो त्या ठिकाणची पब्लीक तुमच्या विरोधात बोलत होती. राज्यातील जनतेशी खोटे बोलून तुम्ही सत्तेवर आला आहात. नजीकच्या काळात एखादी निवडणूक झाली तर तुमच्या उमेदवाराची अनामत रक्कम सुध्दा शिल्लक राहणार नाही.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात टोलच्या बाबतीत उल्लेख होईल असे वाटले होते. टोलच्या बाबतीत या सरकारने खूप गाजावाजा केला होता. टोलमुळे जनतेची लूट होत आहे, तुट होत आहे असे हे सांगत होते. आता तुम्ही सत्तेवर आला आहात तर टोलमुक्त करुन दाखवा. आमच्या काळात टोल सुरु झाले त्याचा भुर्दंड आम्ही सहन केल्यामुळेच आम्ही सत्तेतून बाहेर आलो. हे सरकार युक्तीवाद करण्यासाठी समोर येत नाही, या सरकारकडे कोणतेही धोरण नाही. हे फक्त विरोधासाठी विरोध करुन सत्तेवर आले आहेत. सत्तेत आल्यानंतर यांच्याकडे कोणतीही योजना नाही. या अर्थसंकल्पाच्या भाग एक व भाग दोन मध्ये योजनांची नावे बदलली परंतु योजना आमच्याच वेळेच्या सुरु आहेत. आमच्या दोन-चार योजना गोळा करुन त्याला नाव देऊन आमच्याच योजना सुरु केल्या आहेत. नियतव्यय काय तर जिल्हा नियोजन मंडळातून तो खर्च करा. एक तर जिल्हा नियोजन मंडळाचा पूर्ण राज्याचा वर्षाचा नियतव्यय 1000 कोटी रुपयांनी वाढवून ही योजना त्यातूनच चालवा असे सांगितले जाते. राज्याला दिशाहीन करण्याचे काम सध्या सुरु आहे.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजेंद्र मुळक .......

सभापती महोदय, माननीय अर्थ मंत्री विदर्भातील चंद्रपूरमधील आहे. चंद्रपूर हे व्याघ्र प्रकल्पासाठी प्रसिध्द आहे. सन्माननीय अर्थमंत्री हे वन मंत्री देखील आहेत. या अर्थसंकल्पात टुरिझमच्या बाबतीत साधा उल्लेख सुध्दा करण्यात आलेला नाही.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेंद्र मुळक.....

नागपूरच्या गोरेवाडा प्राणी संग्रहालयासाठी एक रुपयांची देखील तरतूद केलेली नाही. माननीय मुख्यमंत्र्याचा तो फेव्हरेट प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही हे पाहून मुख्यमंत्री महोदयांच्या मनाला किती वेदना झाल्या असतील ते सांगता येत नाही. हा अर्थसंकल्प अंतिम करण्यापूर्वी मुख्यमंत्री महोदयांशी कन्सल्ट केले नसावे असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्री हे वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. गांधी फॉर टुमॉरो. आघाडी सरकारने सेवाग्रामच्या विकासासाठी 600 कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर करुन त्यास प्रशासकीय मान्यता देऊन 100 कोटी रुपये मंजूर केले होते. त्या संदर्भातील एका शब्दाचा उल्लेख या अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, ताजबाग विकास आराखड्यासाठी या सरकारकडे पैसे नाहीत. या अर्थसंकल्पामध्ये सामाजिक समतोल साधण्याचे काम या सरकारच्या माध्यमातून झाल्याचे दिसून येत नाही. मला अनेक विषयांवर बोलायचे आहे. परंतु वेळ कमी आहे. अजून अनेक सन्माननीय सदस्यांना भाषणे करायची आहेत, मी फक्त शेवटचे एक-दोन मुद्दे मांडून माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, राज्यावर वित्तीय भार असा आला आहे, ती तूट कशी भरुन काढणे आवश्यक आहे त्या संदर्भातील उपाययोजना सरकारने करणे आवश्यक होते. पण त्या उपाययोजना दिसून आल्या नाहीत. मी या ठिकाणी एक गोष्ट सांगू इच्छितो की, महसुली तुटीचा सुधारित अंदाज 13 हजार 893 कोटी रुपयांचा होता. नवीन सरकारने फक्त वित्तीय शिस्तीच्या घोषणा केलेल्या आहेत. या अर्थसंकल्पामध्ये कुठेच कृती दिसून येत नाही. मी सुरुवातीलाच सांगितले होते की, अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा जास्त असेल तो यशस्वी अर्थसंकल्प मानला जातो. राज्यावर 3 लाख 24 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे आणि त्यासाठी 24 हजार कोटी रुपये व्याज द्यावे लागते, असे सांगण्यात येते. परंतु त्यामध्ये काय चूक आहे ? राज्याच्या उत्कर्षासाठी कर्ज घेणे वाईट आहे काय ? आघाडी सरकारने जे काही कर्ज घेतले ते कॅपिटल इन्व्हेस्टमेंटमध्ये खर्च केलेले आहे. सन 1995-99 मध्ये युतीच्या सरकारने कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी कर्ज घेतले,

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेंद्र मुळक.....

ओ.डी. देखील घेतला होता. परंतु आघाडी सरकारने कधीही ओ.डी.घेतलेला नाही. देशात महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकाचे राज्य म्हणून ओळखले जाते. हे सरकार राज्याला कोणत्या दिशेने नेणार आहे, याचा कुठेही उल्लेख अर्थसंकल्पात नाही. या सरकारचे हे पहिले आर्थिक वर्ष आहे. पहिल्या आर्थिक वर्षामध्ये किमान अशी धोरणे राहावयास पाहिजे होती की, पुढील चार अर्थसंकल्पात कशारितीने मॅच करुन आपण स्टेपवाईज कसे पुढे जाऊ. परंतु त्या संदर्भातील कोणतीही दिशा दिसून येत नाही म्हणून मी या अर्थसंकल्पाला विरोध करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, "अतिशय संतुलित, शेतकरी केंद्रबिंदू आणि ग्रामीण बाज असलेला अर्थसंकल्प" असे या अर्थसंकल्पाचे वर्णन करता येईल. मी कोणत्या मुद्याचे रिपीटेशन करणार नाही.

सभापती महोदय, जलयुक्त शिवार योजनेवर अनेक सन्माननीय सदस्यांनी टीका केली तसेच काही सदस्यांनी अभिनंदनही केले. आपणास जलयुक्त शिवार योजनेचे फायदे नजीकच्या भविष्यकाळात दिसून येतील.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर व भंडारा या जिल्ह्यांतील मालगुजारी तलावांच्या दुरूस्तीसाठी 100 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. यापूर्वी कोणत्याही सरकारने मालगुजारी तलावांच्या दुरूस्तीसाठी इतकी भरीव तरतूद केली नव्हती. या सरकारची आदिवासी आणि शेतकऱ्यांबद्दल असलेली आत्मीयता दिसून येते, त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात रोजगार हमी योजनेत "क"वर्ग नगरपरिषदेचा समावेश करण्यात आलेला आहे त्यामुळे निमशहरी भागातील लोकांना रोजगार मिळण्यात मदत होणार आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, सिंचनावरील तरतूद व त्याचे नियोजन पाहता हा अर्थसंकल्प खरोखर वाखाणण्यासारखा आहे असे मला वाटते. ग्रामीण योजनांच्या बाबतीत कॉपी, पेस्ट आणि फॉरवर्ड असे काहींनी म्हटलेले आहे, परंतु मुख्यमंत्री ग्रामीण योजना आणि गावांसाठी, आमदारांसाठी आदर्श गाव योजना व इतर सर्व योजनांचे योग्य नियोजन असल्याने राज्याची वाटचाल उत्कर्षाकडे जात असल्याचे दिसून येते.

सभापती महोदय, वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी करण्यात आलेली तरतूद पुरेशी आहे. परंतु मला येथे एक सूचना करावयाची आहे की, आपण रोजगार निर्मितीसाठी भागभांडवल म्हणून

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मितेश भांगडिया.........

10 टक्के देतो ते 20 टक्के करुन त्याचे वितरण बँकेच्या टक्क्यात करण्यात यावे जेणेकरुन या उद्योगाला चालना मिळेल आणि त्यातून भरपूर रोजगार निर्मिती होईल. मला विश्वास आहे की, आमचे सरकार ते नक्की करील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक यांनी जोरदार भाषण करताना सांगितले की, वित्त मंत्री चंद्रपूर जिल्ह्यातील असूनसुद्धा त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील पर्यटनासाठी काहीही तरतूद केलेली नाही. परंतु मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, पर्यटनाचा जो आराखडा तयार केलेला आहे त्यामध्ये चंद्रपूरसाठी, गोरेवाडासाठी आणि व्याघ्र प्रकल्पासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील खनिज संपत्तीचे योग्य नियोजन करुन महसूल वाढविण्याचे व रोजगाराभिमुख प्रयत्न मनाला भावलेला आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये सर्वात लक्षणीय बाब म्हणजे कौशल्य रोजगार योजना. या कौशल्य रोजगार योजनेतून 5 लाख तरुणांना प्रशिक्षित करण्यात येईल. त्यातील 75 टक्के तरुणांना आश्वासित नोकरी देण्याचे या अर्थसंकल्पात प्रायोजित केलेले आहे त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मितेश भांगडिया....

सभापती महोदय, सर्व शिष्यवृत्त्या व शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीसाठी बायोमेट्रिक पध्दतीचा अवलंब करण्याचे सरकारने ठरविले आहे. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी सुध्दा बायामेट्रिक पध्दतीचा अवलंब करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतींना त्यांच्या एकूण स्थानिक विकासासाठी आदिवासी विकास विभागास प्राप्त होणाऱ्या एकूण निधीच्या 5 टक्के निधी थेट देण्याची योजना या अर्थसंकल्पात नमूद केलेली आहे. याबद्दल सुध्दा मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, "माझी कन्या भाग्यश्री" या नावाने राज्यात नवीन योजना सुरु केल्याबद्दल राज्य सरकारचे अभिनंदन करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये देशी दारुवरील उत्पादन शुल्काचा दर वाढवून सरकारने चांगले काम केले आहे. परंतु यामुळे अवैध दारुचे प्रमाण वाढू नये यासाठी जे प्रयत्न करणे गरजेचे आहे ते प्रयत्न सरकारकडून करण्यात येतील, अशी मला खात्री आहे.

सभापती महोदय, जीवनावश्यक वस्तुंच्या करावरील सवलत पुढे एक वर्ष सुरु ठेवण्याचे नमूद करण्यात आले आहे. या बरोबरच 10 हजार रुपये मासिक वेतन असलेल्या महिलांना व्यवसाय कर माफ करण्यात आलेला आहे. याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, कर्करोगावरील काही औषधे करमुक्त करण्यात आली आहेत. तसेच एल.ई.डी. बल्ब वरील करामध्ये सुध्दा सवलत दिली आहे. त्याच बरोबरच इतरही अनेक वस्तुंवरील करांमध्ये केलेले बदल हे अभिनंदनीय आहेत.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर बोलताना सर्व सन्माननीय सदस्यांनी पिण्याच्या पाण्यासंदर्भात आपली मते मांडली आहेत. ग्रामीण भागात शुध्द पाणी पुरवठा करण्यावर लक्ष केंद्रित केले तर ग्रामीण भागातील किमान 25 टक्के रोगराई नियंत्रणात येईल असे मला वाटते. महोदय, केंद्र सरकारने या संदर्भातील अभ्यास करण्यासाठी माशेलकर समितीची स्थापना केली होती. त्या समितीने ऑनलाईन क्लोरिनेशनच्या काही उपकरणांना मान्यता दिली आहे. मला वाटते सरकारने ती उपकरणे पाणी पुरवठ्याच्या योजनांवर लावण्याबाबत नियोजन केले तर ग्रामीण भागामध्ये शुध्द पिण्याचे पाणी मिळू शकेल.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मितेश भांगडिया....

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प 3757 कोटी रुपये महसुली तुटीचा सादर करण्यात आला आहे. परंतु मला नक्की विश्वास आहे की, या राज्य सरकारच्या माध्यमातून या वर्षी दाखविलेली महसुली तूट सुध्दा भरुन निघेल. तसेच या राज्य सरकारच्या नेतृत्वाखाली राज्याचा सर्वांगीण विकास करण्यात येईल, अशी सदिच्छा व्यक्त करुन पुन्हा एकदा या अर्थसंकल्पाचे मन:पूर्वक स्वागत करतो.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

--------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, विद्यमान राज्य सरकारने जो अर्थसंकल्प सादर केला आहे त्यातून आमचा पूर्णपणे अपेक्षाभंग झाला आहे. आम्हाला या अर्थसंकल्पातून खूप मोठ्या प्रमाणावर अपेक्षा होत्या. या अर्थसंकल्पामध्ये खासकरुन महिलांना काहीही मिळालेले नाही. या अर्थसंकल्पातील पृष्ठ क्रमांक-20 वर "नारी शक्तीचा सन्मान व आदर करत महिलांचे सक्षमीकरण व त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्याचा शासनाचा मनोदय आहे. ही ध्येयपूर्ती करण्यासाठी महिला वर्गास सूक्ष्म वित्त पुरवठा करण्याची नितांत आवश्यकता आहे." असे नमूद केले आहे. परंतु प्रत्यक्षात यासाठी प्रत्यक्षात किती रक्कम देण्यात येणार आहे या बाबतचा आकडा नमूद केलेला नाही.

सभापती महोदय, आमच्या आघाडी सरकारने गेल्या वर्षी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या मानधनात अनुक्रमे 950 व 500 रुपये वाढ करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केला होता. परंतु या सरकारने त्यांना ही वाढ दिलेली नाही. या अर्थसंकल्पात नमूद केले आहे की, "अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनात केलेली वाढ दिनांक 1 एप्रिल, 2015 पासून लागू करण्यात येईल." महोदय, राज्य सरकारचे बहुतांश काम अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि आशांच्या माध्यमातून केले जाते. परंतु राज्य सरकार या गरीब महिलांकडून फुकटात काम करुन घेत आहे. तत्कालीन उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी जी.आर. काढून व विशेष तरतूद करुन सुध्दा, विद्यमान राज्य सरकारच्या माध्यमातून अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना वाढीव मानधन दिले जात नाही. मानधनामध्ये वाढ करण्यात यावी या मागणीसाठी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस आझाद मैदान येथे मोर्चा घेऊन आल्या होत्या. सुरुवातीला माननीय महिला व बालविकास मंत्र्यांनी सांगितले की, त्या मोर्चाला भेट देण्यात येईल. परंतु मी सांगू इच्छिते की, माननीय मंत्र्यांनी त्या मोर्चाला भेट दिली नाही. या अर्थसंकल्पात अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या वाढीव मानधनाबाबत तरतूद केली नाही. राज्य सरकारची अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्याकडून फुकटात काम करुन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण....

घेण्याची अपेक्षा चुकीची आहे. या निमित्ताने मी विनंती करते की, 2014 पासून अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या मानधनात केलेली वाढ त्यांना तातडीने अदा करावयास पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी मला प्रामुख्याने दोन गोष्टी सांगाव्याशा वाटतात. राज्य सरकारकडून सांगितले जाते की, शहरीकरण वाढत आहे. परंतु लोक शहराकडे का येतात, याचा मात्र विचार केला जात नाही. आज ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, शिवाय अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ यामुळे हातचे पीक निघून जाते. तसेच ग्रामीण भागात सर्वात मोठा प्रश्न पाण्याचा आहे. या सर्व अडचणींमुळे ग्रामीण भागातील लोक नाईलाजाने शहराकडे येतात, परिणामी शहरीकरण वाढत आहे. महोदय, अर्थसंकल्पामध्ये "स्मार्ट सिटीज" बाबत उल्लेख करण्यात आला आहे. परंतु ज्या शहरातील अर्धे लोक झोपडपट्ट्यांमध्ये दारिद्र्यात खितपत पडले आहेत त्यांच्यासाठी शासन किमान शौचालयाची सुविधा पुरवू शकत नाही. आजच माननीय गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी म.वि.प.नियम 46 अन्वये निवेदन केले. परंतु त्यातून मुंबईला साफ वगळण्यात आले आहे. महोदय, मुंबई महापालिका पाणी पट्टीमध्ये सिवरेज टॅक्स वसूल करते. परंतु त्या तुलनेत सुविधा पुरवित नाही. आज झोपडपट्ट्यांमध्ये शौचालयांची व्यवस्था नाही, मग अशा स्थितीत आपण स्मार्ट सिटीज कशा उभारणार आहात ? परंतु या संदर्भात अर्थसंकल्पामध्ये कसल्याही प्रकारचा उल्लेख नाही. राज्य सरकारकडून झोपडपट्ट्यांवर बुलडोझर चालविले जाते, त्या ठिकाणी पोलीस फौजा नेऊन झोपडपट्ट्या हटविल्या जातात. मी सांगू इच्छिते की, तुम्हाला अशा प्रकारे झोपडपट्ट्या हटविता येणार नाहीत. गरीब माणसाला नाईलाज म्हणून झोपडपट्टीमध्ये राहावे लागते. कारण आजच्या जमान्यात घरांच्या किंमती तुम्हा-आम्हाला परवडण्यासारख्या नाहीत.

सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये नमूद केले आहे की, 2022 पर्यंत सर्वांना घर उपलब्ध करुन देण्यात येईल. या राज्य सरकारने एफएसआय मध्ये वाढ केली आहे. परंतु गरिबांकडे घरेच नसल्यामुळे त्याचा फायदा मध्यमवर्गीय आणि गरिबांना कसा मिळेल ? महोदय, कमी किंमतीत किंवा परवडणाऱ्या किंमतीत घरे उपलब्ध होतील या बाबत अर्थसंकल्पामध्ये कोठेही उल्लेख नाही. आज मुंबई शहरामध्ये अनेक लोक रस्त्यावर झोपतात. काही माणसे मद्यधुंद अवस्थेत त्यांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अंगावरुन गाड्या चालवितात, परिणामी ती माणसे मृत्युमुखी पावतात. वास्तविक पाहता रस्त्यांवर

..5..



श्रीमती विद्या चव्हाण....

झोपणाऱ्या गरिबांसाठी शेल्टर उभी करणे गरजेचे आहे. पण आज शहरातील गरीब माणसांची अतिशय वाईट अवस्था आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, स्मार्ट सिटीज निर्माण करण्यासाठी शासन नेमके काय करणार आहे ? राज्यात बेरोजगारीचा प्रश्न सुध्दा उभा आहे. त्यामुळे बेरोजगार आणि झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या लोकांचे प्रश्न कसे सोडविणार आहात, या बाबतचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये नाही.

सभापती महोदय, शहरी भागात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम वाढत आहे. परंतु त्यावर आळा घालण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये कसलाही उल्लेख नाही. अशा प्रकारे अनधिकृत बांधकामे उभे करुन झोपडपट्टीदादा, महापालिकेचे विभाग अधिकारी, कनिष्ठ अभियंता प्रचंड प्रमाणावर पैसे कमवितात. परंतु या बांधकामांना आपण रोखत नाही. गेल्या 18 वर्षापासून मुंबई महापालिका ही भाजपा-सेनेच्या ताब्यात आहे. परंतु त्या ठिकाणी चालणाऱ्या धंद्यांच्या बाबतीत अर्थसंकल्पामध्ये भाष्य केलेले नाही. शहरातील घरांचा प्रश्न कशाप्रकारे सोडविण्यात येणार आहे या बाबतचा उल्लेख कोठेही दिसत नाही.

सभापती महोदय, शहरामध्ये दुसरा महत्त्वाचा प्रश्न हा वाहतुकीचा आहे. निरनिराळ्या भागांतून चाकरमानी मुंबईला रोजगारासाठी किंवा नोकरीनिमित्त येतात. बहुतांश मुंबईकर हे लोकल ट्रेनने प्रवास करतात. साधारणतः 65 ते 75 लाख लोक दररोज लोकल ट्रेनने प्रवास करतात. परंतु मुंबईतील लोकल ट्रेनसाठी अर्थसंकल्पात कोणतीही तजवीज केलेली नाही. लोकल ट्रेनचा प्रश्न असतानाच मेट्रो रेल्वेचे तिकीट दर भरमसाठ वाढविण्यात आले आहेत. जाण्या-येण्याचा प्रत्येकी 40 रुपये नुसार 80 रुपये तिकीट दर हा सर्वसामान्य मुंबईकरांना परवडणारा नाही. महोदय, ही वाढ कमी होते की, काय म्हणून बेस्ट उपक्रमाने सुध्दा बसच्या तिकिटामध्ये वाढ केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किंमती कमी झाल्या, त्याचा फायदा लोकांना का दिला नाही ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण ....

आता तुम्ही म्हणाल की, आमच्या अखत्यारीत रेल्वेचा प्रश्न येत नाही. आम्ही केंद्रीय रेल्वे बोर्डाकडे गेलो, तेव्हा त्यांनी सांगितले की, आम्ही तुम्हाला महाराष्ट्रात, मुंबई पर्यंत ट्रेन देतो. पण ती मुंबईत कशी, कुठे चालवायची, त्यासाठी पैसा कसा जमा करायचा, ते तुम्ही पाहिले पाहिजे. सभापती महोदय, केंद्र शासनाची याला ना नाही. केंद्र सरकार सांगते की, हा मुद्दा राज्य शासनाचा आहे आणि राज्य शासन म्हणते की, हा मुद्दा केंद्र शासनाचा आहे. मुंबईत रोजची 15 माणसे लोकल ट्रेनखाली मरत आहेत, अनेक लोक आपले हात-पाय गमावत आहेत. पण त्या संदर्भात अर्थसंकल्पात कोणतीही तजवीज केलेली नाही. मुंबई शहराची ही अवस्था आहे. आपण मुंबईला देशाची आर्थिक राजधानी म्हणतो. मुंबईतून 40 टक्के महसूल केंद्र सरकारला दिला जातो. केंद्र सरकारनेही राज्यातील आमच्या शेतकऱ्यांसाठी काहीही दिलेले नाही. मुंबईतील लोक लोकल ट्रेनमधून पडत आहेत, मरत आहेत, अपघातग्रस्त होत आहेत. मात्र त्यांच्यासाठी सुविधा केलेल्या नाहीत. मग आम्ही तुमचे कौतुक का करावे ? श्री. सुरेश प्रभू रेल्वे मंत्री झाल्यावर आम्ही त्यांना भेटून आलो, त्यांनी आम्हाला सांगितले की, आता तुम्हीच मला सांगा की मी या संदर्भात काय करायचे ? सभापती महोदय, श्री. केतन गोराडिया नावाचे एक आर्किटेक्ट आहेत, त्यांनी रेल्वेचा अपघात पाहिला, त्या अपघातात एक माणसाचे हात-पाय तुटले होते. अपघात पाहिल्यावर त्यांनी सतत 2 वर्षे स्वत:च्या खर्चाने एक प्रकल्प तयार केला. फक्त 8 हजार कोटी रूपयांचा प्रकल्प आहे. मुंबई ते विरार, ठाणे, कल्याण, अंबरनाथ या संबंध पट्ट्यात राहणाऱ्या अडीच कोटी लोकांचा प्रश्न सुटावा म्हणून स्वत:च्या खर्चाने त्यांनी प्रकल्प तयार केला, तो प्रकल्प जीएमने सुध्दा स्वीकारला आहे. रेल्वे मंत्र्यांनीही सांगितले की, माझा प्रश्न नाही, तुम्ही त्याप्रमाणे करून घ्यावे. परंतु त्याकडेही लक्ष देण्यास कोणाला वेळ नाही. सभापती महोदय, मुंबईतील खचाखच भरलेल्या लोकल ट्रेनच्या संदर्भात, लोकल ट्रेनमधून पडून मृत होणाऱ्या लोकांच्या संदर्भात कोणतीही तरतूद केलेली नही. माननीय मंत्र्यांनी या संदर्भात उत्तराच्या भाषणात सांगितले पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण ....

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात आत्महत्या होत आहेत. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब म्हणाले की, कोणीतरी येऊन सांगावे की, शेतकऱ्यांच्या संदर्भात काय केले पाहिजे. सभापती महोदय, मी सांगते की, या संदर्भात काय केले पहिजे. नुसते 4 हजार कोटी रूपये देऊन काहीही होणार नाही. शेतकऱ्याचे सावकारी कर्ज मार्फ केले असे म्हणत आहेत. नुसते ते करूनही चालणार नाही. शेतकरी पुढे काय करणार हे देखील पाहिले पाहिजे. शेतीला पाणी नाही, अवकाळी पाऊस पडत आहे, अशा स्थितीत 15 एकरांच्या आतील शेतकऱ्यांची जबाबदारी शासनाने उचलली पाहिजे, त्याच्या शेतीला लागणारी सामुग्री, मग बी-बियाणे, खते, पाणी, फवारणी असो, सर्व बाबींची जबाबदारी शासनाने उचलली, त्याला आवश्यक असे सर्व दिले तर तो दिवसरात्र मेहनत करायला, पीक घ्यायला तयार आहे. शेत मालाला योग्य भाव मिळाला तर शेतकऱ्याला आपण स्वतः सधन करू शकतो. परंतु आपण त्यासाठी कोणतीही उपाययोजना करू शकत नाही.

सभापती महोदय, आपल्याकडे कृषी विद्यापीठ आहे, तहसील आहे, तलाठी आहे, ग्रामपंचायत आहे, जिल्हा परिषद आहे, सर्व यंत्रणा आहे. आपण सर्वांचा उपयोग केला पाहिजे. यंत्रणा एसी कार्यालयात बसून आकडेवारी करते की, इतक्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, इतक्या शेतकऱ्यांना मदत दिली, इतके शेतकऱ्यांना अपात्र केले. मी म्हणते की, आपण गावाला जा, शेतकऱ्यांमध्ये फिरा, त्यांचे प्रश्न काय आहेत ते समजून घ्या आणि त्यांना तातडीने काय मदत केली पाहिजे ती करा. फायर ब्रिगेड आग लागली की ती कुठे लागली आहे हे विचारत नाही, बंब जाऊन तातडीने आग विझवतात. आग कशी विझवायची हे त्यांना सांगावे लागत नाही. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या म्हणजे राज्याला लागलेली आग आहे. ही आग तातडीने विझवणे हे सरकारचे प्रथम कर्तव्य असले पाहिजे. मात्र ते आपण करीत नाही, हे दुर्दैवाने मला सांगावेसे वाटत आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात केंद्र सरकारला काहीही घेणे-देणे नाही. केंद्र सरकारने कोणालाही मदत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

केलेली नाही. आपणाला आता "मन की बात" च्या माध्यमातून शेतकऱ्यांना फसविता येणार नाही. सभापती महोदय, गारूडी बिन वाजवितो, नाग डोलतो, नागाला वाटते की, काय छान ..3



श्रीमती विद्या चव्हाण ....

प्रकार आहे, तेव्हाच गारूडी नागाला पकडतो आणि आपल्या पोतडीत घालतो. आता "मन की बात" ची बिन शेतकरी, विद्यार्थी, महिला किंवा कोणीही ऐकणार नाही. तुम्ही लोकांना फसवू शकणार नाही. एकदा फसविले आहे. आता "मन की बात" ऐकण्याएवढे शेतकरी मूर्ख राहिलेले नाहीत. आपल्याला भूमी अधिग्रहण विधेयक आणायचे आहे म्हणून शेतकऱ्यांशी गोड बोलणार असाल तर तुमची बिन कामाला येणार नाही. तुम्हाला शेतकऱ्यांना ठोस मदत द्यावी लागणार आहे. कचेरीतील प्रत्येक माणूस शेतापर्यंत पाहोचला पाहिजे, शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे.

सभापती महोदय, स्वच्छता हा महत्त्वाचा मुद्दा आहे. आपण स्वच्छता अभियान राबविणार असल्याबाबत सांगितले आहे. परंतु स्वच्छतागृहांच्या संदर्भात काहीही ठोस तरतूद केलेली नही. मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प 36 हजार कोटी रूपयांचा आहे. परंतु शहरात टायलेट नाहीत. गावामध्येही तीच स्थिती आहे. स्वच्छतागृहांसाठी काय करणार आहात त्याचा खुलासा केला असता तर बरे झाले असते, मला निश्चित आनंद झाला असता. तुम्ही सांगितले आहे की, आर्थिक लाभांपासून वंचित राहिलेल्या देशातील जनतेचे सर्वंकष विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत 37.20 लाख शहरी भागात आणि 39.26 लाख ग्रामीण भागात अशी एकूण 76.76 लाख खाती उघडण्यात आली आहेत. लोकांना वाटत आहे की, 15 लाख रूपये कधी जमा होणार आहेत. सभापती महोदय, अजूनपर्यंत एकही पैसा त्यांच्या खात्यात जमा झालेला नाही. आपण येथेही लोकांना मूर्ख बनविण्याचे काम केले आहे. आपण ते बंद केले पाहिजे.

सभापती महोदय, कुंभमेळ्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्याचे कबूल केले आहे. कुंभमेळ्यासाठी निधी दिला पाहिजे आणि तो आवश्यकही आहे. परंतु त्याप्रमाणेच आषाढी कार्तिकीला असंख्य लोक पंढरपूरला जातात. लाखो लोक पंढरपूरला येत असल्यामुळे तेथे घाण होते. तेथे कशाप्रकारे लोकांची व्यवस्था करावी या संदर्भात उच्च न्यायालयाने देखील सांगितले आहे. शिर्डीला लोक पालखी घेऊन जातात. शिर्डीला भक्तांसाठी निवासस्थानाची व्यवस्था,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शौचालयाची व्यवस्था, आंघोळीची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पात इतर अनेक तीर्थक्षेत्रांचा उल्लेख केला. परंतु पंढरपूरचा काहीही उल्लेख केलेला नाही.

..4



श्रीमती विद्या चव्हाण ....

सभापती महोदय, अर्थसंकल्पात अनेक ठिकाणी सरकारने काटकसरीची भाषा केली आहे. काटकसर करणे आवश्यक आहे असे सांगितले आहे. परंतु प्रत्यक्षात काटकसर कुठे करणार आहात हे दिसलेले नाही. राजा-महाराजांचा शपथविधी व्हावा तसा मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला होता. त्यावर लाखो रुपयांचा खर्च झाला, त्यातून आम्हाला समजले की, आपण किती काटकसर करणार आहात.

सभापती महोदय, गोवंश हत्या बंदी केली आहे. फक्त गोवंश हत्या बंदी का ? कोंबडे, बकरे यांना जीव नाही का ? आपण असे केल्याने कोंबडे, बकरे, मासे मोठ्या प्रमाणात कापले जाणार. मग त्यांना जीव नाही का ? आपण त्यांच्यावर सुध्दा कृपा करावी. माझे म्हणणे असे आहे की, गोवंश हत्या बंदी नाही तर बकरे, कोंबड्या यांच्या संदर्भात सुध्दा बंदी करावी. आपण लोकांना वरण, भात, श्रीखंड, पुरी खाण्याची सवय लावावी. श्रीखंड हा दुग्धजन्य पदार्थ आहे. तुम्ही लोकांवर तुमचे विचार थोपवत आहात, त्यामुळे मी सांगत आहे. तुम्ही गोवंश बंदीच काय तर बकरे, कोंबडया, मासे कापण्याचेही बंद करा. आपण सर्व बंद करा. सभापती महोदय, गहू, ज्वारी, बाजरी यांना सुध्दा जीव आहे. कणसात सुध्दा जीव आहे. आपण त्यांना सुध्दा कापू नका. कोणत्याही वनस्पतीला कापू नका. माणसाने फक्त दुग्धजन्य पदार्थाचा साधा आहार करावा. आपण बंदी केल्याने जे बीफचे मटण खातात त्यांनी काय खायचे ? आपण सवंग लोकप्रियतेसाठी काहीही निर्णय घेऊ नका. राज्यात अनेक प्रकारच्या जाती धर्माचे लोक राहतात. सर्वांना मनाप्रमाणे खाण्याचा अधिकार आहे. तुम्हाला अशी बंदी करून त्यांचा अधिकार हिरावून घेता येणार नाही. त्यामुळे त्याचा फेरविचार झाला पाहिजे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण......

तुम्हाला आपली मते अशा प्रकारे कोणावरही बिंबवता येणार नाहीत या अर्थसंकल्पामध्ये आणखी अनेक गोष्टी बोलण्यासारख्या आहेत. परंतु, मलाही वेळेचे बंधन पाळावे लागेल. हा अर्थसंकल्प गोरगरीब, शेतकरी आणि मुंबईतील चाकरमान्यांच्या विरोधातील आहे, त्याचा मी पूर्णपणे धिक्कार करते आणि थांबते.

--------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.श्रीकांत देशपांडे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाला हसावे की, रडावे, ही भूमिका मला स्पष्ट करता आलेली नाही. ज्या शिक्षकांचे मी प्रतिनिधीत्त्व करतो, त्या शिक्षकांसाठी एका पैशाचीही तरतूद या अर्थसंकल्पात, या सरकारने केलेली नाही. मला इतर विभागांचा अभ्यास करण्याची आवश्यकता सध्या एवढ्याकरिता वाटत नाही की, ज्या शिक्षकांनी मला आपला प्रतिनिधी म्हणून या सभागृहात पाठविले आहे, त्यांचाच विषय जर मी या सभागृहात समर्थपणे मांडू शकत नसेल, त्यांच्यासाठी या सरकारची सहानुभूती मिळवू शकत नसेल तर इतर विभागांवर बोलण्याचा मला अधिकार नाही.

सभापती महोदय, एक सुंदर कविता आहे.

गाऊन गोड गजला
टाळ्या नकोत मजला
भानात ऐक रसिका
शब्दात प्राण आहे
जग सत्य जाळते हे
माझे विधान आहे.

सभापती महोदय, तुम्ही जेव्हा असत्य जनतेसमोर ठेवता, तेव्हा ते जनतेला भुरळ पाडणारे असते, थोडा काळ जनता ते स्वीकारते, पण जेव्हा जनतेला सत्य काय आहे, हे कळते, तेव्हा सत्तेमध्ये परिवर्तन होते, हा आजपर्यंतचा इतिहास आहे.

सभापती महोदय, आज राज्यात विनाअनुदानित शिक्षकांची परिस्थिती "माय जेऊ घालीना आणि बाप भीक मागू देईना," अशी भयंकर झाली आहे. आज पर्यंत महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. भविष्यात शिक्षकांच्या आत्महत्या होतील, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सन 2001 पासून या राज्यात विनाअनुदानित शाळा आहेत. सन 2001 ते सन 2015 म्हणजे तब्बल 15 वर्षे हे शिक्षक त्या ठिकाणी विनावेतन काम करीत आहेत.

सभापती महोदय, माझ्या पाहण्यात एक उदाहरण आहे. एक शिक्षक त्याच्या 40 व्या वर्षी

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.श्रीकांत देशपांडे.........

नोकरीस लागला, आज सन 2015 सुरु आहे, नोकरी लागताना तो विनावेतन लागला, आणखी दोन वर्षे त्याला काही मिळाले नाही तर तो विनावेतन सेवानिवृत्त होणार आहे. एवढी महाभयंकर परिस्थिती निर्माण करण्याचे काम आपण केले आहे आणि ती आपली चूक आहे.

सभापती महोदय, वास्तविक पाहता घटनाकारांनी घटना देत असताना घटनेच्या अनुच्छेद 45 अन्वये देशातील वय वर्षे 6 ते 14 पर्यंतच्या सर्व बालकांना मोफत शिक्षण देण्याचे वचन दिलेले आहे. आम्ही सन 2009 मध्ये कायद्यात दुरुस्ती करुन सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. पण आम्ही राज्यात नॉनग्रँटच्या शाळा चालवून राज्यातील बालकांना कोणता न्याय देणार आहोत, हा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला आहे. त्यामुळे राज्यातील नॉनग्रँट शाळेतील शिक्षकांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या समस्यांना उत्तर देणे गरजेचे झाले आहे. हाच शिक्षक सत्ता उलटवू शकतो, हे अर्थ मंत्री महोदयांनी लक्षात घेतले पाहिजे, अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, आज जे सत्तेत आहेत, ते जेव्हा विरोधी बाकावर होते, त्यावेळी नॉनग्रँट शाळांबद्दल ते सहानुभूती दाखवित व त्यांच्यासाठी अनुदानाची मागणी आपल्या भाषणातून करीत असत. तेव्हाचे शासन असमर्थ होते. पण आज आपण सत्तेवर आला आहात. त्यांच्यासाठी साधे लेखाशीर्ष आपण निर्माण करु शकला नाही, त्यांच्यासाठी एक रुपयाचीही तरतूद आपण केली नाही, ही बाब आपल्यासाठी खूप लांच्छनास्पद आहे.

सभापती महोदय, आपल्या मार्फत मी शासनाला सांगू इच्छितो की, शिक्षणावर एकूण बजेटच्या किमान 3 टक्के खर्च झाला पाहिजे, असे घटनाकारांनी देशाला घटना सोपविताना सांगितले होते. राज्याने कोठारी आयोग नेमला, अन्यही काही आयोग नेमण्यात आले. त्यांनीही 5 टक्के खर्च शिक्षणावर करावा, असे म्हटलेले आहे. परंतु, शासन शिक्षणावर किती प्रमाणात खर्च करते, याबद्दल आमच्या मनात साशंकता आहे.

सभापती महोदय, मला आपल्याला सांगताना अतिशय दु:ख वाटते की, नॉनग्रँट शाळांना अनुदान देण्यासाठी 126 कोटी रुपये लागणार होते. ही फाईल वित्त विभागाकडे 3 वेळा गेली.

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.श्रीकांत देशपांडे..........

परंतु, तरतूद करण्यात आली नाही. अर्थ मंत्री महोदयांनी त्यामध्ये लक्ष घातले नाही, शिक्षण मंत्री महोदयांनीही लक्ष घातले नाही. या उलट सन 2014-2015 मध्ये शिक्षण विभागाने 250 कोटी रुपये सरेंडर केले. या रकमेतून 126 कोटी रुपये देऊन शिक्षकांची वेतनाची मागणी आपण पूर्ण करु शकला असता. ही बाब आपल्यासाठी फार अभिमानास्पद नाही. मला अर्थ मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, यासाठी तरतूद होणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा, आपण निधी सरेंडर करतो पण या लोकांसाठी तरतूद करीत नाही. त्यामुळे शासनाने यासाठी तरतूद करण्याबाबत विचार करावा, अशी माझी शासनाला नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, नॉनग्रँट शाळेतील विद्यार्थ्यांना आहार मिळत नाही, पुस्तके मिळत नाहीत, कोणत्याही सोयी त्यांना मिळत नाहीत. या राज्यात 5500 नॉनग्रँट युनिटस् आहेत व त्यामध्ये 10 लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांना पुस्तके आणि आहाराची आवश्यकता नाही का ? महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक महामंडळ पुस्तके तयार करीत असते. अनुदानित शाळांना मोफत पुस्तके मिळत असतील तर नॉनग्रँट शाळेतील मुलांनाही मोफत पुस्तके मिळाली पाहिजेत. ही बाब अतिशय महत्त्वाची आहे व शासनाने याचा जरुर विचार केला पाहिजे. अर्थ मंत्री महोदयांना माझी अशी विनंती आहे की, येत्या एक-दोन दिवसात, हा अर्थसंकल्प मंजूर होण्यापूर्वी आपण वित्त सचिव, शिक्षण सचिव यांना बोलवावे आणि सकारात्मक निर्णय घेता येऊ शकत असेल तर घ्यावा.

सभापती महोदय, मी कोणत्याही पक्षाचा वा कोणत्याही बाजूचा नाही. शिक्षकांच्या बाजूने अतिशय कळकळीने येथे बोलत आहे आणि माझ्या कळकळीच्या विनंतीची शासनाने दखल घ्यावी, अशी माझी नम्र विनंती आहे. आज परिस्थिती अत्यंत बिकट आहे. सिंदखेड राजा येथील शिक्षकाने मागील काळात आत्महत्या केली. आतापर्यंत महाराष्ट्रात दोन शिक्षकांनी आत्महत्या केल्या आहेत. हा आकडा 20 किंवा 200 पर्यंतही जाऊ शकतो. आपण केव्हा गंभीर होणार आहोत, माणूस मेल्यानंतर आपण त्याची किंमत करणार आहोत का ? शेतकरी मेल्यानंतर सरकार त्याच्या कुटुंबीयांना आर्थिक सहाय्य करीत असते. म्हणजे आपण लोकांच्या मरणाची वाट पहातो आहोत का ? उद्या मास्तर मेल्यानंतर त्याच्या कुटुंबीयांना आपण सहाय्य कराल. मग

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.श्रीकांत देशपांडे..........

आपण त्याच्या मरणाची वाट पहातो आहोत का ? माझे म्हणणे असे आहे की, 20 टक्के देऊ नका, शक्य असेल तर 10 टक्केच द्या. 15 वर्षे ते नोकरी करीत आहेत, त्यांना एक पैसाही मिळत नाही. शिक्षक आपली शेती विकून, मातांचे दागिने गहाण टाकून संस्था चालकाला पैसे देऊन नोकरीला लागतो, संस्था चालक त्याला स्वतःच्या खिशातून 5 पैसेही देत नाही, तो फुकट नोकरी करतो. गावात जाताना सांगतो की, मी मास्तर आहे. त्यामुळे त्याला टोपली सुध्दा उचलता येत नाही. त्याच्या हाती शिकून गेलेले विद्यार्थी आज अधिकारी, मोठे व्यावसायिक झाले आहेत. परंतु, त्याला स्वतःला आजपर्यंत काहीच मिळाले नाही, ही शोकांतिका आहे. त्यामुळे माझी संपूर्ण सभागृहाला ही विनंती आहे की, हा महाराष्ट्रातील अतिशय गंभीर प्रश्न आहे. या प्रश्नाने अधिक गंभीर रुप घेण्यापूर्वी प्रत्येक सदस्याने जागरूक होणे गरजेचे आहे. मेल्यानंतर मदत करण्यात कुठलाही अर्थ नाही. जो जिवंत आहे, तोपर्यंत त्याचा सन्मान करावा, अशी आपल्याला विनंती आहे. आपण मला वेळ दिला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद.

---------

...6.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विधानसभेमध्ये प्रत्येक विभागावर चर्चा होत असते. मात्र, विधानपरिषदेमध्ये सर्वसाधारण चर्चा होत असते आणि याच चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडण्याची संधी असते. त्यामुळे थोडा अधिक वेळ लागला तरी चालेल परंतु, सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी आपण द्यावी, अशी विनंती सुरुवातीलाच मी आपल्याला करतो.

**तालिका सभापती :** सभागृहाची वेळ सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या पेक्षा अधिक वेळ लागणार आहे, एखाद दुसरा तास जास्त लागला तरी आज आपण सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यास थांबवू नये, अशी माझी सभापती महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, भारतीय जनता पक्ष व काही अंशी शिवसेनेचे सरकार राज्यात आल्यानंतर सभागृहात बजेट मांडण्यात आले आहे. हे संपूर्ण बजेट या शासनाचे नाही. निवडणुकीच्या काळात या पक्षाने लोकांना आश्वासने दिली होती. त्यानंतर हा पक्ष सरकारमध्ये आल्यानंतर या सरकारची प्रगती योग्य दिशेने व्हायला पाहिजे अशा प्रकारची दिशादर्शक बजेटची आम्ही अपेक्षा केली होती. राज्यातील जनता या सरकारचे पहिले बजेट पाहण्यासाठी टी.व्ही.समोर बसली होती. आमच्यासाठी हे नवीन सरकार काय देणार आहे. राज्यात जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्याबाबत हे सरकार काही मदत करणार आहे काय ? या अपेक्षेने राज्यातील सर्व जनता टी.व्ही.पाहत होती. या सरकारने बजेट मांडले तेव्हा जनतेच्या लक्षात आले की, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत कोणताही उल्लेख यात करण्यात आलेला नाही. राज्यातील जनता दुष्काळाने होरपळत आहे. 24000 गावांतील आणेवारी 50 पैशाच्या आत आहे. भविष्य काळात गावांसाठी पिण्याचे पाणी, जनावरांना चारा लागेल. फळबागा वाळल्या किंवा तशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली तर मदत करावी लागेल, अशा दुष्काळग्रस्त भागांसाठी कोणतीही ठोस तरतूद बजेटमध्ये केल्याचे दिसत नाही. विदर्भ, मराठवाडा विभागासाठी ठोस तरतूद करण्याची गरज होती. भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यावर आम्ही कशा पध्दतीने काम करतो हे राज्यातील जनतेला कळायला पाहिजे होते. कोणत्याही निर्णयात या सरकारची ठोस विचारशक्ती दिसून येत नाही. सर्व आघाड्यांवर जनतेचा भ्रमनिरास झालेला अर्थसंकल्प सरकारने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पाला मी विरोध करतो. राज्यातील विकासासाठी हा अर्थसंकल्प अत्यंत कुचकामी आहे. ही बाब मी काही उदाहरणावरुन स्पष्ट करुन देत आहे.

सभापती महोदय, एक नवीन प्रकार अर्थसंकल्पात सुरु झालेला आहे, चिन्हांकित तरतूद करण्यात आली आहे. याबाबत मंत्री महोदय त्यांच्या उत्तराच्या भाषणात स्पष्टीकरण देतील. चिन्हांकित तरतूद काय आहे असा प्रश्न दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना पडलेला आहे. 1600 कोटी रुपयांची तरतूद वेगवेगळया बाबींसाठी चिन्हांकित म्हणून करण्यात आली आहे. 10

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

श्री.माणिकराव ठाकरे....

कोटी रुपये, 5 कोटी रुपये चिन्हांकित करण्यात आले आहेत. ही रक्कम खर्च करण्यात येणार किंवा नाही असा मोठा प्रश्न सन्माननीय सदस्यांना पडला आहे. अशा प्रकारची गरज का निर्माण झाली. आमचे शासन आल्यावर आम्ही शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार आहोत, असा फार मोठ्या प्रमाणात गाजावाजा करण्यात आला. कर्जमुक्त शेतकरी, वीज बिल मुक्त शेतकरी, वीज कर्ज मुक्त शेतकरी अशी घोषणा सभागृहाचे नेते माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी केली होती. बजेट मध्ये कर्जमाफी बाबत कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. शेतकऱ्यांना वीज बिल माफीसाठी बजेटमध्ये कोणती तरतूद करण्यात आली नाही. उलटपक्षी असे सांगण्यात येते की, आघाडी सरकारने या राज्यावर फार मोठे कर्ज करुन ठेवले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय देता येत नाही.

सभापती महोदय, सन 1999-2000 मध्ये राज्यात युतीचे सरकार होते. त्यावेळी महसुली उत्पन्न 25,259 हजार कोटी रुपये होते. कर्जावरील व्याज 5 हजार कोटी रुपये द्यावे लागत होते. आज राज्याचे महसूली उत्पन्न 1 लाख 98 हजार 230 कोटी रुपये आहे. कर्जावरील व्याज 24 हजार कोटी रुपये द्यावे लागते. सन 1999-2000 मध्ये कर्जावरील व्याज 5 हजार कोटी रुपये द्यावे लागत होते. आज कर्जावरील व्याज 24 हजार कोटी रुपये द्यावे लागत आहे. आता महसुली उत्पन्न दोन लाख कोटी रुपयांपर्यंत गेले आहे. त्या प्रमाणात पाहिले तर खूप मोठे कर्ज करुन ठेवले व फार जास्त व्याज द्यावे लागते अशातला भाग नाही. शेतकऱ्यांना मदत देऊ शकत नाही, तुमचा विकास करु शकत नाही, असा अपप्रचार करण्याचा प्रयत्न नेहमी या सरकारने केला आहे.

सभापती महोदय, युती शासनाने कर्जरोखे काढले होते. त्यावेळचे आज दोन हजार कोटी रुपये व्याज द्यावे लागत आहे. हे कर्ज अजूनही फिटलेले नाही. 24 हजार कोटी रुपयांच्या व्याजात ही रक्कम देखील अंतर्भूत आहे. आणखी 10 ते 15 वर्षे हे व्याज द्यावे लागणार आहे. युती शासनाने 17 टक्के दराने कर्जरोखे काढले होते. याची माहिती सर्व जनतेला आहे. त्यामुळे खोटारडा प्रचार आता तरी थांबविला पाहिजे. सातत्याने सांगितले जाते की, तिजोरी खाली केली आहे, तिजोरीत काही नाही. भरपूर कर्ज काढून ठेवले आहे. अशा प्रकारची परिस्थिती नाही.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

सरकारची इच्छाशक्ती असेल तर या सरकारने जनतेला न्याय दिला पाहिजे. परंतु अशा प्रकारचे चित्र जनतेसमोर आलेले नाही.

सभापती महोदय, आघाडी सरकारने 13 हजार कोटी रुपयांचा तुटीचा अर्थसंकल्प सादर केला होता. आता देखील 3 हजार कोटी व 17 हजार कोटी रुपयांची देणी बाकी आहे. महसुली खर्च अधिकचा झालेला आहे. हा खर्च कशा पध्दतीने भरुन काढला जाणार आहे, हे सांगण्यात आले नाही. तूट भरुन काढण्यासाठी काही उपाययोजना केली असती तर आम्ही समजू शकलो असतो. आम्हाला वाटले असते की, हे शासन गंभीरतेने पुढे जात आहे. तशा प्रकारची पावले राज्य शासनाकडून पडत आहेत, असा प्रकार कोठेही दिसून आलेला नाही.

सभापती महोदय, राज्यातील सिंचनाच्या संदर्भात काही उल्लेख करण्यात आला आहे, मागील काळातील आताचे माननीय मुख्यमंत्री, माननीय महसूल मंत्री व माननीय वित्त मंत्री महोदयांची काही भाषणे काढून पहावी. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, विदर्भात सिंचन व्यवस्था करायची असेल तर 54 हजार कोटी रुपये लागतील.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे........

विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील सिंचनाची परिस्थिती लक्षात घेतली तर त्यासाठी सव्वा लाख कोटी रुपये लागणार आहेत. परंतु, शासनाने सिंचनासाठी तरतूद किती केली ? सिंचनासाठी 7,272 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. तुम्ही सातत्याने सांगता की, सिंचनाशिवाय राज्याची प्रगती होऊ शकणार नाही. आम्हाला देखील याची कल्पना आहे. राज्यातील सिंचन वाढविण्यासाठी आम्ही देखील प्रयत्न केले. या संदर्भात सभागृहात चर्चा देखील झाली. आपण आर्थिक पाहणी अहवालामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, मागील सरकारच्या काळात सिंचनामध्ये वाढ झालेली आहे. परंतु, बोलायचे एक आणि ज्यावेळी जबाबदारी येते त्यावेळी मात्र ती स्वीकारावयाची नाही, त्यासाठी थातूरमातूर तरतूद केली जाते. राज्यातील सर्व सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी आमची आहे. विदर्भात पडणारे पावसाचे पाणी वाहून जाते. परंतु, तत्कालीन शासनाने ते पाणी अडविले नाही. आम्ही ते पाणी अडविणार आहोत, असे सांगितले जाते. मी शासनाला विचारु इच्छितो की, 7,272 कोटी रुपयांमध्ये तुम्ही विदर्भ, मराठवाड्यात कोणती सिंचन व्यवस्था निर्माण करणार आहात ? तुम्ही विदर्भ, मराठवाड्याला कशा प्रकारे न्याय देणार आहात, या संदर्भात शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात शेतकऱ्यांकरिता 4 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब सभागृहात उपस्थित आहेत. त्यांना राज्यातील परिस्थितीची जाणीवच नाही. राज्यात काही भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे, हे तुम्हा आम्हाला मान्य करावे लागेल. राजकारण म्हणून मी हे सांगत नाही. विदर्भ, मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. आता खान्देशमध्ये देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होण्यास सुरुवात झालेली आहे. त्या भागातील शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने कोणता प्रयत्न केलेला आहे ? आपल्याला माहिती आहे की, राज्यात अपुरा पाऊस झाला. त्यामुळे शेतीचे उत्पन्न कमी आले आणि शेती मालाचे भाव देखील मोठ्या प्रमाणावर घसरले आहेत. हे शासन आमच्यासाठी काय करणार आहे,

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे........

याबाबत कापूस उत्पादक शेतकरी विचार करीत आहे. कापूस खरेदी करण्यासाठी किंवा कापसाला चांगला भाव मिळावा यासाठी शासन एखादी नवीन योजना जाहीर करील, याकडे कापूस उत्पादक शेतकऱ्यांची नजर होती. कापसापेक्षा सोयाबीन पिकाच्या माध्यामातून बऱ्यापैकी उत्पन्न मिळू शकते म्हणून ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीनचे पीक घेतले तो सोयाबीन उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी जेवढे सोयाबीनचे बियाणे पेरले, तेवढे देखील सोयाबीनचे उत्पादन झालेले नाही. मागील वर्षीपेक्षा यावर्षी 30 ते 40 टक्क्याने शेती मालाचे भाव कमी झालेले आहेत. शेतकऱ्यांना उत्पन्न मिळत नाही, शेती मालाला भाव मिळत नाही. म्हणून शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शासन त्या शेतकऱ्यांसाठी काय करीत आहे ? तुम्ही शेतकऱ्यांना हेक्टरी 4,500 रुपये मदत दिली आणि समाधान मानून घेतले. आम्ही शेतकऱ्यांना न्याय देत आहोत, असे शासनाच्या माध्यमातून सांगितले गेले. परंतु, तुम्ही शेतकऱ्यांना फक्त हेक्टरी 4,500 रुपये इतकीच मदत केलेली आहे.

सभापती महोदय, परवा माननीय केंद्रीय कृषी मंत्री नाशिक येथे आले होते. कदाचित, माननीय कृषी मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब त्यांना तेथे घेऊन गेले असतील. त्यांनी सांगितले की, अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे, त्या शेतकऱ्यांना आम्ही मदत देऊ. आम्हाला हे मान्य आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत दिली पाहिजे, अधिक मदत मिळाली पाहिजे आणि पुन्हा अशा प्रकारे गारपीट झाली तर शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी देखील व्यवस्था केली पाहिजे. परंतु, फक्त अवकाळी पाऊस आणि गारपीट एवढ्यापुरता राज्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न नाही. राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आपण कोणती तरतूद करीत आहात ? शेतकऱ्यांना हेक्टरी 4,500 रुपये मदत दिली त्याचा शेतकऱ्यांना किती उपयोग होईल, याची आपणा सर्वांना कल्पना आहे. आपण शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रुपये प्रमाणे मदत देणार आहात काय, त्यांचे कर्ज माफ करणार आहात काय ? आम्ही पुढील वर्षी शेतकऱ्यांच्या मालाची अमुक भावाने खरेदी करु अशी

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे........

एखादी कापूस एकाधिकार योजनेसारखी योजना तुम्ही जाहीर करणार आहात काय ? अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद असावयास पाहिजे होती. परंतु, अर्थसंकल्पात तशी तरतूद करण्यात आलेली नाही. आज राज्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती काय आहे, शेतकरी आत्महत्या का करीत आहेत ? तुम्हाला शेतकऱ्यांच्या भावना कळत असतील तर अर्थसंकल्पात तशा प्रकारचे प्रतिबिंब उमटू शकेल. परंतु, तुम्हाला शेतकऱ्यांच्या भावनाच कळत नाहीत. गारपीट झाल्यानंतर केंद्रीय मंत्र्यांना पाहणी करण्यासाठी बोलवायचे आणि सांगावयाचे की आम्ही शेतकऱ्यांना मदत करू. वर्तमानपत्रात मोठे हेडिंग छापून आले की, आम्ही शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रुपये मदत देऊ. परंतु, प्रत्यक्षात काय ? कोणाला न्याय मिळणार आहे ? आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना तुम्ही कोणता न्याय देणार आहात ?

सभापती महोदय, माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेब यवतमाळ येथे आले होते. शेतकऱ्यांना 50 टक्के नफा मिळाला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. नफा तर सोडाच, परंतु मागील शासनाने जाहीर केलेले शेती मालाचे भाव देखील तुम्ही देऊ शकत नाही. शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी काही व्यवस्था करण्याची देखील तुमची इच्छा नाही आणि अंदाजपत्रकात तशा प्रकारचा उल्लेख देखील करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या लक्षात घेता यवतमाळ जिल्ह्यात नवीन पथदर्शी 'मोतीरामजी लहाने कृषी समृद्धी योजना' राबविण्यात येईल, असे अर्थसंकल्पात नमूद करण्यात आले आहे. आम्ही यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करुन देऊ, असे सांगण्यात आले. तुम्ही 50 कोटी रुपये तरतूद करुन कोणत्या सुविधा उपलब्ध करुन देणार आहात ? हा दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे. यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी 50 कोटी रुपये दिले म्हणजे आम्ही सर्व शेतकऱ्यांचे भले करायला निघालो आहोत, अशा प्रकारचा संदेश यातून जाऊ शकत नाही. तुम्हाला जर शेतकऱ्यांना न्याय द्यावयाचा असेल तर कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळाला पाहिजे. कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे........

पुढील वर्षी भाव मिळेल किंवा नाही याची शाश्वती नाही. शेती मालाचे भाव घसरत असतील तर आम्ही मागील वर्षी शेती मालाला जे भाव मिळत होते त्यापेक्षा जास्त भाव देऊ, असा विश्वास शेतकऱ्यांना देण्याची आवश्यकता आहे. परंतु, तुमच्या कोणत्याही वाक्यातून हा विश्वास दिसत नाही. शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतलेले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी सुविधा निर्माण करण्यारिता जी 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे त्यामध्ये ज्या सुविधा निर्माण होतील त्यांचा पत्ता देखील लागणार नाही. कै.मोतीरामजी लहाने साहेबांच्या नावाने योजना जाहीर करुन त्यासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद करावयाची आणि सांगावयाचे की, आम्ही शेतकऱ्यांसाठी 50 कोटी रुपये दिले, आम्ही दानशूर आहोत. परंतु, शेतकऱ्यांसाठी कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. सर्व सन्माननीय सदस्यांनी याचा विचार केला पाहिजे. मी पक्ष दृष्टिकोनातून बोलत नाही. एक लोकप्रतिनिधी म्हणून मी शेतकऱ्यांची परिस्थिती सभागृहासमोर मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, राज्यात अनेक योजना सुरु करण्यात आलेल्या आहेत. कदाचित, नंतरच्या काळात शेतकऱ्यांना त्या योजनांचा कमी अधिक प्रमाणात लाभ मिळाला असेल किंवा मिळाला नसेल. स्व.वसंतराव नाईक साहेब राज्याचे मुख्यमंत्री होते. राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे, जो मधला दलाल आहे त्याला बाजूला सारले पाहिजे आणि शेतकऱ्यांनी पिकविलेल्या कापसाला चांगला भाव मिळावा यासाठी त्यांनी कापूस एकाधिकार योजना सुरु केली. त्यानंतर त्यांनी रोजगार हमी योजना सुरु केली. तुम्ही जर अशा प्रकारची एखादी योजना जाहीर केली असती तर ज्या विदर्भातील जनतेने तुम्हाला भरभरुन मते दिली त्यांनाही वाटले असते की, शासनाने आम्हाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु, या अर्थसंकल्पात तसा कोणताही उल्लेख नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी त्यांना मदत करण्याची कोणतीही भूमिका या अर्थसंकल्पात दिसून येत नाही. मुख्यमंत्री महोदयांना पत्रकार परिषदेत असा प्रश्न विचारला होता की, शेतकऱ्यांना हेक्टरी 4,500 रुपये या प्रमाणे मदत देण्यासाठी किती खर्च येणार आहे ?

..5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे........

मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, यासाठी 10 हजार कोटी रुपये लागतील. मी आपल्याला सांगू इच्छितो की, हेक्टरी 4500 रुपये या प्रमाणे शेतकऱ्यांना काहीही मदत होऊ शकत नाही. तुम्ही जर कर्ज माफीच्या संदर्भात धोरण स्वीकारले नाही तर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ झाल्याशिवाय राहणार नाही आणि त्याची संपूर्ण जबाबदारी या शासनाची असणार आहे.

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.....

अशा प्रकारचे संकट यापूर्वी कधी आले नव्हते. आम्ही अनेक वर्षे सभागृहात काम करीत आहोत. राज्यामध्ये एखाद्या वर्षी गारपीट झाली तर आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिल्यानंतर तो विषय संपुष्टात येत असे. मागील वर्षी आघाडी सरकारने 2000 कोटी रूपयांची मदत दिली होती. त्यावेळी सुध्दा आम्ही आग्रह धरला होता की, कापसाचे अपेक्षित उत्पादन आलेले नसले तरी 2004 पर्यंत कापूस फेडरेशनच्या माध्यमातून 1500 कोटी रुपये किंमतीचा कापूस शेतकऱ्यांकडून खरेदी केला जात होता. आज शासनाला काही खर्च करावा लागत नाही. कापसाचे कमी उत्पादन आले आहे हे आम्ही मान्य करतो. परंतु फेडरेशनतर्फे कापूस खरेदी सुरु करावी. आज राज्यावर आपत्ती आली आहे, कोणत्याही भागातील शेतकरी यातून सुटलेला नाही. कमी पाऊस आल्यामुळे, अवकाळी पावसामुळे, गारपीट झाल्यामुळे शेतीचे उत्पादन घटले आहे. यावर्षी तर दोन दोन वेळा गारपीट झाली. अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे वेगळया पध्दतीने विचार करण्याची आवश्यकता आहे हे मी शासनाला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, शासनाने काही योजना नाव बदलून हाती घेण्याचा कार्यक्रम सुरु केला आहे काय असा संशय राज्यातील जनतेच्या मनात निर्माण झाला आहे, तसा या सभागृहातील अनेक माननीय सदस्यांच्या मनात निर्माण झाला आहे. जलयुक्त शिवार योजनेच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी ठासून सांगितले होते की, 25 हजार गावे दुष्काळमुक्त करणार आहोत. आम्हाला ऐकून आश्चर्य वाटले. या शासनाकडे अल्लाउद्दीनकडे होता तसा जादूचा चिराग आहे की काय? पाच वर्षात 25 हजार गावे दुष्काळमुक्त करण्याची घोषणा शासन करीत असेल तर माननीय सदस्य श्री.विनायक मेटे त्यावर विश्वास ठेवणार आहेत काय? शेतामध्ये पडणारा पावसाचा प्रत्येक थेंब अडविला पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. ग्रेडेड बंडिंगचा कार्यक्रम राज्य आणि केंद्र सरकारने यापूर्वीच सुरु केला होता. शेतामधील मातीची धूप होते, पाणी वाहून जाते त्याकरिता ग्रेडेड बंडिंगची मोहीम राज्यात मोठया प्रमाणात सुरु केली होती. मागणी केली पाहिजे असे नाही. सरसकट सर्वच शेतामध्ये ग्रेडेड बंडिंगचे काम झाल्यानंतर शासनाने त्यासाठीचा पैसा माफ करण्याचा निर्णय 1980 मध्ये घेतला होता.

सभापती महोदय, पाणी अडवा, पाणी जिरवा हा कार्यक्रम तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतदादा पाटील यांनी सुरु केला होता. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री स्व.सुधाकरराव नाईक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.....

यांनी जलसंधारणाच्या माध्यमातून हेच काम पुढे सुरु ठेवले. आता माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, आम्ही सर्व संबंधित विभागांना एकत्र आणणार आहोत. त्यासाठी 1000 कोटी रुपये ठेवले आहेत. शेतामध्ये पडणारे पाणी ग्रेडेड बंडिंग, नाला सिमेंट, बंधारे, नाल्याच्या भोवतालच्या काठावर फलोत्पादन करण्याकरिता 200 ते 300 एकरचा परिसर क्लस्टर स्वरुपात डेव्हलप करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या माध्यमातून संपूर्ण परिसर जलमय करण्याची योजना शासनाने तत्कालीन मुख्यमंत्री स्व.सुधाकरराव नाईक यांच्या काळात आणली होती. ती योजना आणि जलयुक्त शिवार योजना यामध्ये काय फरक आहे? वेगवेगळ्या खात्यांना एकत्र आणून तुम्ही तुमचा प्रयोग वेगवेगळ्या ठिकाणी करु नका. वरपासून खालच्या स्तरावर नाल्यापर्यंतचे पाणी त्याच ठिकाणी कशा पध्दतीने जिरवायचे, क्षेत्र जलमय कसे होईल याबाबत अनेक प्रात्यक्षिके सुध्दा सन्माननीय सदस्यांनी पाहिली असतील. आम्हाला सुध्दा प्रात्यक्षिक दाखविण्यात आले होते. माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी सुध्दा ते पाहिले होते. अनेक प्रदर्शनांमधून पाहण्यासाठी ते ठेवले होते. त्यात आणि या योजनेत काय फरक आहे? यापूर्वी पश्चिम महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात दुष्काळ पडल्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या काळात जल ग्राम योजना घोषित केली गेली. शासनाने त्या योजनेचे नाव बदलून आपल्या नावाची पाटी लावण्यापेक्षा वेगळे काही केलेले नाही. 5 वर्षाच्या काळात 25 हजार गावे दुष्काळमुक्त करणार आहात. आज मराठवाड्यात कशा प्रकारचा दुष्काळ आहे? पाण्याची टंचाई आहे. भविष्यात चारा येईल. परंतु पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत. 25 हजार गावांची संख्या कोणत्या आधारे नमूद केली आहे? राज्यातील शेतकऱ्यांना न्याय देणारा कोणताही ठोस कार्यक्रम या सरकारने हाती घेतलेला नाही.

सभापती महोदय, सूक्ष्म सिंचन योजनेची घोषणा करण्यात आली. निवडणुकीच्या काळात 90 टक्के सबसिडी देण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात दिले होते. ठिबकच्या माध्यमातून चांगल्याप्रकारे सिंचन व्यवस्था होऊ शकते. त्यासाठी काही तरतूद केलेली नाही. राज्य शासनाने ज्या धरणातून सिंचन व्यवस्थेसाठी उपसा सिंचन योजनेस 6 टक्के पाणी दिले जात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

होते, त्या धरणातून ठिबक सिंचनासाठी उपसा सिंचन योजना राबविली जाणार असेल तर 12 टक्के पाणी देण्याचा निर्णय घेतला होता. त्या आधारे ठिबक सिंचन योजना राज्यामध्ये उभी

..3...



श्री.माणिकराव ठाकरे.....

राहिली. जे बोलले जाते त्या दृष्टीने तत्परता दाखविली जात नाही. बेंबळा प्रकल्पातून आम्ही 20 हजार एकर क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणण्याचा प्रकल्प हाती घेतला. हा संपूर्ण संगणकीकृत प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे 99 टक्के काम पूर्ण झाले आहे. आम्हाला वाटले होते की, सिंचनाच्या संदर्भात आस्था असल्यामुळे अशा प्रकारची उपसा सिंचन योजना सुरु होत असेल तर तिची पाहणी करुन योजनेला मदत करण्याची भूमिका शासनाकडून घेतली जाईल. परंतु तशा प्रकारची भूमिका घेतली गेली नाही. त्यामुळे 90 टक्के सबसिडी देण्याची भूमिका घेत असताना फक्त 330 कोटी रुपयांची तरतूद करुन भागणार नाही. मागील सरकारने किती तरतूद केली होती, आताच्या सरकारने किती तरतूद केली यापेक्षा ठिबक सिंचनाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात शिवारात पाणी पोहोचते हे लक्षात घेऊन ठोस पाऊल उचलले असते तर सिंचनाच्या संदर्भात शासन ठोस भूमिका घेत आहे हे जनतेसमोर आले असते.

नंतर 2के.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, आता मी कर्जासंबंधी बोलणार नाही. सन्मानीय मंत्री श्री.दिवाकर रावते सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यांनी पक्षाचे काम करीत असताना संपूर्ण मराठवाडा पिंजून काढला आहे. मी सुद्धा माझ्या पक्षातील कार्यकर्त्यांना उदाहरण देतो की, श्री.रावते साहेबांप्रमाणे आपण तेथे जाऊन काम केले पाहिजे. सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी विदर्भामध्ये देखील पदयात्रा काढली होती. त्यांना शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांसंबंधी जाणीव आहे. असे जरी असले तरी या सरकारमध्ये त्यांचे किती ऐकले जाते हे मला माहीत नाही. ज्या सावकारांकडे परवाना नाही त्यांना कर्ज देण्याचा अधिकार नाही. नागपूर अधिवेशनामध्ये 400 कोटी रूपयांची तरतूद करण्यात येईल असे सरकारतर्फे सांगण्यात आले होते. परंतु, आता आपण 200 कोटी रूपये देऊ असे म्हणत आहात. परवानाधारक नसलेल्या सावकारांकडून कर्ज घेतल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढलेल्या आहेत. अशा शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठी शासन कोणती भूमिका घेणार आहे असे मी माननीय मुख्यमंत्र्यांना विचारले होते. शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले तरी त्याचा लाभ त्यांना मिळणार नाही हे आपणाला देखील माहीत आहे असे त्यांनी सांगितले होते. आमच्याकडे 150 ते 200 कोटी रूपये होते ते दिले आहेत याचेच समाधान मिळणार आहे. पण त्यातून शेतकऱ्याला लाभ मिळणार नाही. मागच्या वेळी देशातील शेतकऱ्यांचे 71000 कोटींचे कर्ज माफ केले होते. त्यावेळी आपल्या राज्यातील 7 ते 8 हजार कोटी रूपयांचे शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले होते. आता आपण सांगत आहात की, 150 कोटी रूपये दिल्यानंतर शेतकऱ्यांची कर्ज माफी होणार आहे. अशा प्रकारचा बनावटपणा आपण शेतकऱ्यांसबंधी करीत आहात तो अत्यंत चुकीचा आहे. अशाने शेतकऱ्यांवरचे कर्ज कुठेही कमी होणार नाही. उलट शेतकरी दु:खी होणार आहे. त्यानें घेतलेल्या कर्जामुळे त्याच्यावर शेती विकायची पाळी येणार आहे. त्यामुळे आता कशी शेती करायची असा प्रश्न आज शेतकऱ्यांसमोर उभा राहात आहे. त्याचे उत्तर आज पर्यंत सरकार कधीही देऊ शकलेले नाही.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.

सभापती महोदय, गोकुळ ग्रामचा उल्लेख करण्यात आला आहे. राज्यामध्ये पहिल्यापासूनच गोवंश हत्येला बंदी आहे. तसा आपल्याकडे कायदा देखील आहे. गोवंश हत्या केली तर शिक्षेची तरतूद देखील आहे.. 1995-96 मध्ये दोन्ही सभागृहाने कायदा मंजूर केला होता. आता गोवंश हत्या बंदीसाठी प्रयत्न करण्यात येत आहे. कायदा करण्यात येत आहे. त्यातील सर्व बाजू आपण तपासून पाहिल्या आहेत काय ? व्यवहारिकदृष्टया ते आपल्याला परवडणारे आहे काय ? अशाने जे बेरोजगार होणार आहेत त्यांना आपण कुठे काम देणार आहात ? अशाने खाद्यपदार्थांच्या भावावर देखील परिणाम होणार आहेत. एका भावनिक विषयाला हात घालून त्यावर कोणीही बोलणार नाही अशा पद्धतीने वाटेल तसा कारभार करण्याचा प्रयत्न करणार असाल तर ते चुकीचे आहे. आपण सर्वजण जबाबदार सदस्य आहोत. या सदनातील कामकाज आपण डोळसपणे केले पाहिजे. या राज्यात सर्व जाती, धर्मातील लोक राहिले पाहिजेत. या राज्यातील कायदा व सुव्यवव्था राखण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. त्यामुळे सर्वात अधिक जबाबदारी ही माननीय मुख्यमंत्र्यावर आहे, माननीय गृह मंत्र्यांवर आहे. आज राज्यात वेगवेगळ्या माध्यमातून हल्ले होते आहेत. आताच माननीय मंत्र्यांनी पनवेल येथे घडलेल्या घटनेसंबंधी निवेदन केले आहे. अशा घटना घडत आहेत. या घटना घडविण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या ज्या शक्ती आहेत त्यांना सरकारने बाजूला करण्याची गरज आहे, तरच या राज्यातील कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित राहू शकेल. पण जे कोणी खतपाणी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांना राज्य कारभार चालविता येतो असे म्हणता येणार नाही. त्यामुळे याबाबत शासन कोणते पाऊल उचलत आहे याकडे देखील जनता पाहात आहे. कुठली तरी शक्ती आपणाला प्रेरित करीत आहे की, आपण अशा प्रकारचे निर्णय करावेत, कायदे आणावेत. कारण आम्ही लोकांना तशा प्रकारची आश्वासने दिली आहेत. त्यास जर आपण बळी पडणार असाल तर या राज्यातील जनतेचे प्रचंड नुकसान होणार आहे, हानी होणार आहे. आपल्या भाकड जनावरांचे काय करावयाचे असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर पडला आहे. शेतीचा बैल कामी येत नसेल आणि त्याऐवजी दुसरा बैल घ्यावयाचा असेल तर शेतकरी जुना बैल विकायला काढत होता. त्यातून तो 30 ते 40 टक्के रक्कम मिळवत होता व उर्वरित रक्कम तो स्वत: टाकून दुसरा बैल आणून सर्व सांगड घालत होता. त्यातून आपली सर्व शेती करीत होता. पण या संबंधातील भावना सदनामध्ये कुठेही दिसून येत नाही. ...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) :** मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना विचारू इच्छितो की, आपण 40 मिनिटे बोलत आहात. आपणास बोलण्यासाठी अजून किती वेळ लागणार आहे. आपण ज्येष्ठ सदस्य असल्यामुळे आपणास मी भरपूर वेळ दिलेला आहे. आपणास अजून किती वेळ लागणार आहे एवढेच सांगावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला फक्त 2-3 मिनिटेच लागणार आहेत.

**तालिका सभापती :** ठीक आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, येथे एलबीटीचा उल्लेख सर्व सन्माननीय सदस्यांनी केला आहे. सुरुवातीला सांगितले होते की, 1 एप्रिल पासून एलबीटी बंद करण्यात येईल. त्याचा उल्लेख माजी वित्त राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांनी केला असून मी त्यात फारसा जाऊ इच्छित नाही. परंतु, आता आपण मुदतीमागून मुदती वाढवत आहात. आता आपण ऑगस्ट पर्यंत मुदत वाढविली आहे. तारीख पे तारीख हो रही हैं. हे जीएसटी लागू होई पर्यंत चालणार आहे असे दिसते. येथे व्हॅटचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. महानगरपालिकेने त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातून आपला खर्च केला पाहिजे हे अपेक्षित असते. जर संपूर्ण राज्यावर 2 ते 4 टक्के व्हॅट वाढवून तो लागू करणार असाल तर या राज्यातील जनता कधीही खपवून घेणार नाही. आज 16 हजार कोटी रुपये राज्याच्या तिजोरीतून देण्याची ऐपत आज आपल्यामध्ये आहे काय ? कशा पद्धतीने आपण व्यवस्था करणार आहात हा महत्त्वाचा प्रश्न आहे. एलबीटी रद्द व्हावा या विचाराचे आम्ही देखील होतो. पण मार्ग निघत नव्हता. राज्यातील जनतेवर आपण लोड टाकला तर त्यांना काय उत्तर द्यायचे हा प्रश्न आमच्या समोर होता. सवंग प्रसिद्धीसाठी निर्णय घेऊ नये असा विचार तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी केला होता. आज सत्ताधारी पक्षातील काही माननीय सदस्य बोलत आहेत की, व्हॅटच्या माध्यमातून आम्ही उत्पन्न जमा करून सर्व महापालिकांना वाटणार आहोत. पण याचे विवेचन येणारा काळच करेल. तत्संबंधातील आपले विचार माजी अर्थ राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांनी देखील मांडलेले आहेत.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, मी आता आमदार आदर्श ग्राम योजनेवर बोलणार आहे. आपण गुप्त पद्धतीने मतदान केले तर एका गावाला अर्ध्या पेक्षा जास्त निधी देण्यास एकही सदस्य तयार होणार नाही हे त्यातून स्पष्ट होईल. सत्ताधारी पक्षातील किती आमदार गाव घेण्यास तयार आहेत ते आपण पहावे. पाच हजार लोकसंख्ये पेक्षा जास्त संख्या असलेले गाव असेल तर तेथे मजबूत रस्ते, पाण्याचा निचरा होण्यासाठी नाल्या किंवा आवश्यक त्या प्राथमिक गरजा पूर्ण करावयाचे म्हटले तर एकाच ठिकाणी पाच ते सात कोटी रूपये लागतील.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे .........

हा पैसा कोठून आणणार आहात ? अर्धा पैसा शासनाने व अर्धा पैसा आमदारांनी द्यावयाचा हे कसे शक्य आहे ? एका मतदारसंघात साधारणत: 200 ते 250 गावे असतात. 250 गावांपैकी एका गावाला पैसा दिला तर दुसऱ्या गावाने काय करावयाचे ? ज्या गावांना पैसा मिळणार नाही ती गावे अंगावर येणार नाहीत काय ? एखाद्या गावाची लहानशी योजना त्या गावासाठी महत्वाची असेल तर त्या लहानशा योजनेवर सुध्दा रक्कम खर्च करावयाची नाही काय ? केंद्राने केले म्हणून आपण करणे योग्य होईल काय ? खासदाराला 5 कोटी तर आमदाराला 2 कोटी रुपये निधी मिळत असतो. आमदार प्रत्येक गावागावामध्ये फिरत असतात. आमदारांचे गावागावात फिरण्याचे प्रमाण व खासदारांचे गावात फिरण्याचे प्रमाण किती आहे याचे जर प्रमाण सरकारने काढले असते तर या सरकारच्या डोक्यातून अशा प्रकारची कल्पना निघाली नसती. केंद्रात तशा प्रकारची योजना असल्यामुळे केंद्राच्या योजने प्रमाणे, मोदी साहेबांप्रमाणेच आम्ही करणार असे केले तर त्याचा उपयोग होणार नाही. सांसद आदर्श ग्राम योजना व आमदार आदर्श ग्राम योजनेतून हजारो गावांची कामे होऊ शकणार आहेत काय ? 25 हजार गावांमध्ये आम्ही चांगल्या योजना राबवू असे म्हणणाऱ्यांनी चुकीच्या आधारावर ज्या योजना आणल्या त्यातून काही निष्पन्न निघणार नाही.

सभापती महोदय, अल्पसंख्यांकाच्या संदर्भात मौलाना अब्दुल कलाम आझाद महामंडळासाठी 75 कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. अल्पसंख्याक समाजातील तरुणांना रोजगार, स्वयंरोजगार उपलब्ध झाला पाहिजे. अल्पसंख्याक समाजातील जो गरीब वर्ग आहे त्या समाजातील गरीब वर्गाला शिक्षणाचे आरक्षण दिले गेले नाही. समाजातील गरीब माणसाला आरक्षण देण्यासाठी कोणीही रोखू शकत नाही. उच्च न्यायालयाने सुध्दा गरिबाला आरक्षण देण्यापासून कोणी रोखू शकत नाही असे सांगितले आहे. गरीब अल्पसंख्याकांना शिक्षणामध्ये 5 टक्के आरक्षण द्यावे अशा प्रकारचा निर्णय उच्च न्यायालयाने घेतला होता. परंतु एकाला आरक्षण द्यावयाचे व दुसऱ्याला आरक्षण द्यावयाचे नाही हे बरोबर नाही.

सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या संदर्भात तुम्हा आम्हा सगळयांना माहिती आहे. मागच्या सरकारने राजीव गांधी जीवनदायी योजनेसाठी 850 कोटी रुपयांची तरतूद

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे .........

केली होती परंतु या सरकारने या योजनेसाठी केवळ 300 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. 300 कोटी रुपयांमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये कशा प्रकारे न्याय मिळणार आहे ?

सभापती महोदय, आरोग्य मंत्र्यांनी या योजनेसाठी 300 कोटी रुपयांची तरतूद का केली हे समजत नाही. आरोग्य विभाग आमच्या मित्राकडे असल्यामुळेच राजीव गांधी जीवनदायी योजनेसाठी 300 कोटी रुपयांची अल्प तरतूद करुन तुम्हाला अडचणीत आणण्याचा डाव दिसून येतो असे मला वाटते.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या कमिटीचे अध्यक्षपद आमच्या मित्राला दिले गेले आहे. मागच्या वर्षी यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या सरकारनेही छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मला वाटले होते की, माननीय मेटे साहेब कमिटीचे अध्यक्ष असल्यामुळे 1000 कोटी रुपयांची तरी तरतूद केली जाईल. परंतु तसे काही झाले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा प्रोजेक्ट 5000 कोटी रुपयांचा असल्यामुळे या वर्षीच्या बजेटसाठी 1000 कोटी रुपये तरी मिळतील असे वाटले होते परंतु तसे काही झाले नाही.

सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील मेमोरियलच्या संदर्भात बजेटमध्ये उल्लेख करण्यात आला आहे परंतु त्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. यासंदर्भातील सर्व परवाने मागच्या सरकारने पूर्ण केलेले आहेत. यासंदर्भात आता कोणताही परवाना शिल्लक राहिलेला नाही. मागच्या शासनाने सर्वच्या सर्व परवान्यांचे काम केले आहे. यासंदर्भातील भूमिपूजन केले जाणार आहे असे सांगितले आहे त्यामुळे आम्ही भूमिपूजनाच्या तारखेची वाट पाहतो आहोत एवढेच या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मागच्या सरकारने वस्त्रोद्योगाच्या संदर्भात अत्यंत चांगले धोरण आणले होते. वस्त्रोद्योगाच्या धोरणाच्या संदर्भात विदर्भातील शेती कपाशीच्या आधारावर आहे, खानदेशमध्ये सर्वात जास्त कापूस पिकतो, मराठवाडयातही चांगल्या प्रकारे कापसाचे उत्पन्न होत असते.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे .........

कापूस उत्पादक भागात कापसावर आधारित उद्योग उभे राहावेत मग ते उद्योग सहकार क्षेत्रातील असो किंवा खाजगी क्षेत्रातील असो त्यांनी उद्योग उभारण्यासाठी घेतलेल्या कर्जातून 10 टक्क्याची भरपाई राज्य सरकार करेल आणि त्यावरील व्याज भरावे लागणार नाही यासंदर्भात मागच्या सरकारने वस्त्रोद्योगाच्या संदर्भात अत्यंत चांगले धोरण आणले होते. परंतु या बजेटमध्ये वस्त्रोद्योग धोरणाच्या संदर्भात काहीही तरतूद केल्याचे दिसून येत नाही. विदर्भातील सूत गिरण्यांना चालना देण्याऐवजी काँग्रेसपक्षाकडे असलेल्या सूत गिरण्या बंद कशा करता येतील यासाठी आता प्रयत्न केले जात आहेत. तुमचे सरकार आल्याबरोबर तुम्ही पहिल्या प्रथम निर्णय घेतला की, माणिकराव ठाकरेंची सूत गिरणी असेल तर त्या गिरणीतील सर्व खाते सिल करण्यात यावे. या गिरणीसाठी जे काही भागभांडवल दिले असेल तर ते सर्व भागभांडवल परत घेण्याची नोटीस दिली गेली आहे. आम्ही सूत गिरणीसाठी मशिन्स खरेदी करण्यासाठी ऑर्डर दिलेल्या आहेत. आम्ही मशिनरीची ऑर्डर दिल्याबरोबर खाते सिल करण्याच्या संदर्भात शासनाचे पत्र आले. अशा प्रकारे चुकीच्या पध्दतीने विदर्भावर अन्याय करण्याचा प्रकार होऊ नये अशी विनंती आहे.

सभापती महोदय, जलविद्युतच्या संदर्भात 553 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्राला कोयनेच्या जलविद्युत प्रकल्पातून वीज मिळते तसेच गोसीखुर्द प्रकल्पातून 36 मे.वॅट वीज मिळते. त्यामुळे जलविद्युत प्रकल्पासाठी 553 कोटी रूपयांची तरतूद का करण्यात आली हे समजत नाही. ही तरतूद कोठे तरी फिरवण्यासाठी करण्यात आली आहे की, काय हे सुध्दा समजत नाही. ज्या ठिकाणी तरतुदीची आवश्यकता आहे त्या ठिकाणी न करता ज्या ठिकाणी गरज नाही अशा ठिकाणी तरतूद करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या मदतीकरिता कोणतीही मदत या सरकारने दिलेली नाही. या सरकारला आजच्या परिस्थितीचे कोणत्याही प्रकारचे गांभीर्य नसल्यामुळे या अर्थसंकल्पाला विरोध करून मी माझे दोन शब्द संपवितो.

धन्यवाद.

--------

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील सदस्यांची बोलण्याची इच्छा दिसत नाही कारण ते बोलण्यासाठी हात वर करताना दिसत नाही. आमच्या बाजूकडील सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी हात वर करीत आहेत. तेव्हा आपण आमच्या बाजूला पहावे अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते )** : सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार आहे.

श्री.महादेव जानकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2015-2016 या वर्षाकरिता मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पाचे स्वागत करण्यासाठी आणि त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सरकारने एव्हीडन्स बेस फोटोग्राफी ही कल्पना उभी केल्यामुळे मी सरकारचे प्रथम अभिनंदन करतो. यापूर्वीच्या सरकारने काय केले, आताच्या सरकारने काय केले यावर भाष्य न करता पैसा कोठे मुरला जातो आणि विकास कसा रुतला जातो यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने स्वतंत्र नियंत्रण कक्ष तयार केला त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सर्वसामान्य नागरिकांवर कराचा भार पडणार नाही, पण तो पैसा कसा उभा करायचा यासाठी सरकारने डोके लढवून अतिरिक्त चटईक्षेत्र व प्रिमियम फी लावून सरकारचा प्रिमियम कसा वाढेल हे पाहिले आहे.

सभापती महोदय, या सरकारने महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेला डोळ्यासमोर ठेवून अर्थसंकल्प मांडलेला आहे. "जलयुक्त शिवार अभियान" ही अर्थसंकल्पातील सर्वात चांगली योजना आहे. या योजनेसाठी 1 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. यापूर्वीच्या सरकारने देखील चांगले काम केलेले आहे, परंतु राज्यातील 198 तालुके दुष्काळी राहिले त्याबद्दल दुर्दैव वाटते. यापूर्वीच्या सरकारच्या काही योजना चांगल्या होत्या.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, ही योजना एका विशिष्ट भागाकरिता नव्हती. महाराष्ट्रातील सर्व भागांसाठी होती, दुष्काळी आणि नॉन दुष्काळी भागाकरिता ती योजना होती.

**तालिका सभापती** : माझी सभागृहाला विनंती आहे की, सन्माननीय सदस्य नवीन आहेत. आपण त्यांच्या भाषणात व्यत्यय आणू नये.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, या सरकारने जलयुक्त शिवार योजनेसाठी 1 हजार कोटी रुपये जिल्हा योजनेंतर्गत उपलब्ध करुन दिले आहेत. असे करुन सरकारने शेतकऱ्यांचे हित पाहिलेले आहे. पूर्वीच्या सरकारने काही गोष्टी चांगल्या केलेल्या आहेत. परंतु नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुका, यवतमाळ जिल्हा, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुका, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, जत, कवठेमहांकाळ, हे तालुके आजपर्यंत दुष्काळग्रस्त का राहिले ? आपण अंमलबजावणीमध्ये कुठेतरी कमी पडला आहात याचे त्यांनी आत्मचिंतन करावे.

सभापती महोदय, मी फक्त, विदर्भ, मराठवाडा किंवा पश्चिम महाराष्ट्राबद्दल बोलत नाही. अगोदरच्या सरकारने साखळी बंधारे केले म्हणून सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील शेतकरी सधन आणि सुखी झालेला आहे. परंतु आम्ही त्यामध्ये अधिक चांगल्याप्रकारे अंमलबजावणी करुन त्यांना आणखी पुढे नेण्याचा प्रयत्न केलेला आहे त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या सरकारने द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी शेडनेटची योजना आणलेली आहे. तशाच प्रकारची योजना दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी आणली तर चांगले होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना ही महत्वाकांक्षी योजना सरकारने घेतलेली आहे. त्यासाठी 3 हजार 500 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. या कामामध्ये काही भ्रष्टाचार होऊ नये म्हणून डिफॉल्ट लायबिलिटी सहा महिन्यांहून पाच वर्षापर्यंत केलेली आहे, त्याबद्दल मी सरकारला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून 790 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. या कामामध्ये न बसणाऱ्या कामांसाठी 71 हजार 861 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. माझी मागणी आहे की, सातारा, कोरेगाव, दहिवडीवरुन पंढरपूरला जाणारा रस्ता चौपदरी केला पाहिजे. सदरहू रस्ता मंगळवेढामार्गे विजापूरला गेला तर त्या चौपदरी रस्त्यामध्ये गोंदलेकर महाराज तीर्थक्षेत्र आणि पंढरपूर तीर्थक्षेत्र येते. तेव्हा या मार्गाचे चौपदरीकरण व्हावे अशी माझी आपल्यामार्फत सरकारला विनंती आहे.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर......

सभापती महोदय, रोजगारयुक्त महाराष्ट्रासाठी 161 कोटी 84 लाख रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. यामुळे सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न सुटणार आहे. "स्कील इंडिया" प्रमाणे "स्कील महाराष्ट्र" तयार होऊन रोजगारयुक्त महाराष्ट्र तयार करुन तरुणांना रोजगार मिळेल, त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात बाळासाहेब ठाकरे आणि गोपीनाथ मुंडे यांचे स्मारक करण्याचा उल्लेख आहे. गोपीनाथ मुंडे यांना दिल्ली येथे ज्या ठिकाणी अपघात झाला त्या चौकाला गोपीनाथ मुंडे यांचे नाव द्यावे असा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारला पाठवावा, अशी मी सरकारला विनंती करतो.

सभापती महोदय, महाराणी अहिल्याबाई होळकरांच्या नावावर 200 कोटी रुपयांची तरतूद करुन महिलांच्या बचत गटाला एकत्र करण्याचे काम सरकारने केले त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सरकारने रेल्वे प्रकल्पासाठी 68 कोटी 60 रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. परळी-नगर रेल्वे आहे. ती रेल्वे चौंडीमार्गे करावी अशी माझी सरकारला विनंती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अखत्यारितील ओझर, कोल्हापूर, अकोला, शिर्डी,कराड, अमरावती, सोलापूर आणि चंद्रपूर इत्यादी विमानतळांच्या धावपट्टयांचे परीक्षण व देखभालासाठी 91 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. यामध्ये फलटण विमानतळाचा समावेश करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, "मेक इन इंडिया"च्या धर्तीवर "मेक इन महाराष्ट्र" ही कल्पना या सरकारने राबविली. महाराष्ट्र राज्य हे देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. ते असेच पुढे रहावे यासाठी सरकारने उचललेले हे पाऊल आहे, त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, तीर्थक्षेत्र विकासासाठी 115 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्यामध्ये शिखर शिंगणापूर, जयसिंगपूरचा श्रीदत्त आणि औंदूबर या तीन तीर्थक्षेत्राचा समावेश करावा अशी माझी सरकारला विनंती आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर......

सभापती महोदय, या सरकारने बाबासाहेब आंबेडकरांचे लंडनमधील निवासस्थान ताब्यात घेण्यासाठी जे प्रयत्न केले त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात एस.सी, एस.टी.प्रवर्गासाठी चांगल्या प्रकारची भरीव तरतूद केलेली आहे. तसेच भटक्या व विमुक्त प्रवर्गासाठी देखील चांगली तरतूद करावी अशी माझी सरकारला विनंती आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षणासाठी पुणे, औरंगाबाद, अकोला, अंबेजोगाई, बीड, सोलापूर, नांदेड, मिरज, सांगली, धुळे, यवतमाळ, लातूर व इंदिरा गांधी महाविद्यालय, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या श्रेणीवर्धनाच्या कामासाठी 20 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, केंद्र सरकारची "बेटी बचाओ बेटी पढाओ" या योजनेच्या माध्यमातून "माझी कन्या भाग्यश्री" या योजनेसाठी 200 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या योजनेतून सरकारने महिलांचा सन्मान केला त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या सरकारने मौलाना आझाद विकास महामंडळासाठी 75 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे त्यामुळे हे सरकार अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण करणारे आहे म्हणून मी सरकारला धन्यवाद देतो.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 7.00 वाजेपर्यंत वाढविण्यात आली होती. सभागृहाच्या कामकाजाची वेळ पुढील निर्देश देईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, या राज्यामध्ये गुन्ह्याचे प्रमाण वाढले असून त्याचा बोजा गृह विभागावर आला आहे. याला आळा घालण्यासाठी सरकारने सायबर क्राईम लॅब स्थापन करण्यासंदर्भात अतिशय उत्कृष्ट निर्णय घेतल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

महोदय, स्मार्ट पोलीस स्टेशनबद्दल तसेच पोलीस वसाहतीबद्दल सरकारने जो निर्णय घेतला आहे तो योग्य आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी पोलिसांच्या घरांचा प्रश्न सोडविल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, डिजिटल महाराष्ट्र ही संकल्पना राबविण्याबाबत राज्य सरकार जागरुक आहे आणि त्यासाठी 10 कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित केल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, पोहरादेवी महाराज व इतर थोर व्यक्तीच्या स्मारकासाठी सरकारने 20 कोटी रुपये निधी दिला होता. या बाबतीत सांगू इच्छितो की, संत नागोजी नफ्ते पाटील हे संत होते. मागच्या सरकारने त्या कामासाठी 8 कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित केला होता. परंतु त्यांचे नातू माजी आमदार श्री.अनंतकुमार पाटील आणि संबधितांमध्ये वाद झाल्यामुळे तो पैसा खर्च न होता परत गेला. माझी विनंती आहे की, त्यांच्यामध्ये समन्वय घडवून आणावा. संत सेवालाल महाराजांच्या फंडासाठी व नफ्ते महाराजांसाठी तरतूद केली तर हा वाद मिटेल आणि पोहरादेवी देवस्थानसाठी तो निधी वापरण्यास आपण कटिबध्द राहू, एवढेच या निमित्ताने सांगतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत आणि सन्माननीय वित्त राज्यमंत्री श्री.दीपक केसरकर यांनी विधानपरिषदेत, युती शासनाचा पहिला-वहिला अर्थसंकल्प मांडला आहे. खरेतर पहिला अर्थसंकल्प सादर करताना प्राथमिक गोष्ट अशी असते की, इतिहासामध्ये काय घडले याची पुनरावृत्ती न करता वर्तमान स्थितीला सामोरे जाताना हे राज्य भविष्यात अधिक मजबूत आर्थिक पायावर कसे उभे राहील, हा या अर्थसंकल्पाचा गाभा असावयास हवा होता. एक गोष्ट नक्की आहे की, साधारणपणे सत्तेवर आल्यानंतर सरकारला पाच वर्षांमध्ये पाच अर्थसंकल्प मांडण्याची संधी मिळते. सत्तेवर येण्यासाठी राज्यातील जनतेला जी काही आश्वासने दिलेली असतात त्या योजनांचा पाठपुरावा करण्यासाठी पहिल्या अर्थसंकल्पामध्ये योजना समाविष्ट केल्या जातात. किंबहुना उत्तरदायित्व म्हणून पहिल्या अर्थसंकल्पामध्ये काही गोष्टींचा उल्लेख करावा लागतो.

सभापती महोदय, अर्थसंकल्प सादर करताना राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालाचा आधार घेतला जातो. आर्थिक पाहणी अहवालामध्ये सिंचन क्षेत्रात 8.12 लाख हेक्टरची वाढ झाल्याचे निदर्शनास आल्याचे नमूद करण्यात आले आहे. यावरुन अगोदरच्या राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणावर पूर्वी केलेले भाष्य किती चुकीचे होते, हे सांगण्यासाठी हा दाखला पुरेसा आहे. महोदय, या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सिंचन क्षेत्रावर भर देण्याच्या योजनांना प्राधान्य दिले जात आहे ही खरोखरच स्वागतार्ह बाब आहे.

महोदय, गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये एकूण 19 हजार कोटी रुपयांची अपेक्षित तूट दर्शविण्यात आली होती. यावर्षी ही तूट 3 हजार कोटी रुपये राहील असे नमूद केले आहे. महोदय, राज्याच्या उत्पन्नात कोणतीही वाढ अपेक्षित नसताना तुटीचा जो आकडा नमूद केलेला आहे तो पटण्यासारखा नाही. दुर्दैवाने राज्याला सातत्याने नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागत आहे. पुढील काही वर्षात या आपत्तींमध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याचे सर्व शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. या आपत्तीवर मात करण्यासाठी तरतूद करणे हा केवळ एका वर्षाच्या अर्थसंकल्पाचा भाग



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

होऊ शकत नाही. त्यामुळेच शासनाने दीर्घकालीन उपाययोजनांवर भर द्यावयास पाहिजे होता. त्यासाठी चालू आर्थिक वर्षापासून रिझर्व्हायर म्हणून 1 हजार कोटी रुपयांची तरतूद आपत्कालीन मदतीसाठी केली असती आणि त्यात सातत्याने भर पडत गेली तर या संकटांना तोंड देण्यासाठी राज्य सरकारची आर्थिक कुवत निश्चितपणे तयार होण्याच्या दृष्टीने पुढे चांगले पाऊल पडले असते.

महोदय, मी आतापर्यंतच्या अर्थसंकल्पीय भाषणाची माहिती घेतली. त्यानुसार राज्यामध्ये एकूण जे उत्पन्न जमा होते त्यातील 61 टक्के वाटा वेतन व निवृत्ती वेतनावर खर्च होतो. ही टक्केवारी पाहिल्यानंतर विकास कामांसाठी उपलब्ध होणारा निधी आणि साधनसामुग्रीचा वापर काटेकोरपणे केला पाहिजे. परंतु चांगली आर्थिक शिस्त येण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबद्दल या अर्थसंकल्पात कोठेही विचार मांडलेला दिसत नाही. त्यामुळे या संदर्भात निश्चितपणे सुधारणे करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, येणाऱ्या आर्थिक वर्षात अन्नधान्य उत्पादनात 1/3 घट होईल असे आर्थिक पाहणी अहवालात नमूद केले आहे. याचा सर्वाधिक परिणाम कडधान्य आणि तेलबिया उत्पादनावर होणार आहे. ही घट 43 ते 53 टक्के होण्याची शक्यता आहे. अशा संकटांची चाहूल लागल्यानंतर त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी आर्थिक तरतूद करणे गरजेचे होते. परंतु माननीय अर्थ मंत्र्यांनी ही बाब गांभीर्याने घेतलेली नाही, असेच दुर्दैवाने म्हणावे लागते. मुळात शेतीच किफायतशीर राहिली नसल्यामुळे ग्रामीण भागातील लोक रोजगाराच्या शोधात शहराकडे येत आहेत. ग्रामीण भागातून शहरी भागात वेगाने होणारे स्थलांतर हा राज्यासमोरील सर्वात मोठा आव्हानात्मक प्रश्न झाला आहे. आज राज्यामध्ये वाढत्या झोपडपट्ट्या आणि निवाऱ्याचा प्रश्न जटिल बनत चालला आहे.

महोदय, एलबीटी रद्द करण्याच्या आश्वासनावर हे सरकार निवडून आले आहे. एलबीटी रद्द केल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांचे वित्तीय स्वायत्ततेचे अस्तित्वच नष्ट झाले तर भविष्यातील त्यांची वाटचाल कोणकोणत्या अडचणींना सामोरे जाईल याचा विचार या अर्थसंकल्पात झालेला नाही. सरकारच्या वित्तीय व्यवहारांना किमानपक्षी काही शिस्त अपेक्षित आहे. दरवर्षी अर्थसंकल्प सादर करताना मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण सभागृहात ठेवले जाते. किंबहुना ते ठेवणे

श्री.हेमंत टकले....

कायद्याने बंधनकारक आहे. महोदय, सन 2012-13 या वित्तीय वर्षापर्यंत राज्य सरकारची एकंदर थकबाकी 39 हजार कोटी रुपयांवर पोहचली होती. यातील विवाद्य नसलेली थकबाकी 20 हजार कोटी रुपयांची आहे. पण ती वसूल करण्यासाठी सरकार पावले का उचलत नाही, याचा खुलासा माननीय अर्थ मंत्र्यांनी करणे आवश्यक आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पात संकल्प नक्की कोणते केले आणि त्यामागचा अर्थ काय आहे, हे न उमगण्याचाच भाग जास्त दिसून येतो.

सभापती महोदय, राज्याच्या विकासाच्या आणि सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने मानव विकास निर्देशांक हा सर्वात महत्त्वाचा विषय असतो. राज्याच्या 36 जिल्ह्यांपैकी 28 जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक हा आपल्या राज्याच्या सरासरी पेक्षा कमी आहे. राज्याच्या एकूण उत्पन्नाच्या जवळपास 50 टक्के वाटा हा केवळ मुंबई, ठाणे आणि पुणे या परिसरातून येतो. राज्यातील 52 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. तरीही शेती क्षेत्रातील घसरण 9 टक्क्यांपर्यंत खाली आली आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे.

सभापती महोदय, उद्योगाला चालना देताना ही घसरण थांबविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. आपल्या राज्यामध्ये उद्योग क्षेत्रात 18,709 प्रकल्प उभे राहिले आणि त्यातून 10 लाख 63 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. तसेच गुजरातमध्ये 12,584 प्रकल्प उभे राहिले व त्यातून 13 लाख 18 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

आपल्या राज्यात इरादा पत्र मोठ्या प्रमाणात येऊन सुध्दा प्रत्यक्ष प्रकल्प उभे राहत नाहीत, या मागची कारणे शोधून त्यावरची उपाययोजना आपल्याला निश्चितपणे करायला हवी. बदलत्या काळात मुंबईचे महत्त्व कमी होऊ लागले आहे. सदर प्रश्नावर लक्ष केंद्रित करून त्यासाठी काही तरी निश्चित अशी उपाययोजना अर्थसंकल्पात अपेक्षित होती. भौगोलिक अंतर व स्थान हे माहिती तंत्रज्ञानाच्या उदयानंतर तितकेसे महत्त्वाचे राहिलेले नाही. हा बदल लक्षात घेऊन त्याचे प्रतिबिंब राज्याच्या धोरणात पडणे गरजेचे होते, पण तसे झालेले दिसत नाही. अर्थसंकल्पातील अनेक विषयावर बोलता येण्यासारखे आहे, पण सर्वांनीच वेळेची मर्यादा पाळण्याचे मान्य केल्यामुळे मी यातील काही गोष्टींवर बोलणार आहे.

सभापती महोदय, नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे सन 2015-16 ला सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. आपण अर्थसंकल्पात त्या संदर्भात 2378 कोटी 73 लाख रूपयांच्या आराखड्यास मंजुरी दिली आहे. प्रत्यक्षात कुंभमेळा आजपासून 3-4 महिन्यांच्या कालावधी नंतर सुरू होणार आहे. आता आपण 3-4 महिन्यांच्या कालावधीनंतर सुरू होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी तरतूद केलेली असली तरी उर्वरित 4 महिन्यांत ही कामे होणार आहेत का, याची वास्तवता काय आहे, यासाठी खरोखर किती निधीची आवश्यकता आहे हे पाहणे गरजेचे आहे. सर्वात मोठा प्रश्न कुंभमेळ्यामुळे नाशिक येथील गोदावरी नदीच्या प्रदूषणाच्या बाबतीत आहे. न्यायालयानेही या संदर्भात बजावलेले आहे. शासन याबाबतीत गंभीर नसेल, प्रदूषण थांबविण्याच्या बाबतीतील उपाययोजना करणार नसेल तर सिंहस्थ मेळावा भरू द्यावा की नाही असा सुध्दा एक प्रश्न न्यायालयाने आपल्यापुढे उपस्थित केला आहे. आपण त्या प्रश्नाला सामोरे जाताना काय निश्चित करणार आहात या बाबतीतील खुलासा अर्थसंकल्पात होत नाही.

सभापती महोदय, पर्यावरण हा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. आपल्या व आपल्या मित्र पक्षाच्या कोणत्या खात्याला किती निधी मिळाला, का मिळाला नाही, मुद्दाम डावलले का, अर्थसंकल्प बनविताना सर्वांचा विचार केला होता का, पर्यावरण संवर्धनासाठी ज्या योजना आवश्यक आहेत त्या घेण्यामध्ये आपण अजून मागे जात आहोत का, अशी शंका यामध्ये निश्चितपणे तयार होत आहे.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

सभापती महोदय, सदर बाबतीत निधीची तरतूद केली आहे. पर्यावरण संवर्धन करताना ठिकठिकाणी तलावांची कामे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, ताडोबा व्याघ्र प्रकल्प, गोरेवाडा प्राणी संग्रहालय असे प्रकल्प या ठिकाणी घेतले आहेत, ते पर्यटनाशी जोडलेले आहेत. परंतु पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजना यामध्ये घेतल्या आहेत का हाही प्रश्न या निमित्ताने निर्माण होत आहे. आपण जे.जे.स्कूल ऑफ आर्ट, मुंबई आणि इतर कला महाविद्यालयांतील कला शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढ यासाठी तरतूद केली आहे. अर्थसंकल्पातील ही भाषा आहे. त्यामुळे 10 कोटी रूपयांच्या निधीपैकी जे.जे.स्कूल ऑफ आर्टला नक्की काय देणार या संदर्भात स्पष्टता येत नाही. राज्यातील किती कला महाविद्यालये सुरू आहेत, किती चांगली आहेत आणि एकूणच कला शिक्षणाकडे आपण कशा पध्दतीने पाहत आहोत हे महत्त्वाचे आहे. आजची अवस्था आहे, त्यामध्ये 10 कोटी रूपयांची तरतूद अतिशय तुटपुंजी आहे, असेही आपल्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, अल्पसंख्याकाकरिता ग्रामीण क्षेत्र विकास योजना कार्यान्वित केल्याचे नमूद आहे. अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्र अशी एकूण क्षेत्रे किती आहेत, त्यामध्ये अल्पसंख्याकांची आताची परिस्थिती काय आहे ? आपण त्यासाठी 25 कोटी रूपये इतका कमी नियतव्यय प्रस्तावित केला आहे. मला वाटते की, यामधून काहीही साध्य होण्यासारखे नाही. या विषयी पुन्हा एकदा लक्ष देऊन काही तरी करण्यासाठी मार्ग शोधावा लागेल. आपल्याला या संदर्भात पुढील पाऊल टाकण्याच्या दृष्टीने निश्चितपणे काम करावे लागेल.

सभापती महोदय, राज्याचा समृध्द सांस्कृतिक वारसा पुढे चालविण्याच्या दृष्टीने आणि नवोदित कलाकारांना पुरेसा वाव मिळावा यासाठी जिल्हा स्तरावर सुसज्ज नाट्यगृहे बांधण्याचा आपला मानस आहे. मला वाटते की, मागच्या सरकारकडून सुध्दा अशाप्रकारे प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी नाटयगृहे बांधण्याची योजना हाती घेण्यात आली होती. सदर बाबतीत 20 कोटी रूपयांचा नियतव्यय राहील आणि 5 वर्षांत सुसज्ज नाट्यगृहाअभावी एकही जिल्हा राहणार नाही असे आपल्या अर्थसंकल्पात म्हटले आहे. मला वाटते की, या क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्याची गरज आहे. परवाच काही कारणाच्या निमित्ताने माझी माननीय शिक्षण मंत्र्यांच्या दालनात काही



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

कलाकारांशी भेट झाली होती. त्यांनी सांगितले की, आज नाटकांना मुंबई, पुणे अशी शहरे सोडली तर बाकी ठिकाणी कुठेही प्रेक्षक वर्ग मिळत नाही. आपण नाट्यगृहे बांधताना ती बहुउपयोगी बांधण्याचा प्रयत्न केला तर बरे होईल. कलाकारांचे म्हणणे असे होते की, आपण नवीन नाट्यगृहे योजना हाती घेणार असाल तर त्यामध्ये निश्चितपणे असे पहावे लगेल की, त्या नाट्यगृहांचा वापर लग्न समारंभासाठी न होता, त्यामध्ये काही सुधारणा करून डॉल्बीसारखी यंत्रणा बसविली तर, मराठी चित्रपटांना गावोगावी चित्रपटगृह मिळण्याच्या समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी, त्यामध्ये लक्ष घालण्यासाठी निश्चितपणे काही तरी पावले टाकता येतील. सभापती महोदय, अनेक विषय असे आहेत की, ज्यावर विस्ताराने बोलता येईल. काही महत्त्वाच्या गोष्टी करणे खरोखर आवश्यक आहे आणि हे या राज्याच्या मूल्यवाढीसाठी गरजचे आहे.

सभापती महोदय, 956 दुर्मिळ ग्रंथांचे डिजिटायझेशन आणि तंजावर विद्यापीठात उपलब्ध असलेले मोडी लिपीतील ऐतिहासिक दस्तऐवज देवनागरी लिपित रूपांतर करणे असे उपक्रम हाती घेण्याचे म्हटले आहे. मला विचारावयाचे आहे की, हे कोणत्या शीर्षकाखाली आले आहे, हे मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या शीर्षकाखाली आले आहे. मराठी भाषेच्या संदर्भात वेगळा विभाग स्थापन झाल्यानंतर त्या संदर्भात पैसे कमी पडू दिले जाणार नाहीत असे कायमचे आश्वासन दिले गेले. पैसेच देत नाही तर ते कमी पडण्याचा प्रश्न येत नाही. शासनाचे भाषेशी, संस्कृतीशी व कलेशी काहीही देणे-घेणे राहिलेले नाही. आपण या संदर्भात विचार कसा करू शकता ? राज्याच्या स्वाभिमानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. सभागृहात या संदर्भात अनेक वेळा चर्चा झाली आहे. बोलणे योग्य आहे की नाही माहीत नाही परंतु मी बोलतोच. आपल्या अधिकारी वर्गाला अर्थसंकल्पाची तयारी करीत असताना ज्या पध्दतीचे ज्ञान पाहिजे ते नसावे. ज्ञानभाषा करायची आहे हे आपले उद्दिष्ट आहे. अधिकाऱ्यांना मराठी कळते की नाही अशी शंका निर्माण होते.

सभापती महोदय, मुंबईतील प्रसिध्द एशियाटिक ग्रंथालयाचे डिजिटायझेशन करण्यासाठी नियोजन विभागांतर्गत अवितरित नियतव्ययापैकी 5 कोटी रूपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे. हे मराठी वाचल्यानंतर नक्की 5 कोटी रूपये देणार आहात की नाही हा प्रश्न पडतो. शिल्लक राहिले त्यातून वळते केले, मग ते एशियाटिक ग्रंथालयाला दिले असा काही प्रकार आहे का ? समजा

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

तुमच्या सर्व चाचण्यांतून, चाळण्यांतून 5 काटी रूपयांचा निधी एशियाटिक ग्रंथालयाला देण्याचे ठरविले तरी त्याचा निश्चितपणे उपयोग करण्याची पध्दत काय आहे ? आज एशियाटिक ग्रंथालयाच्या संपूर्ण संवर्धनाची गरज आहे. राज्यातील ज्या काही दिमाखदार गोष्टी आहेत त्यामध्ये राज्याचे वैभव असणारे एशियाटिक ग्रंथालय आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले......

या ग्रंथालयाला 200 वर्षाचा इतिहास आहे. त्यासाठी काही तरी तरतूद करुन आपण उतराई होऊ, असा समज करुन घेणे सर्वथा चुकीचे आहे.

सभापती महोदय, वेगवेगळ्या दृष्टीकोनातून या अर्थसंकल्पाकडे बघितल्यानंतर मला असे वाटते की, देशामध्ये सत्तांतर झाल्यानंतर वर्षानुवर्षे चालत आलेल्या योजना बाजूला करण्यात आल्या आहेत. नियोजन आयोगाच्या जागी आता नीती आयोग आला आहे. अनेक वक्त्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे नावाची पाटी बदलली आणि बाकी सर्व तेच राहिले आहे का, असा प्रश्न आम्हाला पडला आहे. आपल्या राज्यात अर्थ व नियोजन हे दोन विभाग आहेत. अर्थसंकल्प तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये नियोजनाचा खूप मोठा सहभाग असला पाहिजे. अनेक वक्त्यांनी याचाही उल्लेख केला आहे की, केंद्र सरकारने एखादी योजना आणली की, फक्त नाव बदलून त्याच धर्तीची योजना आपल्या राज्यात तयार केली जात आहे. 'मेक इन इंडिया' प्रमाणे 'मेक इन महाराष्ट्र', 'स्वच्छ भारत अभियान' प्रमाणे 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान', अशा योजना आणण्यात आल्या आहेत. आपण या राज्याच्या नियोजनाबद्दल काही वेगळा विचार करणार आहोत का ? अशा प्रकारचा वेगळा विचार करण्याची संधी तुम्हाला प्राप्त झाली आहे. आपण कायम असे म्हणत राहिलो आहोत की, पूर्वीच्या काळात असे घडू शकले नाही आणि त्यामुळे आज ही परिस्थिती उद्भवली आहे. आता परिस्थिती बदलण्याची संधी आपल्याला मिळाली आहे. अर्थसंकल्प, आर्थिक नियोजन, आर्थिक शिस्त, विकास कामांचा वेगळा दृष्टीकोन आणि त्या निमित्ताने अर्थसंकल्पाचा विचार करीत असताना ज्या काही योजना आपण मांडत आहात, त्यामुळे या राज्यामधील गरीब-श्रीमंतांमधील दरी अधिक वाढणार नाही ना, असा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. ज्या योजना आपण या माध्यमातून आणीत आहात, शहरीकरणाच्या निमित्ताने असतील, एफएसआय वाढवून त्यामधून निधी उत्पन्न करण्याच्या माध्यमातून असतील, याचा सर्वाधिक फायदा कोणाला होणार आहे, सर्वसामान्य माणसाच्या जीवनातील आर्थिक स्तर बदलण्यासाठी त्याची नाळ जोडता येईल का ? अर्थसंकल्पावर एक सामाजिक न्यायाचा कुठला तरी शिक्का निश्चितपणे लावता येऊ शकेल का ? दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, या राज्यातील सामाजिक न्यायाचे जे प्रश्न आहेत,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महिलांच्या सुरक्षिततेचे आहेत, राज्यातील एकूण अर्थव्यवस्थेचे

...2....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले......

आहेत, विकेंद्रीकरणाचे आहेत, त्यामध्ये आपण कुठे तरी कमी पडत तर नाही ना ? अशा प्रकारची दरी पुढे वाढत गेली तर या मधून वर्गकलह सुध्दा उभा राहू शकतो. त्यामुळे या मागील तात्त्विक भूमिका काय आहे, हे तपासून बघण्याची गरज आहे.

सभापती महोदय, या राज्याचे माजी पोलीस प्रमुख स्वत: मीडियामध्ये जाऊन सांगतात की, मी अल्पसंख्याक समाजाचा असलो तरी आजपर्यंत माझ्या मनात जी भावना आली नव्हती, ती असुरक्षिततेची भावना आज निर्माण झाली आहे. आपण या सर्व वर्गाला दिलासा देणार आहात का, तो कृतीतून दिसणार आहे का, हे करीत असताना आपण योग्य पध्दतीने पुढील पावले टाकणार आहात का ?

सभापती महोदय, अर्थसंकल्प अशासाठी असतो की, राज्यापुढील प्रश्नांची उत्तरे त्यामधून आपल्याला शोधता येतील. पण दुर्दैवाने या अर्थसंकल्पाने उत्तरे सापडण्याऐवजी अधिकचे प्रश्न निर्माण केले आहेत. त्यामुळे या अर्थसंकल्पातील सर्वच बाबींचा आपण पुन्हा एकदा निश्चितपणे विचार करावा आणि संधी असेल तर त्यामध्ये सुधारणा करण्याची आपण तयारी ठेवावी. महाराष्ट्र देशात क्रमांक 1 चे राज्य असताना महाराष्ट्रामध्ये आपल्या कार्यकाळात अशी कामे झाली पाहिजेत की, जी पुढील काही पिढ्यांना सांगता आली पाहिजेत. या दृष्टीकोनातून आपण काय करणार आहात, हा एक मोठा प्रश्न आमच्यासमोर उभा राहिला आहे. हे एक प्रकारचे आव्हान आहे. काळाने, निसर्गाने दिलेले हे आव्हान आहे. निसर्गाच्या आणि काळाच्या समोर उभे राहून आपण या पुढील वाटचाल कशी करणार आहात, त्यासाठीचे आपले नियोजन काय आहे, हेही आपण स्पष्ट करावयास पाहिजे. या दृष्टीने आपण या अर्थसंकल्पाकडे पुन्हा एकदा निश्चितपणे बघावे. त्यातील सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म इकॉनॉमिक्स काय आहे, हा भाग कशा पध्दतीने सोडविणार आहात, दिलासा कसा देणार आहात, याचा सर्वंकष विचार करुन योग्य वाटतील त्या सुधारणांचा आपण आदर करावा. विरोधी पक्ष म्हणून जे काही आम्ही मांडत आलो आहोत त्याकडे विरोधासाठी विरोध या भूमिकेतून न बघता ज्या ठिकाणी आवश्यक आहे त्या ठिकाणी लवचिक राहण्याची गरज आहे. त्या पध्दतीने आपली वाटचाल व्हावी. अर्थसंकल्पामधून आपल्या राज्याच्या

श्री.हेमंत टकले......

सामान्य माणसाच्या दर्जामध्ये, त्यांना मिळणाऱ्या आरोग्य, शिक्षण, जलव्यवस्था, पायाभूत सुविधा यामध्ये निश्चितपणे भर पडेल, असे अपेक्षित असताना त्याबाबत आपण आमची निराशा केली आहे, हे खेदाने नमूद करुन मी या ठिकाणी थांबतो, धन्यवाद.

---------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती स्मिता वाघ (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, समाजातील सर्व घटकांना स्पर्श करणारा हा अर्थसंकल्प आहे. वृद्ध, कष्टकरी, महिला, शेतकरी, शेतमजूर, अल्पसंख्याक, युवक, युवती या सर्वांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प आहे. यासाठी मी माननीय अर्थ मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार व माननीय अर्थ राज्यमंत्री श्री.दिपकजी केसरकर यांना धन्यवाद देते, त्यांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, आपल्या सर्वांना माहीत आहे की, पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या अनुषंगाने मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना ही अतिशय चांगली योजना या सरकारने आणली आहे. ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था आपल्या सर्वांना माहीत आहे. कोणत्याही देशाचा, राज्याचा आणि गावाचा विकास व्हायचा असेल तर दळणवळणाची चांगली साधने उपलब्ध असली पाहिजेत. त्यामुळे शेतकऱ्याच्या शेतातील माल शहरापर्यंत पोहोचविला जाऊ शकतो किंवा छोटे, मोठे उद्योग त्या माध्यमातून येऊ शकतात. म्हणून ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था टाळण्यासाठी जवळपास 350 कोटी रुपयांचे नियोजन अर्थसंकल्पात केलेले आहे. दरवर्षी 1 हजार कोटी रुपयांचा भरीव निधी या माध्यमातून दिला जाणार आहे. ही अतिशय चांगली योजना सरकारने आणली आहे.

सभापती महोदय, राज्यात दारिद्र्य रेषेखालील लोकांना निवारा देण्यासाठी घरकुल योजना आहे. परंतु, लोकांकडे स्वतःची जागा नसते. त्यांना घरकुलासाठी जागा उपलब्ध होत नाही. गावठाण विस्तारीकरणामध्ये जागा देताना अनेक अडचणी येतात किंवा गावठाण नसेल तर जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी करतानाही त्या माणसाला जागा उपलब्ध होण्यामध्ये खूप अडचणी येत असतात. त्यासाठी पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना सरकारने आणली आणि त्यासाठी 50 हजार रुपयांचे अनुदान मिळवून दिले आहे. आयुष्यात प्रत्येकालाच असे वाटते की, आपले स्वतःचे घर असावे. या माध्यमातून त्यांचे स्वप्न साकार केले जाणार असल्यामुळे मी सरकारचे अभिनंदन करते.

...5....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती स्मिता वाघ.......

सभापती महोदय, मी 3 टर्म जिल्हा परिषदेची अध्यक्ष होते. त्यामुळे ग्रामीण भागातील अडचणी मला माहीत आहेत. जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात महिलांच्या सबलीकरणाच्या माध्यमातून सतत 5 वर्षे आम्ही महिलांना बाजारपेठ उपलब्ध करुन दिली होती. त्या माध्यमातून महिलांचा खूप चांगल्या पध्दतीने विकास होऊ शकला. महिलांना माल उत्पादित करता येतो, पण त्यांच्याकडे विक्री कौशल्य नसते. परंतु, या सरकारने महिलांना बाजारपेठ उपलब्ध करुन दिल्यामुळे महिलांची उन्नती त्या माध्यमातून होऊ शकेल. सरकारने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ योजनेसाठी 200 कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर केला आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये अशी बाजारपेठ उपलब्ध करुन दिली जाणार आहे. त्या माध्यमातून आमच्या महिलांचा सन्मान केला जात आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्याचा फार मोठा उपयोग होणार आहे.

सभापती महोदय, अडीच ते तीन या वयोगटातील मुलांवर संस्कार करण्याचे काम महिला अंगणवाडी सेविका आणि मदतनीस करीत असतात. हे करीत असताना त्यांना अतिशय कमी मानधन दिले जात होते. मागील सरकारने वाढीव मानधन मंजूर केले होते. पण त्यासाठी कोणतीही आर्थिक व्यवस्था केली नव्हती. आता या सरकारने 1 एप्रिल पासून ही योजना लागू करण्यासाठी आर्थिक व्यवस्था केली आहे व त्यामुळे या महिलांना चांगले जीवन जगण्यासाठी आधार मिळाला आहे. या सरकारने अशा प्रकारचे नियोजन केल्यामुळे महिलांना हे वाढीव मानधन मिळणार आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती स्मिता वाघ...

सभापती महोदय, सिंचन प्रकल्पाबाबत आपणा सर्वांना माहिती आहे की, सिंचन प्रकल्पांची किंमत वाढल्यामुळे ते पूर्ण होऊ शकले नाहीत. याबाबत अचूक, तांत्रिक व वित्तीय नियोजन करुन सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अत्यंत चांगला कार्यक्रम या सरकारने हाती घेतला आहे. एक वर्षात पूर्ण होणारे 38 सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्धार शासनाने केला असून त्यासाठी 7,272/- कोटी रुपयांची तरतूद बजेटमध्ये करण्यात आली आहे.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्राचा विकास आम्ही पाहिलेला आहे. उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा किंवा विदर्भ या भागातील सिंचन प्रकल्पाकडे मागील काळात दुर्लक्ष झाले आहे. मी सरकारला विनंती करते की, उत्तर महाराष्ट्रातील तापी खोरे महामंडळा अंतर्गत येणाऱ्या प्रकल्पासाठी भरीव मदत करावी. अमळनेर तालुक्यातील पाडळसे धरण शेतकऱ्यांचे आशास्थान आहे. तेथील बरीच जमीन कोरडवाहू आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करताना फार अडचणी निर्माण होतात. या प्रकल्पासाठी 14 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, ती अतिशय कमी आहे. ही तरतूद वाढवून देण्यात यावी अशी मी मागणी करतो. पाडळसे प्रकल्प त्या भागातील अत्यंत महत्वाचा आहे. यासाठी थोडी वाढीव तरतूद केली तर या प्रकल्पाचे काम पूर्ण होईल. राज्यातील सिंचन प्रकल्पांबाबत सरकारने चांगले नियोजन केले आहे. बजेट सादर करताना महिलांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यात आले आहे, त्याचप्रमाणे सर्वच घटकांकडे सरकारने लक्ष दिले आहे. त्यामुळे मी सरकारचे अभिनंदन करते व माझे भाषण संपविते, जयहिंद, जय महाराष्ट्र.

-------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंदराव पाटील (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-2016 च्या सर्वसाधारण अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मी उभा आहे

सभापती महोदय, आपण मला बोलण्यास संधी दिली त्याबाबत मी सुरुवातीला आपले आभार मानतो. महाराष्ट्रात सत्ता बदल झाल्यानंतर सन 2015-2016 चा पहिला अर्थसंकल्प या सरकारने सभागृहात सादर केला आहे. या अर्थसंकल्पात महसुली जमा 1 लाख 98 हजार 230 कोटी रुपये आहे. महसुली खर्च 2 लाख 1 हजार 988 कोटी रुपये अंदाजित केले आहेत. परिणामी 3 हजार 757 कोटी रुपये महसुली तूट येणार आहे. अनावश्यक खर्चात बचत करुन व महसुली वसुली अधिक प्रभावीपणे करुन ही तूट मर्यादित करु असे अर्थ मंत्री महोदयांनी सांगितले असले तरी प्रत्यक्षात कोणत्या प्रभावी उपाययोजना करणार याचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, सन 2014 च्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रातील जनतेला वेगवेगळी आश्वासने देऊन त्यांची दिशाभूल केली आहे. त्याचप्रमाणे अर्थसंकल्प सादर करुन जनतेची घोर निराशा करण्यात आली आहे. हा अर्थसंकल्प अत्यंत दिशाहीन आहे. यामध्ये कोणतेही नावीन्य दिसून येत नाही. एखादी कंपनी साच्यात बसवून बॅलन्सशीट तयार करते, त्याप्रमाणे माननीय अर्थ मंत्री महोदयांनी राज्याची बॅलन्सशीट सादर केली आहे. राज्यातील शेतकरी, गरीब, कष्टकरी व सामान्य जनतेला वेळोवेळी येणाऱ्या संकटाबाबत अर्थसंकल्पात चकार शब्दही नमूद केला नाही. त्यामुळे कृषी व औद्योगिक विभागाची अत्यंत निराशा झाली आहे.

सभापती महोदय, सन 2014 च्या निवडणुकीत खोटी व दिशाभूल करणारी आश्वासने देऊन मतदारांची फसवणूक करुन भारतीय जनता पक्षाने सत्ता हातात घेतली आहे. भारतीय जनता पक्षाने 177 कलमी जाहीरनामा तयार करुन त्यामध्ये महत्वाचे 17 विषय मांडले होते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सुगीचे दिवस येणार असे आश्वासन दिल्यामुळे मतदारांनी भाजपला भरभरुन मते देऊन निवडून दिले. युती शासनाचे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन म्हणजे असे म्हणावेसे वाटते की, 'नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न'. युती शासन सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांना व सामान्य

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंदराव पाटील....

जनतेला दिलेली अनेक आश्वासने फोल ठरत आहेत. 'मेक इन महाराष्ट्र' या घोषणेला काळे फासण्यात आले. महाराष्ट्रातील संकटात सापडलेला ऊस, कापूस, कडधान्य, दूध, सोयाबीन व फळबागांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अर्थसंकल्पात कोणतेही ठोस आश्वासन दिसत नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील महत्वपूर्ण ऊस दराबाबत आजपर्यंत या शासनाने निर्णय घेतलेला नाही. सहकारी साखर कारखान्याचा हंगाम बंद होण्यास 2 महिन्याचा कालावधी बाकी आहे. सभापती महोदय, हा अर्थसंकल्प वाचल्यानंतर असे दिसते की, हा अर्थसंकल्प दिशाहीन व चिन्हांकित असल्यामुळे मतदारांच्या व शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम या सरकारने केले आहे. यातील काही महत्वाच्या मुद्यांवर मी भाष्य करणार आहे.

सभापती महोदय, पुरोगामी महाराष्ट्र राज्याचे स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.वसंतदादा पाटील, व स्व.वसंतराव नाईक यांनी खंबीरपणे नेतृत्व करताना राज्यातील सर्व विभागांना न्याय देण्याची भूमिका घेतली होती. राज्याचा सर्वांगीण विकास करताना कृषी, औद्योगिक रचनेचा विचार करुन योजना आखल्या व त्याचा पुरस्कार आघाडी सरकारने केला. आता राज्यातील शेतकरी सर्व बाजूंनी संकटात सापडला आहे. विदर्भ व मराठवाड्यात आत्महत्यांचे सत्र सुरुच आहे. अवकाळी पाऊस गारपिटीने संपूर्ण राज्यात हाहाकार उडवून दिला आहे. सरकारकडून शेतकऱ्यांना फक्त मदतीची आश्वासने दिली जात आहेत. अशा वेळी अर्थसंकल्पाकडून शेतकऱ्यांची घोर निराशा झाली आहे. कृषी क्षेत्रात कधी नव्हे एवढा महाराष्ट्र मागे पडला आहे. याबाबत सरकारला आपली जबाबदारी झटकता येणार नाही, त्यांना मदत करावीच लागेल. जुजबी योजनांच्या घोषणा करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवणाऱ्या योजना सरकारला आखाव्या लागतील.

सभापती महोदय, आज पश्चिम महाराष्ट्रातील सहकार चळवळ मोडीत काढण्याचे काम पध्दतशीरपणे सुरु आहे. सहकारी साखर कारखान्यांबाबत सरकारची धोरणे अत्यंत उदासीन आहेत. सरकार ऊसाच्या प्रश्नांवर हात झटकत आहे, एफआरपी प्रमाणे दर देण्यावर भर दिला जात आहे. राज्य व केंद्र सरकार साखर कारखान्यांकडून कर रुपाने प्रचंड पैसा मिळतो. सहकारी साखर कारखाने अडचणीत असताना त्यांना मोडीत काढण्याचे काम सुरु आहे. याबाबत अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंदराव पाटील....

सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षात आघाडी सरकारने सहकारी साखर कारखान्यांना व शेतकऱ्यांना मदत करण्याची ठाम भूमिका घेतली होती. त्यासाठी कोट्यवधी रूपयांची पॅकेजेस देऊन अनेक योजना राबवून राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे महत्वपूर्ण काम केले होते.

सभापती महोदय, आज औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र पुन्हा पिछाडीवर चालला आहे. वाढती महागाई व मोठ्या प्रमाणात वाढणारे विजेचे दर यामुळे मूलभूत सोयी सुविधांचा अभाव निर्माण झाला आहे. अशी अनेक कारणे निर्माण झाली आहेत. औद्योगिक विजेचे दर सतत वाढत असल्यामुळे राज्यातील उद्योग शेजारील राज्यात चालले असून त्याचा गंभीर परिणाम येणाऱ्या काळात होणार आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात कोणतीही योजना जाहीर केली नसून तरतूद देखील केलेली आहे. हे या राज्याचे दुर्दैव म्हणावे लागेल. शेतीपंपाचे व औद्योगिक वीज दर ठरविताना ठराविक उद्योगांना सबसिडी देण्याचे धोरण होते. त्याबद्दल कोणताही उल्लेख अर्थसंकल्पात करण्यात आला नाही. अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत करताना कृषी संजीवनी सारख्या योजना आखाव्या लागतील याचाही विचार बजेटमध्ये करण्यात आला नाही, हे महाराष्ट्राचे दुर्दैव म्हणावे लागेल.

सभापती महोदय, राज्यात सुरु असलेल्या व मंजूर असलेल्या विकास कामांना सर्रास कात्री लावण्यात आली असून अपेक्षित तरतूद बजेटमध्ये करण्यात आली नाही. विकासाची एकही नाविन्यपूर्ण योजना अर्थ मंत्री महोदयांनी जाहीर केली नाही. ज्या विकास योजना आहेत त्यांच्यासाठी तरतूद करताना मोठ्या प्रमाणात कपात करण्यात आली आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाबाबत ठाम भूमिका दिसत नाही. शाहू स्मारकाबाबत सरकार उदासीन आहे. मेट्रो रेल्वे पुणे, मुंबई व नागपूर येथे प्रस्तावित असल्याचे अर्थमंत्र्यांनी सूचित केले आहे. रेल्वेचे प्रकल्प राज्य व केंद्र शासनाच्या भागीदारीतून पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यासाठी अत्यंत तुटपुंजी तरतूद करण्यात आली आहे. रेल्वे मंत्री महाराष्ट्रातील असताना सदरच्या प्रकल्पांसाठी तरतूद करण्यात उदासीनता दिसत आहे. फक्त घोषणांचा पाऊस पाडण्यात आला असून त्यासाठी तरतूद कमी पडू दिली जाणार नाही असे अर्थ मंत्री वारंवार सांगत आहेत. निधीची उभारणी कशी करणार याबाबत कोणताही कार्यक्रम तयार करण्यात आलेला नाही.

....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंदराव पाटील....

सभापती महोदय, टोल मुक्त महाराष्ट्र करणार म्हणून मोठ्या दिमाखात प्रचार करण्यात आला होता. कोल्हापूर जिल्हा टोलमुक्त करण्याचा निर्धार केला होता. परंतु सरकार आता आपल्याच आश्वासनापासून पळ काढत असून टोलबाबत कोणतीही योजना व तरतूद अर्थसंकल्पात केल्याचे दिसून येत नाही.

सभापती महोदय, आघाडी सरकारने तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जलग्राम ही योजना तयार केली होती. वसंतदादा पाटील यांनी देखील त्या काळात वसंत बंधाऱ्यांच्या माध्यमातून काही योजना महाराष्ट्रात राबविल्या होत्या. त्याचप्रमाणे साखळी बंधारे योजना आघाडी सरकारने राबविली होती. या सर्व योजनांची नावे बदलून 'जलयुक्त शिवार योजना' या सरकारने जाहीर केली असून या योजनेसाठी 1000 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येतील असे बजेटमध्ये नमूद केले आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंदराव पाटील............

आम्ही जल युक्त शिवार योजने अंतर्गत यावर्षी 5 हजार गावे टंचाई मुक्त करु अशी घोषणा करण्यात आलेली आहे. ज्या गावांमधील पावसाचे पाणी वाहून जाते ते अडविण्यासाठी कमीत कमी 25 कोटी रुपये लागणार आहेत. 1 हजार कोटी रुपयांमध्ये फक्त 40 गावे होऊ शकतात. म्हणून हा सर्व घोषणांचा खेळ आहे. केंद्र शासनाने अमरावती विभागात विदर्भ सधन सिंचन योजनेसाठी 5 वर्षात 2300 कोटी रुपये देण्याची तरतूद केली होती. राज्य शासनाने त्याच धर्तीवर महात्मा फुले जलभूमी योजना लागू केली होती. त्या योजनेमध्ये काही सुधारणा करुन प्रत्येक कृषी अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत 2-3 गावांची निवड करण्यात आली होती. त्या गावांसाठी निधी देखील उपलब्ध करुन देण्यात आला होता. परंतु, आता जल युक्त शिवार योजनेत त्याच गावातील एक-एक गाव निवडण्यात आले आहे. विदर्भ सधन सिंचन योजना व महात्मा फुले जलभूमी योजनेसाठी आलेला पैसा या कामासाठी वापरण्यात येत आहे. महात्मा फुले यांनी राज्याला दिशा दिली. परंतु त्यांच्या नावाने सुरु असलेल्या योजनेचे नाव बदलून आता नवीन योजना सुरु करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर बोलताना सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी एक कविता म्हटली होती. मी एक अभंग म्हणणार आहे. मी स्वतः तो अभंग तयार केलेला आहे. तो अभंग असा आहे की,

"दिन दयाळा तू पांडुरंगा, रुप तुझे भोळे,

या ऐवजी मी रचना केलेली आहे की,....

दिन दयाळा तू युती शासना, रुप तुझे भोळे."

महाराष्ट्रातील शेतकरी, धनगर समाज तुमच्या भूल थापांच्या मागे लागला. परंतु, त्या सर्वांचे तुम्ही वाटोळे केले. हा अर्थसंकल्प जन सामान्यांच्या विरोधी आहे. अच्छे दिन आने वाले है, या ऐवजी महाराष्ट्राची अधोगती करणारा हा अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदय, मी या अर्थसंकल्पाचा तीव्र विरोध करतो, निषेध करतो आणि एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2015-16 चा सुमारे 3,757 कोटी रुपये महसुली तुटीचा व सुमारे 643 कोटी रुपये प्रस्तावित कर वाढीचा 54,999 कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करण्यात आलेला आहे. या अर्थसंकल्पात राज्यातील सर्व जनतेचे हित जपण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आलेला आहे, याबद्दल मी शासनाचे सर्वप्रथम अभिनंदन करतो, स्वागत करतो.

सभापती महोदय, जीवनावश्यक वस्तूंवरील कर सवलत कायम ठेऊन महिलांसाठी मासिक 10 हजार रुपये वेतनापर्यंतचा व्यवसाय कर माफ करण्यात आलेला आहे. त्यामुळे 1 लाख 50 हजार नोकरदार महिलांना याचा लाभ होणार आहे. विद्यार्थ्यांसाठी वर्क बुक, आलेख, चित्रकला व प्रयोग शाळा वही करमुक्त करण्यात आली आहे, ही वाखाणण्याजोगी बाब आहे. तसेच, नागपूर येथील मिहान प्रकल्पासाठी 200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. खरे म्हणजे, 400 कोटी रुपयांची मागणी होती. शासनाने ही मागणी पूर्ण करुन मिहान प्रकल्पासाठी आणखी 200 कोटी रुपयांची तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, अपूर्ण असलेले 38 सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 7,272 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे, ही बाब देखील अभिनंदनीय आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी 4 हजार कोटी रुपयांची मदत आणि 171 कोटी रुपयांचे कर्ज माफ करणे, ही देखील अभिनंदनीय बाब आहे. रस्ते बांधणीसाठी 1 हजार कोटी रुपये अतिरिक्त निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे आणि 1,413 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानासाठी 1,690 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. सर्व शिक्षा अभियानासाठी आज पर्यंत जेवढा खर्च करण्यात आलेला आहे तो योग्य प्रकारे वापरला गेला नाही. म्हणून या योजनेचा उद्देश पूर्ण होऊ शकला नाही. सर्व शिक्षा अभियानाच्या खर्चात जो गैरप्रकार झाला त्याची चौकशी झाली पाहिजे, अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. अनेक अधिकारी सरकारचे उद्दिष्ट पूर्ण करु देत नाहीत. कारण, शासकीय यंत्रणा ब्रिटीश शासनाने

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो पुंडलिक गाणार.......

निर्माण केलेली आहे आणि ती जशीच्या तशी सुरु आहे. शासन धोरण ठरविते, अंदाजपत्रक तयार करते, निधी उपलब्ध करुन देते. परंतु ज्या उद्देशाने धोरण ठरविले जाते, निधी उपलब्ध करुन दिला जातो, तो उद्देश पूर्ण होत नाही. कारण, अधिकारी शासनकर्त्यांपेक्षाही जास्त वरचढ झालेले आहेत. म्हणून भ्रष्टाचार बोकाळला आहे. मुळात म्हणजे, ही प्रशासकीय यंत्रणा बदलण्याची गरज आहे, या दृष्टीने मी हा मुद्दा मांडलेला आहे.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्राकरिता करण्यात आलेली 30 हजार कोटी रुपयांची तरतूद अपुरी आहे. शिक्षणाकरिता कमी खर्च करणे म्हणजे राज्याला विकासापासून रोखणे होय. राज्याच्या तिजोरीत पैसा कमी असेल आणि तो वाढवायचा असेल तर शिक्षणाकरिता जास्त खर्च केलाच पाहिजे. शिक्षणाकरिता खर्चात कपात करण्यात येऊ नये. आम्ही ज्या अनेक शाळा पात्र ठरविल्या त्या 1,398 माध्यमिक शाळा, 118 प्राथमिक शाळा, 926 शिक्षकांची पदे मंजूर असलेल्या शाळा आर्थिक निधीची तरतूद न केल्यामुळे सन 2008-09 या शैक्षणिक वर्षापासून अनुदानापासून वंचित राहिलेल्या आहेत. माझी मागणी आहे की, शिक्षण क्षेत्रातील सर्व स्तरावरील शाळा ज्या अनुदानासाठी पात्र ठरलेल्या आहेत, शिक्षण क्षेत्रातील जी पदे अनुदानासाठी पात्र आहेत त्या सर्वांना अनुदान देण्याची तरतूद केली पाहिजे. तसेच, अंगणवाडीमधील महिला सेविकांना आणि मदतनीसांना योग्य तो मोबदला मिळाला पाहिजे. आज त्यांना 2 हजार रुपये मोबदला मिळतो. 2 हजार रुपयांमध्ये अंगणवाडीमध्ये जाण्या-येण्याचा खर्च देखील निघत नाही. नवीन पिढी घडविण्याची जबाबदारी आम्ही त्यांच्यावर सोपवितो. म्हणून माझी या निमित्ताने मागणी आहे की, अंगणवाडी महिला सेविकांना किमान 8 हजार रुपये आणि मदतनीस यांना किमान 5 हजार रुपये मोबदला दिला पाहिजे.

सभापती महोदय, अपंग समावेशी शिक्षण योजना माध्यमिक स्तर अंतर्गत काम करणाऱ्या 1365 शिक्षकांना मागील तीन वर्षापासून वेतन मिळत नाही. ते वेतन देण्यासाठी तरतूद केली पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो गाणार........

सभापती महोदय, आपण मला अर्थसंकल्पावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि एकच महत्वाची मागणी करतो की, आपली प्रशासन यंत्रणा मुळासकट सुधारल्याशिवाय अंदाजपत्रकात पाहिलेले स्वप्न साकार होणार नाही. ते साकार करावे, अशी अपेक्षा करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**केंद्र शासनाने दुष्काळासाठी निधी देण्याचे जाहीर केल्याबाबत.**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सभागृहात अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरु आहे. केंद्र शासनाने राज्याला दुष्काळासाठी 2 हजार कोटी रुपये मदत देण्याची घोषणा सायंकाळी 7.00 वाजता केलेली आहे. सभागृहाच्या माहितीस्तव मी हा मुद्दा उपस्थित केलेला आहे. (...अडथळा...) यापूर्वी केंद्र शासनाकडून 500 ते 700 कोटी रुपयेच मदत मिळत होती. आपण रेकॉर्ड काढून बघू या. केंद्र शासनाकडून राज्याला दुष्काळासाठी 2 हजार कोटी रुपये मिळालेले आहेत, म्हणजे सुरुवात चांगली झालेली आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केंद्र शासनाने राज्याला दुष्काळासाठी 2 हजार कोटी रुपये देण्याची घोषणा केलेली आहे, असे सांगितले. ही तरतूद अत्यंत तुटपुंजी आहे. राज्य शासनाने केंद्र शासनाकडे 7 हजार कोटी रुपयांची मागणी केली होती.

**तालिका सभापती :** मी आपल्याला सांगू इच्छितो की, शासनाकडून या संदर्भात सभागृहात अधिकृतपणे घोषणा होईल. त्यानंतर आपल्याला या संदर्भात काही चर्चा करावयाची असल्यास ती करावी. परंतु, आता आपण यावर चर्चा करु नये.

------

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर बोलण्यासाठी माझ्याकडे ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत, ती नावे मी आपल्याला वाचून दाखवितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज अर्थसंकल्पावरील चर्चा माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह पूर्ण करावयाची आहे.

**तालिका सभापती :** अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी माझ्याकडे ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत, परंतु ज्यांना अद्याप बोलण्याची संधी मिळालेली नाही ते सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित आहेत. त्यांची नावे मी आपल्याला वाचून दाखवितो. जे सन्माननीय सदस्य गैर हजर आहेत त्यांची नावे मी उच्चारणार नाही. श्री.हरिसिंग राठोड, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री सुधीर तांबे, जयदेव गायकवाड, जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री नरेंद्र पाटील, भाई गिरकर, पांडुरंग फुंडकर, विनायक मेटे या सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावर बोलावयाचे आहे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माझे नाव नाही काय ?

**तालिका सभापती :** माझ्याकडे जी नावे आलेली आहेत, त्यामध्ये तुमच्या नावाचा समावेश नाही. मी आता ज्या सन्माननीय सदस्यांची नावे उच्चारली त्यांनाच उद्या अर्थसंकल्पावर बोलण्याची संधी मिळेल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, बुधवार, दिनांक 25 मार्च, 2015 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल.

सकाळी 10.00 ते 11.30 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. विशेष बैठकीत मी मघाशी ज्या सन्माननीय सदस्यांची नावे वाचून दाखविली त्या सदस्यांच्या भाषणासह अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पूर्ण करण्यात येईल.

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते).....**

ज्या सन्माननीय सदस्यांची नावे मी आता उच्चारली, त्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल. माननीय वित्त मंत्री प्रश्नोत्तराच्या तासानंतर चर्चेला उत्तर देतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 07 वाजून 51 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 25 मार्च, 2015 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION